म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. ११८०
९५६३



REFBK-0013168

# भारत माझें घर !

[ AT HOME IN INDIA ]

लेखिका :

सिन्थिया बोल्स्

अनुवादिका :

श्यामला आगाशे

दा. क्र. ९३७६८

REFBK-0013168

ग. पां. प… …र, मुंबअी ४

मूल्य २·५० रुपये

At Home In India
by
Cynthia Bowles

© 1956 by Harcourt, Brace and Company, Inc.

आवृत्ति पहिली, १५।१।१९६३

प्रकाशक : विष्णु गजानन परचुरे. ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर, गोरेगांवकर चाळ २, गिरगांव, मुंबअी ४

मुद्रक : वि. पु. भागवत, मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, गिरगांव, मुंबई ४

# प्रस्तावना

१९५१ सालच्या ऑक्टोबर महिन्यांत मी माझे आईवडील आणि धाकटीं भावंडं, कनेक्टिकमधल्या घराचा तात्पुरता निरोप घेऊन भारतांत येण्यासाठीं निघालों. मी तेव्हां पंधरा वर्षांची होतें.

भारतांत जातांना माझी दृष्टि अभ्यासकाची नव्हती. भारतांतील धर्म, चालीरीती किंवा आर्थिक विकास यांची माहिती करून घेण्यासाठींहि मी गेलें नव्हतें. भारत आणि अमेरिका यांची तुलना करून कुठल्याच तऱ्हेचं मतप्रदर्शनहि मला करायचं नव्हतं.

मी गेलें ती घराच्या मायेची पांखर सोडायला नाराज असलेली एक किशोर-वयाची मुलगी म्हणून. माझं खरं घर मात्र कनेक्टिकमध्येंच राहिलं होतं. तेथील सुखशांति सोडून जाणं माझ्या अगदीं जिवावर आलं होतं.

अर्थातच हें पुस्तक म्हणजे भारताबद्दलची माहिती आणि आंकडेवारी नाहींच मुळीं. त्यामध्यें सर्वसामान्य भारताबद्दल जाडीं जाडीं विधानं किंवा भाकितंहि नाहींत. मी भारतांत काय काय केलं, कुठें कुठें गेलें आणि कुठल्या माणसांची मैत्री संपादन केली एवढीच ही कथा आहे.

मी भारतांत जवळजवळ दोन वर्षं होतें. या पुस्तकाचा बराचसा भाग त्या काळांतच लिहिला गेला. त्यावेळीं अमेरिकेंतल्या मित्रमैत्रिणींना पाठवलेलीं पत्रं आणि माझ्या दैनंदिनीमधली टिपणं यांचंच हें सकलन आहे.

हें पुस्तक लिहितांना माझ्या मनांत दोन हेतू आहेत. एक तर माझे अनुभव तुम्हांला सांगून सहसंवेदनाची मजा मला चाखावयाची आहे. मीं पाहिलेल्या भारताचं चित्र जसंच्या तसं तुमच्यापुढें रंगविण्याची माझी उमेद आहे. माझ्या

भारतांतील सुहृदांबद्दल तुमच्याहि मनांत मी मित्रभाव निर्माण करूं शकेन अशी मला आशा आहे.

दुसरा हेतु असा कीं, हें पुस्तक वाचून भारतांतल्या आणि अमेरिकेंतल्या किंबहुना सर्व जगांतल्याच मुलांमुलींमध्यें असलेलं विलक्षण साम्य माझ्याप्रमाणेंच तुमच्याहि लक्षांत यावं. आजच्या जगांतील संशयग्रस्त वातावरणांत वरकरणी दिसणाऱ्या भिन्नतेपेक्षां, या फार मोठ्या आणि मूलभूत साम्याची जाणीव ठेवण्यांतच शांततामय सहजीवनाची आशा लपलेली आहे असा माझा विश्वास आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३९९४९ वि: चोरे
क्रमांक ...११५०.....
९३७६९

मला कदाचित् भारतांत जावं लागेल हें मला प्रथम कळलं तें ५१ सालच्या जुलै महिन्यांत. मी तेव्हां पंधरा वर्षांची होतें. त्या उन्हाळ्याच्या सुट्टींत न्यू हॅम्पशायरमधील एका घरीं मी मुलं साभाळण्याचं (baby sitling चं) काम घेतलं होतं. पोर्चमधल्या झूल्यावर मी पडलें होतें. इतक्यांत हातांतल्या वृत्तपत्रांतील एका मथळ्यानं माझं लक्ष वेधून घेतलं.

"श्री. बोल्स् यांची भारतांतील जागेवर नेमणूक होण्याची शक्यता"

असा तो मथळा वाचून मी दचकलेंच. तसं पाहिलं तर माझ्या वडिलांची परदेशांतील वकिलातींत नेमणूक होण्याची शक्यता बरेच दिवस ऐकिवांत होती. त्यांत नवीन असं कांहींच नव्हतं. वसंत ऋतूच्या सुरुवातीला त्यांना दुसऱ्या एका देशांत वकील म्हणून जाण्याबद्दल विचारणा आली होतीच, आणि सुट्टी सुरू होऊन मी न्यू हॅम्पशायरकडे निघण्यापूर्वी काहीं दिवस भारतांतील या जागेचा प्रश्न उपस्थित झाला होता. पण 'असेल आपली अफवा झालं' असं म्हणून मी त्याकडे दुर्लक्ष केलं होतं आणि घरांत चालणाऱ्या चर्चेला मुळींसुद्धां महत्त्व दिलं नव्हतं. पण आत्तां वाचलेली वृत्तपत्रांतील जाहीर बातमी निव्वळ अफवेपेक्षां निश्चितच अर्थपूर्ण होती, आणि तिच्यामुळेंच, बाबांची ही नेमणूक पक्की होण्याचा फार दाट संभव आहे याची मला एकदम जाणीव झाली.

माझ्या डोक्यांत विचारांची एकच गर्दी उसळली.. "बाबा भारतांत गेले तर आम्ही सर्व भावंडं पण जाऊं का? भारतामध्यें आपलं घर कसं असेल बरं! पण मग आमची शाळा!..." पण हे सर्वच प्रश्न सुटी संपवून घरीं पोंचेपर्यंत

अनुत्तरितच राहिले. कनेक्टिकमधल्या इसेक्स या छोटेखानी गांवांतील माझ्या घरीं मी गेलें, तेव्हां उन्हाळा संपला होता.

बाबांना—त्यांना जवळजवळ सगळेच लोक 'चेट्' म्हणतात—त्यांची नेमणूक नक्की झाल्याची खात्रीच वाटत होती. त्यांना आशियाबद्दल नेहमींच एक प्रकारचा विशेष जिव्हाळा वाटायचा. भारत आणि आग्नेय आशियांतील राष्ट्रें यांमध्यें पुढच्या पिढ्यांचा इतिहास घडणार आहे असा त्यांचा दृढ विश्वास होता.

सप्टेंबरमध्यें प्रे. ट्रूमन यांनीं बाबांच्या नेमणुकीला अधिकृत मान्यता दिल्याचं जाहीर झालं. कनेक्टिकट सोडून भारतांत जाण्याच्या कल्पनेनं आम्हां सर्वांच्या मनांत उमटलेले साद पडसाद किती भिन्न होते! महाविद्यालयीन शिक्षण संपविल्यानंतर आमची आई कित्येक आठवडे भारतांत राहून आली होती. ती केव्हांहि परत जाण्यासाठीं उत्सुकच होती. पण गेल्या कांहीं वर्षांत आम्ही इतके वेळां बदल्या होऊन गांवोगांव फिरत होतों कीं, इथूनहि लगेच निघायचं म्हणजे आम्हां तिघांच्या दृष्टीनं तिला तें अहिताचंच वाटत होतं. आम्हांला जरा स्थिर होण्याची संधीच मिळत नव्हती.

ताई आणि दादा, दोघं पडले संसारी. आपापल्या नोकऱ्या आणि घरंदारं सोडून येणं त्यांना शक्यच नव्हतं. आम्हांला मिळत असलेल्या संधीचा हेवा करण्यापलीकडे ते दुसरं काय करणार? आमची धाकटी सॅली—ती तेराच वर्षांची होती. तिची अधीरता अगदीं शिगेला पोंचली होती. बाबांच्या बरोबरीनं, कांकणभर जास्तच, तिलाच घाई झाली होती! सॅम तेव्हां बारा वर्षांचा होता. येथील शाळेंत त्याचं बस्तान नीट जमलं होतं आणि नवे खेळ शिकायचे या कल्पनेवर खूष होती स्वारी.

या सगळ्याचं दुसरं टोंक म्हणजे मी. खरं सांगायचं तर भारतांत जायला मी अनुत्सुक होतें. भारत देश पाहण्याची मला इच्छाच नव्हती असा याचा अर्थ नाहीं; पण माझं गांव, शाळा, मित्रमैत्रिणी हें सोडणं माझ्या जिवावर आलं होतं. इथें येण्यापूर्वी बाबा गव्हर्नर पदावर असतांना आम्ही दीड वर्ष कनेक्टिकटमध्यें हर्टफोर्डला होतों. सप्टेंबरपासूनच हायस्कूलमध्यें महाविद्यालयांत प्रवेश करण्यापूर्वीच्या दोन वर्षांपैकीं माझं एक वर्ष पुरं होऊन दुसरं सुरू झालं होतं आणि नुकतंच कुठें माझं आयुष्य जरा स्थिर होत होतं. माझं मित्रमंडळहि

इथें छान जमलं होतं आणि अशांतच मी पुन्हा दूर गेलें तर माझ्या चिमुकल्या जगांत महत्त्वाचं स्थान बनून राहिलेल्या या मैत्रीला मी मुकेन असं मला वाटत होतं.

याचबरोबर अशी संधि पुन्हा येणार नाहीं आणि आतां गेलं नाहीं तर पुढंमागं पश्चात्ताप करण्याची वेळ येईल याचीहि जाणीव मला होती. खरं म्हणजे अशी सुवर्णसंधि मिळाल्याबद्दल स्वतःला भाग्यवान् समजून उत्साहानं फुलून जायचं तर तें सोडून मी अशी निरुत्साही होतें या विचारानंच मनाला अपराधी बोंचणी लागली होती.

सुदैवानं या बाबतींत निर्णय घेण्याची वेळ माझ्यावर आलीच नाहीं. माझ्या मनाची दोलाचलवृत्ति लक्षांत घेऊन, मला घेऊन जायचं असं आईबाबांनींच ठरवून टाकलं. याबद्दल मला नंतर फारच समाधान वाटलं असलं, तरी तेव्हां मात्र माझी जराशी निराशाच झाली होती. माझी नाराजी माझ्या प्रत्येक हालचालींतून व्यक्त होत होती. मुकाट्यानं शाळेंत जायचं, गप्प गप्प बसून राहायचं,...चालतंफिरतं औदासीन्यच जणुं! नंतर या गोष्टी माझ्या मैत्रिणींनीं मला सांगितल्या. भारताची सफर मीं सुरू केली ती अशा विचित्र मनःस्थितींत!

बाबांच्या नेमणुकीला सीनेटमध्यें बहुमतानं मान्यता मिळणं आवश्यक होतं. ९ ऑक्टोबरच्या सभेमध्यें हा मुद्दा मताला टाकण्यांत आला. तोंपर्यंत आमचं घर म्हणजे नुसता गोंधळ! त्यांतून भरीला अनिश्चितता. किती गोष्टींची बांधाबांध करायची होती त्याला तर गणतीच नाहीं. कपडे, पुस्तकं, छोटं फर्निचर, कांचसामान, सायकली, वाद्यं आणि सटरफटर इतर—एक ना दोन, हजार गोष्टी. त्यांतलं कांहीं सामान जायचं होतं बोटींतून, कांहीं मालवहातुक करणाऱ्या विमानानं, तर उरलेलं नित्याचं म्हणून आमच्याबरोबरच ठेवायचं होतं! ट्रंका, सूटकेसेस्, बॅग्ज यांच्या पसाऱ्यानं घरांत पाय ठेवायलासुद्धां जागा उरली नाहीं. त्यांतच आईच्या मदतीला म्हणून नातेवाईक म्हणा, मैत्रिणी म्हणा, कोणी ना कोणी असायचं. धुमाकूळ नुसता!

हा पसारा तसाच टाकून सारखं डॉक्टरांकडे तपासणीसाठीं जावं लागे. इंजेक्शन्स् तर किती घेतलीं त्याची मोजदादच नाहीं. आज काय टायफॉईड, उद्यां काय कॉलरा, परवां म्हणे धनुर्वात तर तेरवां आणखी कांहीं.

९ ऑक्टोबरला सीनेटमध्यें या नेमणुकीला मान्यता मिळाल्याचं संध्या-काळच्या सुमाराला कळलं एकदांचं. म्हणजे आतां बांधलेलं सामान सोडायला नको! आतां खरोखरीचाच निरोप घ्यायची वेळ आली. तेरा तारखेच्या विमानाचं रिझर्व्हेशन पक्कंहि केलं.

जायचं नक्की ठरल्यानंतर घरांतला गोंधळ जरा कमी झाला. या वेळांत कितीतरी वेळां पाहावं तर आमची आई आपली भारताबद्दल नाहींतर आशिया-बद्दल एखादं पुस्तक वाचण्यांत गढलेली असायची : आमच्या आईला घरांत आणि बाहेरहि 'स्टेब्' म्हणतात. भारतांत ती १९२७ सालीं गेली होती. तेव्हांच्या तिच्या आठवणी अगदींच अस्पष्ट होत्या. नेहरूंचं आत्मचरित्र, जॉन न्युएल यांचं 'इंटरव्ह्यू विथ इंडिया', लुई फिशर यांनीं लिहिलेलं गांधींचं चरित्र इत्यादि पुस्तकांच्या मदतीनं आपल्या आठवणींना ती उजाळा देत होती आणि आधुनिक भारताशीं प्राथमिक परिचय करून घेत होती.

भारतांत येण्यापूर्वी भारताबद्दल शक्य तेवढी माहिती पुस्तकांतून आणि इतर मार्गांनीं मिळवण्याचा आमचा प्रयत्न जारीनं चालू होता. पण वेळच किती थोडा. मी, सॅली आणि सॅम अक्षरशः कोऱ्या पाट्याच होतों म्हटलं तरी चालेल. अर्थात् ४८ सालीं गांधीजी गेले आणि राष्ट्रनेते म्हणून नेहरूंनीं त्यांची जागा घेतली एवढं आम्हांला माहीत होतं. पण ब्रिटिशांची वसाहत म्हणून एके काळीं त्यांच्या अंमलाखालीं असलेल्या हिंदुस्थानच्या परिस्थितीची आम्हांला कांहींच माहिती नव्हती. हिंदवी स्वातंत्र्याच्या चळवळीचीहि आम्हांला विशेष माहिती होती असं नाहीं. ४७ सालानंतर प्रगतिपथावर नव्या दमानं जी आश्चर्यकारक प्रगति भारतानं केली त्याबाबत आम्हाला अगदीं अंधुक जाणीव होती.

मुंबई आणि कलकत्ता यांसारख्या मोठ्या शहरांबद्दल कांहीं ना कांहीं ऐक-लेलं होतं. खरा भारत खेड्यांमधून वसला आहे हें आम्हाला नंतर कळलं; पण अमेरिका सोडतांना या खेड्यांची आम्हांला कल्पनाहि नव्हती.

भारताचं दारिद्र्य, तेथील लक्षावधि केविलवाणे भुकेले लोक यांचीं वर्णनं आमच्या कानांवर आलीं होतीं, पण त्याचबरोबर या दारिद्र्याचं समूळ उच्चाटन करण्यास बद्धपरिकर झालेल्या नवभारताच्या नेत्यांबद्दल मात्र आम्हीं कांहींच

ऐकलं नव्हतं. भारतीय जनतेला खऱ्या अर्थानं नवजीवनाची आशा देणाऱ्या ग्रामसेवकांच्या कार्याची तर आम्हांला पुसटशी देखील कल्पना नव्हती.

आम्हीं ऐकलं होतं तें साप, गारुडी, साधू आणि महाराजे यांच्याबद्दलच. लोक या गोष्टींना गैरवाजवी महत्त्व देत, हें प्रत्यक्ष तिथें गेल्यावर लक्षांत येतं.

भारतांतील उष्मा आणि धूळ यांबद्दलहि सगळे बोलत असत पण कसा अन् कां कुणास ठाऊक, निरभ्र आकाशाच्या प्रसन्न वसंत ऋतूचा उल्लेखहि कधीं ऐकला नव्हता. निसर्गाची विविधरंगी, विविधगंधी पुष्पकिमया, वातावरणाचं माधुर्य वाढणारे पक्षिगण, शांत सोज्वळ खेडीं आणि या सर्वांमध्यें आपल्या डौलदार व्यक्तित्वानं शोभणारीं माणसं या साऱ्यांचं वाजवी महत्त्व कोणीच आम्हांला सांगितलं नव्हतं.

भारताबद्दलच्या आणि आशियाबद्दलच्या आमच्या अर्धवट कल्पना चक्षुर्वै सत्यदर्शनानं बदलून घेण्याची संधि आम्हांला मिळाली हें आमचं भाग्य. पण ती ज्यांना मिळत नाहीं, मिळण्याची शक्यता नाहीं, अशा लक्षावधि अमेरिकन लोकांच्या मनांतील गैरसमज नाहींसे करण्याकरितां कांहींतरी मार्ग काढलाच पाहिजे, असं मला वाटतं. अमेरिकेंतील शाळांमधून आशियाई राष्ट्रांच्या अभ्यासाचा समावेश व्हायला हवा. कदाचित् भारतीय माहिती विभागाच्या शाखा अमेरिकेंतील छोट्यामोठ्या शहरांमधून वाढवल्या तरी याला मदत होईल. छोट्या छोट्या गैरसमजांमुळेंच तर कित्येकदां जगांतील लोकांमध्यें अलंघ्य दिसणाऱ्या भिंती उभ्या राहतात आणि दोहों बाजूला अविश्वासाचं आणि द्वेषाचं तण फोंफावत राहतं.

भारतांत येण्यापूर्वीं सुमारें आठ दिवस 'पोस्ट रिपोर्ट' नांवाची एक पुस्तिका परराष्ट्रखात्याकडून आम्हांला मिळाली. पण त्यामुळें भारताविषयींच्या आमच्या ज्ञानांत कांहींच भर पडली नाहीं. हा रिपोर्ट भारतांतील अमेरिकन वकिलातीं-तील लोकांनीं तयार केलेला होता. राजनैतिक पदाधिकारी म्हणून भारतांत जाणाऱ्या सर्वांनाच ही पुस्तिका पाठवली जात असे. त्यामध्यें भारताबद्दल एक विशिष्ट प्रकारचं मत प्रदर्शित केलं होतं. युरोपीय राष्ट्रांच्या राजकीय गोटांत भारताबद्दल एक प्रकारची नापसंती व्यक्त केली जाते आणि तिथें 'अडकून पडणं' म्हणजे भलतं जिकिरीचं आहे असंच सर्वजण मानतात. हेंच मत त्या

पुस्तिकेंतहि दिसून आलं. अन्न, हवा, रोगराई, सामाजिक चालीरीती आणि राजनैतिक चालीरीती यांचं वर्णनहि अतिरंजित आणि अतिशयोक्त होतं असं आम्हांला अनुभवांतीं समजून आलं. कपडे, आहार, औषधं यांची तर एक मोठी यादीच दिली होती. तें सर्व वाचून आम्हां तिघांना न्यावं कीं नाहीं असा बाबांना मोठाच प्रश्न पडला. त्यावेळीं आम्हीं घेतलेल्या कुशंकांबद्दल आम्हां सर्वांनाच नंतर ओशाळण्याची पाळी आली.

या माहितीपत्रकाबरोबरच न्यू दिल्लीमध्यें आम्ही ज्यांत राहणार होतों त्या 'बंगल्या'चीं कांहीं छायाचित्रं पाठविलीं होतीं. कुठल्याहि अमेरिकन घराच्या धर्तीवर सजावट केलेलं तें एक बैठं घर होतं. दिवाणखाना, जेवणघर, स्वयंपाकघर, ग्रंथसंग्रहालय आणि झोपण्यासाठीं तीन खोल्या त्या घरांत होत्या, एवढाच बोध आम्हांला त्या छायाचित्रांवरून होऊं शकला.

भारताविषयींच्या असल्या अपुऱ्या आणि सदोष माहितीमुळें माझी नाखुषी अधिकच वाढली होती. तेरा ऑक्टोबरपर्यंत अबोल उद्विग्नतेनें आणि केवळ कर्तव्यबुद्धीनें मी शाळेंत जात होतें, मित्रमैत्रिणींना भेटत होतें, सामानाची बांधाबांध करीत होतें. पण मनांतून माझी नाराजी अगदीं शिगेला पोंचली होती.

१३ ऑक्टोबरची सकाळ मोठी प्रसन्न आणि सुंदर होती. आकाशाच्या स्वच्छ निळ्या समुद्रांत पांढऱ्या अभ्रांचीं शिडं मोठ्या डौलानं संथपणें फडकत होतीं. सूर्य आपल्या जीवनदायी किरणांनीं जगाला सुखवीत होता. घराभोंवतींच्या झाडीमधून कवडसे नाचत होते, नदीच्या तीरांवरील वृक्षराजीवर किरणांचा खेळ चालू होता. पानापानांतील तांबड्या, नारिंगी, पिवळ्या छटा त्यामुळें किती उठून दिसत होत्या. एखादा गल् पक्षी शोकमय वाटणारे सूर काढीत पाण्यावरून झेपा घेत होता तर दक्षिणेकडे कूच करतांना वाटेंत तळ ठोकून राहिलेले पक्षी मनमोकळा हास्यविनोद करीत होते तो माझ्या खोलींत ऐकूं येत होता.

त्या दिवशीं उठलें अन् हें सारं मीं पाहिलं. कोंवळ्या उन्हांत न्हाऊन निघालेल्या माझ्या गांवाकडे मी नजर टाकली अन् हें गांव आणि हें माझ्याभोंवतींचं सौंदर्य सोडून मला कधींच कुठेंच जावं लागलं नसतं तर किती बरं झालं असतं असा विचार माझ्या मनांत तरळून गेला.

९ वाजेपर्यंत आमचं घर शुभेच्छा देण्यासाठीं अगदीं आयत्या वेळी आलेल्या मित्रमंडळींनीं गजबजून गेलं. आम्ही सर्वजण नेहमींच्या सहजतेनं वावरण्याचा प्रयत्न करीत होतों. पण मनोमन प्रत्येकालाच या दिवसाचं वेगळेंपण जाणवत होतं, आणि मनांतले भाव—इतरांची उत्कंठा आणि माझी नाराजी लपवणं जड जात होतं.

११ वाजतां आम्हीं सर्वांचा निरोप घेतला. आमचीं लाडकीं कुत्रीं मांजरं, आमचं नदीतीरावरचं घर, सारं मागें सोडून निघालों. घर दृष्टिआड झालं... गांव मागें पडलं...दोन तासांच्या प्रवासानंतर आमचं कनेक्टिकट राज्यहि आम्हीं सोडलं.

४ वाजतां थेट पॅरिसला जाणाऱ्या विमानांत बसेपर्यंत आम्हीं काय काय केलं तें आतां मला आठवतसुद्धां नाहीं. आमचे डाग आम्ही पुनः पुनः बघत होतों, पासपोर्ट जागेवर असल्याची खात्री करून घेत होतों, आणि न्यूयॉर्कपर्यंत पोंचवायला आलेल्या कुटुंबीय व स्नेही मंडळींचे निरोप घेत होतों. सूचना मिळाल्यावर आम्हीं विमानाच्या शिडीवरून चढून जाऊन आंत प्रवेश केला.

आप्तसख्यांपासून, घरापासून दूर दूर घेऊन जाणारं तें विमान लौकरच सुरू झालं. कानठळ्या बसवणारा आवाज करीत विमान उंच उंच जाऊं लागलं आणि आम्हीं खरोखरीच प्रस्थान ठेवलं.

पॅरिस, जिनिव्हा, कैरो, बसरा, इराक, दहरान, सौदी अरेबिया इ० शहरां-मध्यें अगदीं अल्प काळ थांबून आमचं विमान देशच्या देश ओलांडत होतं. एके दिवशीं मध्यरात्र उलटून गेल्यानंतर स्टुअर्डेसनं सांगितलं,

"आपण मुंबई शहरांत येत आहोंत"—

## : २ :

मुंबईला पोंचेपर्यंत आम्ही इतके कांहीं थकून गेलों होतों म्हणून सांगूं ! कसेबसे उतरलों अगदीं. त्यांतून मुंबईचा उकाडा ! आमच्या स्वागतासाठीं भर मध्यरात्रीच्या असल्या भलत्या वेळीं तिष्ठत थांबलेल्या मंडळींना अभिवादन करण्यासाठीं हसूं सुद्धां ओढूनताणूनच आणवं लागलं ! औपचारिक भेटी झाल्यानंतर आम्ही सर्व जेव्हां मोटारींत बसलों तेव्हां मागच्या सीटवर मी, सॅम आणि सॅली अगदीं मुटकळीं टाकल्यासारखे बसलों होतों ! मलूल चेहरे, आंबलेलं अंग, प्रवासाचा शीण—त्रिवेणीसंगमच झाला होता ! दुसऱ्या दिवशीं सकाळच्या न्याहरीनंतर दिल्लीला जाणारं वकिलातीचं विमान निघणार होतं. तोंवर आमच्या विश्रान्तीची व्यवस्था ज्या हॉटेलमध्यें केली होती तिकडे ही मोटार निघाली होती.

'ताजमहाल' हें मुंबई बंदराजवळ असलेलं एक भव्य आणि अलिशान हॉटेल आहे. विमानतळापासून तेथवर पोंचायला आम्हांला अर्धा तास लागला. भारताचं प्रथमदर्शन झालं तें त्याच्या निद्रावस्थेंत ! याच अनुभवाच्या विचारांनीं मुंबईंत उतरण्यापूर्वीं मला भंडावून सोडलं होतं. 'कसा दिसेल भारत !' हा प्रश्न पुन्हापुन्हा माझ्या मनांत उभा राहत होता. भारताबद्दल किती—अपुरी माहिती होती मला !

भारताच्या केंविलवाण्या दारिद्र्याबद्दल मी वारंवार ऐकलं होतं. पण पराकाष्ठेचं दारिद्र्य ही माझ्या लेखीं एक कल्पनाच होती; कारण दारिद्र्याशीं माझा निकटचा परिचय कधींच झाला नव्हता. आपल्यासारखींच माणसं अन् त्यांचीं मुलंबाळं त्या दारिद्र्याच्या अजस्र भाराखालीं पिचून जात असतात या विचारानं देखील माझ्या अंगावर शहारे आले.

विमानांत बसलेली असतांना शेवटीं मींच मनाशीं म्हटलं, 'आतां थोडयाच अवकाशांत प्रत्यक्ष जायचंच आहे. उगीच कल्पना रचण्यांत काय अर्थ आहे? आपण उगीच अपेक्षा बाळगूंच नये म्हणजे कसाहि अनुभव आला तरी धक्काहि बसणार नाहीं आणि भेदरूनहि जायला होणार नाहीं.'

म्हणूनच रस्त्याच्या दुतर्फा खाटा गोधडया टाकून किंवा नुसतेच जमिनीवर झोपलेले शेकडों लोक अन् त्यांचीं कुटुंबच्या कुटुंब जेव्हां माझ्या दृष्टीस पडलीं, तेव्हां आश्चर्याचा म्हणावा तसा धक्का कांहीं मला बसला नाहीं. त्या दिवशीं फारच उकाडा होता, म्हणून चार भितींआड कोंदाटून झोंपण्यापेक्षां बाहेरच जरा गारवा वाटत असेल असा एक विचार मनांत आला. पण आसपासच्या भागांत घरं अशीं फारच थोडीं दिसत होतीं. अन् या झोपीं गेलेल्या लोकांच्या संख्येशीं तुलना केली तर तीं फारच अपुरी होतीं हें उघड होतं. रस्त्याच्या कांहीं भागात दोहोंबाजूला ओबडधोबड झोपडया उभ्या होत्या, पण त्या या सर्वांची सोय कधींच करूं शकल्या नसत्या. तेव्हां कुठें माझ्या डोक्यांत प्रकाश पडला कीं हे सर्व बेघर लोक आहेत! त्यांना रस्त्याशिवाय दुसरं घर नाहीं, फूटपाथखेरीज दुसरा बिछाना नाहीं, अन् आकाशाशिवाय दुसरं छत्र नाहीं!

त्या दिवशीं मी फारच दमलें होतें. "ताजमहाल हॉटेलसारख्या ऐषारामी निवासस्थानाच्या हातांत हात घालूनच हें दारिद्र्य अस्तित्वांत असूंच कसं शकतं?" ह्या किंवा अशा त्रासदायक विचारांनीं त्या रात्रीं मला फार वेळ अस्वस्थ केलं नाहीं.

ताजमहाल हॉटेलची बांधणी व्हिक्टोरिअन पद्धतीची, भव्य अशी आहे. मुंबई बंदरालगतच बांधलेलं आहे तें. आमच्या खोल्या आम्हांला दाखवण्यासाठीं पुढें झालेले नोकर अनवाणी चालतांना पाहून मला जरा आश्चर्य वाटलं. आमच्या खोल्या चांगल्या प्रशस्त, उंच होत्या. खोल्यांकडे जाणारे रुंद कॉरिडर संगमरवरी होते. चांदण्यांत न्हाऊन निघालेल्या मुंबई बंदरावर ओझरती नजर टाकून अल्पावकाशांत आम्ही सर्वच निद्राधीन झालों.

चार तासांच्या झोंपेनंतर आम्हांला चांगली हुषारी वाटूं लागली. तो दिवसहि प्रसन्न वाटत होता. तळपत्या सूर्याचे किरण समुद्राच्या लाटांवर चमचमत होते आणि आमच्या खिडकींतून दिसणाऱ्या बागेंतल्या फुलांचे रंगहि

सूर्यप्रकाशानं उजळून गेले होते. रस्त्यावर जाग दिसूं लागली होती. अन् सकाळच्या प्रहरीं हळूहळू गजबज वाढत होती.

न्याहरी झाली आणि आदल्या दिवशीं आलों त्याच रस्त्यानं आम्ही परत विमानतळावर गेलों. दारिद्र्य! तें उघडच होतं. पण रात्रीची स्मशानशांतता, नीरसता, रुक्षपणा यांची जागा उल्हसित वृत्तीनं कामं करणाऱ्या लोकांनीं घेतली होती. कुठें ती रात्रींची भयाण शांतता अन् कुठें ही आत्तांची गजबज! हंसणं खिदळणं, गप्पा, आरडाओरडा, सर्व ऐकूं येत होतं. आणि रात्रीची रंगहीन अवकळा जाऊन त्या जागीं रंगाची दुनिया खुलली होती. चित्रविचित्र रंगाच्या साड्या मोठ्या डौलांत नेसून जाणाऱ्या स्त्रिया त्यांत भर घालीत होत्या.

रात्रीं जेथें पुतळ्यासारखीं वाटणारीं निश्चल माणसं झोंपली होतीं, त्याच फूटपाथवर कामाला जाण्याची तयारी करणारे लोक दिसत होते. बायका चुलीच्या आराधनेला लागल्या होत्या, तर परकऱ्या पोरी त्यांना एकीकडे मदत करून एकीकडे धाकटीं भांवडं संभाळत होत्या. लहान मुलांनीं तर हंसून खेळून चांगलाच दंगा चालवला होता.

शहराच्या भर वस्तींतून जरा बाहेर पडल्यानंतर धनगर लोक गांवठी कुत्र्यांच्या साहाय्यानं बोकड, मेंढ्या आणि इतर जनावरांचे कळप बाजाराकडे नेतांना दिसले.

हें सारं पाहत असतांना दारिद्र्याचा खरा अर्थ मला उमजूं लागला आणि कल्पना अन् सत्यसृष्टि यांच्यांतील अंतर कमी होऊं लागलं. दारिद्र्य हें केवळ भाववाचक नाम नव्हे, तर खरोखरीच्या, तुमच्याआमच्यासारख्याच लोकांच्या हालअपेष्टांचं सार आहे. हीं तर हाडामांसाचीं, चलनवलन करणारीं, आपल्या-प्रमाणेंच प्रेम, आनंद, दुःख यांनीं हेलावणारीं माणसं. आपल्यापेक्षां काय वेगळं आहे त्यांच्यांत?

थोड्याच वेळांत आम्हीं मुंबापुरीचं विहंगमावलोकन करूं लागलों. आतां विमानानं ईशान्य दिशेला दिल्लीच्या रोखानं प्रवास सुरू केला होता. विमानांतून दिसणारा भूभाग खेड्यांनीं व्यापलेला होता. 'थोडीशीं घरं आणि त्यांना वेढणारीं शेतं'—बस्. झालं भारतीय खेडयाचं वर्णन! मधूनच वेडींवाकडीं वळणं घेत वाहणारी एखादी नदी दिसायची.

कांहीं तासांतच आम्ही दिल्लीच्या विमानतळावर उतरलों. बरेच दिवसांत पुरेशी झोंप नसल्यामुळें आम्हीं पेंगळून गेलों होतों आणि उन्हाळ्यानं हैराण झालों होतों. मुंबईत घडलेल्या भारताच्या प्रथमदर्शनानंतर दिल्लींतील घराबद्दल आणि एकूण परिस्थितीबद्दल मग साशंक झालं होतं. थंड पाण्यानं स्नान करावं, छानशी झोंप काढावी आणि मग जरा स्वस्थतेनं श्वास घ्यावा, असं प्रत्येकाला वाटत होतं.

विमानांतून उतरलों, तों वार्ताहर, फोटोग्राफर्स यांची ही गर्दी, अन् शिवाय अमेरिकन वकिलातींतील बरेच लोक आमच्या स्वागताला उभे! असं उत्साहपूर्ण स्वागत आम्हांला फारच अनपेक्षित वाटलं.

या परक्या मंडळींच्या गर्दींत एक चेहरा आम्हां तिघांना विशेष स्नेहपूर्ण वाटला. तो म्हणजे आमच्या बाबांचा ड्रायव्हर जीवनसिंग. भव्य शरीरयष्टि आणि जीव लावणारा प्रेमळ स्वभाव पाहून इतकं बरं वाटलं म्हणून सांगूं! त्यानंच आम्हांला आमच्या नव्या घरीं नेलं. नवं घर दिल्ली विमानतळापासून सुमारें सहा मैलांवर रेटंडन रोडवर होतं. १७, रेटंडन रोड हा आतां आमचा नवा पत्ता होता.

भर बाराच्या तळपत्या उन्हामध्यें रस्त्यावर रहदारी फारच तुरळक होती. जातांजातां आम्हीं एकदोन मजेशीर दृश्यं पाहिलीं. एक जोडपं डोक्यावर खूप मोठाले भारे घेऊन चाललं होतं, अन् एका सायकलस्वाराच्या मागल्या बाजूला दोन्ही पाय एकीकडे सोडून दुसरा एक माणूस बसला होता! वाटेंत आमची गाडी दुसऱ्या एका वाहनाला सहज मागें टाकून गेली. मी वळून पाहिलं, तर त्या भल्यामोठ्या गाड्याला मंदगतीनं चालणारीं वशिंड असलेलीं जनावरं जोडलेलीं होतीं. त्यांना बैल म्हणतात असं जीवननं आम्हांला सांगितलं. रस्त्यावर जे कांहीं थोडे लोक होते, त्यांपैकीं बहुतेक जण झाडांच्या सांवलींत विश्रांति घेत असलेले दिसले.

वाटेंत अगदीं थोड्या खेडींवजा वस्त्या लागल्या. बाकी बहुतेक प्रदेश वैराण आणि खडकाळ होता. कुठेंकुठें झुडपं दिसत होतीं, पण मोठं झाड मात्र एखाददुसरंच दिसत होतं.

विमानतळापासून दिल्ली शहराला सर्वांत जवळ असलेल्या उपनगरवजा भागांत आमचं घर असल्यामुळें त्या दिवशीं खुद्द शहराचा भाग फारसा दृष्टीस पडला नाहीं. पण जो भाग आम्हीं पाहिला, तेथील स्वच्छता आणि आधुनिकता

पाहून आम्हांला वॉशिंग्टन डी. सी. ची आठवण झाली. गेल्या वीस वर्षांत दिल्ली शहराची रचना राजधानीचं शहर म्हणून करण्यांत आली असं बोलतां बोलतां बाबा म्हणाले.

कुठल्याहि गोष्टीसाठीं मीं जी मनाची तयारी ठेवली होती, त्याबद्दल मला घरीं पोंचताक्षणीं पुन्हा एकदां समाधान वाटलं. आमची गाडी छोट्या फाटकांतून आवारांत शिरली, आणि आमचं घर आम्हांला दिसलं! त्या घराभोंवतीं एक साधेपणाचं आणि आपुलकीचं वातावरण होतं. मला तिथें गेल्याबरोबर फार बरं वाटलं. पण उतरून बघतें, तों दर्शनी भागाच्या पायऱ्यांवर स्वच्छ पांढरे गणवेष आणि तांबडीं निळीं पागोटीं घातलेले अकरा लोक अदबीनं अगदीं एका रांगेत उभे! ह्या सर्वांशीं आमचे नोकर म्हणून आमची ओळख करून देण्यांत आली.

घरकामाची व्यवस्था जातीनं बघणाऱ्या प्रमुखाचं नांव होतं शकूर. त्यानं पुढें होऊन आम्हाला लवून अभिवादन केलं आणि घर दाखवायला सुरुवात केली. घर एअरकंडिशण्ड असल्यामुळें आंतमध्यें फारच छान गारवा होता. आम्हांला आमचं नवं घर आवडलं. पण तिथल्या वस्तू इतक्या टापटिपीनं आंवरून ठेवलेल्या दिसत होत्या कीं त्यामुळें कुणाचा बरेच दिवसांत वावर नसल्यासारखं वाटत होतं.

इतर नोकरांपैकीं बहुतेकांना इंग्रजी येत होतं. त्यांच्याशीं औपचारिक भाषण झाल्यावर खास अमेरिकन पद्धतीचं जेवण आम्हांला देण्यांत आलं. जेवणं उरकल्यावर आम्हीं सामान सोडून लावायला सुरुवात केली.

थोड्याच दिवसांत आम्ही नव्या वातावरणांत रुळलों. पण बरेच दिवसपर्यंत आम्हीं तिथंहि म्हणण्यासारखे खूष नव्हतों. सगळंच परकं वाटायचं, मनाला एक प्रकारची बेचैनी वाटयची. घराबाहेरचं जग स्नेहपूर्ण असलं तरीहि स्वप्नांतल्यासारखं वास्तवापासून दूरचं वाटत असे.

पूर्वी आम्ही हर्टफोर्डला बदलून गेलों होतों, तेव्हां माझ्या मनाची अशीच कांहींशी स्थिति झाली होती. माझं घर, कुटुंब आणि मी स्वतः याखेरीज सर्वच गोष्टी अनिश्चित, परक्या आणि भासात्मक वाटायच्या.

त्या काळांत दिल्लीमध्यें ज्या अमेरिकन मंडळींशीं आमची गांठ पडली, ते लोक आम्हांला प्रत्यक्ष भारतीयांइतकेच परके भासले. अमेरिकेमध्यें आम्हांला

सुपरिचित असलेल्या समाजापेक्षां हे दोन्ही समाज कितीतरी भिन्न होते. स्वतः-भोंवतीं एक प्रकारचं कवच निर्माण होऊं लागलं आहे हें माझ्या लक्षांत आलं, त्याचबरोबर, या नव्या ठिकाणीं जर सुखासमाधानानं राहायचं असेल तर हें कवच फोडून मला बाहेर आलंच पाहिजे याचीहि मला जाणीव झाली.

हळूहळू थंडीचे दिवस आले. संध्याकाळ फार रम्य असायची. पुष्कळदां घरामागच्या बागेंत नाहींतर आसपासच्या भागांत आम्ही फिरायला जाऊं लागलों. रेटंडन रोड शांत असे. त्याच्या दुतर्फा झाडं होतीं आणि तिथें रहदारीहि बेताचीच असे. अधूनमधून जाणाऱ्या मोटारगाड्या, एखाददुसरी ट्रक, खडखडणारी बैलगाडी नाहींतर खुळखुळ आवाज करीत जाणारा टांगा यांच्या आवाजांनीं काय शांततेचा भंग होईल तेवढाच. दुचाकीवरून माणसं जात. चालवणाऱ्याची मनोवृत्ति आणि त्याचें उद्दिष्ट स्थळ यांवर सायकलीची गति अवलंबून असायची. कधींकधीं लहान मुलांचे बोबडे बोल कानीं येत. त्यांची भाषा समजत नसली, तरी त्यांतून खळाळणारा आनंद मला प्रतीत झाल्याखेरीज राहत नसे.

आमच्या शेजाराला एका बाजूला चीनच्या वकिलातींतील लोक होते, अन् दुसऱ्या बाजूला एक भारतीय कुटुंब होतं. त्यांच्या मुलांशीं आम्हीं तिघांनीं लवकरच चांगली गट्टी जमवली. रस्त्याच्या पलीकडे समोरच्या घरांत अमेरिकन माहिती संस्थेंत काम करणाऱ्या गृहस्थांचं कुटुंब होतं. जवळच एक भारतीय डॉक्टर राहत होते. त्यांचा मुलगा आणि सॅम् अगदीं जानी दोस्त बनले.

कालान्तरानं रेटंडन रोड मला फारच आवडूं लागला. त्या रस्त्याशीं निगडित झालेले आवाज अन् दृश्यं अविस्मरणीय आहेत. हे पहिले कांहीं आठवडे आम्ही तिघांनीं या नव्या आयुष्याशीं एकरूप होण्याचा प्रयत्न केला खरा, आणि आमच्यावर ही कांहीं पहिलीच वेळ होती अशांतला भाग नाहीं—पण या ठिकाणची गोष्टच वेगळी होती. आम्हांला इथल्या आजूबाजूच्या जीवनाची नीटशी ओळख होत नव्हती. आणि ओळख नाहीं तेथें आनंद कोठून? आम्हांला अजून कितीतरी शिकायचं होतं.

घरांत वावरणाऱ्या एवढ्या नोकरमाणसांची संवय झाली खरी, पण त्यांचं औचित्य मीं कधींच समजूं शकलें नाहीं. तें घर तसं फारसं मोठं नव्हतं. बरं, आम्ही राहणारीं माणसंहि बेताचींच होतों. आपलीं कामं आपणच उरकण्याची

आम्हांला संवय होती. अर्थातच प्रत्येक गोष्टींत नोकरावर अवलंबून राहणं आम्हांला अनावश्यक वाटे आणि आवडतहि नसे. गाडी चालवणारा एक, बाजारहाट करणारा दुसरा, स्वयंपाकी तिसरा, वाढपी वेगळाच, वरकामाला आणखी एकजण आणि शिवाय माळी. करायचीं आहेत काय मुळीं एवढीं माणसं ? अमेरिकेंतील वातावरणांत ज्या समतेच्या तत्त्वांचं बाळकडू आम्हीं घेतलं, तीं तत्त्वें किती प्रखर आहेत याची जाणीव आम्हांला झाली. आमचं सगळं काम करणारे आणि आमचं श्रेष्ठत्व निमूटपणें मानणारे हे लोक पाहून आम्हांला कसंतरीच वाटत असे.

हळूहळू भारतीय समाजरचनेची आम्हांला ओळख होऊं लागली. जन्मनिष्ठ कामधंदा, त्यामागून येणाऱ्या उच्चनीचतेची कल्पना, ह्या लक्षांत घेतल्यानंतर जन्मानें ठरलेल्या धंद्यापेक्षां हलकं गणलं जाणारं काम पत्करायला हे लोक कां तयार नसतात, तें समजलं. परंतु भारतांतील जातिसंस्था आतां झपाट्यानें परिवर्तनशील बनत आहे, असंहि आम्हांला समजलं. खरं पाहतां कायद्यानें तर जातिभेद नष्टच केलेला आहे.

मात्र आमच्या घरचे नोकर आपल्या ठराविक कामापलीकडे दुसरं कांहीं काम करीत नसत. धोबी कधीं स्वयंपाक करायचा नाहीं किंवा स्वैपाकी कधीं कपडे धुवायचा नाहीं. तीच गोष्ट माळी आणि वाढपी यांची. मालक म्हणून आमच्याबद्दल फारच आदर आणि श्रेष्ठतेची भावना. आम्ही एखाद्या कामाला जरासा जरी हात लावला तरी त्यांना तें आवडत नसे. आम्हांला त्यांचं काम पसंत तरी नाहीं किंवा आम्ही आमच्या प्रतिष्ठेला बाध तरी आणीत आहोंत असं त्यांना वाटे.

आमची त्यांची जरा जवळून ओळख झाल्यानंतर आम्ही त्यांना अमेरिकेंतील राहणीची पद्धत समजावून सांगत असूं. सर्व लोक आपापलीं कामं कशीं स्वतःच करतात आणि निरनिराळ्या यांत्रिक साधनसामुग्रीनं सर्व घरकाम कसं सोपं जातं तें आम्हीं त्यांना सांगितलं. तें समजल्यावर त्यांची नाराजी कमी झाली आणि स्वतःचं काम स्वतः करण्याचा आमचा आग्रह त्यांना समजूं शकला. पुढें कांहींजणांना आम्हीं चांगल्या घरीं कामं पाहून दिलीं.

आमचं बोलणं वागणं त्यांच्या गळीं उतरायला कांहीं काळ जावा लागला,

आणि कांहीं जणांच्या तर तें अंगवळणीं पडलं इतकंच. आमच्या वागण्याच्या खऱ्या अर्थाचा त्यांना कधींच उमज पडला नाहीं. एक दिवस मी आमच्या नोकरांच्या मुलांशीं परसदारच्या अंगणांत खेळत होतें. नोकरांच्या घराची जागा तिथें जवळच होती. खेळतांखेळतां आमचा चेंडू गेला गटारांत. त्या सांडपाण्याच्या वाटेंत बराच गाळ सांचला होता. चेंडू आणण्यासाठीं आम्ही धांवलों, तेव्हां ही गोष्ट माझ्या लक्षांत आली. बरोबर खेळणाऱ्या मुलींमध्यें लीला नांवाची एक मुलगी होती. मी तिला म्हटलं, "ए, हें सगळं स्वच्छ अन् साफ-सूफ करून टाकलं तर किती मजा येईल, नाहीं?

"छे छे बहेनजी" लीला म्हणाली, "तुमच्यासारख्यांनीं हीं असलीं कामं करायचीं नसतात."

"अग पण हें काय काम थोडंच आहे? सहज आपली गंमत म्हणून करूं या कीं." इतकं मी म्हटल्यावर ती बरं आहे म्हणाली आणि आम्हीं सफाईला प्रारंभ केला.

आमच्या जीवन ड्रायव्हरची बायको तिकडून येईपर्यंत सगळं कसं छान चाललं होतं. आमचं जोरजोरांत चाललेलं काम आणि हातातोंडाचे अवतार बघून तिला धक्काच बसला. इतर मोठीं माणसं धांवत आलीं आणि आम्हांला त्यांनीं चांगलंच जामलं. मला ताबडतोब तो उद्योग थांबवून आधीं हातपाय स्वच्छ धुवायला लावलं त्यांनीं.

'हें तुमचं काम नव्हे ताईसाहेब, तें मदनचं आहे' असं त्यांनीं मला बजावलं. [मदन हें आमच्या झाडूवाल्याचं नांव. सगळं भंगीकाम तोच करीत असे.] पुढें मला बरंच ऐकावं लागलं असतं, पण तेवढ्यांत तिकडून शकूर आला, आणि आमची सुटका झाली. तोच बाकीच्यांना सांगायला लागला,

"बहेनजीच्या देशांत कष्टाचं काम करून हात मळले तर कुणाला देखील लाज वाटत नाहीं." नंतर त्यानं त्याला अमेरिकन राहणीची जी कांहीं कल्पना आली होती, ती सर्वांना समजावून सांगितली.

मला माझ्या एकलकोंडेपणापासून मुक्त करण्यांत जीवन, शकूर आणि इतर नोकरांनीं मोठाच वांटा उचलला. त्यांच्यापैकीं कांहींजणांशीं तर पुढें पुढें माझी चांगली मैत्रीच झाली.

: २ :

दिल्लींत पोंचल्यानंतर थोडेच दिवसांत शाळेचा प्रश्न उपस्थित झाला. आम्ही तिघं या नव्या ठिकाणीं जळावेगळ्या मासोळीसारखे झालों होतों; जुन्या आठवणींनीं बेचैन होत होतों. आमचा परकेपणा दूर करायला शाळेची आणि नव्या मित्रमैत्रिणींची खूपच मदत होऊं शकेल असं आम्हांला वाटलं. शाळेच्या दुव्यामुळें आमच्यांत आणि नव्या वातावरणांत आपुलकी आणि स्नेहभाव निर्माण होऊन अनोळखी साशंकतेचं पटल दूर होईल अशी आमची अपेक्षा होती.

तसं पाहिलं तर आमचं शिक्षण ही बाब या वर्षभर तरी दुय्यमच होती. भूमिति, लॅटिन यांसारखे पुस्तकी विषय काय, कोठेंहि शिकतां येतात. पण भारताशीं परिचय करून घेणं ही अनुभवाची बाब होती. तो घेण्याची दुर्मिळ सुवर्णसंधि मिळाली आहे, तिचा पुरेपूर फायदा घ्यायचा असा आमचा निश्चय होता.

तेव्हां ह्या भूमिकेवरून आम्हीं खुद्द दिल्लींतील आणि आसपासच्या भागांतील शाळांची चौकशी करायला सुरुवात केली. बहुतेक अमेरिकन लोकांनीं वुडस्टॉक स्कूलचं नांव सुचवलं. दिल्लीच्या उत्तरेस सुमारें तीनशें मैलांवर हिमालयाच्या पायथ्याशीं असलेल्या निसर्गसुंदर टेकड्यांवर ही शाळा आहे. शिक्षणाची आणि राहण्यासाठीं वसतिगृहाची उत्कृष्ट सोय असणारी शाळा म्हणून वुडस्टॉक प्रसिद्ध आहे. उत्तर हिंदुस्थानांत राहणारे सर्वच अमेरिकन लोक आपलीं शाळकरी मुलं तिकडे पाठवतात. मुख्यतः अमेरिकन लोकांसाठींच ही शाळा चालविण्यांत येते, आणि तेथील अभ्यासक्रमाची आंखणी अमेरिकेंतील महाविद्यालयपूर्व अभ्यासक्रमाच्या धर्तीवर केलेली आहे.

पण आम्हांला कळलं कीं तेथें भारतीय मुलांची संख्या पुरती एक चतुर्थांश देखील नव्हती, आणि शिक्षकवर्गहि बहुसंख्य अमेरिकनच होता. वुडस्टॉकला राहण्यांत एक फायदा होता. आमच्या शिक्षणांत खंड पडला नसता आणि अमेरिकेंत परत गेल्यानंतर महाविद्यालयामध्यें प्रवेश मिळायला अडचण पडली नसती. पण मग भारताबद्दलचं आमचं अज्ञान तसंच कायम राहिलं असतं. मग कनेक्टिकटमध्येंच राहिलों असतों तर काय बिघडत होतं ? तिथें काय आणि इथें काय, शाळेच्या चाकोरींत शिक्षणाच्या दृष्टीनं फायदा सारखाच होता कीं !

वकिलातींत भेटलेल्या एका भारतीय महिलेनं आईला दिल्लीमधल्या कुठल्या एका कॉन्व्हेंट स्कूलचं नांव सुचवलं. कॅथलिक् लोकांनीं चालविलेल्या या दोन शाळा होत्या. पण दोन्ही शाळांत विद्यार्थ्यांची अतिशय गर्दी झाली होती. इतकी कीं आई चौकशी करायला गेली, तेव्हां संस्थेचे कार्यवाह आम्हांला प्रवेश द्यायला उत्सुक दिसले नाहींत.

इंग्रजी माध्यम असलेल्या शाळांचाच आम्हांला उपयोग होता, त्यामुळें या शाळा वगळल्यानंतर तीनच शाळा उरल्या. लेडी आयर्विन सेकंडरी स्कूल फॉर गर्ल्स् ही चांगली शाळा होती. त्या शाळेचं वैशिष्ट्य म्हणजे तेथें गृहजीवन-शास्त्राच्या अनुषंगानं येणारं अर्थशास्त्र शिकवतात. ही गोष्ट आम्हां दोघींना—मला आणि सॅलीला—पसंत पडली. पण मग आम्हां तिघांना एकत्र नसतं राहतां आलं. तेव्हां आम्हीं सहशिक्षणाची सोय असणाऱ्या शाळेंतच जायचं असा निर्णय पक्का केला.

नव्या दिल्लींतील मॉडर्न स्कूल ही शाळा जुनाट ब्रिटिश धर्तीवर नसून प्रागतिक विचारसरणीनें चालवली जाणारी शाळा आहे. इतर शाळांप्रमाणें तेथील अभ्यासक्रम केवळ महाविद्यालयीन शिक्षणाच्या पूर्वतयारीसाठीं सनातन पद्धतीनं आंखलेला नव्हता, तर समृद्ध भारताच्या नवनिर्माणांत सहभागी होणाऱ्या पिढीचे हात बळकट करण्याच्या दृष्टीनं उपयुक्त होता. पण आमचं दुर्दैव असं कीं तिथें फक्त हिंदीच माध्यम आहे, अशी (चुकीची) माहिती आम्हांला कुणीतरी दिली. त्यामुळें आम्हाला तिचा उपयोग नाहीं हें उघड होतें. हिंदी ही उत्तर भारताची प्रमुख भाषा. आम्हांला नीट हिंदी येऊं लागेपर्यंत तरी या शाळेंत प्रवेशाची आशा नाहीं असंच आम्हांला वाटलं.

राहतां राहिली दिल्ली पब्लिक स्कूल नांवाची शाळा. अमेरिकेंत ज्या अर्थानं आपण पब्लिक स्कूल म्हणतों, तसं हें नव्हतं. महिना पंचवीस रुपये (सुमारें पांच डॉलर्स) फी होती त्या शाळेची. मात्र तिथें सहशिक्षणाची सोय होती, अन् घरापासून दोन मैलांचं अंतरहि बेताचंच होतं. या शाळेंतहि संख्येचा प्रश्न होताच. पण शाळेचे वर्ग तंबूमध्यें भरवीत असत आणि पटावरील संख्येच्या कमीअधिक प्रमाणानुसार तंबू उभारत किंवा गुंडाळीत असत.

आम्हीं या शाळेंत प्रवेश केला तेव्हां सर्व शिक्षकवर्ग आणि तेराशें मुलं भारतीयच होतीं. परदेशी अशीं फक्त एका इंडोनेशियन कुटुंबांतील मुलं तिथं येत. त्यांची आणि आमची पुढें खूप दोस्ती झाली. इथल्या मुलांमध्यें पुष्कळ धर्मांचीं मुलं होतीं. हिंदु, मुस्लिम, शीख, बौद्ध, आणि ख्रिश्चन हे तर प्रमुख धर्म. आमचे मुख्याध्यापक ब्रिटिश होते. त्यांचं वागणं कधीं अतिशय कडक शिस्तीचं तर कधीं फार प्रेमळ असे. ग्रेट ब्रिटनमध्यें एखादी खाजगी शाळा त्यांनीं जशी चालवली असती, तशीच हीहि शाळा ते चालवीत असत.

शाळेचा पहिला दिवस मला स्पष्टपणें आठवतो. आमच्या शेजाऱ्यांचीं दोन्ही मुलं त्याच शाळेंत जात असत. त्यांच्याशीं सॅमची चांगली जानपछान झाली होती. ते तिघंजण साडेआठच्या सुमाराला सायकलीवरनं पुढें गेले. शाळा नऊ वाजतां भरत असे. त्यांच्या पाठोपाठच आम्हीहि निघालोंच.

आमच्या घरच्या सायकली अजून भारतांत आलेल्या नव्हत्या म्हणून एका दुकानांतून आम्हीं भाड्याच्या सायकली आणल्या होत्या. हें दुकान, "कॉनॉट प्लेस" या नांवानं ओळखल्या जाणाऱ्या मध्यवर्ति बाजारपेठेंत होतं. ही बाजारपेठ जवळजवळ पूर्णपणें पाश्चात्य धर्तीवर आहे. आमच्या सायकली तशा जुन्यापैकींच होत्या. आम्ही थोडासा रस्ता काटून गेलों न गेलों तोंच सॅलीच्या सायकलची चेनच पडली. सायकलदुरुस्तीची इथें कुणाला माहिती होती? या अनोळखी जगांत पहिलं पाऊल टाकलं, तोंच हा घोटाळा. आम्ही अगदीं बावरून गेलों. आतां उलटं फिरून घरीं जायचं आणि शकूरला दुरुस्ती करायला सांगायचं म्हणजे पहिल्याच दिवशीं शाळेला उशीर! उरलेला रस्ता पायीं गेलं, तरी अर्थ तोच! अशा गोंधळलेल्या मनःस्थितींत दिङ्मूढ होऊन उभ्या असतांनाच सॅमचा एक नवा मित्र मागून आला. तोहि शाळेंतच निघाला

होता. त्यानं आम्हांला ओळखलं. आम्ही कसल्या अडचणींत पडलों आहोंत याची त्यानं चौकशी केली. आम्हीं नुसतं चेनकडे बोट केलं. डोळ्याचं पातं लवतं न लवतं तोंवर त्यानं चेन बसवून दिलेली पाहून आम्ही चांगल्याच ओशाळलों. त्याचे मनःपूर्वक आभार मानून आमच्या स्वाऱ्या पुन्हा मार्गक्रमण करूं लागल्या! आम्ही अगदीं जेमतेम वेळेवर पोंचलों. शाळेच्या मोठ्या सायकलस्टँडवर सायकली ठेवून आम्ही आपापल्या वर्गांच्या तंबूंकडे गेलों.

तीन अमेरिकन मुलं शाळेंत यायला लागणार ही वार्ता आमच्या आधींच शाळेंत पोंचून पसरली होती हें उघड होतं. सर्वांत वरच्या यत्तेंत मला प्रवेश मिळाला होता. अमेरिकन शाळेच्या महाविद्यालयपूर्व दुसऱ्या यत्तेशीं याची बरोबरी झाली असती. आमच्या वर्गांत चौदाएक मुलगे आणि सहा मुली होत्या. मी वर्गांत गेलें, तेव्हां सर्वजणी आधीं आलेल्याच होत्या. आमच्या शिक्षिका वर्गांत येण्यापूर्वी जो अगदीं थोडासा वेळ मिळाला तेवढ्यांत आम्हीं एकमेकींची धांवती ओळख करून घेतली. मात्र त्यांत बुजरेपणा आणि संकोचाची भावना बरीच होती.

प्रौढ वयाच्या, करारी मुद्रेच्या आमच्या बाई येतांना दिसल्याबरोबर मला त्या सगळ्याजणींनीं घाईघाईनं माझ्या जागेवर जायला सांगितलं.

बाई वर्गांत येऊन स्थानापन्न होईपर्यंत इतर मुलांप्रमाणें मीहि उभी राहिलें, पण सर्वांनीं जेव्हां एकमुखानं बाईंना 'शुभ प्रभात' असं अभिवादन केलं, तेव्हां मात्र माझ्या आश्चर्याला पारावार उरला नाहीं. त्या भरांत माझ्या तोंडून शब्दच बाहेर पडले नाहींत.

शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यामधलं अत्यंत औपचारिक स्वरूपाचं नातं ही गोष्ट मला संपूर्णतः नवी होती. आणि तसं पाहिलं तर, तें वातावरण काय किंवा वागण्याची पद्धत काय, माझ्या कधींच अंगवळणीं पडूं शकलं नाहीं. बाई समोर असेपर्यंत मारे अगदीं आदराचा आणि मानाचा आव आणायचा अन् त्यांच्या अपरोक्ष मात्र मन मानेल तसं वागायचं ह्या वृत्तींतील पोरकटपणा मला बोंचक वाटत असे.

हजेरी घेऊन झाल्यानंतर आम्ही प्राथमिक शाळेंतल्या मुलांसारख्या दोन दोनाच्या ओळी करून एका तंबूमागच्या मोकळ्या पटांगणांत गेलों. सबंध शाळा

प्रार्थनेसाठीं अर्धवर्तुळाकारांत उभी होती. सगळीकडे शांतता झाल्यावर मुख्याध्यापकांनीं प्रथम प्रार्थना म्हटली आणि नंतर त्यांच्या म्हणण्याबरहुकूम आम्ही दोन प्रार्थना म्हटल्या. त्यांपैकीं एक 'लॉर्ड्स् प्रेअर' होती. पण आम्ही सर्वच इतके लहान आणि अजाण होतों कीं खरा भक्तिभाव अन् गांभीर्य आमच्या ठिकाणीं नव्हतंच. प्रार्थना म्हणजे पोपटपंचीचाच प्रकार होत असे. बाईच्या मागें एकमेकींना कुठें खुणाच कर, डोळेच मिचकाव, वेण्याच घाल, असले उद्योग आम्ही करीत होतों. मात्र पहिल्या दिवशीं नाहीं हं!

पहिला तास त्या दिवशीं खेळाचा होता. आम्हीं नेटबॉल हा बास्केटबॉलसारखाच एक खेळ खेळलों. नंतर भूगोल, भारतीय इतिहास, आणि शेवटीं इंग्रजी व्याकरण हे तास होते. हे सर्व विषय सक्तीचे होते.

बाराच्या जरा आधीं आम्हांला जेवणाची सुटी मिळाली. ती पाऊण तासाची होती. मुलींपैकीं बहुतेकजणी आपापले डबे घेऊन तरी आल्या होत्या किंवा मग त्यांचे घरचे नोकर त्यांचे डबे घेऊन आले होते. शकूर आमच्यासाठीं सँडविचेस् आणि सफरचंद घेऊन आला होता. आम्ही तिघं आपापला वांटा संपवीत होतों. बाकीच्यांचं जेवण भारतीय पद्धतीचं होतं; म्हणजे वरण, रस्सा आणि पोळी.

मुलींना अमेरिकेबद्दल प्रत्यक्ष माहिती ऐकायची मनस्वी उत्सुकता होती. मला त्यांनीं पहिला प्रश्न केला, तो म्हणजे 'तूं तुमच्या सिनेनट्यांपैकीं एखादी कधीं पाहिली आहेस का?' हाच. मी आत्तांपर्यंत फक्त जेन रसेलला पाहिलं होतं, अन् तें सुद्धां यूयॉर्क ते पॅरिसच्या प्रवासांत ती आमच्या विमानांत होती म्हणून. त्यांचे इतर प्रश्नहि मुख्यतः चित्रपटसृष्टीबद्दलच होते आणि मी माझ्या मगदुराप्रमाणें त्यांना उत्तरं देण्याचा प्रयत्न करीत होतें. पण थोड्याच वेळांत माझ्या लक्षांत आलं कीं, हॉलिवुडबद्दल माझ्यापेक्षां त्यांनाच जास्त माहिती आहे.

माझं बोलणं इतरांना समजायला त्रास पडत असे. त्यांच्यापैकीं बहुतेकजणी निर्दोष इंग्रजी बोलत. माझं तसं तर नव्हतंच, पण त्याशिवाय त्यांना अपरिचित अशा अमेरिकन बोलीभाषेचं माझ्या भाषेंत भरपूर मिश्रण होतं. त्यामुळं त्यांना माझं बोलणं उमगायला जड जात असे. आमचं संभाषण एकाच नांवानं

ओळखल्या जाणाऱ्या दोन भाषांत चाललं आहे हें कुणाच्याहि लक्षांत येण्याजोगं होतं. पण महिन्याभरांतच त्यांच्यासारखं भारतीय इंग्रजी मी उचललं आणि माझ्या अमेरिकन इंग्रजीची त्यांना संवय झाली.

जेवणाची सुटी संपल्यानंतर आम्हांला आणखी चार तास होते. पहिला तास धर्मग्रंथाच्या अभ्यासाचा होता. त्यामध्यें बायबलचं विवेचन केलं जात असे. त्या वेळांत बहुतेक इतर मुलं विज्ञान व रसायन यांचा अभ्यास करीत असत. हा विषय शेवटचीं दोन वर्षं मिळून शिकवला जाई आणि मला याआधीं त्यांचा गंधहि नसल्यामुळें मला बायबलचा पर्याय निवडणं प्राप्त होतं. त्यानंतर गणिताचा तास असे. पण वर्गाच्या मानानं माझा गणिताचा अभ्यास खूपच मागें होता. पुढें पुढें तर या तासांत मला भूमितीसाठीं खास मदत घ्यावी लागे. गणिताला गृहशास्त्र व आरोग्यशास्त्र यांचा पर्याय असे. कांहीं मुली तोच विषय पसंत करीत. यानंतर एक तास चित्रकलेचा आणि शेवटचा हिंदीचा असे.

एवढं झाल्यावर शाळा संपली आणि माझ्या मैत्रिणींनीं शाळेच्या आवारांतून एक चक्कर टाकण्यासाठीं मला नेलं. वैद्यकीय केंद्राखेरीज शाळेचे सर्व व्यवहार तंबूमध्येंच होत असत. वर्ग भरविण्यासाठीं उभारलेले तंबू तीस मुलांना व्यवस्थित बसतां येईल एवढ्या आकाराचे असत. दिवे, पंखे, खिडक्या कांहींच नसे, पण एक बाजू संपूर्ण उघडी असे.

मुख्याध्यापकांची खोली आणि कचेरी यांच्या तंबूमध्यें दिवे, पंखे वगैरे सामुग्री असे. ते आकारानं इतर तंबूपेक्षां लहान होते. एके ठिकाणीं शालोपयोगी साहित्याचं भांडार होतं, तर दुसऱ्या तंबूंत खेळांसाठीं लागणारं सामान ठेवलेलं असे. ग्रंथालयाचा तंबू वेगळा होता. दुसऱ्या एकामध्यें कांहीं खाद्यपदार्थ विकण्याची सोय होती. गोळ्या, चॉकलेट, आईस्क्रीम इत्यादि वस्तू तिथें मिळत.

आरोग्यकेंद्र ज्या इमारतींत होतं ती घुमटाकार बांधणीची असून पंधराव्या शतकांत मुसलमानांनीं बांधलेली होती. आंतमध्यें छान गारवा असावयाचा. ती बहुधा जुनी कबर असावी.

पुष्कळांना तंबूमध्यें भरणाऱ्या शाळेची नीट कल्पना करणं जड जाईल कदाचित्. पण मला ही शाळा फार आवडूं लागली. उन्हाळ्यांत उकाड्यानं आणि

थंडींत गारठ्यानं आम्ही हैराण होत असलों, तरी नित्य मोकळी हवा आम्हांला मिळत असे आणि हें निसर्गसान्निध्य मला मनापासून आवडत असे.

नाना तऱ्हेचे प्राणी आमच्या वर्गांना भेटी देत. छोट्या खारकुंड्या तंबूच्या दोरावरून खेळतांखेळतां छतावरून धांवत जायच्या. किती तरी वेगवेगळे पक्षी आंतबाहेर करायचे. उंच कुठेंतरी काळ्यापांढऱ्या रंगाचे ससाणे उडत असायचे आणि त्यांच्या केवढ्या तरी सांवल्या जमिनीवर हलतांना दिसायच्या. एक दिवस तर मला मुंगूस दिसलं. तंबूच्या एका कोपऱ्याआडून हळूच डोकावून तें पटकन् पळून गेलं. मुंगूस म्हणजे वीझलच्या जातीचा साप मारणारा प्राणी.

शाळेच्या आवारालगतच दोन मोठीं क्रीडांगणं होती. त्यांपैकीं एक क्रिकेट, हॉकी वगैरे खेळासाठीं होतं आणि दुसरं नेटबॉलचं. तिथें जवळच बॅडमिंटन आणि व्हॉलीबॉलचीं क्षेत्रं आखलेलीं होतीं. आम्ही तेथून गेलों, तेव्हां खालच्या वर्गांचीं मुलं हॉकी खेळत होतीं.

शाळेचं आवार शहराच्या सीमेवर होतं अन् आरोग्यकेंद्रांत जाण्यासाठीं म्हणून जेव्हां छोटंसं टेकाड आम्ही चढून गेलों, तेव्हां आसपासचा प्रदेश अगदींच ओसाड आणि निर्जन असलेला आढळला. बहुतेक सर्व भाग सपाटच होता. उगीच कुठेंकुठें खडकाळ उंचवटे दिसत होते. बरींचशीं हिरवीं झुडुपं आणि एखादद्दुसऱ्या मोठ्या झाडांचे बुंधे यांचीच वस्ती तिथें होती. पण मी भारतांतून निघेपर्यंत शाळेच्या सभोंवतीं पुष्कळच चाळी आणि नवीं घरं बांधलीं गेलीं.

माझ्या नव्या मैत्रिणींनीं सायकलस्टँडवर मला पोंचवलं तोंवर सुमारें चार वाजले होते. त्या सगळ्याजणी शाळेच्या बसनें घरीं जात. त्या दिवशीं त्यांचा निरोप घेतांना माझा सर्व संकोच जरी नाहींसा झाला नव्हता, तरी मी मनांतून आनंदून गेलें होतें.

नंतरच्या काळांत माझ्या मनांत माझी अमेरिकेंतील शाळा आणि ही शाळा यांची सारखी तुलना चालू असे. या शाळेंतील कडक शिस्त आणि औपचारिकता यांचा उल्लेख मीं केलाच आहे. शिवाय अध्यापनाच्या पद्धतींमध्येंहि खूपच अंतर होतं.

उदाहरणादाखल एकच गोष्ट सांगतें. आमचा इतिहासाचा तास असायचा,

तेव्हां शिक्षक त्यांच्या पुस्तकांतून जें वाचतील तें आपण आपल्या पुस्तकांत वाचत जायचं कीं झाला इतिहास शिकून. प्रश्नोत्तरं नाहींत कीं चर्चा नाहीं. पुस्तकांतील मजकुराव्यतिरिक्त शिक्षकांचं जादा विवेचन विशेषसें कानांवर पडत नसे. ती शुद्ध कवाईत होती. पाठ कसला तो!

इतरहि बहुतेक सर्वत्र हीच पद्धति अवलंबली जात होती. चित्रकलेच्या तासाला मास्तरांनीं फळ्यावर काढलेलं चित्र कागदावर काढून आम्ही रंगवत असूं!

मौलिकतेपासून शतयोजनं दूर असलेलं हें शिक्षण घशाखालीं उतरवण्याला मला प्रयास पडले. सगळे तास कंटाळवाणे, पुनरावृत्तीनं भरलेले असत. जिवंतपणा, प्रेरकता यांचं नांवच नाहीं कुठें. मात्र मी जर मन लावून शिकायचं आणि चांगले मार्क मिळवायचे असं मनोमन ठरवलं असतं, तर याहि शिक्षणानं माझा अमेरिकेंतील शिक्षणाइतकाच फायदा झाला असता, यांत तिळमात्र संदेह नाहीं.

दुसरा महत्त्वाचा आणि मोठाच फरक म्हणजे परीक्षापद्धतींमधला. इसेक्स-मध्यें संपूर्ण वर्षांत ब्याच चांचणी परीक्षा होत, पण एकच एक वार्षिक परीक्षा कांहीं नव्हती. गृहपाठ, वर्गपाठ आणि चांचणी परीक्षांचे निकाल यांवरच आम्हांला गुण देऊन वरच्या वर्गांत घालीत. इथें मात्र साप्ताहिक परीक्षा तर होत्याच, पण वर्षाच्या शेवटीं केंब्रिज विद्यापीठाची परीक्षा असे. पुष्कळ मुलं त्या परीक्षेंत नापास होत, मग पुन्हा पुढल्या वर्षीं त्यांना बसावं लागे.

दिल्ली पब्लिक स्कूल ही कांहीं भारतांतील प्रातिनिधिक स्वरूपाची शाळा म्हणतां आली नसती. सहशिक्षण ही एकच बाब त्या शाळेचं वेगळेंपण दाखवायला पुरेशी होती. भारतांतील दुय्यम शाळांपैकीं बहुसंख्य शाळा सहशिक्षण न देणाऱ्या आहेत. या वयाच्या मुलामुलींनीं एकत्र अभ्यास करण्याची पद्धत नाहीं तिथें.

एवढी गोष्ट सोडली, तर ब्रिटिश राजवटींत भारतांत स्थापन झालेल्या विशिष्ट प्रकारच्या शाळांपैकीं ही एक होती. त्यांचं संचालकत्व बहुधा इंग्लिश शाळा-मास्तरांकडे असे आणि शाळेचा एकूण नूर तीसएक वर्षांपूर्वींच्या ब्रिटनमधील शाळेसारखा असे.

कांहीं व्यक्ति किंवा गट या संस्थांचे आश्रयदाते असतात, तीन ते दहा

डॉलर्सपर्यंत त्यांची फी असते, माध्यम इंग्रजी असतं आणि सीनिअर केंब्रिजच्या परीक्षेसाठीं मुलांची तयारी करून घेतात. अमेरिकेंतील महाविद्यालयपूर्व अभ्यासक्रमासारखाच त्यांचा अभ्यासक्रम असतो. भारतांत आधींच दुय्यम शाळा पुरेशा नाहींत आणि आहेत त्यांपैकीं बहुतेक वर वर्णन केलेल्या सांचाच्या आहेत.

सद्य:स्थितींत भारतांतील सार्वत्रिक शिक्षणाचा विकास कोणत्याच दृष्टीनं अमेरिकेइतका अर्थातच झालेला नाहीं. मात्र राज्यसरकारें आणि स्थानिक स्वराज्यसंस्था आपापल्या विभागांतील प्राथमिक आणि दुय्यम शाळा वाढविण्याच्या मागें आहेत. दिल्ली पब्लिक स्कूलसारख्या शाळांपेक्षां या शाळा खूपच बाबतींत वेगळ्या आहेत. त्यांची स्थापना स्वातंत्र्योत्तर काळांत झालेली आहे हें एक, आणि त्या निमसरकारी स्वरूपाच्या आहेत हें दुसरं. बहुधा या शाळांमध्यें शिक्षण मोफत असतं. माध्यम हिंदी किंवा प्रादेशिक भाषेचं असतं आणि इंग्रजीचा दर्जा आणि महत्त्व कमी असतं. शालान्त परीक्षा घेणारीं परीक्षक मंडळं ज्या त्या विभागांतील असतात आणि त्या शाळांचीं मुलं या परीक्षा देतात. त्यांचा अभ्यासक्रम महाविद्यालयपूर्व शिक्षणाची तयारी करणारा असतोच, पण पुष्कळ वेळां शेतकी, गृहशास्त्र, हस्तव्यवसाय यांचाहि त्यांत समावेश केलेला आढळतो.

केंद्रसरकारला जुन्या शिक्षणपद्धतीच्या मर्यादा कळून चुकल्या आहेत. सध्यां शिशुगटापैकीं निम्मींअधिक मुलं खेड्यांतसुद्धां शाळेंत जात असलीं, तरी किशोर वयाच्या मुलांमुलींपैकीं फक्त दहा टक्के मुलांनाच शिक्षणाचा लाभ घडूं शकतो.

भारतीय घटनेमध्यें चौदा वर्षांपर्यंत सर्व मुलांना सक्तीचं आणि मोफत शिक्षण देण्याच उद्दिष्ट नमूद केलं आहे. हें ध्येय गांठण्यासाठीं भारतभर नव्या शाळा उघडण्याची मोहीम चालू आहे. भारताची बहुसंख्य जनता खेड्यापाड्यांतूनहि साक्षर होत आहे. मला वाटतं, भारतांत खेडीं हीं राहतीलच, पण निरक्षरता मात्र उरणार नाहीं. आजच्या नवभारतांत जे भगीरथ प्रयत्न चालू आहेत ते ही गोष्ट स्पष्ट करण्यास पुरेसे आहेत. खेडूत म्हणजे अज्ञानी, अडाणी, निरक्षर हें दुष्ट समीकरण नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.

## : ४ :

दिल्ली पब्लिक स्कूलबद्दल माझं, सॅमचं आणि सॅलीचं मत जरी निरनिराळं असलं तरी तिथें जोडलेली मित्रमंडळी ही तेथील सर्वांत मोलाची गोष्ट होती याबद्दल आमचं अगदीं एकमत होतं.

सुमन नांवाची एक मुलगी माझी जिवलग मैत्रीण बनली. वरकरणी पाहतां प्रत्येक गोष्टींत ती माझ्यापेक्षां वेगळीच होती. तरी तिची माझी अगदीं गट्टी जमली. ती दिसायला गोड होती आणि बोलण्याचागण्यांत धीट होती. शाळेच्या पहिल्याच दिवशीं इतर सर्व मुलींपेक्षां तिनं दाखवलेली धिटाई आणि जिज्ञासा माझ्या चांगलीच लक्षांत आहे.

भारतीय मुलींबाबत माझी जशी ठरीव ठशाची कल्पना होती, तशी तिच्याहि मनांत अमेरिकन मुलींबद्दल एक साचेबंद कल्पना होती. त्याला मुख्य आधार म्हणजे तिनं पाहिलेल्या हॉलिवुडनिर्मित चित्रपटांचा. तिच्या वयाची, तिनं प्रत्यक्ष पाहिलेली मी पाहिलीच अमेरिकन मुलगी होतें. माझं वागणं बोलणं, कपडे करणं, सगळंच तिच्या अपेक्षेपेक्षां वेगळं असलेलं पाहून ती जरा खट्टूच झाली म्हणानात ! पण माझ्याशीं मैत्री करण्याची तिला तीव्र इच्छा होती आणि तेवढ्यासाठीं पहिल्या पहिल्यांदा ती कितीतरी गोष्टी केवळ माझ्याबरोबर करण्यासाठीं ती आपला नित्यक्रम बदलीत असे.

आमची ओळख होऊन सुमारें महिना लोटल्यानंतर सुमननें मला नव्या दिल्लींतील चित्रपटगृहांची माहिती करून द्यायला सुरुवात केली. रिवोली थिएटर कॉनॉट प्लेसच्या अगदीं जवळ आहे. कॉनॉट प्लेस म्हणजे बड्या लोकांचं बाजारहाट करण्याचं ठिकाण. तेथवर आम्ही शाळेच्या बसनं गेलों.

थिएटरमध्यें तशी बरीच गर्दी दिसली. त्यामध्यें बरेच सुशिक्षित वेकार आणि कॉलेजकुमार होते असं सुमन म्हणाली. तिथें मुली आधींच थोडया होत्या. त्यांतून माझा वेष वेगळा. मला इतकं ओशाळगत वाटत होतं कीं विचारतां सोय नाहीं. आपणहि सुमनसारखाच पंजाबी पोशाख करून आलों असतों तर एवढं अवघडल्यासारखं तरी झालं नसतं असाहि विचार मनांत आला.

सलवार म्हणजे घोट्यापर्यंत लांबीच्या पायजम्याचाच एक प्रकार. त्याला कमरेपाशीं नाडी असते. एकूण घेर जवळजवळ दोन वारांचा असतो! बहुधा सलवार पांढऱ्या सुती कापडाची असते; पण सलवार खमीस दोन्ही एकाच कापडाचे बनवतात.

हिंदुस्थानींत कमीज़ याचा अर्थ अंगरखा असा होतो. कमीज़ कमरेपाशीं सैल असतो, पण त्याची एकूण ठेवण पाहून पुरुषांच्या शर्टाचीच आठवण होते. शिवतांनाचं त्याचं तंत्र मात्र स्वतंत्र आहे, आणि घालतांना तो सलवारीवरून घालतात. अमेरिकन मुलींच्या फ्रॉक्प्रमाणेंच खमिसांचे रंग, लांबी, कापडाची तऱ्हा, शिवण्याची रीत यांच्याबाबत 'व्यक्ति तितक्या प्रकृति' हेंच बघायला मिळतं.

सुमनचे खमीस बहुधा झगमगीत रंगाचे, मोठाल्या प्रिंटचे आणि गुडघ्यापर्यंत पोंचणारे असत. तेव्हां लांब खमीसांची फॅशनच होती. शाळाकॉलेजांत जाणाऱ्या बहुतेक मुली गुडघ्यापर्यंत, क्वचित् त्याहून लांब, पोंचणारे खमीस वापरीत असत.

दिल्लीकर मुलीच्या वेषभूषेचा सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे ओढणी. ओढणीलाच चुन्नी किंवा दुपट्टा म्हणतात. हें उपवस्त्र सहा फूट लांब आणि दोन फूट रुंद असतं. ओढणीचं कापड बहुधा झिरझिरीत, हलकंफुलकं असतं. अंगावर घेतांना डोक्यावरून किंवा दोन्ही खांद्यांवरून मागें सोडून घेतात.

हा वेष पंजाबी पोशाख म्हणून ओळखला जातो. तिथलं वैशिष्ट्य आहे तें. पंजाब हा दिल्लीच्या उत्तरेलगतचा प्रान्त. पण आजकाल साडीच्या गैरसोयी टाळण्यासाठीं सर्वच प्रांतांतील मुली खेळतांना आणि कामांत पंजाबी पोशाख वापरतांना दिसतात.

त्या दिवशींचा सुमनचा पोशाख तिला विशेषच शोभून दिसत होता.

जातीच्या सुंदरांना कांहींहि शोभतं म्हणा! त्या दिवशीं पांढऱ्या शुभ्र सलवारीवर फिक्या आणि गडद हिरव्या रंगाच्या डिझाईनचा खमीस तिनं घातला होता आणि पांढरीच ओढणी घेतली होती. तिच्या ओठावरची लिप्स्टिकची रंगरेखा तिच्या आधुनिकतेची साक्ष देत होती. भारतांत पाश्चात्य संस्कृतीचा स्पर्श झालेल्या कांहीं थोड्या तरुणीच लिपस्टिक वापरतात. तिनं आपल्या काळ्याभोर लांबसडक केंसांच्या दोन वेण्या घातल्या होत्या. दोन्ही हातांत कांचेच्यीं कंकणं किणकिणत होतीं. तिच्या मानानं आपण अगदींच कमी तोलाच्या दिसतों आहोंत असं त्या दिवशीं त्या थिएटरमध्यें शिरून तिकिटं काढायला जातांना मला राहूनराहून वाटत होतं.

तें थिएटर कुठल्याहि अमेरिकन थिएटरसारखंच होतं, पण कनेक्टिकटमध्यें मी पाहिलेल्या कुठल्याहि थिएटरपेक्षां जास्त शान तिथें होती. तिथल्या किनखापावरूनच तें लक्षांत येण्याजोगं होतं. तिकिटांच्या दरानुसार बसण्याच्या जागेचे तीन विभाग पाडले होते.

सर्वांत कमी दराचं तिकीट होतं सव्वा रुपयाचं. या दराच्या जागा पडद्याच्या अगदीं जवळ होत्या. पण हा दर सुद्धां (सुमारें २५ सेंट्स्) बहुतेक भारतीयांच्या आवांक्याबाहेरचा आहे. सर्वांत जास्त दराचं तिकीट म्हणजे तीन रुपये बारा आण्याचं. (सुमारें ७५ सेंट्स्.) बहुतेक लोक—आम्ही त्यांत आलोंच—अडीच रुपये दराचं तिकीट काढून जातांना दिसले. [हा दर सुमारें ५० सेंट्चा.]

वेफर्स, एक थंड पेय वगैरे घेऊन आम्ही आंत शिरलों. सिनेमा सुरू व्हायला अजून थोडा अवकाश होता. तोंवर थिएटरमध्यें लोकप्रिय हिंदी आणि अमेरिकन गाण्यांच्या ध्वनिमुद्रिका चालू होत्या.

मुख्य चित्रपटापूर्वीं तीन छोटे माहितीपट दाखविण्यांत आले. एक भारतीय वार्ताविषयक, एक जागतिक घडामोडींबद्दल व एक युनायटेड स्टेट्स्मधील बातम्यांबद्दल असे ते होते. यानंतर कांहीं जाहिराती, एक व्यंगचित्रपट एवढं झाल्यावर 'फ्रॅन्सिस् गोज् टु रेसेस्' हा हॉलिवुडनिर्मित चित्रपट सुरू झाला.

हॉलिवुडचे पुष्कळच चित्रपट नव्या दिल्लींत आणि भारतांतील मोठ्या शहरांतून दाखवले जातात. मी सिनेमाला क्वचितच जात असें, आणि गेलें

तर सुमनबरोबरच. भारतांतील श्रीमंतांच्या मुलींना दर आठवड्याला सिनेमा बघण्याचा नादच आहे. सुमनहि याला अपवाद नव्हती. तिच्याबरोबर असेच कधींमधीं मी 'कम् बॅक् लिटल् शीबा' 'गॅस लाईट' 'स्कॅरापूश' आणि एक बॉब होपचा असे चित्रपट पाहिले.

भारतांतले सिनेशौकीन मुख्यतः असल्या चित्रपटांवरूनच अमेरिकेबद्दलच्या कल्पना आणि आपलीं मतं बनवीत असतात. 'कम् बॅक् लिटल शीबा' या चित्रपटांतले कांहीं प्रसंग पाहून मी अवघडल्यासारखी झालें होतें. त्यामध्यें शाळेंतल्या वरच्या वर्गातला एक मुलगा खुशाल आपला एका मैत्रिणीशीं अति प्रसंग करतांना दाखवला होता! आणि सर्वांत अचंब्याची गोष्ट म्हणजे एरवीं अशा मुलाला जो प्रतिकार होईल, त्याचा फारसा मागमूस नव्हता त्यांत.

अमेरिकेंत तो सिनेमा मीं मजेंत पाहिला असता. त्या विशिष्ट प्रसंगावर तर मीं विचारसुद्धां केला नसता. पण या प्रसंगामागची भूमिका मला जशी परिचयाची होती, तसं या इतरांचं नव्हतं हें त्या थिएटरमध्यें माझ्या लक्षांत आलं. या असल्या दृश्यांमुळें अमेरिकन लोकांना नीति आणि शालीनता यांचा गंधहि नाहीं असाच ग्रह या सर्वांचा होणार.

हॉलिवुडनिर्मित जे चित्रपट भारतांतील आणि आशियांतील मोठमोठ्या शहरांत पाठवले जातात, त्यांच्यापैकीं 'कम् बॅक् लिट्ल् शीबा' हा त्यांतल्या त्यांत बऱ्यापैकीं चित्रपट होता असंच म्हटलं पाहिजे. उदाहरणादाखल सांगायचं झालं तर कांहीं सिनेमांत पाश्चात्य लोक अमेरिकेंतील इंडियन लोकांशीं ग्राम्य, उद्दाम वर्तन करतांना दाखवलेले असतात. तीं दृश्यं बघायला अमेरिकेंतहि तिटकारा वाटतो, पण दिल्लींत तर तीं फारच गर्हणीय वाटलीं. अमेरिकन जीवनाबद्दल हे चित्रपट चुकीच्या कल्पना पसरवीत असतात. इतकंच नव्हे तर अमेरिकेची संपत्ति आणि ऐश्वर्य यांचं एवढं भडक चित्र रंगवतात, कीं त्या सगळ्यालाच पारखा असलेला भारतीय मनुष्य "अमेरिका म्हणजे पृथ्वीवरचं साक्षात् नंदनवनच आहे" असं मनाशीं ठरवून टाकतो. माझ्या एका पत्रमित्रानं असंच मत बनवून घेतलं होतं. या चित्रपटांमध्येंच केवळ दृष्टीस पडणाऱ्या भोगविलासांमध्येंच आपल्या भोंवतींच्या वैफल्यपूर्ण परिस्थितीची जहरी जाणीव जणुं काय बुडवून टाकण्याचा त्यांचा प्रयत्न असतो.

यापेक्षांहि व्यक्तिमत्त्वाच्या घडणीच्या दृष्टीनं महत्त्वाची प्रतिक्रिया होते, ती अल्लड वयांतील मुलांमुलींची. अमेरिकेंतील तरुण पिढीच्या सहजीवनाचं चित्र त्यांना दिसतं. त्यांची मैत्री, शिक्षण, धर्म व इतर सामाजिक क्षेत्रांत समपातळीवर घडणारा त्यांचा सहवास, यांमधून हें चित्र विकास पावतांना त्यांना दिसतं. यामुळें जातिसंस्था, एकत्र कुटुंबपद्धति, आणि समाजानं लादलेल्या बंधनकारक नीतिकल्पना यांच्याबद्दल त्यांच्या मनांत नाना प्रकारचे विचार उत्पन्न होऊन एक प्रकारचा असंतोष मनांत मूळ धरूं लागतो.

इटालियन चित्रपटहि भारतांत लोकप्रिय आहेत, तेहि दिशाभूल करणारेच असतात. मीं आणि सुमननं "बिटर राईस," आणि 'बायसिकल् थीफ्' हे चित्रपट पाहिले. ५२ सालीं आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव दिल्लींत भरवण्यांत आला होता, तेव्हां आम्हीं कांहीं जपानी आणि रशियन चित्रपट पाहिले.

प्रत्यक्ष भारतीय चित्रपटसृष्टि अमेरिकेखालोखाल सर्व जगांत मोठी आहे. सुमन आणि इतर मित्रमैत्रिणींबरोबर मी बरेच भारतीय चित्रपट पाहिले. लांबी, विषयवैचित्र्य, आणि एकाच व्यक्तीवर कोसळणारी संकटश्रेणी यांच्या दृष्टीनं पाहिलं तर बहुतेकांचा तोंडवळा हॉलिवुडच्या "गॉन् विथ द विंड" सारखा असतो. जन्म, मृत्यु, आजार, अपघात—त्या नायिकेच्या जीवनांत अमूक एका गोष्टीला वगळ म्हणून नसते. इतर कित्येक चित्रपटांत विनोद आणि गांभीर्य यांचं मिश्रण करण्याचा अयशस्वी प्रयत्न दिसून येई. भारतीय जीवन त्यामध्यें अतिरंजित स्वरूपांत रेखाटलेलं असे. हॉलिवुडचाच भारतीय नमुना तो! पुष्कळदां त्यामध्यें भारताच्या अभिमानास्पद भूतकाळाचं गुणगानच कितीतरी भाग खर्ची घालून केलेलं असे.

—

मला फार दिवसांपासून भारतीय विवाहविधि बघायचा होता. जानेवारीच्या शेवटींशेवटीं एक दिवस सुमननं मला तिच्या एका मैत्रिणीच्या लग्नाला येणार का म्हणून विचारलं. मी अर्थातच एका पायावर तयार होतें. दुसऱ्या दिवशीं लग्न होतं. संध्याकाळीं मला घेऊन जायचं सुमननं कबूल केलं.

पांच वाजतां ती गाडी घेऊन आली, तेव्हां मी तयारच होतें. आज सुमन

साडी नेसून आली होती. अगदीं चांगली बाईच दिसत होती ती ! सबंध पदरावर टिकल्यांनीं नक्षी काढलेली गुलाबी रंगाची साडी तिनं परिधान केली होती. चमचमणारीं कर्णफुलं आणि सोन्याच्या पाटल्याहि तिनं घातल्या होत्या.

अमेरिकेंत एवढे दागदागिने घालणं म्हणजे अफाट श्रीमंतीचंच लक्षण समजलं जाईल. पण सुमनचं घर कांहीं अशा नवकोट ऐश्वर्याचं नव्हतं. सोन्याचांदीचे दागिने दिल्लींत फारसे महाग नाहींत आणि साधारण परिस्थितींतील मुलींजवळ सुद्धां त्यांचे मौल्यवान् दिसणारे दागिने असतात.

दिल्लीच्या गजबजलेल्या रस्त्यांतून वाट काढीत आमची मोटार निघाली. वाटेंत रस्त्याच्या कडेला असलेले बगीचे माणसांनीं फुलून गेले होते. कुटुंबवत्सल लोक, विद्यार्थ्यांचे गट, काम आणि अभ्यास बाजूला ठेवून घटकाभराच्या विश्रांतीसाठीं आणि करमणुकीसाठीं आले होते. सगळ्या जगांतच मला वाटतं, सार्वजनिक उद्यानांमध्यें हें दृश्य आपल्याला आढळेल.

तें लग्नघर जुन्या दिल्लीमधील एका अरुंद, अस्वच्छ गल्लींत होतं. रस्त्यानं गर्दीहि खूप होती. पण घर आंतून मात्र चांगलं प्रशस्त आणि आरामशीर होतं. त्याच्या बाह्यरूपावरून तिथें इंग्रजी जाणणारं कोणी असेल असं कांहीं मला वाटलं नव्हतं. पण बघतें तों बरींच माणसं इंग्रजींत संभाषण करणारीं भेटलीं कीं. मला खरंच आश्चर्य वाटलं. आम्ही गेलों तेव्हां घरांत वऱ्हाडी मंडळींची गर्दी जमलेली होतीच. आम्हांला ज्या खोलींत बसायला सांगितलं तिथें बऱ्याच बायका आणि मुली गप्पा मारीत बसल्या होत्या.

वधू त्यांच्यांतच बसली होती. तांबड्या रंगाची लगीनसाडी तिच्या अंगावर होती. अजून ती लाजायला मुरकायला लागली नव्हती. पण 'तिकडची' स्वारी आणि त्यांचा परिवार यायचा अवकाश, कीं लगेच तिला सलज्ज बनून शालीनता धारण करणं भाग होतं. तिच्याभोंवतीं गराडा घालून बसलेल्या जवळच्या नातेवाईकांनीं तिचं सारखं कौतुक चालवलं होतं आणि सर्वजणी तिच्या सरबराईत दंग होत्या. कुणीं तिची साडी नीट करीत होतं तर कुणीं तिच्या केसांत माळलेलीं रंगीबेरंगी फुलं नीट खोंचून बसवीत होतं.

सुमन आणि मी कांहीं दिवसांपूर्वीं एका लग्नाच्या पानसुपारी समारंभाला गेलों होतों, त्याची मला आठवण झाली. तिथली नवरी मुलगी इतकी

लाजरी होती, कीं ती अधोवदनच उभी होती; मग डोळे वर करून बघायची गोष्टच नको! नंतर मला कुणींतरी सांगितलं कीं हा कांहीं अभिनयच असतो असं नव्हे. तो अभिनय असो अगर नसो, पण वधू म्हटली कीं सलज्ज आणि विनम्र असली पाहिजे ही साऱ्यांची अपेक्षा असते. लग्न होऊन नव्या घरीं यायचं म्हणजे परकऱ्या मुलीसारखा अल्लडपणा सोडायला हवा, शालीन आणि कर्तव्यदक्ष पत्नीची भूमिका पार पाडण्यासाठीं जबाबदारी ओळखायला हवी, हें गृहीत धरलें जातें.

लग्नाला जमलेल्या सर्व बायका तिला शुभेच्छादर्शक भेटी देत होत्या. सस्मित अभिवादन करून ती आहेर स्वीकारत होती. पण एवढंच. पुन्हा आपली तिची नजर जमिनीवरच स्थिर होत होती.

या आजच्या वधूला थोड्याच वेळांत असं बनून बसावं लागणार होतं, कारण नवरदेवाची 'बरात' जवळ आल्याची सूचना वाद्यांच्या आवाजानं दिली. सुमन आणि मी धांवतच दुसऱ्या मजल्याच्या गॅलरींत गेलों. तिथून रस्त्यावरचा देखावा छान दिसत होता.

हिंदु पद्धतीप्रमाणें लग्नाच्या दिवशीं नवरामुलगा घोड्यावरून किंवा पायीं स्वतःच्या घरापासून वधूच्या घरापर्यंत जातो. पण हा आधुनिक मुलगा फुलांनीं सजवलेल्या उघड्या मोटारींतून आला. 'बरातीं'तली ती गाडी आम्हांला लांबून सुद्धां दिसत होती.

मिरवणुकीच्या अग्रभागीं वाजंत्री होत्या. दोघं ताशेवाले आणि दोघं सनईवाले. त्यांच्या बजावण्यांत सुरावटीपेक्षां शक्य तितका मोठा आवाज काढण्याचं महत्त्व जास्त दिसलं! पण ते मोठ्या खुषींत येऊन अगदीं मनापासून आपलं काम अक्षरशः 'बजावीत' होते! त्यांच्या पाठोपाठ नवऱ्यामुलाची गाडी येत होती. गाडींत त्याच्याखेरीज इतरहि जवळचे नातेवाईक बसले होते. त्या मुलानं पाश्चात्य पद्धतीचा सूट घातला होता, आणि खांद्यापासून वर डोळ्याखेरीज सर्व चेहरा झांकून टाकणारं बाशिंग बांधलं होतं. गाडीच्या मागून इतर वऱ्हाडी मंडळी आणि बरेच बघे लोक येतांना दिसत होते.

घराच्या दाराजवळ 'बरात' आली तेव्हां घरचीं कर्तीं माणसं स्वागतासाठीं पुढें झालीं. गाडींतून उतरल्यावर नवऱ्यामुलानं बाशिंग दूर केलं आणि व्याही

लोकांनीं शुभेच्छादर्शक म्हणून गुलाबपाणी एकमेकांवर उडवलं. हें सर्व चालू असतां आम्ही सर्व जण वरून फुलांच्या पाकळयाचा वर्षाव करीत होतों.

एवढं झाल्यावर सर्व जण घरांत आले. रात्रीची मेजवानी आटोपल्यानंतर लग्नसमारंभ सुरू होण्याची सर्व जण वाट पाहत बसले. पण १० : ३० पर्यंत थांबूनहि जेव्हां कांहींच हालाचालीचं चिन्ह दिसेना तेव्हां मात्र खट्टू होऊन मला आणि सुमनला तेथून निघावंच लागलं. नंतर आम्हांला कळलं कीं लग्नसमारंभ संपायला उजाडायचीच वेळ आली म्हणे!

भारतांतील वास्तव्यांत हिंदु आणि शीख पद्धतीचे लग्नसमारंभ मीं पुष्कळ वेळां पाहिले. वधूपक्षाच्या मांडवांतच बहुतेक हे विधि होतात. त्यांना वेळहि बराच लागतो. लहानशा होमाभोंवतीं वधूवरांच्या उपवस्त्रांची गांठ मारून सप्तपदीचा विधि झाला कीं विवाहविधि पूर्ण होतो.

माझ्या एका जिवलग मैत्रिणीचं लग्न दिल्लींत झालं. लग्नांतल्या तांबड्या भरजरी शालूत ती फारच सुंदर दिसत होती. पुष्कळशीं सोन्याचीं कांकणं तिनं भरलीं होतीं आणि सोन्याच्या तारेंत गुंफलेल्या भांगसराचं पिंपळपान तिच्या कपाळावर रुळत होतं. काजळामुळें मुळांतच सुंदर असलेले तिचे डोळे अधिकच सुंदर दिसत होते. तिच्या कपाळावर पांढऱ्या ठिपक्यांचीं सुंदर नक्षी काढली होती. लग्नसमारंभानंतर लग्नाची मेजवानी तिच्याच घरीं झाली होती.

सुमन आणि मी खूप मजा करीत असूं. पहिल्या पहिल्यांदां चारदोन तासांच्या करमणुकीमध्यें सहभागी होणारी मैत्रीण एवढंच तिचं माझं नातं होतं. ती माझ्याशीं चांगुलपणानं वागायची आणि कंटाळा आला असला कीं मनोरंजनाचा कांहीं तरी मार्ग शोधून काढायची. कांहीं वेळां तर तिच्या धीटपणानं मी चकित होऊन जायची. कारण भारतांतील वातावरण हें आचाराच्या बाबतींत कांटेकोर असतें. आमच्यामधलं औपचारिक नातं महिना दोन महिन्यांतच नाहींसं झालं आणि ती माझी जिवलग मैत्रीण बनली. अमेरिकेंतल्या मैत्रिणींसारख्याच तिच्याबरोबरहि माझ्या रहस्याच्या गुजगोष्टी चाललेल्या असत.

जानेवारी महिन्यांतला एक दिवस मला चांगला आठवतो. जानेवारी दिल्ली-मध्यें फारच रम्य असतो. निरभ्र आकाशाची निळाई अधिकच गहिरी वाटत असते आणि सूर्यकिरणांची ऊब हवीहवीशी वाटते. वातावरण कसं स्वच्छ आणि प्रकाशमय असतं. पाठ शेकावी इतपत उन्ह तापलेलं असतं, पण त्याच-बरोबर चांगला जाड स्वेटर असल्याखेरीज सांवलीमध्यें उभं राहवूं नये, इतपत शीतलहि असतं. सुमन, मी आणि इतर कांहीं मुलंमुली त्या दिवशीं शाळा सुटल्यावर हॉकी खेळण्यासाठीं थांबलों होतों.

खेळ संपवून मी आणि सुमन ऊन खात बसलों होतों. तेवढ्यांत एक भडक सजवलेली ट्रक शाळेवरून जातांना दिसली. त्या ट्रकच्या दोन्ही बाजूला रंगी-बेरंगी ठळक चित्रं लावलेलीं होतीं आणि "पटेलांना मतें द्या" "कॉंग्रेसला मतें द्या" अशीं प्रचारवाक्यं लिहिलेलीं होतीं. बैलाचं खुणेचं चित्र आणि तोच मजकूर इंग्रजी, हिंदी आणि ऊर्दू भाषांतून लिहिलेला होता. ट्रकमध्यें गचडी करून उभीं राहिलेलीं माणसं मन मानेल त्या पट्टींत 'कॉंग्रेसला मतें द्या' म्हणून ओरडत होतीं. दिल्लीच्या विधानसभेची पहिली निवडणूक केवळ एका आठवड्यावर आली होती आणि दिल्लींतील प्रमुख पक्षांच्या प्रचार-मोहिमा धूमधडाक्यानं चालू होत्या. मुख्य पक्ष म्हणजे कॉंग्रेस, समाजवादी, जनसंघ आणि कम्युनिस्ट.

त्या चित्रामधल्या बैलाचं स्पष्टीकरण मी सुमनला विचारलं. तेव्हां ती कॉंग्रेस पक्षाची खूण आहे असं तिनं सांगितलं. निरक्षर लोकांच्या सोयीसाठीं कॉंग्रेसनं बैल, समाजवादी पक्षानं झाड, जनसंघानं दिवा आणि कम्युनिस्टांनीं विळा आणि गव्हाची लोंबी अशीं संकेतचिन्हं जाहीर केलीं होतीं. ज्या पक्षाला मत द्यायचं असेल, त्याच्या खुणेच्या पेटींत आपली मतपत्रिका ते टाकतात.

अमेरिकेंतहि अशा खुणा राजकीय पक्ष वापरतात का? असा प्रश्न सुमननं मला केला. मग रिपब्लिकन हत्ती आणि डेमॉक्रॅटिक गाढव या चिन्हांचे इति-हास आणि गंमती मीं तिला सांगितल्या, अमेरिकेंतील द्विपक्ष राज्यपद्धति, प्रचारमोहीम, निवडणुका यांबद्दलची माहिती मी तिला बोलतांबोलतां सांगि-तली. प्रचाराबाबत दोन्ही देशांत फारच थोडा फरक आहे यावर आमचं अगदीं एकमत झालं.

'पण भारतांत द्विपक्ष पद्धति अस्तित्वांतच नाहीं' सुमन पुढें म्हणाली. 'कॉंग्रेस हा सर्वांत बलाढ्य पक्ष आहे. आणि इतर कुठलाच पक्ष त्याची बरोबरी करूं शकत नाहीं. कम्युनिस्ट आणि समाजवादी पक्षांना थोडाबहुत पाठिंबा आहे, पण जनसंघाचं बळ त्या मानानें कमी आहे.'

जनसंघाचे कार्यकर्ते अभिनिवेशाच्या भरांत "हिंदूसाठीं हिंदुस्थान" असा पुकारा करून सर्व मुसलमानांना पाकिस्तानांत वा अन्य मुस्लीम राष्ट्रांत जाणं भाग पाडलं पाहिजे अशी विचारसरणी मांडत असतात. अशा गोष्टींबरोबरच इतर लहान पक्षांची आणि स्वतंत्र उमेदवारांचीहि थोडीबहुत माहिती सुमननं मला दिली.

मी जशी अमेरिकेंत असतांना राजकारणाशीं ओळख करून घेत होतें, तसंच सुमनचंहि होतं. तिचे वडील दिल्लीच्या राज्यसभेसाठीं स्वतंत्र उमेदवार म्हणून त्यांच्या राहत्या घराच्या मतदारसंघांतून उभे होते. शिडी ही त्यांची निशाणी होती आणि "आपल्याला हवी प्रगती, कॉंग्रेसला पाडा खालती" असं त्यांचं घोषवाक्य होतं. तें ऐकून मी आश्चर्य व्यक्त केलं, कारण कॉंग्रेस हा भारतांतील पुरोगामी वृत्तीचा पक्ष आहे अशीच माझी समजूत होती. पण सुमन म्हणाली कीं स्वातंत्र्योत्तर काळांत कॉंग्रेस प्रगतिशील राहील ही जी सर्वांची अपेक्षा होती, ती सर्वांशानं पूर्ण झाली नाहीं. त्यांनीं देशासाठीं मोलाचं कार्य केलं हें जरी खरं असलं तरी प्रगतीच्या कार्यक्रमांच्या अंमलबजावणींत जी दिरंगाई आढळते ती फार मारक ठरते. नंतर नंतर पुष्कळांकडून ही टीका मीं ऐकली. ज्या लोकांशीं मी बोललें ते सर्व प्रगतीसाठीं उत्सुक दिसले. सारा भारतच गतीचा कायदा पाळण्यासाठीं अधीर झाला आहे! असंच आमचं बोलणं दुपार उलटली तरी चालू होतं. त्या गप्पागोष्टींमुळें सुमनच्या स्वभावाची चांगली ओळख मला झाली आणि तिच्याविषयीं मला अधिक जिव्हाळा वाटूं लागला. प्रथमदर्शनीं झालेलं माझं मत मला बदलावं लागलं. पाश्चात्यांचं केवळ अंधानुकरण करणाऱ्या सिनेशौकीन किशोरींपैकीं ती नव्हती.

फेब्रुवारीच्या सुरुवातीची गोष्ट. मला आतां भारतांत येऊन जवळजवळ तीन महिने लोटले होते. माझ्या वर्गमैत्रिणींनीं मला भारतीय पेहराव चढवायचं

ठरवलं. भारतांत मागणीनुसार कपडे शिवून देणाऱ्या शिंप्याला 'दर्जी' म्हणतात. सुमनच्या सूचनेनुसार आम्हीं कापड खरेदी केल्यावर तिच्याच शिंप्याकडे माझी सलवार खमीस शिवायला टाकायचं ठरवलं.

खरं सांगायचं तर अलीकडे स्वतःची सलवार खमीस असावी अशी मलाच मनांतून इच्छा झाली होती. अमेरिकन पोशाखांत माझं वेगळेंपण जास्तच जाणवायचं आणि त्यांत सायकलवर बसतांना बरीच गैरसोय वाटत असे. सुमनच्या घरासमोर ठीक चार वाजतां आम्हीं भेटायचं ठरवलं.

बाबर रोडवरचं सुमनचं घर म्हणजे सिमिटाचा छोटेखानी टुमदार बैठा बंगला आहे. मी सायकलवरून तिथें पोंचलें तेव्हां माझी वाट पहात ती दारांतच उभी होती. कापडबाजार अगदींच जवळ असल्यानें आम्हीं पायींच जाऊन खरेदी करायचं ठरवलं. बाबर रोडवरून निघून दुतर्फा रांगेनं गर्द छायेचीं झाडं असलेल्या बाराखंबा रोडवरून आम्ही कॉनॉट सर्कलला पोंचलों. तेथून आम्ही क्वीन्सवेला वळलों. दिल्लींतला हा एक प्रमुख रस्ता. या रस्त्यावर हिंदु निर्वासितांचीं दुकानं आहेत. त्यांच्यापैकीं बहुतेक जण सध्यां पश्चिम पाकिस्तान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागांतून आलेले आहेत. त्यांनीं थाटलेल्या दुकानांत पुष्कळशीं कापडाचीं दुकानं आहेत. तिथें आपल्या आवडीचं कापड नक्कीच मिळेल असं आम्हांला वाटत होतं.

थोड्या वेळांतच आमची पसंती ठरवून आम्हीं सलवारीसाठीं पांढरं कापड तीन वार, खमीससाठीं निळ्या प्रिंटच सुती कापड अडीच वार आणि ओढणी-साठीं निळ्या रंगाचं तलम कापड पावणेदोन वार अशी खरेदी करून बाहेर पडलों. दर्जीचं दुकान जवळच्याच एका रस्त्यावर होतं. तिथवर आम्ही चालतच गेलों. माझ्या पसंतीची फॅशन त्याला सांगितली. त्यानं माझं माप घेऊन कपडे नेण्यासाठीं आठ दिवसांनीं यायला सांगितलं. ते कपडे मिळाल्यापासून मी रोजच भारतीय पेहराव करूं लागलें.

दर्जीच्या दुकानांतून निघाल्यानंतर आम्ही सुमनच्याच घराच्या बाजूला एका लहान रस्त्यावरच्या एका खाद्यवस्तूंच्या दुकानांत गेलों. हें दुकान तसं बाजाराला लागूनच होतं. तिथले पदार्थ जसे दृष्टीला चांगले दिसतात तसेच रुचीलाहि चटकदार असतात याची एकवेळ भेट देऊन आम्ही खात्री करून आलों! त्या

दिवशीं जे मसालेदार पदार्थ आम्हीं खाल्ले त्यांचं काय वर्णन करावं समजत नाहीं. आम्हीं थोडी मिठाईसुद्धां घेतली. पण येथपासून जी संवय लागली ती पुढें कधीं सुटली नाहीं. सुमनकडे गेल्यावर या दुकानाला भेट द्यायची हा क्रमच ठरून गेला!

सुमनच्या घरीं जाऊन तिच्या कुटुंबियांशीं ओळख करून घेण्याची संधि मात्र मार्च महिन्याच्या सुरुवातीपर्यंत मला मिळाली नव्हती. तिच्या घरांत मी प्रथम पाऊल ठेवलं तेव्हां क्षणभर आपण इसेक्समधल्या आपल्या गजबजलेल्या घरांतच शिरतों आहोंत असा मला भास झाला. लहान मुलांचं रडणं, खेळणाऱ्या मुलांच्या हास्याचा खळखळाट, मोठ्या माणसांच्या गप्पाटप्पा, छोट्या-मोठ्यांच्या पावलांचे ध्वनि, सारेच आवाज ओळखीचे वाटले.

तिच्या चुलतभावाच्या वाढदिवसानिमित्त त्या दिवशीं सर्वच तिथें जमले होते. दोन्ही घरचे आजी आजोबा, मावशा, आत्या, काका, मामा, सर्वच आले होते. त्यांत मुलांचा दंगा चालू होता. लहान बाळांना भरविण्यांत त्यांच्या माता गुंतल्या होत्या. सगळीकडे उत्साही, आनंदी वातावरण होतं, अन् प्रत्येकजण त्या गडबडीचा आस्वाद घेत हास्यविनोदांत रमून गेला होता. सुमननं तिच्या आईशीं आणि इतरांशीं माझी ओळख करून दिली अन् मग मीहि त्यांच्यांतीलच एक बनून त्या गडबडींत सामील झालें. सर्वांनींच मला आपलंसं केलं.

त्या दिवशीं मी परत निघालें, ती दुसऱ्या दिवशींच्या दुपारच्या जेवणाचं आमंत्रण घेऊनच. आत्तांपर्यंत शाळेंतल्या मैत्रिणींचे डबे संपवतांना भारतीय जेवणाची चव मीं चाखली होती, पण संपूर्ण भारतीय भोजनाचा आस्वाद मात्र मीं कधींच घेतला नव्हता.

दुसऱ्या दिवशीं सुमनच्या घराचं दार मीं ठोठावलं तेव्हां तिच्या धाकट्या भावानं दार उघडलं. मला बघतांच सुमनच्या नांवानं त्यानं आरोळी ठोकली. सुमन धांवतच बाहेर आली आणि चित्रपटावरून शिकलेल्या अगदीं खास अमेरिकन पद्धतीनं 'हाय्—' करून तिनं माझं स्वागत केलं. खरं स्वागत तिच्या चेहऱ्यावर झळकणारं स्मित केव्हांच करून चुकलं होतं. मी तिचं स्वागत स्वीकारून आंत गेलें आणि मग आमच्या गप्पा ज्या सुरू झाल्या, त्या जेवण तयार असल्याची सूचना येईपर्यंत!

'तुमच्या या घरांत कोणकोण राहतं ?' अशी मीं चौकशी केली आणि त्या ओघांत सुमननं मला एकत्र कुटुम्बपद्धतीची माहिती सांगितली. कुटुंबांत मुख्य माणसं म्हणजे आजोबा, आजी. त्यांचे मुलगे, सुना, नातवंडं, अविवाहित मुली एवढ्या परिवाराचा प्रपंच चालायचा.

भारतांत बहुतेक कुटुंबं अशींच आहेत असं सुमननं मला सांगितलं. पण आतांशा आईवडिलांपासून वेगळं राहून आपलं स्वतंत्र घर करण्याची प्रथा शिकलेल्या लोकांत रूढ होत आहे असं ती म्हणाली. पण तिचं मत असं होतं कीं 'आईवडिलांचं मायेच ऋण केवढं तरी असतं. त्यांच्या उतारवयांत त्यांचा सांभाळ करणं, त्यांचा आदर राखून आज्ञाधारक राहणं एवढं तरी किमान प्रत्येक मुलानं करायला काय झालं ?'

सुमनच्या घरांत तिचे आजी आजोबा, आईवडील, काकाकाकू, एक अविवाहित काका, एक अविवाहित आत्या आणि तिचीं भांवडं एवढीं माणसं आहेत.

त्यांच्या घरांतल्या मोठ्या जेवणाच्या टेबलाभोंवतीं आम्ही बसलों, तेव्हां बहुतेक सर्वांशीं माझा परिचय झाला. जरा संकोचानंच त्यांनीं मला इंग्रजींत अभिवादन केलं. थोड्या वेळानं त्यांचं संभाषण हिंदुस्थानींत सुरू झालं. त्या सर्वांनाच थोडंफार इंग्रजी अवगत होतं.

सुमनचं घर जरी हिंदुधर्मीय असलं, तरी ते लोक बहुसंख्य हिंदूंप्रमाणें शाकाहारी मात्र नाहींत. पण गाईबैलाचं मांस मात्र निषिद्ध मानतात. माझ्या अपेक्षेप्रमाणेंच जेवण फारच चांगलं होतं. खूप मसाला घातलेला कोंकराच्या मांसाचा रस्सा, बटाटे मटाराची रसभाजी, आणि वरण एवढीं तोंडीलावणीं होतीं. वरण हें प्रोटीनयुक्त अन्न असून त्याचा खर्च विशेष नसतो. याचा समावेश दोन्ही वेळच्या जेवणांत जवळजवळ सर्व भारतीय लोक करतात.

भात, पोळ्या हें मुख्य अन्न. पोळींसाटीं न आंबवलेली गव्हाची कणीक वापरतात. भिजवलेलं पीठ गोल लाटून भाजतात. पोळी हा उत्तरहिंदुस्थानी लोकांचा प्रमुख अन्नघटक आहे. नंतर एकदां तर मी पोळी करायला देखील शिकलें. कृति सांगायला अगदीं सोपी आहे. गव्हाच्या पिठांत पाणी मिसळून त्याची घट्टशी कणीक बनवतात. कणीक चांगली तिंबून तिचे उंडे बनवतात.

उंडे लाटून शेगडीवरच्या तव्यावर पोळी टाकली कीं मिनिटाभरांत तयार! याच पिठाचे इतरहि प्रकार करतात. भाजण्याऐवजीं थोडंसं तेल लावून ती तळल्यासारखी करतात—वगैरे. सुमनच्या घरीं, किंबहुना उत्तर हिंदुस्थानांत गव्हाइतक्या प्रमाणांत तांदूळ खात नाहींत. सुमनकडे रोज भात नसतोच.

याखेरीज चटण्यांचे प्रकार, बर्फासारखं शुभ्र दहीं, याहि गोष्टी पानांत होत्या. शेवटीं सफरचंदं, केळीं आणि आंबे अशीं फळं आम्हीं घेतलीं, आणि जेवण संपवलं.

बहुतेक सर्व दुपारभर आम्ही गप्पाच मारीत होतों. नंतर आम्हीं 'आमच्या' खास दुकानाला भेट दिलीच. येतांना दोन सेंटच्या किंमतींत मिळणारीं सुंदरपैकीं उसाचीं कांडीं घेऊन आलों.

यानंतर पुढें मी पुष्कळ वेळां सुमनकडे जेवायला जात होतें. जेवणानंतर आमच्या ज्या गप्पा चालायच्या, त्यांमधून सुमनच्या संपन्न व्यक्तिमत्त्वाचे वेगवेगळे पैलू माझ्या दृष्टीस पडायचे; आणि तिच्या सस्यश्यामला भारतभूमीची खूप माहिती मिळायची.

सुमन फार संवेदनाक्षम मुलगी होती. तशीच सहृदय आणि प्रेमळ. नव्या नव्या गोष्टी जाणून घ्यायला फार अधीर असायची. सिनेमा, मासिकं, चित्रांचीं पुस्तकं यांमधून दृष्टीस पडलेल्या अमेरिकेनं तिचं मन वेधून घेतलं होतं. शालीनतेच्या भारतीय कल्पना संभाळून जेवढं म्हणून अमेरिकन मुलींसारखं राहतां येईल तेवढं ती राहत असे. तिच्या मनांतली अमेरिकन मुलीची कल्पना एका ठराविक स्वरूपाची होती. जीं साधनं उपलब्ध होतीं, त्यांचं रेखाटनच या कल्पनेला आकार देत होतं.

प्रसाधनांमध्यें चेहऱ्याचे रंग, भिवयांची पेन्सिल, क्वचित् नखांचे रंग आणि अमेरिकन पद्धतीचे अलंकार ती वापरीत असे. साध्या चपलांपेक्षां उंच टाचांचे बूटच तिला पसंत पडत. (उलट इतर अनेकांप्रमाणें मी साध्या चपला वापरीं.) घरांतल्या घरांत ती (मी दिलेला) अमेरिकन पेहेराव घालत असे आणि बबलगम् चघळत असे. अमेरिकन नट्यांची नामावलि तिला पाठ होती आणि वॉल्ट्झ, फॉक्स् ट्रॉट, ऱ्हंबा हे नृत्यप्रकार तिला अवगत होते. अभिवादनाचे आणि इतर डझनावारी अमेरिकन वाक्प्रचार तिनं उचलले होते.

या सगळ्यामुळें सुमनला जादा धीट, 'पुढें गेलेली'—जवळजवळ चंटच—मुलगी समजत असत. तिची राहणीहि खर्चिक दिसे. तिच्या बाह्य वर्तनावरून तिला मायदेशापेक्षां अमेरिकेचंच प्रेम फार आहे असं कांहींना वाटे.

पण ती अशी उथळ नाहीं हें तिच्याशीं बोलतांना माझ्या पूर्ण लक्षांत आलं. हा वरवरचा आविर्भाव म्हणजे तिचं खरं रूप नव्हेच. माझ्या इतर मैत्रिणीं-प्रमाणेंच तीहि शंभर टक्के भारतीय होती.

तिनंच मला भारतीय विवाहपद्धति दाखवली, घरच्या आनंदोत्सवाला आवर्जून आमंत्रण दिलीं आणि भारताच्या सांस्कृतिक जीवनाशीं माझा परिचय वाढवला.

बाजारांत, हॉटेलांत जाऊन, गजबजलेल्या शहरांत फिरून भारतीय शहरी जीवनाची मजा त्यांच्यांतच एक होऊन मी बघत होतें, ती सुमनबरोबर. तिनंच मला रामलीलेला नेलं आणि एका महान् भारतीय महाकाव्याचं लोकप्रिय नाट्यरूप दाखवलं.

भारताचं यथार्थदर्शन घडवून त्याचा अर्थ समजावून घेण्यांत तिनं मला जशी मदत केली तशीच अमेरिकेबाबत माझ्याकडून तिला झाली असेल अशी मला आशा आहे. छोटेखानी शहरांतून वसलेल्या माझ्या अमेरिकेचं चित्र मी तिच्यापुढें रेखाटलं. माझं गांव, माझे लोक, त्यांची राहणी, कामधंदे, यांचीं वर्णनं केलीं. आमच्या शाळा, शिक्षणपद्धति, नगरपालिका, राज्यकारभार यांची माहिती सांगितली. मुख्य म्हणजे रंगरंगोटींत मग्न नसणाऱ्या, बब्ल्गमूचं प्रेम नसणाऱ्या, चित्रतारकांची नामावलि तर राहोच पण ओझरती ओळखहि नसणाऱ्या अमेरिकन मुलींचीहि तिला ओळख करून दिली आणि अमेरिकन मुलगी म्हणजे नस्त्यांच्या चरित्रांचे संदर्भग्रथ हा तिचा भ्रम दूर केला.

हें सारं खरं असलं, तरी मी परत यायला निघालें, तेव्हां वरकरणीं आमच्या पोशाखांकडे पाहून सुमनच अमेरिकन आणि मी भारतीय वाटलें असतें. पण याच्या खालीं असणाऱ्या हृदयांचीं स्पंदनं मात्र स्वतःच्या संस्कृतीनंच नटलेलीं होतीं.

मीं भारत सोडण्यापूर्वीं कांहीं दिवस सुमननं आपलं एक गुपित मला सांगितलं. एक तरुण तिला आवडला होता आणि आज ना उद्यां त्याच्याशीं विवाहबद्ध

उंडे लाटून शेगडीवरच्या तव्यावर पोळी टाकली कीं मिनिटाभरांत तयार! याच पिठाचे इतरहि प्रकार करतात. भाजण्याऐवजीं थोडंसं तेल लावून ती तळल्यासारखी करतात—वगैरे. सुमनच्या घरीं, किंबहुना उत्तर हिंदुस्थानांत गव्हाइतक्या प्रमाणांत तांदूळ खात नाहींत. सुमनकडे रोज भात नसतोच.

याखेरीज चटण्यांचे प्रकार, बर्फासारखं शुभ्र दहीं, याहि गोष्टी पानांत होत्या. शेवटीं सफरचंद, केळीं आणि आंबे अशीं फळं आम्हीं घेतलीं, आणि जेवण संपवलं.

बहुतेक सर्व दुपारभर आम्ही गप्पाच मारीत होतों. नंतर आम्हीं 'आमच्या' खास दुकानाला भेट दिलीच. येतांना दोन सेंटच्या किंमतींत मिळणारीं सुंदरपैकीं उसाचीं कांडीं घेऊन आलों.

यानंतर पुढें मी पुष्कळ वेळां सुमनकडे जेवायला जात होतें. जेवणानंतर आमच्या ज्या गप्पा चालायच्या, त्यांमधून सुमनच्या संपन्न व्यक्तिमत्त्वाचे वेगवेगळे पैलू माझ्या दृष्टीस पडायचे; आणि तिच्या सस्यश्यामला भारतभूमीची खूप माहिती मिळायची.

सुमन फार संवेदनाक्षम मुलगी होती. तशीच सहृदय आणि प्रेमळ. नव्या नव्या गोष्टी जाणून घ्यायला फार अधीर असायची. सिनेमा, मासिकं, चित्रांचीं पुस्तकं यांमधून दृष्टीस पडलेल्या अमेरिकेनं तिचं मन वेधून घेतलं होतं. शालीनतेच्या भारतीय कल्पना संभाळून जेवढं म्हणून अमेरिकन मुलींसारखं राहतां येईल तेवढं ती राहत असे. तिच्या मनांतली अमेरिकन मुलीची कल्पना एका ठराविक स्वरूपाची होती. जीं साधनं उपलब्ध होतीं, त्यांचं रेखाटनच या कल्पनेला आकार देत होतं.

प्रसाधनांमध्यें चेहऱ्याचे रंग, भिंवयांची पेन्सिल, क्वचित् नखांचे रंग आणि अमेरिकन पद्धतीचे अलंकार ती वापरीत असे. साध्या चपलांपेक्षां उंच टाचांचे बूटच तिला पसंत पडत. (उलट इतर अनेकांप्रमाणें मी साध्या चपला वापरीं.) घरांतल्या घरांत ती (मी दिलेला) अमेरिकन पेहेराव घालत असे आणि बबलगम् चघळत असे. अमेरिकन नट्यांची नामावलि तिला पाठ होती आणि वॉल्ट्झ्, फॉक्स् ट्रॉट, ऱ्हुंबा हे नृत्यप्रकार तिला अवगत होते. अभिवादनाचे आणि इतर डझनावारी अमेरिकन वाक्प्रचार तिनं उचलले होते.

या सगळ्यामुळें सुमनला जादा धीट, 'पुढें गेलेली'—जवळजवळ चंटच—मुलगी समजत असत. तिची राहणीहि खर्चिक दिसे. तिच्या बाह्य वर्तनावरून तिला मायदेशापेक्षां अमेरिकेचंच प्रेम फार आहे असं कांहींना वाटे.

पण ती अशी उथळ नाहीं हें तिच्याशीं बोलतांना माझ्या पूर्ण लक्षांत आलं. हा वरवरचा आविर्भाव म्हणजे तिचं खरं रूप नव्हेच. माझ्या इतर मैत्रिणीं-प्रमाणेंच तीहि शंभर टक्के भारतीय होती.

तिनंच मला भारतीय विवाहपद्धति दाखवली, घरच्या आनंदोत्सवाला आवर्जून आमंत्रणं दिलीं आणि भारताच्या सांस्कृतिक जीवनाशीं माझा परिचय वाढवला.

बाजारांत, हॉटेलांत जाऊन, गजबजलेल्या शहरांत फिरून भारतीय शहरी जीवनाची मजा त्यांच्यांतच एक होऊन मी बघत होतें, ती सुमनबरोबर. तिनंच मला रामलीलेला नेलं आणि एका महान् भारतीय महाकाव्याचं लोकप्रिय नाट्यरूप दाखवलं.

भारताचं यथार्थदर्शन घडवून त्याचा अर्थ समजावून घेण्यांत तिनं मला जशी मदत केली तशीच अमेरिकेबाबत माझ्याकडून तिला झाली असेल अशी मला आशा आहे. छोटेखानी शहरांतून वसलेल्या माझ्या अमेरिकेचं चित्र मी तिच्यापुढं रेखाटलं. माझं गांव, माझे लोक, त्यांची राहणी, कामधंदे, यांचीं वर्णनं केलीं. आमच्या शाळा, शिक्षणपद्धति, नगरपालिका, राज्यकारभार यांची माहिती सांगितली. मुख्य म्हणजे रंगरंगोटींत मग्न नसणाऱ्या, बबल्‌गमचं प्रेम नसणाऱ्या, चित्रतारकांची नामावलि तर राहोच पण ओझरती ओळखहि नसणाऱ्या अमेरिकन मुलींचीहि तिला ओळख करून दिली आणि अमेरिकन मुलगी म्हणजे नट्यांच्या चरित्रांचे संदर्भग्रंथ हा तिचा भ्रम दूर केला.

हें सारं खरं असलं, तरी मी परत यायला निघालें, तेव्हां वरकरणीं आमच्या पोशाखांकडे पाहून सुमनच अमेरिकन आणि मी भारतीय वाटलें असतें. पण याच्या खालीं असणाऱ्या हृदयांचीं स्पंदनं मात्र स्वतःच्या संस्कृतीनंच नटलेलीं होतीं.

मीं भारत सोडण्यापूर्वीं कांहीं दिवस सुमननं आपलं एक गुपित मला सांगितलं. एक तरुण तिला आवडला होता आणि आज ना उद्यां त्याच्याशीं विवाहबद्ध

होण्याचं स्वप्न ती बघत होती. पण भारतांत आधीं प्रेमविवाहच प्रचलित नाहींत. त्यांतून हा पडला परजातीचा. स्वतःच्या जातींतच लग्न करावं ही आईवडिलांची इच्छा सुमन कधीं मोडूं शकेल असं मला वाटलं नाहीं. त्यामुळें तिच्याच जातींतल्या दुसऱ्या एका मुलाशीं तिचा साखरपुडा झाल्याची वार्ता आणणारं पत्र जेव्हां माझ्या हातीं पडलं तेव्हां मला फारसं आश्चर्य वाटलं नाहीं.

दिल्ली पब्लिक स्कूलमध्यें तिची आणि माझी सर्वांत घनिष्ठ मैत्री होती. माझ्या इतरहि मैत्रिणी होत्याच. पूर्व आणि पश्चिम एकमेकींना परक्या वाटण्याचं कारण नाहीं. तर त्यांच्यांत अगदीं बहिणींचंसुद्धां नातं आहे हें मला त्यांनीं पटवून दिलं. परदेशपर्यटन करणाऱ्या सर्वांनाच हा अनुभव येतो असं मला वाटतं.

३६६८९ वि. ...
११६० नों: दि: ...

: ५ :

५१ सालचा डिसेंबर महिना आला, तरी दिल्ली, आसपासचीं 'प्रेक्षणीय' स्थळें आणि इटावाची सरकारी विकासयोजना यापलीकडे भारतांतील कुठलाच भाग मी, सॅम् आणि सॅलीनं पाहिला नव्हता. बाबांनीं जेव्हां डिसेंबरच्या मध्यावर दक्षिण हिंदुस्थानच्या सफरीचा बेत आंखला, तेव्हां आम्ही फारच आनंदून गेलों. या सुमाराला शाळेच्या सुटीचाहि प्रश्न उद्भवला नाहीं.

दिल्लीहून निघून सहा तासांच्या प्रवासानंतर आमचं विमान मद्रासला पोंचलं. मद्रास म्हणजे दक्षिण भारतांतील सर्वांत मोठं शहर. भारताच्या पूर्वकिनाऱ्यावर वसलेल्या या बंदराशीं बंगालच्या उपासागराच्या खेळकर लाटा सलगी करीत असतात. जसजसं शहर जवळ येऊं लागलं, तसंतसं खालचं दृश्य हरितश्यामल दिसूं लागलं. खूप लांबून पाहिलं तेव्हां मद्रास अगदीं धूसर दिसत होतं; अन् त्यापलीकडे, दृष्टीच्या टप्प्यापलीकडे कुठें तरी आभाळाला भेटणारा निळा उपसागर! बंदरांत सर्व प्रकारच्या लहानमोठ्या बोटी होत्या. कांहीं नांगर टाकून खुशाल ऊन खात होत्या. तर कांहीं घाईघाईनं इकडे तिकडे फिरत होत्या.

मोठ्या गिरक्या घेत विमान उतरायला लागलं, तशी पामूचीं झाडं, भातशेतं यांची सौंदर्यसृष्टि अधिकाधिक स्पष्ट दिसूं लागली, अन् दक्षिण भारतांत आम्ही आलों हें कांहीं कुणीं सांगावं लागलं नाहीं.

मद्रासमध्यें आम्ही फक्त एक दिवस राहिलों. तेवढ्यांत तामिळ भाषेंतले कांहीं शब्द आम्ही शिकलों. बहुसंख्य दक्षिणी लोक 'तामिळ' ही कर्णमधुर भाषा बोलतात. तेलगु आणि कानडी या उरलेल्या दोन प्रमुख भाषांप्रमाणेंच तामिळ भाषेचंहि संस्कृत आणि तद्भव भाषांशीं साम्याचं देखील नातं नाहीं.

इंग्रजीइतकीच हिंदुस्थानी भाषाहि दाक्षिणात्यांना परकी वाटते. 'राष्ट्रभाषा म्हणून हिंदी मानली जावी' या निर्णयाचं दक्षिणेंत अगदीं थंड स्वागत झालं. भारताची राजभाषा म्हणून इंग्रजीचं उच्चाटन करूं नये, अशा मताचे लोक आहेत. कारण इंग्रजीचं सर्व जगामध्येंच बोलल्या जाणाऱ्या भाषांमधलं स्थान लक्षांत घेतां त्यांना तिचा त्याग करणं योग्य वाटत नाहीं.

सकाळीं साडेसहा वाजल्यापासून आम्ही मद्रासमध्यें हिंडत होतों. पुष्कळच संस्थांना आणि संघटनांना आम्हीं भेटी दिल्या. सर्वांत शेवटीं आम्हीं एका करमणूक व आरोग्यकेंद्राला भेट दिली. तें केंद्र पाहून मला आमच्याकडील शहरांमधल्या समाजकेंद्रांची–'सेटलमेंट हाऊसेसची'–आठवण झाली. आसपासच्या सुमारें तीनशें कुटुंबांना या केंद्रांत सर्व प्रकारची वैद्यकीय मदत आणि करमणुकीचीं साधनं यांचा लाभ घेतां येत असे. मुलं दिवसभर तिथेंच राहून शाळेंत जायचीं. तिथें बसवल्या जाणाऱ्या करमणुकीच्या कार्यक्रमांत भाग घ्यायचीं. आवश्यक वैद्यकीय मदत त्यांच्यासाठीं सज्ज असायची.

या आणि अशा ज्या संघटना आम्हीं पाहिल्या, त्या सर्वांचं पहिलं उद्दिष्ट समाजाच्या एखाद्या भागाचं जीवनमान उंचावणं हें होतं. बहुतेक सर्व कार्यकर्ते आशावादी होते आणि स्वतःच्या अंगीकृत कार्याबद्दल त्यांना अभिमान वाटत होता असं दिसलं. व्यक्तिगत कार्य जरी कितीहि अल्प असलं तरी अशाच अनेक व्यक्तींच्या कार्यांत जेव्हां त्याची भर पडते, तेव्हांच मोठीं कार्यं यशस्वी होतांना दिसतात. या विचारावरील विश्वासांतच त्यांच्या उत्साहाचं मर्म असावं, माझी श्रद्धा अशी आहे. नंतर भारताच्या इतर भागांतहि असाच आशावाद आमच्या दृष्टीस पडला.

मद्रासच्या पश्चिमेला अडीचशें मैलांवर बंगलोर शहर आहे. दुसऱ्या दिवशीं पहांटे आम्हीं मोटारीनें त्या दिशेला प्रयाण केलं. दुपारच्या सुमाराला मद्रास प्रांताची हद्द ओलांडून आम्हीं म्हैसूर प्रांतांत प्रवेश केला. पहिला मुक्काम कोलार या शहरीं केला. त्या भागामध्यें सार्वजनिक आरोग्य आणि साक्षरता-प्रसाराचं काम करणाऱ्या अमेरिकन मिशनरी लोकांनीं आमचं स्वागत केलं. आम्हांला हार घातले. अमेरिकन मिशनचं काम मी प्रथमच पाहत होतें, आणि माझं त्यांच्या कामाबद्दल फारच चांगलं मत झालं.

केवळ धर्मप्रसाराच्या मागें लागलेल्या मिशनऱ्यांबद्दल मी इतकं ऐकलं होतं कीं धर्मांतर हेंच आद्यकर्तव्य न मानतां सेवाकार्याला वाहून घेतलेले हे मिशनरी बघून मला फारच बरं वाटलं.

धर्माशीं संबंध नसलेल्या कार्यक्षेत्रांत आपल्या शक्ति कामास लावणाऱ्या आणखी कांहीं मिशनऱ्यांची पुढें मला माहिती झाली. कोलारमधील गटा-प्रमाणेंच, इतरत्रहि अत्यंत निःस्वार्थी बुद्धीनें खऱ्या ख्रिश्चनाप्रमाणें काम चालू ठेवणारे गट मला माहीत झाले. भारतांतले बहुसंख्य मिशनरी रोमन कॅथलिक आहेत; आणि उरलेल्यांपैकीं बहुतेक एपिस्कोपेलिअन किंवा मेथॉडिस्ट आहेत.

कोलारच्या दिशेनें आम्ही जसे गेलों, तसा आसमंतांतील प्रदेश वैराण दिसूं लागला आणि खडकाळ टेकड्या दृष्टीस पडूं लागल्या. इथलीं भाताचीं आणि खरीपाचीं पिकं पाण्याच्या एका तरी शिडकाव्यासाठीं अगदीं आंसावलेलीं दिसलीं.

त्यांतल्या त्यांत जे बरे प्रदेश होते, तेथें खेडेगांवं वसलेलीं होतीं. मातीनं बांधलेल्या आणि झांवळ्यांनीं शाकारलेल्या झोंपड्यांच्या समूहांत एखादंच विटांचं किंवा दगडांचं छोटंसं घरसुद्धां कसं उठून दिसायचं! बहुतेक गांवांच्या सीमेवर सुंदर खोदकाम केलेलं हिंदु मंदिर दिसे. ख्रिश्चन आणि मुस्लिम धर्मांच्या अस्तित्वाच्या खुणाहि चर्च किंवा मशिदींच्या रूपानं कुठेंकुठें दिसल्या.

रस्त्यांच्या दुतर्फा वटवृक्षांच्या रांगा लांबवर पसरल्या होत्या. पारंब्यांमुळें झाडांचा विस्तार केवढा तरी झाला होता! तो पाहून मला मोठं आश्चर्य वाटलं.

संध्याकाळीं बंगलोरला मुक्कामाला गेलों आणि दुसऱ्या दिवशीं पहांटेच बंगलोरच्या नैर्ऋत्येला असलेल्या म्हैसूर शहराच्या दिशेनें निघालों. म्हैसूरच्या महाराजांचा राजवाडा पहाण्यासाठीं आम्ही तेथें थांबलों. महाराज स्वतः नव्हते, पण त्यांच्या अधिकाऱ्यांनीं आम्हांला राजवाडा दाखवला. ताजमहाल हॉटेल पाहून मला ज्या तऱ्हेचा धक्का बसला तसाच कांहींसा हा राजवाडा पाहूनहि बसला. त्याचबरोबर आम्ही ज्या रस्त्यावरून आलों, त्या दारिद्र्याशीं जें विषमचित्र या इमारतीचं दिसत होतं, त्यामुळें मला चीडहि आली.

सोनं, चांदी, संगमरवर, कांचेचं फर्निचर, झगमगणारे महाल आणि पेंढा भरलेल्या जनावरांचीं संग्रहालयं—सारंच तिथं होतं. माझ्या लेखीं ज्या कल्पनांना केवळ परीकथांतच अस्तिव होतं त्या इथें साकार झाल्या होत्या.

हें अद्भुताचं जग सोडून आम्ही बाहेर पडलों तेव्हां एका रस्त्यावर पोलिसानं आमची गाडी अडवून दुसऱ्या रस्त्यानं वळसा घेऊन जायला सांगितलं. सरकारस्वारीसाठीं रस्ते रोखले होते म्हणे. मला तर असा संताप आला! त्याचं कारण, मला ज्या अमेरिकन परंपरेनं वाढवलं होतं, त्यामध्यें होतं कीं कुणाहि मनुष्याला, आत्तां या रस्त्यावर थांबलेल्या माणसांनासुद्धां, अशीच चीड येत असेल का, असा प्रश्न मला पडला. आपली पूर्वींची 'प्रजा' आपल्या वाटेंतून बाजूला केली जात असतांना महाराजांना काय वाटत असेल असाहि विचार डोक्यांत आला. पण कदाचित् महाराजांना काय किंवा प्रजेला काय, यापेक्षां वेगळं कांहीं असूं शकतं याची माहितीसुद्धां नसेल.

स्वातंत्र्योत्तर कालांत पिढीजाद गादीवर आलेल्या राजेमहाराजांची राजकीय सत्ता जवळजवळ शून्यावर आली आहे. कांहीं जणांनीं निवडणुका लढवून, आपलं लक्ष नवभारताच्या निर्मितीवर केंद्रित केलं आहे. पण भारत सरकारनं युवराजपदाचे अधिकार काढून घेतांना चालू केलेल्या तनख्यावर चैनींत आयुष्य घालविणारे कांही संस्थानिक आहेतच !

म्हैसूरहून आम्ही उटकमंडकडे निघालों. पश्चिमघाटाच्या टोंकाला, निलगिरी पर्वतांतील उंच जागीं हें शहर आहे. घाटाचा रस्ता जसजसा चढत गेला तसतशी वृक्षराजी गर्द होऊं लागली. शेलाटे बांबू, उंच राजेशाही सागवान, आणि डौलदार निलगिरीवृक्ष यानीं आम्हांला घेरलं होतं. भारतांतील सृष्टि-सौंदर्याच्या बाबतींत याच जागेला मी अग्रमान देईन. दिल्लीच्या उजाड सपाटींत या झाडीचा, उत्तुंग गिरिशिखरांचा, हिरव्या ओलाव्याचा मला उपास घडला होता. या निसर्गदर्शनाची ओढ मला अस्वस्थ करीत होती.

आम्ही जसजसे घाटांतून उंच जाऊं लागलों तसतशी हवा थंड होऊं लागली. कांहीं वळणांवर तर थांबल्याशिवाय आणि जरा पुढंमागं केल्याशिवाय गाडी वळतच नव्हती. पुढेंपुढें चहाचे मळे लागले. शिस्तवार बांध घातलेलीं भातशेतं दिसलीं. सिंकोना वृक्षाच्या सालीपासून क्विनाईन मिळतं, त्यासाठीं खास लागवड केलेलीं सरकारी मालकीचीं बनं आम्हीं पाहिलीं.

दुसऱ्या दिवशीं रविवार होता. सारा दिवस त्या हिरव्या सौंदर्यांत न्हाऊन अगदीं सुखावल्यासारखं झालं. नाताळ जेततेम आठ दिवसांवर आला होता.

७३९६५



आमच्याबरोबर एक दक्षिणी ख्रिश्चन होता. त्याच्याबरोबर मी आणि सॅली चर्च-मध्यें प्रार्थनेसाठीं गेलों. एका छोट्याशा टेकडीच्या टोंकावर तें चर्च होतं. तेथून शहराची बाजारपेठ दिसत असे. सन अठराशेंच्या सुमारास बांधलेलं तें चर्च साधं आणि छोटेखानी होतं. आम्ही पोंचण्यापूर्वीच तिथें पुष्कळ गर्दी झालेली होती. थकलेले वयोवृद्ध लोक, गरम ब्लँकेटांत गुंडाळलेलीं तान्हीं मुलं, शाली, जाकिटं, फरकॅप्स् अशा गरम कपड्यांचा जामानिमा करून आलेली गृहस्थाश्रमी मंडळी, अशीं सर्व वयाचीं माणसं तिथें होतीं.

चर्चच्या इमारतीचा आणि प्रार्थनेचा साधेपणा मनोरम होता. साधा लांकडी क्रॉस, पांढऱ्याशुभ्र लांब मेणबत्त्या आणि झाडांच्या हिरव्या फांद्या एवढ्याच गोष्टींनीं वेदी सुशोभित केलेली होती. तामिळ आणि इंग्रजी या दोन्ही भाषांमध्यें प्रार्थना झाली. त्यांत मुख्यतः कॅरोल गाणींच होतीं.

तामिळ भाषेंतील स्तोत्रें अमेरिकेंत नेहमीं म्हटल्या जाणाऱ्या स्तोत्रांपेक्षां अधिक भावपूर्ण आणि जोरकस वाटलीं आणि म्हणतांना त्यांच्या अर्थगांभीर्याकडे सर्वांचं लक्ष होतं.

उटकमंडला आम्ही आलों, ते उत्तर दिशेकडून. तें सोडतांना मात्र आम्ही दक्षिण उतारावरून किनाऱ्यालगतच्या त्रावणकोर–कोचीन या राज्याच्या रस्त्याला लागलों. दोन दिवस उटींत राहून आम्ही खुद्द कोचीनला निघालों होतों. सुरुवातीचीं वळण हळूहळू कमी झालीं आणि पर्वताच्या पायथ्याशीं आम्ही सरळ सपाट रस्त्याला लागलों. कापसाचीं आणि भाताचीं शेतं, पोफळीचीं वनं, आणि काजूचीं झाडं दुतर्फा लागत होतीं, त्यावरूनच तेथील उष्ण आणि दमट हवामानाची कल्पना येत होती.

हत्ती विशेषेंकरून दक्षिणेंतच असतात याचा पत्ता इथें आल्यानंतरच आम्हांला लागला. अमेरिकेंत असतांना आमची आपली समजूत होती कीं जिकडे जावं तिकडे भारतांत हत्ती आढळणार म्हणून ! त्या दिवशीं कोचीनच्या रस्त्यावर माझ्या आयुष्यांत मीं प्रथम हत्ती पाहिला आणि तोमुद्धां रानटी हत्ती !

मुख्य रस्त्याला लागून दोनएक मैलांवर एका खेड्यांत हत्ती पकडण्यासाठीं खड्डा बनवला होता. त्यांत एक पिल्लू सांपडलं होतं. त्या गांवाकडे जाणारी सडक

फारच खराब होती. आमची गाडी नेणं शक्यच नव्हतं. एका बैलगाडीवाल्यानं आम्हांला तेथवर न्यायचं आणि परत पोंचवायचं कबूल केलं आणि आम्ही डकाव डकाव करीत निघालों सुद्धां.

जिवाच्या करारानं धडपड करणाऱ्या त्या पिल्लाभोंवतीं थोडासा जमाव जमला होता. पण तें एवढंसं (आतां हत्तीचं पिलूं तें! त्याला एवढंसं म्हणायचं म्हणजे प्रश्नच आहे!) पिलूं मात्र अगदीं केंविलवाणं दिसत होतं. रानटी हत्ती उभ्या पिकाची फार नासधूस करतात. माणसाळलेले आणि शिकवून तयार केलेले हत्ती मात्र फारच उपयोगी पडतात. त्या दिवशीं याचंहि उदाहरण आम्हांला बघायला मिळालं. मोठमोठाले ओंडके, फांद्या यांची नेआण करण्याच्या कामाला लावलेले हत्ती आम्हीं पाहिले.

किनारा जवळ येत चालला तसतशी जमीन रेताड दिसूं लागली. वाटेंत लागणारे नाले, कालवे, छोटे पाणलोट ओलांडत आमची वाट जाऊं लागली. एके ठिकाणीं नदी लागली. पात्र होतं उथळच. पण रुंद होतं आणि प्रवाहाला ओढहि फार होती. तेव्हां आमच्या मोटारीसकट आम्ही एका तराफ्यावरून नदीपार गेलों! दोन लांब ओंडके पोखरून त्यावर फळ्या बांधून ही सोय केलेली होती.

आम्ही नदीपाशीं पोंचलों तेव्हां तिन्हीसांजा झाल्या होत्या आणि नदीपार जाईपर्यंत तर चांगलाच अंधार पडला. पलीकडच्या तीरावरील झाडीमागून नुकताच चंद्र वर आला होता. त्याचं पाण्यांत आंदुळणारं प्रतिबिंब मनोरम दिसत होतं. आम्ही रांगेमध्यें आमचा क्रम येण्याची वाट बघत उभे होतों. वातावरण कसं शांतप्रशान्त, निःस्तब्ध होतं. वेडकांचे तालसूर आणि जवळच्या 'रामभरोसे' हॉटेलांत चहासाटीं जमलेल्या माणसांचं संथ संभाषण यांनींच त्या शांततेचा काय भंग होईल तेवढाच.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं कोचीनहून निघून आम्ही केप कामोरिन या दक्षिणेकडच्या अगदीं टोंकाला असलेल्या शहरीं गेलों. कोचीन ते केप कामोरिन या रस्त्यावर दिसून येणारं मुक्त सृष्टिसौंदर्य आणि समृद्धि मीं भारताच्या इतर कुठल्याहि भागांत पाहिली नाहीं. प्रथमदर्शनीं त्रावणकोर कोचीनची भूमि शांत, संतुष्ट, समृद्ध दिसली. निसर्गानं आपलं वरदान मुक्तहस्तानं तिला बहाल केलं

होतं—आकाशाच्या गहिऱ्या निळाईवर रेखलेले नारळींचे शेंडे, गर्द झाडी, लांबच लांब पांढरी स्वच्छ पुळण, थेट आफ्रिकेपर्यंत किनारा शोधणारा संथ, मंद्र, निळा हिरवा सागर! झाडीच्या पोटांत लपलेल्या उतरत्या छपरांच्या झोंपड्या किनाऱ्यावर हारीनं लावल्यासारख्या दिसतात. धरणीमातेच्या कन्याच जणुं!

निसर्गाच्या इतर देणग्याहि कितीतरी होत्या. नारळी म्हणजे तर साक्षात् कल्पवृक्षच! जवळजवळ सर्व गरजा भागवण्याचं सामर्थ्य आहे यामध्यें. भरपूर पाऊस आणि समशीतोष्ण हवा म्हणजे ऋतुचक्राची कृपाच होती.

पण हें सौंदर्य, ही संपत्ति, सारं कांहीं फसवं. या बुरख्याआड अठराविश्वे दारिद्य, वेसुमार लोकसंख्या, निर्घृण पिळवणूक करणारी जमीनदारी आणि अशा प्रदेशाकडे स्वभावतःच जाणारे भडक माथ्याचे कम्युनिस्ट यांचं थैमान चालू असतं.

बहुसंख्य ग्रामीण जनता त्या भागांतील नारळींवरच भिस्त ठेवून असते. अत्यंत विपुल प्रमाणांत असलेल्या या मोठ्या झाडाचा एकहि भाग हे लोक वायां जाऊं देत नाहींत. बाजारांत नारळ पाठवण्यापूर्वी वरची साल आणि शेंड्या काढण्याचं काम मजूर लोक करतात. आपल्याला जो नारळ मिळतो, तो झाडावरून उतरतात तेव्हां असोला असतो. त्याची हिरवी साल खतासाठीं आणि जळणासाठीं वापरतात. शेंड्यांपासून काथ्या बनवून तरटं, पिशव्या वगैरे वस्तू बनवतात. करवंटीच्या आंत जाड खोबरं असतं. नारळ बहुधा ओलाच खातात; पण निर्यातीसाठीं वाळवून कीस करतात, किंवा घाणीवर खोबऱ्याचें तेल काढतात. नारळाचं पाणी फारच थंड असतं. तें एक उत्तम तृषाहारक पेय आहे.

कुठेंहि नजर फिरविली तरी या झाडाच्या कुठल्या ना कुठल्या भागाचा वापर केलेला दिसतोच. छोट्या झोंपड्या बहुधा झांवळ्यांनींच शाकारतात. पात्यांच्या किंवा काथ्याच्या, चटया, टोपल्या विणतात.

मोठाले हारे, गाड्या भरभरून सोडणें म्हणजेच नारळाच्या जाड साली ठेवलेल्या असतात. समुद्रांतल्या आणि कालव्यांतल्या बोटींतसुद्धां ह्याच माल. पुष्कळदां ह्यांत शेंडी शिगोशीग भरून ठेवलेली असते. पुष्कळ ठिकाणीं

रस्त्याच्या कडेला तरटांवरून ओलं खोबरं सुकवण्यासाठीं उन्हांत पसरून ठेवलेलं असतं.

बहुसंख्य लोक निर्वाहासाठीं नारळींच्याच औद्योगिक आणि उत्पादक कामधंद्यावर अवलंबून असतात. पण पैसा आणि सत्ता बोटांवर नाचवणारे जमीनदार त्यांना अत्यंत तुटपुंजं वेतन देतात. त्यांच्यावर या बिचाऱ्यांचं कांहींच चालूं शकत नाहीं. नियंत्रण तर दूरच. मग हे लोक संतापून हिंसक मार्गांकडे प्रवृत्त झाले तर त्यांत नवल तें काय?

जिथें जिथें निवडणुकीची धामधूम चालू होती, तिथें सर्वच राजकीय प्रचारमोहिमांमध्यें जमीन-सुधार हा महत्त्वाचा विषय होता. लोकसत्ताक भारतांत ५१ सालाच्या पहिल्या वहिल्यानिवडणुका प्रत्येक प्रांतांत वेगवेगळ्या तारखांना घेण्यांत आल्या. आम्ही तेथून निघाल्यानंतर थोड्याच दिवसांत त्रावणकोरकोचीनच्या निवडणुका होणार होत्या. भिंतीपत्रकं, जाहिराती, निशाणं, गाड्यामोटारी, मेळावे, सभा, फेऱ्या, मिरवणुका—सगळीकडे उमेदवारांच्या प्रचाराचा धूमधडाका चालू होता. नेहरूंच्या कॉंग्रेस पार्टीच्या धीरगंभीर तिरंग्याबरोबरच डाव्या गटांच्या संयुक्त आघाडीचीं, कम्युनिस्टांचीं बंडखोर तांबडीं निशाणंहि दिसत होतीं. एका खेडेगांवांतून जात असतांना लाल गटाची एक लहानशी मिरवणूक आम्हीं पाहिली. चेहऱ्यावरून प्रक्षुब्ध दिसणारीं हीं माणसं हातांत तांबडीं निशाणं घेऊन 'कम्युनिस्टांना मतें द्या' अशा एकमुखानं प्रादेशिक भाषेंतील घोषणा करीत चाल्लीं होतीं.

नंतर दिल्लींत पोंचल्यानंतर निवडणुकांचे निकाल पाहिले तेव्हां राज्यसरकारांत बहुमत मिळवण्यांत कम्युनिस्टांना यश आलं नाहीं ही बातमी मला कळली. ५४ सालच्या निवडणुकांवरून कम्युनिस्टांचं वजन हळूहळू कमी होत आहे हें ऐकून आम्हांला समाधान वाटलं.

आम्ही संध्याकाळीं केप कामोरिनला पोंचलों. भारतदेशाच्या चरणतलासमान असलेल्या या ठिकाणीं मला एक मुलगी भेटली. तिला मी कधीं काळीं विसरेन असं मला वाटत नाहीं. दहा वर्षांची असेल ती. तिचं नांव मेरी होतं. आम्ही कामोरिनच्या किनाऱ्यावर गेलों, तेव्हां शिंपल्यांच्या माळा कांहीं झालं तरी आम्हाला विकायच्याच या निश्चयानंच ती पुढें आली. त्या माळा तिनं

स्वतः बनविलेल्या होत्या. आम्हीं तिच्याकडून माळा घेतल्या मात्र, लगेच तिनं ओढूनताणून आणलेला व्यापारी वृत्तीचा आव टाकून देऊन उरलेल्या वस्तू खिशांत कोंबून ती अवखळ सागरकन्येसारखी बागडूं लागली. आम्हीं चालत होतों, तशी ती आमच्यापुढें धांवत चालली होती. लाटांशीं खेळ चालला होता तिचा. तिच्या पावलांना स्पर्श करण्यासाठीं लाटेनं हात लांबवले कीं इतक्या चपळाईनं ती दूर जात होती कीं पांढऱ्या फेसाचं शुभ्र हास्य करण्याखेरीज लाटेला गत्यंतरच नव्हतं! तिच्याबरोबर आम्हीहि खेळूं लागलों. तिच्या कल्पना आणि आमचे हात एका मोठ्या वाळूच्या बांधकामांत गढून गेले होते!

आम्ही निघालों अन् मेरी मात्र आम्हांला भेटली तशीच राहिली. वाऱ्यासारखी खट्याळ, सागरलाटांसारखी अवखळ, आणि वाळू, शिंपले या तिच्या सौंगड्यांसारखीच मोहक, वेधक होती ती!

हिंदुस्थानच्या टोकाला केप कामोरिनच्या किनाऱ्यावर उभं असतांना मला अगदीं एकाकी, परकं वाटायला लागलं. माझ्या पायाशीं अरबी समुद्र, हिंदी महासागर आणि बंगालचा उपसागर एकमेकांना उराउरीं भेटत होते. त्यांचे अथांग निळे विस्तार दृष्टीच्या टप्प्यापलीकडेहि पसरले होते. कां कुणास ठाऊक, पण समोरच सूर्यास्त, समुद्र, वारा, आकाश यांच्या विस्तारांत मी लोटली जात आहें, असं मला वाटलं. माझ्यामागं असलेली भारतीय जनताच जणुं मला लोटूं पाहत होती.

तिथें असं एकटं उभं असतांना सारं विश्व परस्परभिन्न अशा दोन भागांत विभागलं गेलं आहे असं मला वाटलं. त्यापैकीं निसर्ग प्रत्यक्ष रूपांत माझ्यापुढें ठाकला होता. सागराचा प्रचंड विस्तार, त्यावरचा स्वैर वारा, उंचच उंच वाटणारं भव्य आकाश हीं निसर्गाच्या महत्तेची प्रतीकं. तीं सुंदर असलीं, तरी व्यक्तिविन्मुख आणि एकाकी.

विश्वाचा दुसरा घटक माझ्यामागं दाटीवाटीनें राहणाऱ्या भारतीय जनतेचं रूप घेऊन उभा होता. ही तर मानव्याची सृष्टि! ती व्यक्तिसन्मुख, सहृदय आणि प्रेममयी; पण तरीहि अनेकदां महाबली वाटणारी, गूढ दिसणारी. कलहशील गटांमध्यें कृत्रिमतः विभागलेली आणि अशा गुंतागुंतींतहि व्यक्ति-

रूपांत स्वतंत्रपणें प्रकटणारी. हें व्यक्तिरूपच आपण भिन्नभिन्न माणसांमध्यें बघ असतों.

आम्ही दुसऱ्या दिवशीं त्रिवेंद्रम्मार्गें दक्षिण हिंदुस्थानचा निरोप घेतला. कामोरिनहून पश्चिम किनाऱ्यानें उत्तर दिशेला ५० मैल प्रवास केला कीं त्रिवेंद्रम् लागतं. यापूर्वीं या खंडप्राय देशाचे उत्तर आणि दक्षिण एवढे दोनच ठोकळ भाग मी मानत होतें. त्यांपैकीं दिल्ली आणि उत्तर भारत–कोरडा पण रंगवैचित्र्यानं नटलेला भारत–मला आपलासा वाटूं लागलेला होताच. आतां जवळजवळ दोन आठवडे दक्षिण भारताच्या शांत हिरव्या ओलाव्यांत काढून आल्यावर मला भारत अधिकच जवळचा वाटूं लागला, संपूर्ण भारताबद्दल विधान करणं समर्थनीय वाटूं लागलं आणि मी म्हटलं,

'माझा प्यारा भारतदेश.

## : ६ :

राष्ट्राच्या मध्यभागीं असणाऱ्या 'मध्यप्रदेश' या राज्यांत एक छोटं खेडं आहे. त्याचं नांवच आहे, 'सेवाग्राम.' तें छोटं असलं तरी त्याचा महिमा मोठा आहे.

या गांवाचें महत्त्व आणि त्याचें नांव अगदीं अलीकडचें आहे. पस्तीस सालच्या वसंत ऋतूनं या खेड्याचा कायापालट पाहिला. वर्षानुवर्षं कुणाच्या खिजगणतींत नसलेलं एक सामान्य खेडं! पण त्यालाच भारतांत सर्वत्र पूज्य असलेले महात्मा गांधी यांनीं आपलं निवासस्थान केलं.

गांधीवादाचं तत्त्वज्ञान आचरणांत आणूं पाहणाऱ्या मंडळींसाठीं व स्वतःसाठीं या खेड्याच्या सीमेवर गांधीजींनीं आश्रम स्थापन केला. एखाद्या अत्यंत मागासलेल्या खेड्यांतसुद्धां सुसंस्कृत समाजाची घडण होऊं शकते हें त्यांना दाखवून द्यायचं होतं. गांधीजींचे दोन शिष्य—श्री. आर्यनायकम् आणि त्यांच्या पत्नी आशादेवी—त्यांच्या बरोबरीनं या ध्येयसिद्धीसाठीं झटत होते. नवसमाजनिर्मितीच्या कार्याचं पहिलं पाऊल पडलं तें एक नवी शिक्षणपद्धति तयार करण्याच्या दिशेनं. 'नई तालीम' म्हणून पुढें ही पद्धति ओळखली जाऊं लागली. हिची पहिली अंमलबजावणी सेवाग्रामच्या शाळांमधून झाली. 'जीवनाचा कुठलाहि भाग—मग तो कितीहि लहान असो, शिक्षणाशीं अ-संबद्ध असूं शकत नाहीं' असं गांधीजींचं मत होतं आणि म्हणून या नवशिक्षणाला ते 'जीवन-शिक्षण' म्हणत.

आमच्या आईला शिक्षणक्षेत्रांत आणि सार्वजनिक आरोग्याच्या क्षेत्रांत काम करण्याची फार आवड असल्यामुळें या अनन्यधारण महत्त्वाच्या स्थानाला भेट

द्यावी अशी तिची मनापासून इच्छा होती. ५२ सालच्या जानेवारीच्या मध्यावर आम्ही दिल्लीहून निघालों. आम्ही तिघं आणि आई सर्वच निघालों. सेवाग्रामला जाण्यासाठीं दिल्लीपासून दक्षिणेकडे जाणारी गाडी आम्हीं पकडली. गाडी दिल्लीहून संध्याकाळच्या वेळीं निघून हळू हळू वेग घेत अंधाऱ्या रात्रींत मार्गक्रमण करूं लागली. वर्धा हें सेवाग्रामला सर्वांत जवळ असलेलं रेल्वे स्टेशन. तेथून सेवाग्राम पांच मैलांवर आहे. तिथें पोंचायला दुसऱ्या दिवशीं रात्रीपर्यंत प्रवास करावा लागतो.

आमच्या सेकंड क्लासच्या डब्यांत चांगल्या चामड्याच्या गिरद्या असलेले दोन बांक आणि दोन बर्थ होते, त्यामुळें आम्ही चौघेहि आरामांत झोंपूं शकलों. भारतीय पद्धतीच्या आगगाडींत एका डब्यांत कप्पे पाडलेले नसतात. डब्याच्या बाजूला एक एक दार आणि गजाच्या दोन खिडक्या होत्या. वरच्या छताला विजेचा दिवा आणि पंखाहि होता. गाडीच्या पुढच्या मागच्या डब्यांशीं जोडणारी वाट नसल्यामुळें गाडी चालू असतांना आंतबाहेर करण्याचा प्रश्नच नव्हता. स्टेशनांत थांबली कीं मगच काय तें फिरून यायचं.

त्या रात्रीं फक्त आम्हीच डब्यांत होतों आणि गाडीच्या चाकांच्या तालावर आम्ही सर्वांनीं छान झोप काढली. गाडी स्टेशनांत थांबली कीं फेरीवाल्यांच्या आरोळ्यांनीं मात्र जाग येऊन झोंपमोड व्हायची. "नारंगीऽऽ, नारंगीऽऽ, अच्छे अच्छे नारंगी ऽऽऽ" 'गरऽम दू ऽध, गरऽऽम दूऽऽध,' 'दालसेव दालसेव वाला' 'चाय गरम चाय' या आणि अशा आरोळ्या रात्रभर अधून-मधून कानांवर येत होत्या. मी परत यायच्या वेळपर्यंत या आवाजांची मला इतकी संवय झाली, कीं माझ्या स्वप्नांना त्या आवाजांची सुंदर पार्श्वभूमि मिळाल्यासारखं वाटायचं. पण त्या दिवशीं मात्र हे आवाज मला नवे आणि चमत्कारिक वाटत होते आणि त्यामुळें आम्ही सारखीं जागीं होत होतों.

कांहीं वेळां या सर्वांमध्यें एखाद्या भिकाऱ्याचा आवाज भर घालीत असे. एकदां एक चांगला चलाख दिसणारा मुलगा खिडकींत डोकं घालून केविलवाण्या स्वरांत 'दो पैसे दो मेमसाहेब, माँ नहीं है मेमसाहेब, भूखा है' असं म्हणत होता. पण तो चांगला धट्टाकट्टा दिसला. आम्ही मग खुशाल झोपेचं सोंग घेतलं. पण शारिरिक व्यंग किंवा व्याधि असलेले, अपंग, हातापायाच्या काड्या

झालेले भिकारी जेव्हां दृष्टीस पडत, तेव्हां त्यांच्याकडे दुर्लक्ष करणं जड जात असे.

दुसरा दिवस उजाडल्यानंतर आम्ही प्रत्येक स्टेशनावर उतरत होतों. जवळ-जवळ तासागणिक गाडी थांबत होती. कुठं पाणी पी, कुठं फळं घे, कुठं कुठं नुसतेच पाय मोकळे करून ये, असं आमचं चाललं होतं. शिवाय आम्ही सर्व वर्गाच्या डब्यांचीहि पाहणी केली.

पहिल्या वर्गाच्या आणि दुसऱ्या वर्गाच्या डब्यांत फारसा फरक वाटला नाहीं. एका डब्यांत कमी माणसं बसण्याची सोय होती एवढंच. कदाचित् आंतल्या बांकांवरच्या गाद्या अधिक मऊ असतील! कांहीं झालं, तरी पहिल्या वर्गाचं भाडं आमच्या दुसऱ्या वर्गाच्या भाड्यापेक्षां जवळजवळ दुप्पट होतं आणि फारच थोड्यांना तें परवडण्यासारखं होतं. प्रतिष्ठेच्या कल्पना सोडल्या तर कुणी झालं तरी पहिल्या वर्गानं जाईलच कशाला, असा मला प्रश्न पडला.

इंटरचे डबे आमच्या डब्यांपेक्षां मोठे होते आणि बरींच माणसं बसण्याची सोय होती. बाकं अरुंद होतीं आणि गिरद्या म्हणजे आपल्या नांवालाच होत्या. तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत कायमच अफाट खेंचाखेंच असते. आंतल्या बांकांच्या फळ्यांवर गिरद्याहि नसतात. दिल्ली ते वर्धा दुसऱ्या वर्गाचं भाडं प्रत्येकीं जवळ-जवळ साठ रुपये आहे. साठ रुपये म्हणजे बारा डॉलर्स. मला वाटतं, तिसऱ्या वर्गाचं भाडं वीस रुपयांच्या आसपास असेल.

नंतर जेव्हांजेव्हां मी एकटीनं प्रवास केला, तेव्हांतेव्हां मी तिसऱ्या वर्गानंच गेलें. नाना वेषाचे, नाना पेशाचे लोक तिथेंच भेटले, त्यांच्याशीं बोलतां आलं. त्यांच्या बरोबरीनं खाण्यापिण्याची मजा चाखतां आली.

आमचा सेवाग्रामचा दुसऱ्या वर्गानं केलेला प्रवास आणि नंतर तिसऱ्या वर्गानं केलेल्या सफरी या, सेवाग्राम-सफरीनंतर एक महिन्यानं केलेल्या आमच्या नेपाळच्या राजेशाही सफरीपेक्षां किती वेगळ्या होत्या! नेपाळला आम्ही खास पहिल्या वर्गानं गेलों. त्याचा बडेजावच एवढा कीं माझी तर छातीच दडपून गेली. इतकं अवघडल्यासारखं झालं! राजनैतिक प्रतिनिधी आणि सरकारी पाहुणे यांना श्रीमंती बडेजाव आणि थाटमाट याशिवाय पाऊलच टाकतां येत नाहीं जणुं! या सगळ्या गोष्टींना फांटा दिला तर किती बरं होईल असा विचार हजारदां तरी माझ्या मनांत आला असेल.

नेपाळच्या प्रवासांत दरेक स्टेशनवर आपले बघे लोक आम्हांला उत्सुकतेनं न्याहाळत उभे राहायचे ! बरोबरीच्या लोकांशीं, मित्रांशीं वागतांना कांहीं ते असं करीत नसतील याबद्दल माझी खात्री आहे. पण बांडगुळाप्रमाणें आमच्या नांवाला चिकटलेल्या श्रेष्ठत्वाच्या कल्पनेनं त्यांच्या वागण्यांत किती फरक पडला ! आमचे बाबा, वकिलातीचे इतर लोक आपलं सत्य स्वरूप प्रकट न करतां या लोकांच्यांत मिसळून त्यांना बरोबरीच्या नात्यानं भेटतील तर काय बहार होईल, असाहि विचार मनाला स्पर्श करून गेला.

तसं पाहिलं तर या लोकांसंबंधीं आम्हांला माहिती मिळत होतीच कीं. त्यांना अभिवादन करून स्मितहास्याची 'देवाण-घेवाण' हि आम्ही करीत होतों. पण अशा भेटींत स्वभावतःच मित्रभावापेक्षां औपचारिकताच फार भासायची.

मित्रत्वाचे दृढ संबंध जर खऱ्या अर्थानं निर्माण व्हायला पाहिजे असतील तर तें उपचाराच्या ओझ्याखालीं कधींच घडणार नाहीं. मग ते संबंध व्यक्तींशीं असोत, त्यांच्या कुटुंबाशीं असोत किंवा त्यांच्या गांवाशीं असोत. असे संबंध प्रस्थापित होत असतांना एक तर त्या लोकांनीं तुम्हांला बिनशर्त आपलंसं करण्याची तयारी दाखवावी लागते, किंवा त्यांच्याशीं समरूपता दाखवण्यासाठीं वेष, भाषा, वर्तन, सारंच त्यांचं उचलावं लागतं. कां कुणास ठाऊक, पण यापैकीं पहिली गोष्ट घडायला दुर्दैवानं बराच काळ जावा लागतो. यापेक्षां मानवजातीच्या समरूपतेवर विश्वास ठेवून, वरकरणीं दिसणाऱ्या भिन्नतेला मैत्रीच्या वाटेंत उभं राहायला थारा न देतां, एकमेकांच्या व्यक्तित्वांची प्रत्यक्ष ओळख करून घेण्याची इच्छा आज ना उद्यां सर्वांमध्यें उत्पन्न होईल व त्यांना संधीहि मिळेल अशी मला आशा आहे.

नेपाळच्या ऐषारामी प्रवासांत आणखीहि एक गोष्ट मला अस्वस्थ करीत होती. इतरांनाहि हीच अस्वस्थता बेचैन करीत असल्याचं मला माहीत आहे. गांधीजींनीं एके ठिकाणीं म्हटलं आहे, 'जोंपर्यंत जगांतील सर्व धडधाकट माणसांना काम किंवा अन्न मिळत नाहीं, तोंपर्यंत आपल्याला विश्रांति घेण्याची आणि पोटभर जेवण्याची शरम वाटली पाहिजे !' ते स्वतः मिताहारी होते आणि एक शारीरिक गरज म्हणूनच ते विश्रांति घेत. बाकीचा सर्व वेळ त्यांच्या डोक्यांत ध्येयसिद्धीचे विचार आणि हातांत कामं असत. हें ध्येय म्हणजे

प्रत्येक स्त्रीपुरुषाला रोजगार आणि अन्न मिळूं शकेल अशी योजना आंखणं.

गांधीजींप्रमाणें मला आहार व विश्रांति घेणं हें लज्जास्पद जरी वाटत नसलं, तरी गैरवाजवी आहार, अनावश्यक विश्रांति, संपत्तीचं भडक प्रदर्शन या गोष्टींची चीड मात्र जरूर येते. प्रत्येक मनुष्याच्या आवांक्यांत असेल अशी वाजवी उपभोगाची मर्यादा आहेच कीं. पुरेसं अर्थार्जन, सुस्थिर गृहजीवन, सुयोग्य आहार, कुवतीप्रमाणें व इच्छेनुसार शिक्षण यांच्या मर्यादा ओलांडून चैनी विलासांत मश्गुल होणं मला सर्वथैव गैर व अनावश्यक वाटतं.

या विचारसरणीमुळें आमच्या नेपाळच्या प्रवासांतील अपरिहार्य भपक्या-बद्दल मला वाईट वाटत होतं. पण एवढ्या महत्त्वाच्या समारंभप्रसंगीं आम्ही एवढा बडेजाव दाखवणं हेंच प्रचलित कल्पनांनुसार अपेक्षित होतं. शारीरिक दृष्ट्या नसला तरी मानसिक दृष्ट्या आमचा सेवाग्रामचा प्रवास नेपाळ प्रवासा-पेक्षां किती सुखावह झाला!

गाडीप्रमाणेंच स्टेशनावरहि गर्दी होती. पत्र्याच्या छोट्या ट्रंका, जड पेट्या, करंड्या डोक्यावर घेऊन गाडींत जागा शोधण्यासाठीं हमालांची धांवपळ चालू असे. त्यांच्या पाठोपाठ एखादं कुटुंबच्या कुटुंब इकडून तिकडे जातांना दिसायचं. त्याच गर्दीत छोट्या हातगाड्यांवर किंवा खांद्याला अडकवलेल्या ट्रेवर आपापला माल घालून फेरीवाले ललकाऱ्या देत असत. डब्यांमध्यें कांहीं पिण्याच्या पाण्याची सोय नसते. एखादा मनुष्य गाडीभर फिरून लोकांचे तांबे, खुजे भरून देतांना दिसला.

गाडी स्टेशनांत पुष्कळ वेळ थांबायची. मग कुटुंबीय मंडळींना घेऊन खाणंपिणं, विश्रांति वगैरे कार्यक्रम बरेच लोक प्लॅटफॉर्मवर उरकतांना आढळले. पाण्याच्या नळावर पिण्याच्या पाण्यासाठीं आणि आंघोळीसाठीं लोकांची गर्दी होई. जवळच्या लोटीनंच पाणी डोक्यावर ओतून आंघोळी करणारे पुरुषलोक दिसायचे. अत्यंत कौशल्यानं नेसूचं धोतर बदलून ते स्वच्छ कोरडं धोतर नेसत आणि पाहिलं धुवून उन्हांत वाळत टाकत.

आम्ही संध्याकाळीं वर्ध्याला पोंचलों. एक धुळीचा त्रास सोडला तर प्रवास अगदीं मजेंत झाला. घरीं बनवलेल्या पांढऱ्या कापडाचे कपडे घातलेले एक उंच सद्गृहस्थ आम्ही उतरतांच पुढें आले व अभिवादन करून म्हणाले, "मी

आर्यनायकम्." आशादेवी त्यांच्या पत्नी असून ते स्वतः सेवाग्रामच्या मूलोद्योग शिक्षण मंदिराचे संचालक होते हें आम्हांला माहीत होतं. ते गांधीजींचे फार जवळचे सहकारी होते. आशादेवींची आणि माझ्या आईवडिलांची पुढें चांगली मैत्री झाली.

एका जुन्या मोटारीनं आम्ही आश्रमाच्या दिशेनं जाऊं लागलों. मात्र आपण चालत जाणें अधिक उचित दिसलें असतें, असें मला वाटत होतें. रस्ता म्हणजे कच्ची सडकच होती. गोशाळा, रुग्णालय, ग्रंथालय वगैरेंच्या इमारती त्यांनीं जातांजातां आम्हांला दाखविल्या आणि त्या पाहण्याचा कार्यक्रम दुसरे दिवशीं सकाळीं ठेवू असं सांगितलं. आम्ही आश्रमांत पोंचलों, तेव्हां सायंप्रार्थनेची वेळ होत आली होती; त्यामुळें सर्वच आश्रमवासी तेथें जमले होते.

या जनसमूहापासून जरासे एका बाजूला आम्ही जमिनीवर बसलों. प्रार्थना सुरू झाली. बहुतेक प्रार्थना मराठींत किंवा हिंदींत असल्यानें आम्हाला अर्थ-बोध झाला नाहीं. पण त्यांच्यापैकीं एक गीत मात्र 'लॉर्ड्स् प्रेअर'च भाषांतर होतं हें शब्दरचनेवरून ओळखतां आलं. प्रार्थनेमध्यें सर्व धर्मांच्या स्तोत्रांचा समावेश असून लॉर्ड्स् प्रेअर ही त्यापैकीं एक होती हें आम्हांला नंतर कळलं. उच्चवर्णीयांपासून अस्पृश्यांपर्यंत सर्व वर्णांचे व प्रचलित असलेल्या सर्व धर्मांचे लोक एकमुखानं ईश्वराचीं स्तुतिस्तोत्रं गात होते. कुराण, बायबल, गीता या सर्व ग्रंथांतील उतारे त्यांत होते. एक प्रकारची समाधानानं भरलेली शांतता तेथें नांदत होती.

तुरुंगांतून सुटून आल्यानंतर—किंवा अधिक योग्य तऱ्हेनं वर्णन करायचं झाल्यास दोन तुरुंगवासांच्या दरम्यानच्या काळांत गांधीजी ज्या मातीच्या झोंपडींत वास्तव्य करीत, ती पाहण्यासाठीं प्रार्थना संपल्यावर आम्ही निघालों. आर्यनायकम् आणि त्यांची मुलगी मिनु आमच्याबरोबर आले. मिनु वयानं माझ्या बरोबरीचीच होती. गांधीजींनीं अत्यावश्यक तेवढ्याच वस्तु जवळ बाळगल्या होत्या. निर्वाणाच्या वेळीं त्यांच्या वस्तू जशा होत्या, तशाच त्या राखण्यांत आल्या आहेत. अत्यंत साधेपणा प्रत्येक गोष्टींत दिसून आला.

ही झोंपडी म्हणजे अनेक भारतीयांना तीर्थक्षेत्रच वाटतं. त्या लहानशा

खोलींत वरच्या आवाजांत कुणी बोलत नव्हतं. खरं सांगायचं तर तिथें कांहीं बोलावं असं मला वाटेच ना.

गांधीजींच्या झोंपडीपासून कांहीं अंतरावर अतिथिगृह आहे. त्याचं बांधकाम माती आणि बांबूचं होतं. तेथेंच आमच्या राहण्याची सोय केलेली होती. त्या दिवशीं संध्याकाळचं जेवण—भारतीय पद्धतीचं—आम्हीं घेतलं, तेव्हां जेवणांतील सर्व पदार्थ आश्रमांतच अथपासून इतिपर्यंत बनवलेले होते असं आम्हांला कळलं. जेवण अगदीं साधं होतं. मसालेहि अगदीं कमी प्रमाणांत होते, तरीहि तें चांगलं वाटलं. भात, पोळ्या, रस्सा आणि आमटी हें मुख्य जेवण आणि त्यानंतर भाताची गोड घट्ट खीर.

एक दिवस भारतांतील प्रत्येक खेडं स्वयंपूर्ण होईल हें गांधीजींचं स्वप्न होतं. त्यांनीं एके ठिकाणीं म्हटलं आहे, "खेड्यांचं स्थानिक स्वराज्य म्हणजे प्राथमिक गरजांबाबत स्वयंपूर्ण असणारी आणि केवळ अपरिहार्य म्हणूनच कांहीं बाबतींत शेजारच्या खेड्यांवर अवलंबून असणारी लोकसत्ता अशी माझी कल्पना आहे. यानुसार, अन्नधान्य आणि कापूस यांचीं पुरेशीं पिकं काढणं हें प्रत्येक खेड्याचं पाहिलं ध्येय ठरतं. याखेरीज गुरचराईचीं राखीव कुरणं, लहानथोरांसाठीं क्रीडागृह आणि करमणुकीचीं साधनं याहीकडे लक्ष हवं. एक प्रेक्षागृह, शाळा आणि सभागृह एवढ्या गोष्टींची प्रत्येक खेड्यानं व्यवस्था बघायला हवी. मूलोद्योगाचा संपूर्ण अभ्यासक्रम प्रत्येकाला सक्तीचा असावा. शक्य तों प्रत्येक कार्यक्रमाची आंखणी सहकारी तत्त्वावर असावी." सेवाग्रामच्या प्रयोगांतून हें ध्येय साकार करून आज ना उद्यां सर्व भारतांतहि हेंच घडूं शकेल हें त्यांना सिद्ध करायचं होतं.

सेवाग्रामला नोकर नव्हते. आर्यनायकम् यांची मुलगी मिनु आणि तिच्या मैत्रिणी यांनींच जेवण बनवलं होतं. मिनु सेवाग्रामच्या महाविद्यालयाची विद्यार्थिनी होती. झोंपायला जाण्यापूर्वी मी तिच्याशीं गप्पा मारीत होतें. तिच्या मैत्रिणींपैकीं जरी कुणाला इंग्रजी येत नव्हतं, तरी तिला येत होतं. आमच्याबरोबर नोकर नाहींत एवढंच नव्हे तर दोन दिवसांचं सामान मावेल एवढीच पिशवी प्रत्येकाजवळ असल्याचं पाहून आश्रमांत सर्वांना फार आश्चर्य वाटलं असं ती सांगत होती. पण दोनच दिवसांसाठीं आल्यावर पसारा तो काय आणणार? त्या लोकांना आश्चर्य वाटलं याचंच मला आश्चर्य वाटलं!

मी म्हटलं कीं अमेरिकेंत तर किती थोड्या लोकांकडे नोकर असतात. त्यामुळेंच प्रवासांत अत्यावश्यक वस्तूच आम्ही जवळ बाळगतों. अमेरिकन झालों किंवा इतर कांहीं असलों, म्हणून आम्ही विनाकारण उधळपट्टी करीत सुटावं कीं काय ? जोंपर्यंत भारतीय लोकाचाराच्या आड आमचं वागणं येत नाहीं, तोंवर आम्ही जसे अमेरिकेंत वागत आलों, तसंच इथेंहि नाहीं का वागणार ?

आपले नोकर बरोबर घेऊन येणं हेंहि गैरच दिसलं असतं हें तिनं मान्य केलं. पण ती सांगत होती कीं खास पाहुणे म्हणजे पुष्कळ नोकर आणि पुष्कळ सामान हें एक समीकरणच बनलं आहे. असल्या अनावश्यक गोंधळांत शेवटीं फक्त पराधीनता पदरीं पाडणाऱ्या त्या लोकांची मला दयाच आली. आतां मिनूला आणि तिच्या मैत्रिणींना काय वाटलं देव जाणे.

मच्छरदाणी लावलेल्या, उंचीला अगदीं कमी असलेल्या खाटा आम्हांला दिल्या होत्या. गाद्यांवर रजया पसरलेल्या होत्या. ती रात्र फारच सुंदर होती.

सेवाग्राम गांधीजींनीं निवडलं तें तें भारतांतील सर्वांत गरीब भागांतलं सर्वांत गरीब खेडं म्हणून. त्यावरूनच ही आश्रमाची जागा ठरली होती. अगदीं दरिद्री नारायणालाहि वापरतां येईल एवढी स्वस्त झाल्याखेरीज वीज वापरायची नाहीं असंहि त्यांचं तत्त्व होतं. त्या रात्रीं जे लोक जागे होते, ते कंदिलाच्या मंद प्रकाशांत काम करीत होते.

आम्हांला जागं करण्यासाठीं कोणी तरी अगदीं हलक्या आवाजांत हांक मारली, तेव्हां नुकतं झुंजुमुंजु झालं होतं. प्रातर्विधी उरकून साडेसहाच्या ठोक्याला आम्ही जेवणघरांत न्याहरीसाठीं जायला सिद्ध झालों. पण इतरांच्या मानानं आम्ही सूर्यवंशीच ठरलों. अगदीं लौकर उठणारे कांहीं लोक तर साडेचारच्या प्रार्थनेला हजर होते. साडेपांचला सर्वच आश्रम जागा होऊन सकाळचीं कामं पार पाडण्याच्या मागें लागला होता. त्यांत मुख्य काम म्हणजे न्याहरी बनवण्याचं.

जेवणघर शाळाकॉलेजांतील विद्यार्थी व शिक्षक यांनीं भरून गेलं होतं. सारवलेल्या जमिनीवर पंक्ति करून, जाति, पंथ यांचे भेद विसरून सर्व लोक बसले होते. आम्ही पानावर बसल्यावर आम्हांला तांब्याची थाळी दिली.

पाठोपाठ न्याहरीचं वाढप करणारीं मुलं आलीं. त्यांनीं सर्वांना कांजी आणि गरम दूध दिलं. नंतर छोटी प्रार्थना करून न्याहरीला सुरुवात झाली.

खाणं झाल्यावर प्रत्येकानं आपापली कप थाळीं बाहेर नेऊन राखेनं घांसून, पाण्यानं विसळून आणून ठेवली. आश्रमांतील विद्यार्थी नियोजित कार्यानुसार भांडीं घांसणं, जमीन सारवणं, विहिरीचं पाणी उपसणं अशीं कामं करण्यांत गढून गेले होते.

उरलेला सर्व दिवस शाळेंत आणि शेतावरच्या कामांत जात असे. प्रत्येक मुलाला दिवसाकांठीं सरासरी दोन तास शेतीचं काम पडत असे. फावल्या वेळांत त्यांनीं कुठलाहि आपल्या आवडीचा उद्योग करावा—किंवा खोळंबलेलीं कामं करावीं—अभ्यास, कपडयांची धुलाई, सूतकताई वगैरे. बहुतेकांना सूतकताईचा छंद आवडत होता असं दिसलं. हा छंद उपयुक्त आहे; शिवाय त्यांत मेहनत कमी असून त्यामुळें एकाग्रचित्तानं चिंतन करणंहि सुलभ होतं.

न्याहारीनंतर आम्ही शेतावर गेलों. शेतांत उभीं पिकं दिसलीं. रस्ता आणि कडेचं गवत अजून दंवामुळें ओलसरच होतं. भाज्यांचे वाफे, मका, ज्वारी, कापूस यांचीं सुरेख वाढलेलीं भरदार पिकं आणि केळीं, संत्रीं, पपया इ.च्या बागा आम्हीं पाहिल्या. यांपैकीं बहुतेक पिकं तेथील ग्रामस्थांनीं कधीं लावूनहि पाहिलेलीं नव्हती. गांधीजी तिथें गेले तेव्हां कापूस आणि एरंडी याखेरीज दुसरी कसलीच लागवड या भागांत होत नसे.

फिरतांफिरतां आम्ही एका विहिरीवर गेलों. एक कॉलेज विद्यार्थी एक भलं मोठं रहाटगाडगं चालवण्यासाठीं बैल हांकत होता. विहिरीच्या भोंवतीं गोलगोल फिरून बैल रहाटगाडगं फिरवत होते आणि पाण्याच्या बादल्या एकापाठोपाठ एक पाटांमध्यें रित्या होत होत्या. त्या विद्यार्थ्याचे सहाध्यायी जेथें पाणी लावत होते, तिकडे हे पाट काढलेले होते. शेतावर अंगमेहनतीचं काम करणारा भारतीय विद्यार्थी पाहणं ही नवीनच गोष्ट होती. पण सेवाग्रामच्या शिक्षणाचं हें सर्वांत महत्त्वाचं वैशिष्टय आहे.

शेतावर फिरून परत आल्यानंतर आम्ही कोंबडया पाळण्याचं आणि दुग्धोत्पादनाचं काम बघण्यासाठीं गेलों. खेड्यांतील सर्वसामान्य पद्धतीच्या तुलनेनं बघतां इथें प्रगतिपथावर एखादंच पाऊल पुढें टाकलेलं होतं पण तेथील

स्वच्छता व हवेशीरपणा वाखाणण्याजोगा होता. सर्व कार्यपद्धति अगदीं साधी, कुणाहि खेडुताच्या समजुतीच्या आटोक्यांतील होती. पालनपोषण चांगलं असल्यामुळें अंडीं आणि दूध दोन्हींचा दर्जा तेथील लोकांच्या कल्पनेबाहेर चांगला होता. कोंबड्या आणि गुरं सुदृढ दिसत होतीं. तसं पाहिलं तर कार्यपद्धतींतील फरक लहानसहानच होते, पण त्याचं फळ कितीतरी पटीनं पदरांत पडत होतं.

नंतर आम्ही आश्रमाचं छोटं ग्रंथालय पाहण्यासाठीं गेलों. ग्रंथालयप्रमुखाचं काम दक्षिण आफ्रिकेंतून आलेले एक वयोवृद्ध जर्मन गृहस्थ करीत होते. ग्रंथालयांतील ग्रंथसंख्या पाहिली तर शेंकड्यांतच मोजतां आली असती. पण विविध भाषांतील विविध विषयांवरचीं पुस्तकं तेथें होतीं.

सात वर्षांखालील मुलांसाठीं बालकमंदिर होतं. तेथें काम करणारे तरुण शिक्षक आमच्या स्वागतासाठीं सामोरे आले आणि त्यांनीं ती छोटीशी शाळा आमच्याबरोबर स्वतः येऊन दाखवली. तेव्हां शाळेंत कापूस पिंजणं, पेळू बनवणं, सूतकताई हीं कामं चालू होतीं. हा कापूस नुकताच शाळेच्या शेतावरून वेंचून आणलेला होता. कांहीं मुलं कामं करतांना गाणीं म्हणत होतीं. मुलं मोठीं मजेंत दिसलीं. स्वच्छताहि चांगली होती.

'यांपैकीं बहुतेक मुलं सेवाग्रामच्या खेड्यांतून शाळेपुरतीं येतात' असं ते म्हणाले. कापसाची शेती ही कांहीं केवळ हुन्नराची बाब नाहीं. त्यांतून सामान्य-ज्ञानांत भर पडत असते. रोपांची देखरेख ठेवून काळजी घेतांना त्या मुलांना शास्त्राची तोंडओळख होत होती, तर गोळा केलेल्या कापसाची मोजदाद् करतांना अंकगणिताचीं मूलतत्त्वं त्यांना कळत होतीं. कापसाच्या लागवडीचीं इतर क्षेत्रं कुठें कुठें आहेत याची माहिती करून घेतांना त्यांचा भूगोल पक्का होत होता. ज्या देशांत या कापसापासून बनवलेलं कापड निर्यात होतं, तेथील लोक आणि राज्यव्यवस्था यांद्दल बोलतांना त्यांच्या सामान्यज्ञानाच्या कक्षा रुंदावत होत्या. शिवाय उत्पादनाच्या विविध अवस्थांचं प्रत्यक्ष ज्ञान होत होतं तें वेगळंच.

गांधीजींच्या मूलोद्योग–शिक्षणपद्धतीच्या प्रत्यक्ष कार्यक्रमाची रूपरेषा ही अशी आहे. "कृतीमधून शिक्षण" (Learning by doing) या नव्या विचारप्रणालीशीं त्याचं साम्य आहे, हें मला जाणवलं. अमेरिकेमधली माझी

शाळा याच नव्या तत्त्वावर चालणारी होती. मूलोद्योग शिक्षणपद्धतीच्या अभ्यासक्रमाला नव्यानं विस्तार पावत असलेल्या शाळांमधून उत्तरोत्तर मान्यता मिळत आहे.

दुपारीं आम्ही रुग्णालय व दवाखाना बघायला गेलों. आश्रमापासून सुमारें दोन मैलांवर ही जागा होती. सेवाग्रामच्या परिसरांतील सुमारें ७५ खेड्यांना याचा फायदा मिळतो. ग्रामीण भागांतील आरोग्यसंशोधन केंद्र म्हणून या लोकांचं काम चालू होतंच. शिवाय शाळांमधील आरोग्यकेंद्र चालविण्यास आवश्यक असणारं शिक्षण मूलोद्योगाच्या शाळेंत काम करणाऱ्या शिक्षकांना तेथें देण्यांत येत होतं. जेथें कुठल्याच तऱ्हेची वैद्यकीय मदत उपलब्ध नसते तेथें या केंद्रांचा फार उपयोग होतो.

सेवाग्रामहून मोटारीनं आम्ही वर्ध्याला गेलों. तेथें गांधीजींनीं स्थापन केलेला अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ आहे. कागद बनवणं, कुंभारकाम, साबण तयार करणं, तेल गाळणं, मधुमक्षिका-पालन इत्यादि व्यवसाय तेथें शिकवतात. भारताच्या सर्व भागांतून हुन्नरी लोक विद्यार्थी म्हणून तेथें येतात. अगदीं साध्या यंत्रसामग्रीचाच वापर करण्यावर ग्रामोद्योगाचा भर आहे.

अखिल भारतीय ग्रामोद्योग संघाची इमारत भेट देण्यासाठीं येणाऱ्या पाहुणे मंडळींना खुली असते. या कार्यासंबंधीं जनमत अनुकूल बनविण्याचे कामीं या लोकांचा उपयोग होतो, असा चालकांना विश्वास वाटतो. ग्रामोद्योगाच्या प्रसारामुळें शेतकऱ्यांचा वायां जाणारा वेळ व वनस्पतिजन्य संपत्ति कारणीं लागेल व वर्षभर उत्पादक कामधंदा त्यांना मिळेल या विश्वासानं गांधीजींनीं कार्य केलं व संस्थेचे चालक तें पुढें चालवीत आहेत.

रात्रीच्या प्रार्थनेनंतर झोंपण्यासाठीं मी गेलें, तेव्हां भोंवतींच्या वातावरणांत भरून राहिलेल्या विश्रब्ध शांततेची जाणीव मला अधिक ठळकपणानं झाली. सेवाग्रामला राहणाऱ्या या लोकांचं जीवन म्हणजे शांततामय क्रांतीचा आदर्श होता. त्यांचं राहणं, काम, अभ्यास, खेळ, सर्वच वेगळं होतं. भावी भारताचा आशाकिरण म्हणून सेवाग्रामकडे कां बघितलं जातं तें आतां मला समजून आलं. भारतांतील समाजरचनेंत क्रांतिकारी बदल घडवून आणूं पाहणाऱ्या महात्म्याचं साकार झालेलं तें स्वप्न! सेवाग्राम म्हणजे केवळ सेवे-

स्वच्छता व हवेशीरपणा वाखाणण्याजोगा होता. सर्व कार्यपद्धति अगदीं साधी, कुणाहि खेडुताच्या समजुतीच्या आटोक्यांतील होती. पालनपोषण चांगलं असल्यामुळें अंडीं आणि दूध दोन्हींचा दर्जा तेथील लोकांच्या कल्पनेबाहेर चांगला होता. कोंबड्या आणि गुरं सुदृढ दिसत होतीं. तसं पाहिलं तर कार्यपद्धतींतील फरक लहानसहानच होते, पण त्याचं फळ कितीतरी पटीनं पदरांत पडत होतं.

नंतर आम्ही आश्रमाचं छोटं ग्रंथालय पाहण्यासाठीं गेलों. ग्रंथालयप्रमुखाचं काम दक्षिण आफ्रिकेंतून आलेले एक वयोवृद्ध जर्मन गृहस्थ करीत होते. ग्रंथालयांतील ग्रंथसंख्या पाहिली तर शेंकड्यांतच मोजतां आली असती. पण विविध भाषांतील विविध विषयांवरचीं पुस्तकं तेथें होतीं.

सात वर्षांखालील मुलांसाठीं बालकमंदिर होतं. तेथें काम करणारे तरुण शिक्षक आमच्या स्वागतासाठीं सामोरे आले आणि त्यांनीं ती छोटीशी शाळा आमच्याबरोबर स्वतः येऊन दाखवली. तेव्हां शाळेंत कापूस पिंजणं, पेळू बनवणं, सूतकताई हीं कामं चालू होतीं. हा कापूस नुकताच शाळेच्या शेतावरून वेंचून आणलेला होता. कांहीं मुलं कामं करतांना गाणीं म्हणत होतीं. मुलं मोठीं मजेंत दिसलीं. स्वच्छताहि चांगली होती.

'यांपैकीं बहुतेक मुलं सेवाग्रामच्या खेड्यांतून शाळेपुरतीं येतात' असं ते म्हणाले. कापसाची शेती ही कांहीं केवळ हुन्नराची बाब नाहीं. त्यांतून सामान्य-ज्ञानांत भर पडत असते. रोपांची देखरेख ठेवून काळजी घेतांना त्या मुलांना शास्त्राची तोंडओळख होत होती, तर गोळा केलेल्या कापसाची मोजदाद करतांना अंकगणिताचीं मूलतत्त्वं त्यांना कळत होतीं. कापसाच्या लागवडीचीं इतर क्षेत्रं कुठें कुठें आहेत याची माहिती करून घेतांना त्यांचा भूगोल पक्का होत होता. ज्या देशांत या कापसापासून बनवलेलं कापड निर्यात होतं, तेथील लोक आणि राज्यव्यवस्था यांद्दल बोलतांना त्यांच्या सामान्यज्ञानाच्या कक्षा रुंदावत होत्या. शिवाय उत्पादनाच्या विविध अवस्थांचं प्रत्यक्ष ज्ञान होत होतं तें वेगळंच.

गांधीजींच्या मूलोद्योग–शिक्षणपद्धतीच्या प्रत्यक्ष कार्यक्रमाची रूपरेषा ही अशी आहे. "कृतीमधून शिक्षण" (Learning by doing) या नव्या विचारप्रणालीशीं त्याचं साम्य आहे, हें मला जाणवलं. अमेरिकेमधली माझी

शाळा याच नव्या तत्त्वावर चालणारी होती. मूलोद्योग शिक्षणपद्धतीच्या अभ्यासक्रमाला नव्यानं विस्तार पावत असलेल्या शाळांमधून उत्तरोत्तर मान्यता मिळत आहे.

दुपारीं आम्ही रुग्णालय व दवाखाना बघायला गेलों. आश्रमापासून सुमारें दोन मैलांवर ही जागा होती. सेवाग्रामच्या परिसरांतील सुमारें ७५ खेड्यांना याचा फायदा मिळतो. ग्रामीण भागांतील आरोग्यसंशोधन केंद्र म्हणून या लोकांचं काम चालू होतंच. शिवाय शाळांमधील आरोग्यकेंद्र चालविण्यास आवश्यक असणारं शिक्षण मूलोद्योगाच्या शाळेंत काम करणाऱ्या शिक्षकांना तेथें देण्यांत येत होतं. जेथें कुठल्याच तऱ्हेची वैद्यकीय मदत उपलब्ध नसते तेथें या केंद्रांचा फार उपयोग होतो.

सेवाग्रामहून मोटारीनं आम्ही वर्ध्याला गेलों. तेथें गांधीजींनीं स्थापन केलेला अखिल भारतीय ग्रामोद्योग संघ आहे. कागद बनवणं, कुंभारकाम, साबण तयार करणं, तेल गाळणं, मधुमक्षिका-पालन इत्यादि व्यवसाय तेथें शिकवतात. भारताच्या सर्व भागांतून हुन्नरी लोक विद्यार्थी म्हणून तेथें येतात. अगदीं साध्या यंत्रसामग्रीचाच वापर करण्यावर ग्रामोद्योगाचा भर आहे.

अखिल भारतीय ग्रामोद्योग संघाची इमारत भेट देण्यासाठीं येणाऱ्या पाहुणे मंडळींना खुली असते. या कार्यासंबंधीं जनमत अनुकूल बनविण्याचे कामीं या लोकांचा उपयोग होतो, असा चालकांना विश्वास वाटतो. ग्रामोद्योगाच्या प्रसारामुळें शेतकऱ्यांचा वायां जाणारा वेळ व वनस्पतिजन्य संपत्ति कारणीं लागेल व वर्षभर उत्पादक कामधंदा त्यांना मिळेल या विश्वासानं गांधीजींनीं कार्य केलं व संस्थेचे चालक तें पुढें चालवीत आहेत.

रात्रीच्या प्रार्थनेनंतर झोंपण्यासाठीं मी गेलें, तेव्हां भोंवतींच्या वातावरणांत भरून राहिलेल्या विश्रब्ध शांततेची जाणीव मला अधिक ठळकपणानं झाली. सेवाग्रामला राहणाऱ्या या लोकांचं जीवन म्हणजे शांततामय क्रांतीचा आदर्श होता. त्यांचं राहणं, काम, अभ्यास, खेळ, सर्वच वेगळं होतं. भावी भारताचा आशाकिरण म्हणून सेवाग्रामकडे कां बघितलं जातं तें आतां मला समजून आलं. भारतांतील समाजरचनेंत क्रांतिकारी बदल घडवून आणूं पाहणाऱ्या महात्म्याचं साकार झालेलं तें स्वप्न! सेवाग्राम म्हणजे केवळ सेवे-

साठीं ग्राम नसून शांततामय नवनिर्माणाची आशा बनून राहिलेलं स्थान आहे, याबद्दल माझी खात्री पटली.

गांधीजींनीं एके ठिकाणीं म्हटलं आहे, 'खेड्यांचा पूर्ण विकास होऊन तीं स्वयंपूर्ण बनतील, तेव्हां कलाकौशल्यांत उच्च कोटीला पोंचलेल्या कारागिरांची जराहि वाण भासणार नाहीं. प्रत्येक गांवांत त्या त्या गांवचा कवि, कलाकार, स्थापत्यविशारद, भाषाप्रभु आणि संशोधक असेल. थोडक्यांत म्हणजे आयुष्यांत हवीशी वाटणारी अमुक एक गोष्ट खेड्यांत नाहीं असं होणारच नाहीं. आज भारतांतील खेडीं अचेतन मातीच्या ढिगाऱ्याप्रमाणें आहेत. पण त्यांतूनच उद्यांचं नंदनवन उभं राहील. मग तेथें राहणाऱ्या सुबुद्ध लोकांची फसवणूक आणि पिळवणूक कुणीं करूं शकणार नाहीं.'

गांधीजी आदर्शवादी होते, पण त्यांचा आदर्शवाद व्यवहाराच्या भूमींतच रुजला होत. नंदनवनतुल्य अशा इवल्या इवल्या खेड्यांनीं नटलेला भारत जर कधींकाळीं निर्माण झाला, तर सेवाग्रामच्या या विकसनशील जीवनाचं, मूलोद्योग शिक्षणपद्धतीचं उदाहरण हा त्यांतला अतिशय महत्त्वाचा टप्पा असेल.

दुसऱ्या दिवशीं न्याहरी अटोपल्याबरोबर आम्ही सेवाग्रामचा आणि तेथील स्नेहीमंडळींचा निरोप घेतला. आर्यनायकम्‌ना 'जातों आतां' असं म्हणणं जड गेलं. भारताच्या प्रगतीच्या दृष्टीनं अत्यंत महत्त्वाच्या असणाऱ्या आगामी कालखंडांत त्यांच्यासारख्या निष्ठेनं व श्रद्धेनं काम करणाऱ्या माणसांची फार जरुरी आहे असं आम्हांला वाटलं.

सेवाग्रामहून आम्ही नागपूरला गेलों. तेथून दिल्लीला जाणारं विमान आम्हांला गांठायचं होतं. नागपूरच्या वाटेवर आम्ही विनोबा भाव्यांच्या आश्रमांत थांबलों. आश्रमाची कांहीं विशेष छाप माझ्या मनावर पडली नाहीं. पण विनोबांचा लौकिक फार मोठा आहे. गांधीजींच्या बरोबरीनं त्यांनीं भारताच्या स्वातंत्र्यचळवळींत काम केलं, आणि गांधीजींच्या पश्चात् नेहरूंखालोखाल त्यांनाच भारतीय जनता ओळखते.

५१ सालीं विनोबांनीं भूदान-यज्ञाचं आंदोलन सुरू केलं. इतर अनेक विचारवंतांप्रमाणेंच त्यांनाहि जमीनसुधारणा व फेरवांटपाचे प्रश्न फार महत्त्वाचे

वाटतात. मात्र नवभारताच्या प्रगतीच्या दृष्टीनं एवढ्या महत्त्वाच्या या समस्येंत सरकारचं काम फारच मंदगतीनं चालू आहे असं त्यांचं मत आहे. या दिरंगाईचं कारण म्हणजे विधानसभा व लोकसभा यांमध्यें असलेला जमीनदारांचा प्रभाव.

यावर उपाय म्हणून विनोबांनीं भारतभर पदयात्रा सुरू केली. गांवोगांव हिंडून भूहीनांना जमीनदारांनीं जमिनी द्याव्या यासाठीं ते व्यक्तिशः प्रयत्न करूं लागले. जमीनदारांना उद्देशून ते म्हणतात, 'मी प्रेमानं तुम्हांला लुटण्यासाठीं आलों आहें. भारतमातेचे कितीतरी पुत्र भूहीन आहेत. तुमच्यापैकीं एखाद्याला पांच मुलगे असले आणि सहाव्याचा जन्म झाला तर तो आपली इस्टेट पांचाऐवजीं सहा समभागांत वांटून देईल. भारतांतील भूहीनांच्या वतीनं तुमचा सहावा मुलगा बनून मी आलों आहें. मला तुमच्या जमिनीचा एक षष्ठांश भाग द्या.'

इतक्या साध्या आवाहनाचे परिणाम नजरेंत भरणारे आहेत. विनोबांची भूदान यज्ञाची मोहीम सुरू झाल्यापासून चाळीस लाखांपेक्षां अधिक एकर जमीन त्यांना मिळाली आहे; आणि भूहीन भूमिपुत्रांमध्यें तिचं फेरवांटप जलद गतीनं चालू आहे.

दुसऱ्या दिवशीं शाळेंत गेल्यावर माझ्या मनांत अनेक तऱ्हेचे विचार घोळत होते. भारताच्या प्रगतीला साहाय्य करायचं असलं तर सुमन आणि माझ्या मैत्रिणी भूमिति आणि इंग्रजी साहित्य अशा विषयांचा अभ्यास कशासाठीं करीत बसल्या होत्या! हें शिक्षण संपवून त्या पदवीधर होतील तेव्हां कुठेंतरी कारकुनी तरी करतील किंवा पांढरपेशा वर्गांतील सुशिक्षित बेकारांच्या मेळ्यांत सामील होतील.

भारतांतील तरुण कार्यकर्त्यांची खरी गरज आज खेड्यांतच आहे हें सेवाग्रामला असतांना माझ्या लक्षांत आलं. दिल्ली पब्लिक स्कूलसारख्या शाळांमधलं शिक्षण, शेतीचं काम, सार्वजनिक आरोग्य किंवा साक्षरताप्रसार यांसारख्या कार्यांमध्यें अजिबात उपयोगी पडत नाहीं. मूलोद्योगाचं जर माझ्या मैत्रिणींना शिक्षण मिळालं असतं तर त्यांची शहरी राहणी आणि 'उच्चभ्रू' विचारसरणी यांत कितीतरी फरक पडला असता.

हे माझे विचार मी जेव्हां सुमनला बोलून दाखवले तेव्हां ती जराशी उखडलीच. 'तुला समजायचं नाहीं,' ती म्हणाली, 'एकदोन वेळां मलाहि वाटलं होतं, पण ते विचार जरी माझ्या मनांत दृढमूल झाले असते, तरी आपलं इथून उठायचं आणि सेवाग्रामला जायचं, तिथला शिक्षणक्रम पुरा करून एखाद्या आडगांवीं स्थायिक व्हायचं, या कांहीं वाटतात तेवढ्या साध्या आणि सोप्या गोष्टी नाहींत.'

'माझे आईवडील काय म्हणतील कल्पना आहे? ते कधींच असल्या प्रकाराला परवानगी देणार नाहींत. मी त्यांना न जुमानतां घर सोडून निघून गेलें तर त्यांच्या दुःखाला पारावार राहणार नाहीं. त्यांनीं आजवर ज्या प्रेमानं आणि काळजीनं माझं संगोपन केलं, त्या सर्वांकडे पाठ फिरवून त्यांची मुलगी काडीचीहि दिक्कत न बाळगतां बेफाटपणें घरांतून निघून गेली, असं त्यांना वाटेल.

'अन् दुसरं असं कीं शहरी जीवनाची माझी संवय आतां दृढमूल झाली आहे. रेशमी साड्या, अलंकार, प्रसाधन, सिनेमा यांसारख्या 'लहानसहान चैनी' माझ्या जीवनाचा अविभाज्य घटक बनल्या आहेत. त्या सोडणं मलाहि जमणार नाहीं.'

हें सुमनचं उत्तर तिच्यापरीनं बरोबर होतं असं मला वाटलं. जातीचीं बंधनं, श्रमप्रतिष्ठेचा अभाव, आपापल्या जातींत लहान वयांतच होणारे विवाह अशांसारख्या कितीतरी गोष्टी तिच्या व इतरांच्या जीवनांत पक्क्या रुजल्या होत्या.

सुमनशीं हें बोलणं चालू असतांनाच, एका ग्रामसेवकांच्या शिक्षणाचं केंद्र आम्हीं पाहिलं होतं त्याची मला आठवण झाली. [आतां सबंध देशांत अशीं ४० पेक्षां जास्त केंद्रें आहेत.] या केंद्रांमध्यें सेवाग्रामप्रमाणेंच कार्यकर्त्यांना ग्रामीण जनतेशीं आपुलकीचे संबंध कसे जोडावेत याचं शिक्षण दिलं जात होतं. स्वतःला त्यांच्यांतीलच मानून, त्यांच्या चालीरीती, परंपरा व राहणी यांच्याविषयीं आदर बाळगायला शिकणं हा त्यांतला एक महत्त्वाचा भाग होता.

सुमन अशा कार्यकर्त्यांतीलच एक झाली आहे अशी मी कल्पना करून

बघितली. सुधारलेल्या कार्यपद्धतीची महती शेतकऱ्यांच्या बायकांना समजावून सांगायची म्हणजे स्वतःच्या उदाहरणानंच तिला पटवून द्यायला हवं, त्यांच्या बरोबरीनं कंबर कसून काम करायला हवं.

याचा परिणाम म्हणजे तिच्या 'लहानसहान चैनीं'वर तर पाणी सोडायला हवंच; पण उन्हातान्हांत, पडेल तें शारीरिक कष्टाचं काम करण्याची, मातींत हात बुडवण्याची तयारी हवी. पण आज शतकानुशतकं तिच्या वर्गाचे लोक शारीरिक कष्ट ही गोष्ट कमीपणा आणणारी, स्वतःच्या प्रतिष्ठेला न साजणारी अशी मानीत आले आहेत. छे! सुमनला कितीहि वाटलं, तरी तिचे आईवडील तिला कधींच तशी परवानगी देणार नाहींत. हा दृष्टिकोन भारतांतील शहरांत राहणाऱ्या कितीतरी पालकांचा आहे, याची मला जाणीव झाली.

तसं जरी असलं तरी जाति आणि रूढींच्या मर्यादा उल्लंघून काम करायला आपल्या मुलांना परवानगी देणाऱ्या पालकांची संख्या प्रतिदिनीं वाढत आहे हेंहि विसरून चालणार नाहीं. गांधींजींचं व्यक्तिमत्व आणि तत्त्वज्ञान अनेक पालकांच्या मनावर बिंबलं आहे. एकत्र कुटुंबपद्धतीची, जातींचीं पारंपारिक बंधनं तोडून टाकणाऱ्या नव्या पिढीची आज गरज आहे, हेंहि अनेकांना पटलं आहे. शिवाय भारत सरकारनं जातीयतेवर अस्त्र उगारलं असल्यामुळें व नोकरीसाठीं माणसं निवडतांना जातीचा विचार बेकायदा ठरवल्यामुळें पुष्कळच भारतीय लोक सहिष्णु बनले आहेत.

मात्र विद्यार्थीदशेंतील बहुसंख्य तरुण एक प्रकारच्या शृंगापत्तींत सांपडले आहेत. एकीकडे जुन्या मताचे पालक, तर दुसरीकडे नवीं जीवनमूल्यं पंचवार्षिक योजनांच्या द्वारां प्रस्थापित करूं पाहणारा भारत! कॉलेजांतील अभ्यासक्रम संपवून बाहेर पडतांना अस्थिरतेची, असुरक्षिततेची भावना त्यांच्या मनांत असते. नव्याजुन्याच्या संघर्षांत त्यांची 'अरत्रीं ना परत्रीं' अशी स्थिति होते. अशा नैराश्यांतून शेवटीं साम्यवादाकडे झुकणारीं माणसं कांहीं थोडीं नाहींत. पण साम्यवादाच्या बाबतींतहि अपेक्षा आणि पूर्ति यांची गांठ न पडल्यामुळें अनेक जण त्यांतून बाहेर पडतात ही एक आनंदाची गोष्ट आहे.

सुमनच्या आजीच्या किंवा आईच्या पिढीनं ग्रामसेवेचं काम करण्याचा विचार स्वप्नांतहि आणला नसता. सुमन त्याचा गंभीरपणें विचार तरी करूं

हे माझे विचार मी जेव्हां सुमनला बोलून दाखवले तेव्हां ती जराशी उखडलीच. 'तुला समजायचं नाहीं,' ती म्हणाली, 'एकदोन वेळां मलाहि वाटलं होतं, पण ते विचार जरी माझ्या मनांत दृढमूल झाले असते, तरी आपलं इथून उठायचं आणि सेवाग्रामला जायचं, तिथला शिक्षणक्रम पुरा करून एखाद्या आडगांवीं स्थायिक व्हायचं, या कांहीं वाटतात तेवढ्या साध्या आणि सोप्या गोष्टी नाहींत.'

'माझे आईवडील काय म्हणतील कल्पना आहे? ते कधींच असल्या प्रकाराला परवानगी देणार नाहींत. मी त्यांना न जुमानतां घर सोडून निघून गेलें तर त्यांच्या दुःखाला पारावार राहणार नाहीं. त्यांनीं आजवर ज्या प्रेमानं आणि काळजीनं माझं संगोपन केलं, त्या सर्वांकडे पाठ फिरवून त्यांची मुलगी काडीचीहि दिक्कत न बाळगतां बेफाटपणें घरांतून निघून गेली, असं त्यांना वाटेल.

'अन् दुसरं असं कीं शहरी जीवनाची माझी संवय आतां दृढमूल झाली आहे. रेशमी साड्या, अलंकार, प्रसाधन, सिनेमा यांसारख्या 'लहानसहान चैनी' माझ्या जीवनाचा अविभाज्य घटक बनल्या आहेत. त्या सोडणं मलाहि जमणार नाहीं.'

हें सुमनचं उत्तर तिच्यापरीनं बरोबर होतं असं मला वाटलं. जातीच्चीं बंधनं, श्रमप्रतिष्ठेचा अभाव, आपापल्या जातींत लहान वयांतच होणारे विवाह अशांसारख्या कितीतरी गोष्टी तिच्या व इतरांच्या जीवनांत पक्क्या रुजल्या होत्या.

सुमनशीं हें बोलणं चालू असतांनाच, एका ग्रामसेवकांच्या शिक्षणाचं केंद्र आम्हीं पाहिलं होतं त्याची मला आठवण झाली. [आतां सबंध देशांत अशीं ४० पेक्षां जास्त केंद्रें आहेत.] या केंद्रांमध्यें सेवाग्रामप्रमाणेंच कार्यकर्त्यांना ग्रामीण जनतेशीं आपुलकीचे संबंध कसे जोडावेत याचं शिक्षण दिलं जात होतं. स्वतःला त्यांच्यांतीलच मानून, त्यांच्या चालीरीती, परंपरा व राहणी यांच्याविषयीं आदर बाळगायला शिकणं हा त्यांतला एक महत्त्वाचा भाग होता.

सुमन अशा कार्यकर्त्यांतीलच एक झाली आहे अशी मी कल्पना करून

बघितली. सुधारलेल्या कार्यपद्धतीची महती शेतकऱ्यांच्या बायकांना समजावून सांगायची म्हणजे स्वतःच्या उदाहरणानंच तिला पटवून द्यायला हवं, त्यांच्या बरोबरीनं कंबर कसून काम करायला हवं.

याचा परिणाम म्हणजे तिच्या 'लहानसहान चैनीं'वर तर पाणी सोडायला हवंच; पण उन्हातान्हांत, पडेल तें शारीरिक कष्टाचं काम करण्याची, मातींत हात बुडवण्याची तयारी हवी. पण आज शतकानुशतकं तिच्या वर्गाचे लोक शारीरिक कष्ट ही गोष्ट कमीपणा आणणारी, स्वतःच्या प्रतिष्ठेला न साजणारी अशी मानीत आले आहेत. छे! सुमनला कितीहि वाटलं, तरी तिचे आईवडील तिला कधींच तशी परवानगी देणार नाहींत. हा दृष्टिकोन भारतांतील शहरांत राहणाऱ्या कितीतरी पालकांचा आहे, याची मला जाणीव झाली.

तसं जरी असलं तरी जाति आणि रूढींच्या मर्यादा उल्लंघून काम करायला आपल्या मुलांना परवानगी देणाऱ्या पालकांची संख्या प्रतिदिनीं वाढत आहे हेंहि विसरून चालणार नाहीं. गांधींजींचं व्यक्तिमत्व आणि तत्त्वज्ञान अनेक पालकांच्या मनावर बिंबलं आहे. एकत्र कुटुंबपद्धतीची, जातींचीं पारंपारिक बंधनं तोडून टाकणाऱ्या नव्या पिढीची आज गरज आहे, हेंहि अनेकांना पटलं आहे. शिवाय भारत सरकारनं जातीयतेवर अस्त्र उगारलं असल्यामुळें व नोकरीसाठीं माणसं निवडतांना जातीचा विचार बेकायदा ठरवल्यामुळें पुष्कळच भारतीय लोक सहिष्णु बनले आहेत.

मात्र विद्यार्थीदशेंतील बहुसंख्य तरुण एक प्रकारच्या शृंगापत्तींत सांपडले आहेत. एकीकडे जुन्या मताचे पालक, जर दुसरीकडे नवीं जीवनमूल्यं पंचवार्षिक योजनांच्या द्वारां प्रस्थापित करूं पाहणारा भारत! कॉलेजांतील अभ्यासक्रम संपवून बाहेर पडतांना अस्थिरतेची, असुरक्षिततेची भावना त्यांच्या मनांत असते. नव्याजुन्याच्या संघर्षांत त्यांची 'अरत्रीं ना परत्रीं' अशी स्थिति होते. अशा नैराश्यांतून शेवटीं साम्यवादाकडे झुकणारीं माणसं कांहीं थोडीं नाहींत. पण साम्यवादाच्या बाबतींतहि अपेक्षा आणि पूर्ति यांची गांठ न पडल्यामुळें अनेक जण त्यांतून बाहेर पडतात ही एक आनंदाची गोष्ट आहे.

सुमनच्या आजीच्या किंवा आईच्या पिढीनं ग्रामसेवेचं काम करण्याचा विचार स्वप्नांतहि आणला नसता. सुमन त्याचा गंभीरपणें विचार तरी करूं

शकते. कदाचित् थोड्याशा विरोधानंतर तिचीं मुलं खेड्यांत काम करूं शकतील.

सहा लक्ष खेड्यांना आज जें दारिद्र्याचं वरदान आणि मातीचं मोल आहे, त्यांना ऊर्जितावस्था येऊन शहरांचे शेजारी आणि भारतीय संस्कृतीचीं प्रतीकं म्हणून मान मिळविण्याचा दिवस कांहीं फार लांब नाहीं असं मला वाटत.

## : ७ :

थोड्या महिन्यांतच मला दिल्ली पब्लिक स्कूलच्या विद्यार्थिजीवनाचा कंटाळा आला. भारतांत इतरत्र हिंडून आल्यानंतर दिल्लीचे दुतर्फा झाडं असलेले सुंदर रस्ते, अलिशान घरं हें सर्व एखाद्या भारतीय शहरापेक्षां युरोपिअन शहरालाच शोभण्याजोगं आहे हें मला कळून आलं.

नेपाळची नवजात, अनिश्चित लोकशाही, सेवाग्रामसारखं शांततामय मार्गाचा पुरस्कार करणारं एकुलतं एक चिमुकलं खेडं अशा ठिकाणीं जाऊन आल्यावर माझी वृत्ति अधिक जागरूक झाली आणि त्यांतूनच माझ्या असमाधानाचा जन्म झाला. पुष्कळच भारतीय आणि नेपाळी लोकांशीं माझ्या ओळखी झाल्या होत्या आणि त्यांच्या समस्यांचं पुसटतं दर्शन मला घडूं लागलं होतें. ज्यांच्याशीं ओळख झाली नाहीं अशांच्याहि यातना मी पाहत होतें आणि अशी सहन-शीलतेची कसोटी पाहण्याची वेळ त्यांच्यावर येतां कामा नये असं मनांतल्या मनांत म्हणत होतें.

करण्याजोगं होतं पुष्कळ. पण त्या नेटाचे कार्यकर्ते फारच थोडे होते. त्यांच्या प्रयत्नाला हातभार म्हणून मी आपला वांटा उचलायचा निश्चय केला. अर्थात् माझ्यासारख्या पंधरा वर्षांच्या मुलीला मोठंसं कांहीं साधणार नाहीं हें मला माहीत होतं.

लहानपणापासून मला परिचारिकेच्या कामाची आवड होती. आमच्या आईच्या ओळखीच्या एक इंग्लिश बाई दिल्लीमध्यें रुग्णालयांमध्यें काम करीत असत. त्यांच्या ओळखीनं मला आयर्विन हॉस्पिटलमध्यें बालविभागांत स्वयंसेवक म्हणून काम मागून घेतां आलं. हें हॉस्पिटल सरकारी मदतीवर चालतं.

बालविभागावर काम करणाऱ्या प्रमुख परिचारिकेनं मला पहिल्याच दिवशीं हॉस्पिटलमध्यें येण्याजाण्यासाठीं लागणारं ओळखपत्र लिहून दिलं. पण त्याचा उपयोग करण्याचा प्रसंग कधीं आलाच नाहीं. मला वाटेल तेव्हां मी जा-ये करत असें. मार्च-एप्रिलमध्यें शाळा चालू होती तेव्हां ४॥ ते ७ अन् पुढें पुढें तर ८–८॥ पर्यंत सुद्धां मी काम करीत असें. मला माझ्या कामापुढें घरीं जाणं सुद्धां नको वाटत होतं, इतकं मला तें काम आवडूं लागलं. जाणं प्राप्तच होतं म्हणून मी घरीं परतत असें. मेमध्यें उन्हाळ्याच्या सुटीसाठीं शाळा बंद झाली. मग तर मी दुपारभर हॉस्पिटलांतच असायची. कधींकधीं तर सातसात वाजेपर्यंत मी तिकडे असायची. रोज कामावरून परत जातांना एक प्रकारचा थकवा वाटला तरी आवडीचं काम करायला मिळाल्यामुळें यांतहि आनंदच वाटत असे. मुलांच्यांत असलें म्हणजे क्षुल्लक प्रश्नांचा मला विसर पडे.

हॉस्पिटलच्या एका बाजूचा सर्व भाग बालविभागासाठीं दिलेला होता. एका बाजूला मोकळा व्हरांडा असल्यामुळें भरपूर हवा आणि प्रकाश येत असे. खाटांच्या दोन रांगा होत्या. एकूण चाळीस मुलांची सोय होती. कांहीं कांहीं वेळां मुलांची संख्या जास्त होत असे. मग विशेष गंभीर रोग न झालेल्या मुलांचीं अंथरुणं जमिनीवरच गाद्या टाकून करावीं लागत. एकदां तर जवळजवळ पंधराएक बिछाने असे घालावे लागले होते. नियमांना कांटेकोरपणें चिकटून हॉस्पिटल अधिकाऱ्यांनीं जादा रोग्यांना वैद्यकीय मदतीचीं दारं बंद केलीं नव्हतीं हें पाहून मला बरं वाटलं.

बालविभागाच्या ज्या वॉर्डांत मी काम करायची, त्यांत संसर्गजन्य रोगांखेरीज इतर आजारांचीं मुलं असत. बहुतेकांवर कसली ना कसली शस्त्रक्रिया करावयाची असे. टॉन्सिल्स् वाढलेलीं, भाजून जबर जखमा झालेलीं, हातपाय मोडून घेतलेलीं किंवा इतर आजार झालेलीं मुलं तेथें असत. रस्त्यावरच्या अपघातांत सांपडून जखमी झालेलीं बरींच मुलं येत. त्यांच्यापैकीं माझ्या एका लाडक्या बनलेल्या मुलीला तात्पुरतं अंधत्व आलं होतं. तिच्या परिस्थितींत घडणारी सुधारणा मी अतिशय उत्कंठित मनानें पाहत होतें. तिला फार एकटं वाटायचं आणि म्हणून बाकीच्या मुलांना भेटायला जाण्यापूर्वीं तिच्याजवळ जाऊन, तिला बरोबर घेऊनच मी जात असें.

माझ्या सहवासांतून मी जें प्रेम मुलांना देऊं शकत होतें त्यासाठीं तीं आंसावलेलीं असत. वैद्यकीय मदत केवळ त्यांच्या शरिरांचं आरोग्य राखत असे. हॉस्पिटलमध्यें आधींच परिचारिकांची संख्या अपुरी. त्यांत मी करीत होतें तें काम करायला कुणालाच वेळ होत नसे.

ऑपरेशनसाठीं ठेवलेल्या मुलांना ईथर दिलेलं असलं कीं त्यांना पाणी देण्याचं काम मी करीत असें. उन्हाळ्यांत त्यांना फारच शोष पडायचा. जसजसे दिवस लोटले तसतसं त्यांच्याकडून मी कामचलाऊ हिंदुस्थानी उचललं. मग बोलण्याची शक्ति असलेल्या मुलांशीं मला गप्पागोष्टी करतां येऊं लागल्या. इंजेक्शन् देतांना त्यांना धरून ठेवायचं, मलमपट्टी करतांना, जखमा धुतांना त्यांचं लक्ष दुसरीकडे गुंतवायचं अशा कामांत मी परिचारिकांना मदत करत असें. मुलांच्या जेवणाच्या वेळेला हजर असलें तर मी मुलांना भरवत देखील असें.

पण मी आलें कीं खेळण्यांचं कपाट उघडलं जायचं. यामुळं सर्व बालचमू बेहद्द खूष होती. ह्या विभागाच्या प्रमुख परिचारिकेनं एक भलीमोठी किल्ली मला दिली होती. पोर्चमधल्या एका कपाटाची ती किल्ली. त्यामध्यें चेंडू, खेळ, बाहुल्या, मोटारगाड्या. टिमक्या, कोडीं, पट, रंग, चित्रांचीं पुस्तकं, अशा हरतऱ्हेच्या खेळण्यांची गर्दी होती नुसती.

पण टिमक्या आणून मात्र पस्तावायची वेळ आली. नुकत्या आणलेल्या रंगीबेरंगी चित्रांनीं वेधक बनवलेल्या टिमक्या ! सर्वांत जास्त मागणी त्यांनाच. एकूण टिमक्या होत्या तीन. मग साहजिकच कायम त्यासाठीं ओढाताण चालायची. हें सगळं एकवेळ परवडलं असतं, पण एकदां का त्या बडवायला सुरुवात झाली कीं बघायला नको. हळू वाजवा म्हणून सांगण्याचा काडीमात्र उपयोग होत नाहीं याचा लवकरच मला अनुभव आला. मग एक दिवस जादू झाली. कुणाला न कळतां सगळ्याच्या सगळ्या टिमक्यांनीं सूंबाल्या केला !

गेल्याबरोबर किल्ली घेऊन यायचं अन् मगच कामाला सुरुवात करायची असा माझा क्रम होता. हिंडतांफिरतां येणारीं पांचसहा तरी मुलं माझ्या मागेंमागें करायचीं. आल्याबरोबर माझ्याभोंवतीं गोळा होऊन तीं सर्वजण 'बहेनजी आई हैं ! बहेनजी आई हैं' करून ओरडत सुटायचीं. या सलामीसाठीं

आणि स्वागतासाठीं मी अगदीं उत्सुक असायची. खेळण्यांचं कपाट उघडल्याखेरीज दुसऱ्या कामाला बोटदेखील कुणीं लावूं देत नसत.

अंथरुणावर पडून असलेल्या प्रत्येक मुलासाठीं मी एकएक खेळणं घेऊन जायची. 'नमस्ते' म्हणून थोडावेळ विचारपूस करायची कीं दुसऱ्याजवळ जायचं असा परिपाठ मी ठेवला होता. एखाददिवशीं एखाद्याला गोष्ट ऐकायची लहर यायची. मग बाकीच्यांना खेळणीं देऊन मी पुस्तकांतून त्यांना गोष्ट वाचून दाखवीत असें.

सुरुवातीसुरुवातीला त्यांच्याशीं मला हिंदुस्थानींत कांहींच बोलतां येत नसे. आणि त्यांच्यापैकीं बहुतेकांना फक्त हिंदुस्थानीच समजत असे. हिंदुस्थानी मला वाचतां येत होतं. शाळेंत मी देवनागरी लिपी शिकलें होतें. पुष्कळ वेळां मी काय वाचतें तें मला जरी समजत नसलं तरी त्यांना समजायचं आणि सर्वजण मोठ्या खुषींत रंगून जाऊन गोष्ट ऐकत बसायचे, त्यांच्या खास आवडीची गोष्ट म्हणजे तांबड्या कोंबडीची. अमेरिकन मुलांच्या ती चांगली परिचयाची आहे.

दिवसेंदिवस माझ्या हिंदुस्थानीच्या शब्दसंपत्तींत भर पडूं लागली. कानावर पडणाऱ्या संभाषणापैकीं माहीत नसलेले दोनतीन शब्द मी रोज लक्षांत ठेवून शकूरला त्यांचे अर्थ विचारायची. हॉस्पिटल सोडलं तेव्हां माझं हिंदुस्थानी एखाद्या लहान मुलासारखं होतं. क्रियापदांचीं रूपं म्हणजे तर चुकांचीं माहेर-घरं! शिवाय त्यांच्या बोलीभाषेच्या लकबीहि मी उचलल्या होत्या. पण मुलांशीं मला जोडणारा तो धागा होता. खरं महत्त्व याचं होतं.

नव्या भाषेचा एक घोटाळा माझ्या पक्का लक्षांत आहे. तिथें एक दहा वर्षांचा मुलगा होता. पायाचं हाड मोडल्यामुळें त्याला जागचं हलतां येत नसे. मी त्याच्याजवळ बसावं, बोलावं, बैठे खेळ खेळावे असं त्याला फार वाटे. एक दिवस मी त्याला चित्रांचं पुस्तक आणि रंग दिले.

'बरुश आहे?' त्यानं मला विचारलं. मी बाहेर पाहिलं. ढग जमले होते, अंधारूनहि आलं होतं.

'छेः छेः, पाऊस पडतोय कुठें? पण अगदीं पडणारच आहे असा रंग दिसतोय्.' मी. 'नाहीं ताई, बरुश, बरुश, तुमच्या जवळ बरुश आहे का?'

तेव्हां कुठें माझ्या लक्षांत आलं कीं तो चक्क इंग्रजींतला 'ब्रश' हा शब्द वापरत होता ! बरुश—बारिश—पाऊस असा घोटाळा मीं केला होता. त्याला रंग देतांना ब्रश देण्याचं मी विसरूनच गेलें होतें ! संध्याकाळीं घरीं जाण्यापूर्वी सगळीं खेळणीं गोळा करून कपाटांत ठेवतांना सगळीं उदास होत. मुलांना भेटण्याची वेळ होण्याच्या थोडंसं आधीं माझं काम संपत असे. आतां तुमचे आईबाबा तुम्हांला भेटायला येणार असं सांगून मी त्यांची समजूत घालत असें. येणाऱ्या बहुतेक लोकांची परिस्थिति अगदीं गरिबीची असे. आणि हॉस्पिटल-मध्यें मिळणाऱ्या मदतीसाठीं होणारा खर्च त्यांना झेंपण्यासारखा नसे. पण मायेपोटीं कुठें थोडासा खाऊ, एखादं फळ, खेळणं असं कांहींना कांहीं ते घेऊन यायचे. पुष्कळांचीं घरं खूप लांबलांब असायचीं. पुन्हा घरीं इतर मुलं असणारच कीं. पण साधारणपणें प्रत्येक मुलाला रोजच कोणीतरी भेटायला येत असे..

बहुतेक मुलं निदान आठ दिवस तरी तिथें असत. नव्या मुलाचं नांव दोनतीन दिवसांत मला पाठ होई आणि त्यालाहि रोज खेळायला येणारी ताई म्हणून माझी ओळख होई. मग आमची एकदम गट्टी होत असे. ज्यांचं ऑपरेशन व्हायचं असे, त्यांना, ऑपरेशन होऊन परत आल्यावर त्यांना रिझवायला मी तिथें असणार याची खात्रीच असे. मुलं जरा बरीं होऊन हिंडायला फिरायला लागलीं म्हणजे त्यांच्या खोड्या विचारायला नकोत. मग त्यांना शांतहि ठेवायचं आणि खुषींतहि ठेवायचं म्हणजे मला अगदीं पुरेपूर उद्योग होता. जास्त दिवस राहणाऱ्या मुलांचा मलाहि लळा लागत असे. त्यांच्या जागीं दुसरा चेहरा येणार हें माहीत असलं तरी प्रत्येक चिमुकला जीव घरीं निघाला कीं मला चुकचुकल्यासारखं होई.

वॉर्डमधल्या परिचारिका कामांत पुष्कळच गढलेल्या असत, आणि दर पंधरा दिवसांनीं त्यांचा वॉर्ड बदलत असे; त्यामुळें त्यांच्यापैकीं कुणाशींच म्हणण्या-सारखी ओळख झाली नाहीं. त्यांच्यापैकीं कांहींजणी तरी सेवाभावापेक्षां लग्न होईपर्यंत अर्थार्जन करायला हवं म्हणून या पेशांत आलेल्या असत. सगळ्याच-जणींना मुलांशीं सहानुभूतीनं वागणं जमत नसे. बहुतेक सर्व परिचारिका आणि डॉक्टरलोक दिल्लींतच शिक्षण घेतलेले असत. डॉक्टरांपैकीं परदेशीं जाऊन आलेल्यांमध्यें अमेरिकेपेक्षां इंग्लंडला गेलेल्यांची संख्या जास्त होती.

आणि स्वागतासाठीं मी अगदीं उत्सुक असायची. खेळण्यांचं कपाट उघडल्याखेरीज दुसऱ्या कामाला बोटदेखील कुणीं लावूं देत नसत.

अंथरुणावर पडून असलेल्या प्रत्येक मुलासाठीं मी एकएक खेळणं घेऊन जायची. 'नमस्ते' म्हणून थोडावेळ विचारपूस करायची कीं दुसऱ्याजवळ जायचं असा परिपाठ मी ठेवला होता. एखाददिवशीं एखाद्याला गोष्ट ऐकायची लहर यायची. मग बाकीच्यांना खेळणीं देऊन मी पुस्तकांतून त्यांना गोष्ट वाचून दाखवीत असें.

सुरुवातीसुरुवातीला त्यांच्याशीं मला हिंदुस्थानींत कांहींच बोलतां येत नसे. आणि त्यांच्यापैकीं बहुतेकांना फक्त हिंदुस्थानीच समजत असे. हिंदुस्थानी मला वाचतां येत होतं. शाळेंत मी देवनागरी लिपी शिकलें होतें. पुष्कळ वेळां मी काय वाचतें तें मला जरी समजत नसलं तरी त्यांना समजायचं आणि सर्वजण मोठ्या खुषींत रंगून जाऊन गोष्ट ऐकत बसायचे, त्यांच्या खास आवडीची गोष्ट म्हणजे तांबड्या कोंबडीची. अमेरिकन मुलांच्या ती चांगली परिचयाची आहे.

दिवसेंदिवस माझ्या हिंदुस्थानीच्या शब्दसंपत्तींत भर पडूं लागली. कानावर पडणाऱ्या संभाषणापैकीं माहीत नसलेले दोनतीन शब्द मी रोज लक्षांत ठेवून शकूरला त्यांचे अर्थ विचारायची. हॉस्पिटल सोडलं तेव्हां माझं हिंदुस्थानी एखाद्या लहान मुलासारखं होतं. क्रियापदांचीं रूपं म्हणजे तर चुकांचीं माहेर-घरं! शिवाय त्यांच्या बोलीभाषेच्या लकबीहि मी उचलल्या होत्या. पण मुलांशीं मला जोडणारा तो धागा होता. खरं महत्त्व याचं होतं.

नव्या भाषेचा एक घोटाळा माझ्या पक्का लक्षांत आहे. तिथें एक दहा वर्षांचा मुलगा होता. पायाचं हाड मोडल्यामुळें त्याला जागचं हलतां येत नसे. मी त्याच्याजवळ बसावं, बोलावं, बैठे खेळ खेळावे असं त्याला फार वाटे. एक दिवस मी त्याला चित्रांचं पुस्तक आणि रंग दिले.

'बरुश आहे?' त्यानं मला विचारलं. मी बाहेर पाहिलं. ढग जमले होते, अंधारूनहि आलं होतं.

'छेः छेः, पाऊस पडतोय कुठें? पण अगदीं पडणारच आहे असा रंग दिसतोय्.' मी. 'नाहीं ताई, बरुश, बरुश, तुमच्या जवळ बरुश आहे का?'

तेव्हां कुठें माझ्या लक्षांत आलं कीं तो चक्क इंग्रजींतला 'ब्रश' हा शब्द वापरत होता! बरुश—बारिश—पाऊस असा घोटाळा मीं केला होता. त्याला रंग देतांना ब्रश देण्याचं मी विसरूनच गेलें होतें! संध्याकाळीं घरीं जाण्यापूर्वी सगळीं खेळणीं गोळा करून कपाटांत ठेवतांना सगळीं उदास होत. मुलांना भेटण्याची वेळ होण्याच्या थोडंसं आधीं माझं काम संपत असे. आतां तुमचे आईबाबा तुम्हांला भेटायला येणार असं सांगून मी त्यांची समजूत घालत असें. येणाऱ्या बहुतेक लोकांची परिस्थिति अगदीं गरिबीची असे. आणि हॉस्पिटलमध्यें मिळणाऱ्या मदतीसाठीं होणारा खर्च त्यांना झेंपण्यासारखा नसे. पण मायेपोटीं कुठें थोडासा खाऊ, एखादं फळ, खेळणं असं कांहींना कांहीं ते घेऊन यायचे. पुष्कळांचीं घरं खूप लांबलांब असायचीं. पुन्हा घरीं इतर मुलं असणारच कीं. पण साधारणपणें प्रत्येक मुलाला रोजच कोणीतरी भेटायला येत असे..

बहुतेक मुलं निदान आठ दिवस तरी तिथें असत. नव्या मुलाचं नांव दोनतीन दिवसांत मला पाठ होई आणि त्यालाहि रोज खेळायला येणारी ताई म्हणून माझी ओळख होई. मग आमची एकदम गट्टी होत असे. ज्यांचं ऑपरेशन व्हायचं असे, त्यांना, ऑपरेशन होऊन परत आल्यावर त्यांना रिझवायला मी तिथें असणार याची खात्रीच असे. मुलं जरा बरीं होऊन हिंडायला फिरायला लागलीं म्हणजे त्यांच्या खोडया विचारायला नकोत. मग त्यांना शांतहि ठेवायचं आणि खुषींतहि ठेवायचं म्हणजे मला अगदीं पुरेपूर उद्योग होता. जास्त दिवस राहणाऱ्या मुलांचा मलाहि लळा लागत असे. त्यांच्या जागीं दुसरा चेहरा येणार हें माहीत असलं तरी प्रत्येक चिमुकला जीव घरीं निघाला कीं मला चुकचुकल्यासारखं होई.

वॉर्डमधल्या परिचारिका कामांत पुष्कळच गढलेल्या असत, आणि दर पंधरा दिवसांनीं त्यांचा वॉर्ड बदलत असे; त्यामुळें त्यांच्यापैकीं कुणाशींच म्हणण्यासारखी ओळख झाली नाहीं. त्यांच्यापैकीं कांहींजणी तरी सेवाभावापेक्षां लग्न होईपर्यंत अर्थार्जन करायला हवं म्हणून या पेशांत आलेल्या असत. सगळ्याचजणींना मुलांशीं सहानुभूतीनं वागणं जमत नसे. बहुतेक सर्व परिचारिका आणि डॉक्टरलोक दिल्लींतच शिक्षण घेतलेले असत. डॉक्टरांपैकीं परदेशीं जाऊन आलेल्यांमध्यें अमेरिकेपेक्षां इंग्लंडला गेलेल्यांची संख्या जास्त होती.

कांहीं कांहीं मुलं मला इतकीं चांगलीं आठवतात! आमची कस्तुरी. उकळतं पाणी अंगावर सोडून घेऊन कमरेखालीं सबंध पोळली होती. हॉस्पिटजवळच्या एका मातीच्या खोपटांत राहत होती ती. हॉस्पिटलपासून राजघाटकडे (गांधीजींच्या समाधीकडे) जाणाऱ्या रस्त्यावर तिचं घर होतं. राजघाट हें भारताचं तीर्थस्थान आहे. तिचे वडील आणि काका जवळच चालू असलेल्या बांधकामावर मजुरी करीत होते असं ती म्हणाली. तिला भेटायला मी उत्सुक असायची.

दुसरा म्हणजे चूपा. त्याच्या पायाला कसलासा रोग झाला होता. गप्प गप्प बसणारा म्हणून सारेच त्याला 'चूपा' म्हणत. कुठेंहि जा, मुलं तीं मुलंच याचा प्रत्यय इथें काम करतांना मला आला. भारतीय, अमेरिकन असं म्हणून त्यांना अलग ठेवण्यासारखा काय मूलगामी फरक त्यांच्यांत होता? चूपा स्वभावानं सर्वांच्यांत प्रेमळ होता. त्याच्या अंथरुणाजवळून जायला लागलं कीं उचलून बसवण्यासाठीं हात वर करायचा. इतर मुलांशीं खेळण्यापेक्षां माझ्या कडेवर बसून फिरायलाच तो राजी असायचा. परिचारिका म्हणत कीं तो मुका आहे. त्याला बोलतांना मी ऐकलं नाहीं खरंच; पण उन्हाळ्यांत एक दिवस बर्फाचं पाणी मी दुसऱ्या एका मुलासाठीं घेऊन जात होतें. एक बर्फाचा तुकडा मी जातांजातां त्याच्या पायाच्या तळव्याला घांसला तशी त्याच्या चेहऱ्यावर हंसू उमललं. 'थंडा' एवढंच तो म्हणाला. तो सहसा हंसत नसे. आसपासच्या नव्या वातावरणांत बुजल्यामुळें तो भेदरला होता आणि अनोळखी लोकांच्यांत म्हणून तो बोलत नव्हता हें त्या दिवशीं मला समजलं.

तसाच गळघाटीचं हाड मोडून घेतलेला मोहन. प्लास्टरमध्यें मान ठेवून तसंच्या तसं अवघडून उताणं पडून राहावं लागत असे त्याला. माझ्या हिंदुस्थानीची तो चेष्टा करायचा आणि इतरांप्रमाणेंच माझ्या चेहऱ्यावरील पिंगट ठिपक्यांबद्दल मला चिडवायचाहि.

मला सर्वांत चांगला आठवतो तो रामचंद. त्याचा पाय लंगडा होता. हा बारा वर्षांचा चुणचुणीत मुलगा त्या उन्हाळ्यांत जवळजवळ महिनाभर हॉस्पिटलमध्यें पडून होता. पुढें तीन महिन्यांनंतर तो पुन्हा आला. त्याची माझी ओळख सर्वांत अधिक काळची. इतर सारे यायचे आणि जायचे, हा मात्र

तिथेंच राहायचा. डॉक्टर, परिचारिका इतर नोकरवर्ग, सर्वांचीच त्याला माहिती होती आणि वॉर्डमध्यें लंगडत लंगडत फिरून इतर मुलांशींहि तो ओळख करून घ्यायचा. केवळ मिष्किलपणा म्हणून त्याच्या खोड्या चालायच्या. त्यांत त्रास देण्याची हीन वृत्ति मला कधींच आढळली नाहीं.

मी हॉस्पिटल सोडण्यापूर्वी एक आठवडा त्याचं ऑपरेशन झालं. त्या दिवशीं मी गेलें तेव्हां अगदीं थकून तो पडून राहिला होता. त्याचा पाय प्लास्टरमध्यें होता. मला पाहतांच तो हंसला आणि जवळ बसण्यासाठीं त्यानं मला बोलावलं.

मी हॉस्पिटलमध्यें जाणं थांबवलं तोंवर त्याचा पाय प्लास्टरमध्येंच होता. शांतपणानं आणि धीरानं तो सहन करीत होता, पण त्याचा एकाकीपणा मात्र चटका लावून टाकीत असे. त्याचे आईवडील दिल्लीजवळच्या एका खेड्यांत होते. रोजच्या रोज त्याला भेटायला येणं त्यांना शक्य नव्हतं.

दोन महिने कॉलेजला जाऊन मी परत आलें, तेव्हां मुलांचा वॉर्ड नव्या जागेंत हलवला होता. नव्या इमारतींत अधिक उल्हसित वातावरण वाटे. प्रकाशहि अधिक वाटला. भिंतींचे रंग चांगले होते आणि दिवे झगमगीत असले तरी आल्हादकारक होते. शिवाय प्रत्येक मुलाला स्वतःच्या वस्तू ठेवण्यासाठीं एकेक कपाट होतं.

हा वॉर्ड रस्त्याला अगदीं लागून होता आणि फेरीवाले अगदीं जवळ येऊन मुलांना दिसेल अशा बेतानंच उभे राहत. आतां मला आणखी एक काम लागलं. खालून कांहीं तरी आणण्यासाठीं एखाददुसरा आणा मुलं मला द्यायचीं. बहुतेक वेळां कांहीं तरी खाऊ त्यांना हवा असायचा. एखादे वेळीं फुगेवाला आला म्हणजे सर्वांचीच फुग्यासाठीं मागणी!

मार्चपासून जुलैपर्यंत हें काम मीं केलं. पुढें कॉलेजसाठीं हें सोडावं लागलं. तरी ऑक्टोबरच्या सुटींत मी पुन्हा आलेंच. दर दिवशीं जायची वेळ केव्हां होते याची मी दुपारीं वाटच बघत असें. आजवर माहीत नसलेल्या काळजींत स्वतःला विसरून इतरांच्या दुःखांत समरस होतांना माझ्या दिवसाचं सार्थक झाल्यासारखं मला वाटे.

: ८ :

हॉस्पिटलमध्यें जातांयेतां मी सायकल वापरीत असें. अंतर सुमारें चार मैल होतं आणि पाऊस असला किंवा उशीर झाल्यामुळें घाई असली तरच अर्ध्या तासाच्या आंत मी पोंचत असें. पण एरवीं जवळजवळ पाऊण तास मी लावत असें. इथें कुणाला घाई होती ?

उन्हाळ्यांत दिल्लीचं उष्णतामान सांवलींतसुद्धां ११५° असतं. या दिवसांत सकाळचं जेवण होतांच मी घरनं निघत असें. भर बाराच्या उन्हांतून तळपत जाणं म्हणजे शुद्ध मूर्खपणा आहे असं माझ्या मैत्रिणींना वाटे. त्याउलट मला मात्र, घराच्या चार भिंतींआड स्वतःला कोंडून घेणं यांना जमतंच कसं, असा प्रश्न पडे. मी जर त्या दिवसांत हें काम घेतलं नसतं तर त्यांच्यासारखीच मीहि उष्म्याचा आणि स्वतःच्या गैरसोयीचा विचार करीत बसलें असतें.

आरामांत सायकलवरून मोकळ्या हवेंत फिरणं म्हणजे मला तर पर्वणीच वाटे. त्यामुळं मला खूप ताजंतवानं वाटयचं. दुसरं म्हणजे कार्यमग्न असलेला मनुष्य स्वतःच्या गैरसोयींकडे बघत बसत नाहीं हेंहि तत्त्व माझ्या लक्षांत आलं. माझ्यामागें जोंवर काम होतं, तोंवर दिल्लीच्या उन्हाळ्याचा त्रास मला झाला नाहीं.

घरांतून निघालं कीं दुतर्फा झाडं असलेल्या निरुंद रेटंडन रोडच्या टोंकापर्यंत मी जायची. उजव्या हाताला लोधी पार्क, आणि आधुनिक पद्धतीच्या दुमजली भाड्याच्या घरांची वस्ती, तर डाव्या हाताला बड्या मंडळींचीं बैठीं घरं.

रेटंडन रोडच्या टोंकाच्या कोंपऱ्यावर एक सौम्य चेहऱ्याचा शुभ्र दाढी असलेला म्हातारा फळं विकण्यासाठीं बसलेला असायचा. टरबुजं, खरबुजं, कलिंगडं, सफरचंदं, लीची (द्राक्षासारखं एक स्वादिष्ट फळ) आंबे, केळीं वगैरे

फळं मोसमानुसार त्याच्याकडे असायचीं. जवळच एका झाडाच्या सांवलीखालीं दोन अल्पवयीन मुलं सायकलदुरुस्तीच्या साधनसामग्रीचा पसारा घालून बसलेलीं असायचीं. पाहावं तर आपलीं झोंपलेलीं किंवा खेळतांना दिसायचीं. प्रत्यक्ष सायकलदुरुस्ती एखादवेळींच.

डाव्या हाताच्या लहनशा गल्लींत वळून रेटंडन रोडवरून मी पृथ्वीराज रोड या दुसऱ्या हमरस्त्याला लागत असें. त्या रस्त्यावर कार्यालयीन वातावरण व बाह्यरूप असणाऱ्या सिमेंट कॉंक्रीटच्या नव्या इमारती लागत. ह्या भारत सरकारच्या कचेऱ्या होत्या. ऑफिस सुटण्याच्या वेळेला सायकलीची एवढी गर्दी असते तिथें कीं कनेक्टिकटमधल्या रूट एकवर उन्हाळ्यांतल्या रविवारीं गाड्या दिसतात त्यांचीच आठवण होते.

पृथ्वीराज रोडवर एका भव्य चौकांत मध्यभागीं आठव्या एडवर्डचा पुतळा अजूनहि दिसतो. त्या पुतळ्याला फेरी घालून मी हार्डिंज् रोडला वळत असें. तीनचार चौक ओलांडल्यावर हार्डिंज रोड नव्या आणि जुन्या दिल्लीला जोडणाऱ्या मथुरा रोडला मिळत असे. येथून हॉस्पिटल दोन मैलांवर होतं.

उन्हाळ्याच्या त्या दिवसांत भर दुपारीं रस्त्यावर शुकशुकाटच असे. संध्याकाळच्या वेळीं मी परत जायची तेव्हां मात्र नेहमींच गजबजलेली रहदारी असायची. पादचारी थोडेबहुत असायचे, पण सायकलस्वार मात्र शेंकड्यांनीं असायचे. डझनावारी टांगे, आसपासच्या खेड्यांतून येणाऱ्या बैलगाड्या, एखादी धीरे धीरे चालणारी उंटाची गाडी, आणि शिवाय ट्रक, बसेस, आणि मोटारी. सायकलस्वारांची गर्दी एवढी होत असे कीं मोटार ड्रायव्हर्सप्रमाणेंच हातांच्या खुणा वापराव्या लागत.

एकदां सायकलीवर बसलं कीं मला आपण अगदीं चाहेल तिकडे जायला स्वतंत्र आहोंत असं वाटून अंगांत उत्साह संचारायचा. घरीं परततांना मथुरा रोडवर केवढा तरी उतार लागायचा. सगळे सायकलस्वार अगदीं भरधांव वेगानं सायकल सोडायचे. लहान मुलांसारखं एकमेकांना मागें टाकत, हळूहळू जाणाऱ्या गाड्या बैलगाड्यांकडे तुच्छतेनं पाहात आणि आमच्या जवळून भरवेगानं पुढें जाणाऱ्या मोटारींकडे सरळ दुर्लक्ष करीत आम्ही सायकली सुसाट सोडीत असूं.

मी ५१ सालीं जेव्हां प्रथम मथुरा रोडनें गेलें, तेव्हां आसपास पुष्कळ मोकळी जागा होती. पण ५३ सालीं मी दिल्ली सोडली, तेव्हां दोन्ही बाजूला ओळीनं इमारती झाल्या होत्या. मथुरा रोडच्या जुन्या दिल्लीकडील टोंकाला उजव्या हाताला मोठं मैदान आणि प्रेक्षागृह आहे. तेथें हॉकी आणि क्रिकेटचे सामने होतात. डाव्या बाजूला तुरुंग आणि एक जैन धर्मशाळा आहे. तुरुंगावरनं जातांना पुष्कळदां कैद्यांचे गट दिसायचे. त्यांचे पाय एका सांखळींत अडकवून टाकलेले असायचे आणि दोनतीन खाकी गणवेषांतील मुकादमांच्या देखरेखीखालीं फावडीं कुदळी घेऊन ते ओळीनं चाललेले असायचे.

जैन धर्मशाळा आणि मैदान मागें टाकलं कीं पुढें एक मोठा चौक लागतो. या ठिकाणीं मथुरा रोड दिल्ली गेटवरून जुन्या दिल्लींत शिरतांना दिसतो. त्याला येऊन मिळणाऱ्या सर्क्युलर् रोडच्या डाव्या हाताला हॉस्पिटल आहे. त्याचं आवार या रस्त्याच्या कडेनं जवळजवळ दोन फर्लांग पसरलेलं आहे.

हॉस्पिटलच्या आवारांत सायकलस्टँड होता. इतरांप्रमाणें मीहि तिथें सायकल ठेवीत असें. आमच्या सायकलींची राखण करणारे दोघे गडी माझे चांगले मित्रच बनले म्हणा ना! त्यांच्यापैकीं एकजण देखणा, संकोची स्वभावाचा होता. त्याला फक्त हिंदुस्थानी येत असे. त्याला मी हॉस्पिटलमध्यें काय काम करतें याबद्दल मोठी जिज्ञासा होती. कांहीं वेळां त्याच्याबरोबर माझ्या कामाबद्दल तसंच अमेरिकेबद्दलहि मी बोलत असें.

दुसरा जरासा वयस्क होता. त्यानं माझं हिंदुस्थानी सुधारण्याचा चंग बांधला. त्याची स्वतःची बोलीभाषा म्हणजे इंग्रजी आणि हिंदुस्थानी यांचं एक अजब मिश्रण होतं. एखादा इंग्रजी शब्द माहीत नसला कीं तो हिंदुस्थानी शब्द घालत असे. तो मला 'बेबी' म्हणत असे.

त्यांना मी रोज २ आणे (३ सेंट्स्) भाडं म्हणून देत असें. सर्वचजण देत. पण निम्मेअधिक दिवस पैसे घेऊन यायलाच मी विसरत असें. पण मग तो मनुष्य हंसून सांगायचा, 'असू दे बेबी, उद्यां आण.' एकदोनदां पंक्चर टायर दुरुस्त करायला मलाच त्यांच्याकडून पैसे घ्यावे लागले.

टायर पंक्चर होणं ही उन्हाळ्यांत तरी नित्याचीच गोष्ट होऊन बसली होती. रस्त्यावरचं सीमेंट आणि डांबर इतकं गरम असायचं कीं टायरचं रबर

खराब व्हायचं. मी मेपर्यंत भाड्याची सायकल वापरीत होतें आणि सारखी कांहींतरी कटकट असायचीच. टायरला सारखीं भोंकं पडायचीं अन् चेन सैल होऊन पडायची. दिवसां सगळं चालून जायचं कारण दर अर्ध्या मैलानजिक सायकलदुरुस्तीसाठीं तात्पुरतीं दुकानं थाटून लोक बसलेले असायचे. पण अंधार पडला म्हणजे मात्र पायपीटच करायची वेळ.

एखाद्या जागेवर गिऱ्हाईक मिळत नाहींसं वाटलं कीं हे लोक आपला गाशा गुंडाळून टाकीत. एखादी मोक्याची जागा वाटली तर सगळी सामुग्री पसरून रस्त्याच्या कडेला बसायचं. त्या दिवसापुरतं तेंच त्यांचं दुकान.

हे सर्वजण बहुधा मला आपलं एक गिऱ्हाईक म्हणूनच मानीत. मी अमेरिकन आहें आणि माझ्याकडून जादा पैसे उकळावे असं त्यांनीं कधीं केलं नाहीं. एका पंक्चरला दोन आणे, हवा फुकट किंवा अर्धा आणा असे तेव्हांचे दर होते. आमच्या घराजवळचा सायकलवाला माझ्याजवळ पैसे असोत, नसोत, दुरुस्ती करून द्यायचा. पुन्हा दोनतीन दिवसांत मला पुन्हा त्याच्याकडे जायची वेळ येणार हें माहीत असल्यानें तो पैशांच्या बाबतींत निश्चित असायचा.

एक दिवस हॉस्पिटलला जातांना मीं धडक खाल्ली. पुढचं चाक चांगलंच वांकडं झालं. मीं जवळच्याच एका सायकलवाल्याकडे सायकल नेली आणि सांगितलं कीं माझ्याजवळ आतां कांहीं पुरेसे पैसे नाहींत, पण दुसरे दिवशीं मी उरलेले आणून देईन. त्याला त्या दुरुस्तीला जवळजवळ वीस मिनिटं काम करावं लागलं. पण "पैशाचं बघूं बाई. त्यांत काय एवढं?" असं तो म्हणाला. दुसऱ्या दिवशीं मी त्याचे पैसे देण्यासाठीं म्हणून गेलें, तर त्याचा तिथें पत्ता कुठें होता!

खर्चाची बाब सोडली तर पंक्चरचा त्रास वाटत नसे. पण सायकलवर बसण्याचा एक मोठाच त्रासदायक भाग होता आणि त्याचा मला फारच ताप वाटे. एवढंच नव्हे तर त्याच्यापायीं घरांतून बाहेर पडणं सुद्धां नको वाटे. २० जूनच्या डायरींत अगदीं सहन न होऊन मी लिहिलं आहे, 'किती चांगला, मित्रभावानं ओसंडणारा देश आहे हा! पण लोकांच्या एकटक नजरांनीं मला नुसता कंटाळा आणला आहे.'

या नजरा माझ्या अंगवळणीं कधींच पडल्या नाहींत. मी जशी रुळलें,

नित्याची जा–ये करूं लागलें, तसा हा काच कमी झाला इतकंच. मग सायकलरिपेअरवाले, फळविक्रे, पोलीस, अशा रस्त्यावरच्या ठराविक व्यक्ति आपल्या कामांतून डोकंसुद्धां वर काढीनाशा झाल्या. पण मला प्रथमच पाहणारांना परदेशी मुलगी भारतीय पोशाख घालून सायकल चालवते हें मोठं चमत्कारिक वाटायचं आणि ते मला आपादमस्तक न्याहाळून घ्यायचे.

दहा वर्षांपूर्वीच्या मानानं आज दिल्लीच्या रस्त्यावर बऱ्याच तरुण स्त्रिया दिसतील. पण अजूनहि मुलींनीं सायकलवर बसणंच शिष्टसंमत मानलं जात नाहीं. तिन्हीसांजा उलटल्यावर तर बोलायची गोष्टच नको. अशा ठिकाणीं मी रोजच्या रोज आपली खुशाल सायकलवर फिरतांना दिसायची. मग त्यांनीं मला चंट ठरवलं जर त्यांत नवल तें काय? मला पक्कं आठवतं. एक दिवस माझ्याकडे तुच्छतेनं बघणारी बाई तर माझ्या सायकलसमोर थुंकली!

रूढींच्या विरुद्ध जाऊन परिचारिकेला वागावं लागतं हें या पेशावर होणाऱ्या टीकेचं प्रमुख कारण आहे. नर्स म्हटली कीं सायकल चालवणं आलं, व्हिजिट्स् आल्या. एकटं दुकटं फिरणं आलं. मग जुन्या मताचे लोक त्यांना अमर्याद वागणुकीच्या मानतात. अशा परिस्थितींत नर्सिंगपेक्षां डॉक्टरपेशाच्या मुली पसंत करतात. कारण तो पेशा प्रतिष्ठेचा मानला जातो.

सायकल चालवण्याची गंमत मात्र मला लोकांच्या नजरांकडे दुर्लक्ष करायला लावत असे. कुठेंहि जायचं झालं तरी कुणावरच अवलंबून राहावं लागत नाहीं ही स्वातंत्र्याची जाणीव मला फार आवडे. माझी सायकल, माझा वेळ. केव्हांहि निघावं, कुठेंहि जावं.

सायकलवर बसलं कीं संथ भारतीय जीवनाचा मीहि एक घटक आहें असं वाटायचं. मोटारींत हा अनुभव कधींच येत नाहीं. नाना प्रकारचे लोक, हरतऱ्हेच्या वस्तू, नवनव्या घटना माझ्या आसपास वावरतांना दिसत. मान्सूनचा पहिला पाऊस आला, तेव्हां मी घरीं यायला निघालें होतें. पोंचेपर्यंत चिंब भिजून गेलें, पण किती छान वाटलं! इतके महिने किती उष्ण, कोरडं आणि तापलेलं होतं वातावरण! पावसांत भिजत येणं तसं दिसायला विचित्र दिसत असलं तरी त्याची मजा सोडून निवाऱ्याला धांवणारे लोक त्या दिवशीं फार थोडे होते.

एक दिवस मी घरीं जात असतांना मथुरा रोडवर कुणींतरी 'बहेनजी' म्हणून हांक मारली. वळून पाहिलं तर घागरा नेसलेली एक नीटस, तरुण खेडवळ बाई दिसली. मी कुठल्या बाजूला चाललें आहे याची तिनं चौकशी केली. ती खूप दमली होती. तिला थोडा रस्ता मी डबल सीट न्यावं अशी तिची इच्छा होती. तिच्या विनंतीनुसार मी तिला तिच्या खेडयाच्या फांट्यापर्यंत सोडलं. तेथून पुढें मैल दोन मैल तिला चालतच जावं लागणार होतं.

एप्रिलच्या सुरुवातीला मी हॉस्पिटलमधलं काम घेतलं. त्यानंतर थोडयाच दिवसांत हिंदूंचा रामनवमीचा उत्सव दिल्लींत साजरा झाला. मथुरा रोडवरच्या क्रीडागृहावर खूप मोठी जत्रा भरली होती. हॉस्पिटलमध्यें पोंचेपर्यंत बैल-गाडयांची रांगच रांग दिसत होती. गाडया भरभरून आसपासच्या खेडयांतून माणसं येत होतीं. हंशा, गप्पा, गाणीं यांना अगदीं ऊत आला होता. बहुतेक बायकांच्या साडयांमध्यें तांबडा, नारिंगी, पिवळा हे रंगच उठावदारपणें लक्षांत येत. त्यांनीं साडीचा पदर शालीनपणें डोक्यावरून घेतला होता. पुरुष मात्र बहुतेक पांढऱ्या कपडयांतच होते.

दिवसाभराच्या अवधींत चित्रविचित्र सजवलेलीं दुकानं घाईघाईनें उभारलीं गेलीं. मिठाई, फळं, आईस्क्रीम, इतर खाद्यपदार्थ गिऱ्हाईक मिळवण्यासाठीं शक्य तितक्या आकर्षकपणें मांडून ठेवले होते. देवदेवतांच्या मातीच्या मूर्ति, खेळणीं यांचे ढीग किती तरी दुकानांत होते. या गर्दीतच फेरीवाल्यांचा आरडाओरडा चालू होता.

लाऊड स्पीकरवर लोकप्रिय गाण्यांच्या ध्वनिमुद्रिका अव्याहत चालू होत्या. छोट्याशा लांकडी घोडयांचं चक्र फिरत होतं. पण तिथल्या गाण्याचा आवाज यापुढें अगदींच फिका वाटत होता. लहान लहान पोरं पाठशिवणीचा खेळ खेळत दंगा करीत होतीं, आइसफ्रूट चाखत-माखत खात होतीं, नाहीं तर गंभीर चेहऱ्यांनीं मोठ्या भावंडांसह फिरत्या चक्रांवर बसलीं होतीं.

या सगळ्या गर्दीतून मी जेव्हां हॉस्पिटलमध्यें पोंचलें, तेव्हां तिथल्या बालचमूला मीं जत्रेचं वर्णन करून सांगितलं. त्यांच्या कानावर लाऊडस्पीकरचे आवाज आलेले होतेच. तिथें गेलेलीं मुलं किती गंमत जंमत करीत असतील याची आसुसलेपणानं तीं चर्चा करीत होतीं.

मे, जून हे दोन महिने वावटळींचेच. मी पुष्कळदां वावटळीची हवा चाखली आहे. आली आली म्हणेस्तोंवर जायची सुद्धां. पण तडाख्यांत सांपडलं कीं हैराण करून टाकायची. सोसाट्याचा वारा आला कीं सायकलवर बसणं अशक्य-प्राय होऊन बसायचं. बहुतेक वेळां मी मुकाट्यानं खालीं उतरायची, पण दर वेळीं मी वाऱ्याला पाठ दिली नाहीं. कांहीं वेळां वाऱ्याशीं मोठ्या आवेशानं भांडणसुद्धां केलं. ओढणी तोंडावर ओढून दांतओठ खाऊन सायकल दामटली.

एकदोन वेळां ओढणीनं माझ्यावर अवघडण्याचेहि प्रसंग आणले. मी ओढणी दोन्ही खांद्यांवरनं मागें सोडायची. ती सायकलच्या चाकांत अडकेल हें मुळीं माझ्या डोक्यांतच आलं नाहीं. एक दिवस नेमकी ओढणी अडकली. अडकली ती चेनमध्यें जाम गुंतून बसली. वयांत आलेल्या मुलीनं ओढणी न घेतां रस्त्यावरनं जायचं हें अगदीं शालीनतेला सोडून होतं! तें पुरतं माहीत असल्यामुळें मी पार गोंधळून गेलें. रस्त्याच्या कडेला सायकल नेऊन वंगणानं माखलेली ती फाटकी ओढणी सोडवण्याची खटपट आरंभली. तेवढ्यांत एक तरुण आला आणि त्यानं माझी सुटका केली. त्याचे मीं अगदीं मनापासून आभार मानले.

एका सायकलवर दिल्लींत जेवढे बोजे नेत, ते पाहून मला मोठा अचंबा वाटे. कितीतरी कुटुंबांमध्यें वडिलांची सायकल एवढं एकच वाहन असे. रविवारीं आणि इतर सुट्यांच्या दिवशीं कितीक सायकली अगदीं जास्तींत जास्त भार घेऊन जातांना दिसायच्या. चालवणारा माणूस, पुढच्या दांड्यावर छोकरा, कॅरिअरवर बायको, तिच्या मांडीवर पुन्हा एक मूल असा प्रकार. एकदां तर नवराबायको आणि तीन मुलं एकाच सायकलीवर पाहिलीं!

शेजारच्या खेड्यांतले दूधवाले चरव्या, बरण्या, त्यावरच घालून आणीत. फळवाले, भाजीवाले, तर हारेच सायकलींना बांधायचे. वेताच्या खुर्च्या वगैरे विकणारा मनुष्य तर त्याच्या मालामध्यें दिसायचाच नाहीं! एखादा अट्टल सायकलस्वार चारपाईसुद्धां मागं बांधून न्यायचा!

..मी जरी रोज या रस्त्यानं जायची, तरी ती चक्कर कंटाळवाणी कधींच वाटत नसे. नित्य कांहींतरी नवं दिसायचं, घडायचं, भेटायचं. पण एकटक, शोधक नजरा सहन करणं एवढीच किंमत या साऱ्यासाठीं द्यावी लागायची.

बि: ......
९१५० ...... नों दि: ......

## : १ :

मी शाळेंत होतें, तोंवर रविवारची सुटी आली कीं एकंदर वातावरण अमेरिकेंतल्यासारखंच वाटायचं. कामाच्या दिवशीं मुलं शाळेला जायचीं, मोठीं माणसं आपापल्या उद्योगांत मग्न असायचीं, दुकानांमधल्या उलाढाली सतत चालू असायच्या अन् बाजारांतील गर्दी आणि गोंधळ ऐकून डोकं पिकून जायचं. एक संध्याकाळ सोडली तर बागांमधनं चिटपांखरूं देखील दिसायचं नाहीं.

पण शनिवार यायचा आणि ही धांवपळ हळूहळू थंडावत जायची. अर्ध्या दिवसाची साऱ्यांनाच सुटी. रविवारीं तर सारं शहर आळसांतच असायचं. कुटुंबांतलीं सर्व माणसं घरींच असायचीं, आणि सहली, भेटीगांठी, खाने असे कार्यक्रम सुरू असायचे. नाहीं म्हणजे एखाद्या पार्कमध्यें कडुनिंबाच्या सावलींत किंवा घरीं चारपाई टाकून झकास तणावून द्यायची.

बाजारांत मात्र नेहमींचीच गडबड. शुक्रवारीं मुसलमानांचा सुटीचा आणि प्रार्थनेचा—नमाज पढण्याचा—दिवस. पण सुटीचं खरं वातावरण रविवारींच शहरभर दिसायचं.

मी जरी आठवड्याचे सारेच दिवस हॉस्पिटलमध्यें काम करीत होतें, तरी शनिवार रविवार मलाहि वेगळा कार्यक्रम असे. शनिवारीं सकाळीं आमच्या घराजवळच्या एका वैद्यकीय तपासणीकेंद्रावर मी काम करीत असें.

दिल्लीमधील अमेरिकन महिला समाजाच्या मदतीनें कांहीं भारतीय स्त्रियांनीं हें केंद्र चालविलं होतं. गांवांत सरकारी अधिकाराखालीं चालणारीं अशीं बरींच केंद्रं आहेत. स्त्रिया व मुलांसाठीं मुख्यतः हें तपासणीचं व सल्ल्याचं काम चालतं. मी ज्या ठिकाणीं जात होतें, त्या केंद्रावर आसपासचीं बरींच

बायकामुळं येत. एक डॉक्टर, कंपौंडरचं काम करणाऱ्या दोघी आणि तपासणीच्या खोलींत मदतीसाठीं दोघी, इतक्या स्वयंसेविका तेथें असत. औषधं समाजातर्फें पुरवलीं जात. मुलांना दिल्या जाणाऱ्या दुधाची पावडर युनिसेफ् (UNICEF) कडून विनामूल्य मिळत असे.

सल्लयासाठीं प्रथम येतांना रोग्याला दोन आणे द्यावे लागत. सर्वांसाठीं हाच सरसकट दर. मग दुखणं कुठल्याहि स्वरूपाचं असो. त्यामुळें रोग्याला उपकाराचं ओझं वाटत नसे हें तर खरंच, पण अल्प कां होईना, पण किंमत दिली म्हणजे आरोग्य राखण्याची जबाबदारी त्यांना जाणवते. शिवाय केंद्राच्या खर्चालाहि थोडाफार हातभार लागत असे.

एका छोटेखानी इमारतीच्या पोर्चमध्यें डॉक्टरांचं टेबल असे. रोगी प्रथम त्यांच्याकडे जात आणि आपलें दुखणें सांगत. तपासणीनंतर औषधोपचाराची चिठी आणि पुन्हा येण्यासंबंधींच्या सूचना डॉक्टर देत. केंद्राचं काम आठवड्यांतून तीन दिवस चालत असे.

औषधं पुरविण्यासाठीं वेगळा विभाग होता. ज्यांना डॉक्टरांनीं औषध लिहून दिलं असेल, ते लोक त्या विभागांतील खिडकींत स्वतःच्या बाटल्या व चिठ्ठया देत. त्यानुसार त्यांना औषधं व वापरण्यासंबंधींच्या संपूर्ण सूचना दिल्या जात. बारीकसारीक तक्रारींवर तात्काल इलाज करण्यासाठीं एक उपचार–विभाग होता. गळवं, साध्या जखमा, डोळे, घसा वगैरेंचे किरकोळ त्रास, पोळणंभाजणं वगैरे गोष्टींसाठीं या औषधाच्या खिडकीपासून रोगी उपचार विभागांत जाई.

उपचार विभागांत काम करणं मला फार आवडत असे. कारण प्रत्यक्ष ओळखी होऊन त्यांच्या तक्रारी दूर करण्यामध्यें मदत करण्याची संधि तिथेंच मिळायची. हळूहळू रोगमुक्त होणारे लोक बघण्यांत केवढा आनंद वाटे. थोडे दिवस काम केल्यानंतर मला डोळ्यांत औषधं घालणं, घशाला औषधं लावणं, जखमांवर पट्टया बांधणं हीं कामं अगदीं सराइतासारखीं जमूं लागलीं.

घशाला औषध लावणं म्हणजे मात्र माझा नावडता प्रकार. सुरुवातीला एकदां माझा कापूस काडीला कांहीं घट्ट बसला नाहीं. औषधांत बुडवून घशाला लावला मात्र, बोळाच्या बोळाच त्या पोरीच्या पोटांत गेला! तो घशांत अडकून तिला घाईनं पाणी प्यावं लागलं. मी इतकी ओशाळलें आणि गोंधळलें कीं

विचारतां सोय नाहीं! बरं तर बरं, कोणीं कांहीं बोललं नाहीं! त्या मुलीनंहि दंगा ओभाटा केला नाहीं. पण मला वाटायचं कीं थोडयाच दिवसांत ही मुलगी आतां पोटाची कांहींतरी भयंकर तक्रार घेऊन येणार म्हणून. पण सुदैवानं तसं कांहीं झालं नाहीं.

बहुतेक वेळां मी चिठ्ठयांवरनं औषधं नेण्याच्या कामांत मदत करीत असें. थोडयाच दिवसांत गोळ्यांच्या डब्या, बाटल्या, यांच्या शेल्फांवरच्या विशिष्ट जागा मला माहीत झाल्या. आमच्या कामाच्याच टेबलावर कितीतरी औषधांचे शिसे भरलेले असायचे. पुष्कळदां पेपरमिंटचं तांबडं पाणीच आम्ही बटल्यांत भरून देत होतों. डॉक्टर त्याला आमच्याआमच्यांत "मानसिक" औषध म्हणायचे.

दर दिवशीं पन्नासएक तरी माणसं येऊन जायचीं. जास्तच पण कमी नाहीं. हॉस्पिटलमधल्यापेक्षां हें काम वेगळंच होतं. इथें मी प्रत्यक्ष वैद्यकीय मदत करीत होतें. शनिवारची सकाळ या कामांत कशी येऊन निघून जायची तें कळतहि नसे.

शनिवारीं दुपारीं मी नेहमींप्रमाणें हॉस्पिटलमध्यें जात असें. मधल्या मोकळ्या वेळांत कुठें मैत्रिणीकडे जेवणाचं आमंत्रण लाव, कुठें सिनेमा बघ, कुठें सहलीला जा, असे कार्यक्रम मला आटोपतां यायचे. पण अनेक वेळां मी घरींच लेखन वाचन करीत बसायची. शाळेचा गृहपाठहि असायचा.

घरची माझी छोटी खोली रस्त्याच्या बाजूला यायची. खिडकीलगतच्या टेबलावर माझं बस्तान असायचं. रेटंडन रोड आणि आसपासच्या भागांतील नित्याच्या आवाजांचं पार्श्वसंगीत चालू असायचं आणि माझं काम त्या पार्श्व-भूमीवर रंगांत येत असायचं. टांग्यांच्या घंटा, बैलगाडीचा खडखडाट, पिंजाऱ्याच्या धनुकलीचा ट्वँग ट्वँग आवाज, पोरांची बडबड, मोठ्या माणसांच्या संभाषणांचे आवाज, एखाद्या सायकलस्वाराची शीळ, गारुड्याच्या पुंगीचे करुण वाटणारे स्वर, पक्ष्यांची किलबिल, कुत्र्यांचं भुंकणं, रात्रींच्या वेळीं मागच्या पार्कमधून येणारी कोल्हेकुई, हे सारे आवाज भारतीय वैशिष्ट्यानें भरलेले असत. ते सर्व माझ्या चांगल्याच परिचयाचे व आवडीचे बनले होते.

रविवार पुष्कळदां गडबडींतच जायचा. पहांटे उठून आम्ही पक्षिनिरीक्षणाला

जात असूं. जेवण बहुधा बाहेरच कुठेंतरी व्हायचं. दुपारीं खेळ, बालवीर पथकाचा मेळावा, निवडणुकीच्या प्रचारसभा, सिनेमा, असलं कांहींतरी असायचंच. सुरुवातीचे कांहीं दिवस दिल्ली आणि आसपासचीं प्रेक्षणीय स्थळं पाहण्यांत गेले.

अमेरिकेंत मला पक्षिनिरीक्षणाची फार आवड होती. पांखरं ओळखायला शिकणं हा माझा छंदच होता. त्यामुळें दिल्लींतला हा कार्यक्रम मला अगदीं पसंत होता आणि दिल्लीमधल्या अशाच हौशी लोकांबरोबर आम्ही जात होतों.

भारतीय, ब्रिटिश, अमेरिकन सर्वच मंडळी शहराबाहेर कुठल्या तरी जलाशयाच्या आसपास किंवा नदीकिनारीं जात असूं. या जागा बहुधा निर्जनच असत.

अगदीं पहिल्या रविवारीं आम्ही यमुनेच्या तीरावर एका उंसाच्या शेतांत गेलों होतों. पहांटेची वेळ होती, आकाश निरभ्र होतं. डेरेदार वृक्षांची हिरवी पालवी सतेज दिसत होती. अशा वातावरणांत जलाशयाच्या आसपासच आढळणारे व जमिनीवर नित्यच दिसणारे पक्षी आम्ही निरखून बघत होतों.

आम्हीं नेहमीं दिसणारे पक्षी तर पाहिलेच. म्हणजे मैना, काळाकुट्ट विद्रूप कावळा, तीक्ष्ण नजरेची उंच उडणारी घार, वगैरे. इतरहि सहसा न आढळणारे पक्षी आम्हांला बघायला मिळाले. लांब शेपटीचा तपकिरी पांढऱ्या रंगाचा म्हालट पक्षी, रामगंगा, सारखी कांहीं तरी बडबड करणारा बुलाल चश्म, बुलबुलाच्या जातीचे इतर अनेक पक्षी, नीटनेटका दिसणारा काळापांढरा दयाळ, काळ्या डोक्याचा सुंदर पीलक, पंचरंगी काकाकुवा, निळ्या आणि नारिंगी रंगाच्या झगमगीत छटांचा खंड्या, डोक्यावर पंखा असलेला हुधहुध, आणि कर्कश आवाज असणारा तोता—असे अनेक पक्षी बघतांबघतां आम्ही त्यांच्या-बद्दल माहितीहि गोळा करीत होतों.

नंतर एकदां आम्ही असेच दिल्ली शहराच्या यमुनेच्या पलीकडे वसलेल्या भागांत गेलों होतों. यमुनेवर जो पूल आहे त्यावर रहदारी विचित्रपणें अडकून पडली. वाहनांची भयंकर गर्दी आणि खेंचाखेंच झाली. आमची मोटार जागची हलायलाच मुळीं अर्धा पाऊण तास लागला. तोंवर मी आणि आई आसपासच्या वाहनांची मजा बघत बसलों होतों. पायीं चालणारे आणि साय-कलस्वार तर शेंकड्यांनीं होते. टांगे, रिक्शा, बैलगाड्या, सायकलरिक्शा,

ट्रक्स्, बसेस्, मेंढ्यांचे कळप, इतर गुरं, वगैरे सर्वच त्या गुंतागुंतींत सांपडले होते. सहसा न दिसणारा उंटांचा तांडाहि त्यामध्यें दिसला.

पुलाखालीं नदीवर धोबीघाट होता. नदीकांठचं गवत वाळत टाकलेल्या कपडयांनीं झांकून गेलं होतं. धोबीकाम म्हणजे कंटाळवाणं. सारा दिवस उन्हातान्हांत, पावसापाण्यांत राबायचं. घाटावर प्रत्येकाचा दगड ठरलेला.

त्या दिवशींचा पक्षिनिरीक्षणाचा कार्यक्रम मला कांहीं फारसा गंमतीचा ठरला नसावा; कारण या क्षणीं तर त्याचा मागमूस देखील माझ्या स्मृतींत सांपडणार नाहीं. मात्र अडकून पडलेल्या वाहनांचं दृश्य माझ्या मनावर खोलवर ठसा उमटवून गेलं आहे.

सकाळचं किंवा संध्याकाळचं जेवण घरीं न घेतां आम्ही सहलीला जात असूं. अशा कार्यक्रमाला सर्वांत जवळची जागा म्हणजे घराच्या मागच्या बाजूला लागूनच असलेला लोधी पार्क. आम्ही तिथें वारंवार जात असूं. तिथला गारवा, सांवली, झाडी, निवांतपणा हें सारं वातावरणच मला एकंदरींत आवडायचं. पार्क अहोरात्र उघडा असे, त्यामुळें नेहमीं लोक येतांना दिसत. आंवळीभोजनाला आलेलीं कुटुंबं, मुलांशीं खेळणारीं वडील माणसं, गप्पा मारीत बसलेल्या बायका, अभ्यास करणारे विद्यार्थी, कामावरून सुटल्यावर अंमळ आडवा होणारा मजूर—सारेच तिथें यायचे.

एकदां आम्ही हौजकाझी या बागेंत सायकलवरून गेलों होतों. ही जागा पुष्कळशी लोधी पार्कसारखीच होती. गांवाबाहेर सुमारें चारपांच मैलांवर हें रम्य ठिकाण होतं. रविवार साधून सहलीला आलेल्या माणसांनीं तेथील हिरवळी गजबजून गेल्या होत्या. आबालवृद्धांचा मेळा तिथें दिसायचा. त्या दिवशीं आम्ही पोंचलों तोंवर हौशी मंडळींनीं व्हॉलीबॉल खेळायला सुरुवात केली होती. सतार, बांसरी, हार्मोनियम् वगैरे आपापल्या आवडीचीं वाद्य घेऊन लोक आले होते आणि त्यांच्या वादनाचे संमिश्र स्वर भंवतींच्या स्वच्छंद मोकळ्या वातावरणांत मिसळत होते. रात्रींच्या वेळीं तर ही जागा फारच मनोरम असे. आम्ही कांहीं वेळां रविवारीं रात्रीं तेथें गेलों होतों. सारं कसं शांत असायचं. माणसं नाहींत, गडबड नाहीं. फक्त चंद्राचा दिवा संथपणें प्रकाशत असायचा.

हॉस्पिटलमध्यें जाण्याआधीं किंवा परत आल्यानंतर दर रविवारीं कांहीं ना

कांहीं कार्यक्रम असायचेच. एकदां मी भारत विरुद्ध जपान हा हॉकीचा सामना बघण्यासाठीं गेलें होतें. भारतीय खेळाडूंचं चापल्य आणि कौशल्य वाखाणण्याजोगं होतं. त्यांना प्रोत्साहन देण्यासाठीं आम्हीं किती आरडाओरडा केला ! त्यांनींच ती मॅच जिंकली.

स्काऊट वर्ल्ड फेलोशिप्च्या वतीनं जगभर पाहणी करण्यासाठीं मिस् क्रोव निघाल्या होत्या. त्या दिल्लींत आल्या तेव्हां गर्लगाईडचा केवढा तरी मोठा मेळावा झाला. मीहि माझा निळा आरमारी गणवेष घालून गेलें होतें. भारतीय मुलींना पांढरी सलवार, खमीस आणि निळी ओढणी असा गणवेष होता.

५२ सालच्या जानेवारींत भारतांत पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली. दिल्लींत सभा मिरवणुकांची अगदीं दंगल असे. भिंतीपत्रकं आणि जाहिरातींची गर्दी तर विचारायलाच नको. एका रविवारीं मी आणि आई कॉंग्रेसच्या प्रचारसभेला गेलों. नेहरू स्वतः बोलणार होते. आम्ही पोंचलों तोंवर ते आलेले नव्हते. हजारों लोकांचा समुदाय जमला होता, त्यांतच आम्ही घुसलों. वाट काढत काढत व्यासपीठाच्या शक्य तितक्या जवळ गेलों. ठरलेल्या वेळीं नेहरूंची गाडी आली. त्याबरोबर सर्व समुदायांत कुजबुज सुरू झाली. टाळ्यांचा गजर, जयजयकाराचा घोष असं कांहीं नव्हतं. त्यांच्या आवडत्या पुढाऱ्याच्या आगमनार्थ लोक शांत उभे होते. नेहरूंनीं धिम्या अन् स्पष्ट वाणीनें हिंदुस्थानींत बोलायला सुरुवात केली. पण दुर्दैवानं त्यांचं भाषण समजण्याइतकं हिंदुस्थानी आम्हांला तेव्हां येत नव्हतं. भाषण समजत नसल्यामुळें माझं लक्ष एकूण जनसंमर्दाकडे व लोकांच्या वर्तनाकडेच होतं. समाजाच्या सर्व थरांतील, जातिधर्मपंथांतील लोक तेथें होते. त्यांना एकत्र आणणारी भावना म्हणजे पंडितजींबद्दल सर्वांना वाटणारा आदर. तेथें जातिभेद कधींच लोपला होता. जातीपातींचं बंड शहरांतून आतां कमीच होत चाललं आहे.

इतके सगळे उद्योग मागें असतांना शनिवार रविवार आळसांत जाणं कठीणच होतं ! उपचारकेंद्रांतील काम, हॉस्पिटल, सहली, खेळांचे सामने, मैत्रिणींच्या गांठीभेटी या सर्वांमुळें शनिवार रविवारचं आकर्षण केवढं तरी वाटत असे. आतां या दोन दिवसांची इथल्या ओबर्लीन कॉलेजमध्यें पाहतें, तशीच वाट मी दिल्लीची शाळा चालू असतांना पाहत असें.

# : १० :

मला नर्सिंगची विशेष आवड असल्यानें खेड्यांमध्यें जें सार्वजनिक आरोग्य केंद्रांचं काम चालतं, त्याचं स्वरूप कसं असतं हें जाणून घेण्याची मला उत्सुकता होती. त्यासाठींच पुढें कांहीं दिवसांनीं मीं दिल्लीच्या नर्सिंग कॉलेज-मध्यें चौकशी करून चौला या दिल्लीपासून वीस मैलांवर असलेल्या खेड्यांत आठएक दिवसांसाठीं जाण्याची परवानगी मागितली. या खेड्यांतील सार्वजनिक आरोग्यकेंद्रावर नर्सिंग कॉलेजमधल्या मुली प्रात्यक्षिक शिक्षणासाठीं जात, असं मीं ऐकलं होतं. मला परवानगी मिळाली तेव्हां मी फार खूष झालें.

जूनमध्यें एक दिवस भर तिसऱ्या प्रहरीं मी चौलांत दाखल झालें. तोंपर्यंत तेथील विद्यार्थिनी सकाळचं काम संपवून परत आलेल्या नव्हत्या. मिस् क्रेग् नांवाच्या नर्सिंग कॉलेजमधल्या माझ्या मैत्रिणीनं मला वसतिगृहाच्या सर्व आवारांत हिंडवून माहिती सांगितली. एकेक दोनदोन खोल्यांच्या चार छोटेखानी इमारती चौलाच्या शीवेवर बांधलेल्या होत्या. एका इमारतींत स्वयंपाकघर व जेवणघर होतं, दुसरी अध्यापकवर्गासाठीं होती, आणि उरलेल्या दोन विद्यार्थिनींसाठीं होत्या.

तेव्हां तिथें एकूण आठजणी होत्या. त्यांच्यांत सहा विद्यार्थिनी, एक ग्रामीण भागांतील अन्नाच्या पोषणमूल्यांचा अभ्यास करणारी पदवीधर विद्यार्थिनी व एक देखरेखीसाठीं नेमलेली, वयानं त्यांच्यांतच शोभेशी व्यवस्थापिका. नर्सिंगच्या अभ्यासक्रमांतीलच एक भाग म्हणून या मुली खेड्यातील आरोग्यप्रसाराच्या कार्याचा अनुभव घेण्यासाठीं आल्या होत्या.

त्यांच्यापैकीं बहुतेकजणी उत्तर हिंदुस्थानांतीलच होत्या, म्हणजे दिल्ली,

पंजाब, उत्तर प्रदेश, बिहार या भागांतल्या. दोघी बंगाली होत्या आणि एकजण मात्र थेट सीलोनहून आलेली होती. भारताच्या वेगवेगळ्या भागांचं प्रतिनिधित्व करणाऱ्या मुलींबरोबर राहण्याचा हा अनुभव खेड्यांतील प्रत्यक्ष काम बघण्याच्या व करण्याच्या संधीइतकाच नवीन व महत्त्वाचा होता.

मुली गांवांतलं काम संपवून परत आल्या तेव्हां आम्हीं सर्वांनीं 'लस्सी' घेतली. लस्सी हें दहीं व पाणी एकत्र करून बनविलं जाणारं थंड पेय आहे. त्यानं पोटाला थंडावा तर वाटतोच, अन् तसा खर्च पाहिला तर कांहीं विशेष नाहीं. लस्सी हें लोकांचं फार आवडतं पेय आहे असं मला आढळून आलं. यानंतर थोड्याच वेळांत जेवणाची वेळ झाली. भात, पोळी आणि रस्सा असं भारतीय पद्धतीचं जेवण होतं. कांटेचमचे न वापरतां सर्वजणी अगदीं सफाईनं हातानं जेवत होत्या. सुमनकडे आणि सेवाग्रामला मीहि थोडीफार प्रगति केली होती.

जेवणानंतर जवळजवळ चार वाजेपर्यंत विश्रांतीची वेळ. भारतामध्यें रणरणत्या उन्हाळ्याच्या दिवसांत बहुतेकांची दुपार एखादी डुलकी घेण्यांत जाते. उन्हं उतरल्यावर चहा, दूध वगैरे घेऊन संध्याकाळच्या कामाला सुरुवात झाली. दिवेलागणी होईपर्यंत मुली गांवांत फिरून कामं करीत किंवा राहत्या जागेच्या आवारांतच आरोग्यविषयक चित्रं असलेलीं भिंतीपत्रकं बनवणं, अहवाल लिहिणं वगैरे गोष्टी करीत.

त्या पहिल्या दिवशीं संध्याकाळीं मी तिथल्या दोघीजणींबरोबर चौलामध्यें फेरफटका करून आलें. गांवकरी मंडळींना परिचारिकांच्या कामाची आतां संवय झालेली होती. येतांजातां लोक आपुलकीनं 'नमस्ते' म्हणत. कांहीं जणांनीं तर आम्हांला बोलावून थोडा वेळ बोलून बसून जाण्याची विनंति केली.

आम्ही प्रथम ज्या आजारी मुलीला बघण्यासाठीं गेलों तिला ताप येत होता. जेमतेम चार दिवसांचं मूल तें! पण मुलगी झाली म्हणून नावडती. नेहमींचीच तऱ्हा आहे ही. रूढीनुसार वडलांना लग्नांत हुंडापांडा द्यावा लागणार. आधींच घरची गरिबी.

अर्थातच तिच्याकडे सर्वांचं दुर्लक्ष. ना धड दुधापाण्याची सोय ना धड अंगड्याटोपड्याची सोय. नर्सेस् गेल्यावर त्याच तिला न्हाऊं घालणार, पाणी

पाजणार, पण यापरतं जास्त त्या तरी काय करूं शकतात? 'पुरेसं, पुन्हा पुन्हा दूध पाज, बाळाची योग्य काळजी घे' असं सांगून तिच्या आईला संगोपनाचं महत्त्व पटवण्याचा प्रयत्न केला. परिचारिकांचा सल्ला एका कानानं ऐकून दुसऱ्या कानानं सोडून देण्याचा क्रम जर त्या आईनं चालू ठेवला तर त्या पोरीचं जिणं मोठं कठीण दिसत होतं.

नंतर आम्ही टायफॉईडनं आजारी असलेल्या एका मुलाकडे गेलों. विषमाचा ताप भारतांत नित्याचीच गोष्ट बनून राहिला आहे. अन्न, पाणी, दूध वगैरे दूषित झाल्यानें याचा प्रसार होतो. या मुलाखेरीज आणखीहि एक लागण चौलामध्यें झाली होती.

आम्ही गेलों तो मुलगा एका लहानशा घरांतल्या अंधेऱ्या खोलींत चारपायीवर पडला होता. त्याची बहीण शेजारीं बसून त्याला वारा घालीत होती. या मुलींच्या देखरेखीखालीं त्याची चांगली शुश्रूषा होत होती. नाहींतर हें केंद्र निघण्यापूर्वी विषमाच्या तापाच्या रोग्यांची जी गत व्हायची तीच याचीहि झाली असती.

अशा लहान घरांमध्यें संसर्गजन्य रोगी कसे वेगळे ठेवीत असतील हा मला प्रश्नच पडला. पण नंतर मला कळलं कीं रोगांचा, विशेषतः देवीच्या सांथीचा कार्यकारणसंबंध आजहि बरेच हिंदु लोक देवीच्या कोपाशीं लावतात. मनुष्य आजारी पडला कीं पुष्कळदां त्याला झपाटलंच आहे असं समजून त्याच्या जवळसुद्धां जायला कोणीं तयार होत नाहीं, सेवेचं तर नांवच नको !

या दोन घरचं काम संपल्यानंतर आम्ही खेड्यांत इतरत्र फिरलों. वाटेंत भेटलेल्या बायकांशीं चार शब्द बोलून आम्ही पुढें जात होतों. घरांमधल्या बायका कांहीं ना कांहीं काम करतांना दिसल्या. कुणी सूत काततांना दिसल्या, तर कुणी मुलं सांभाळण्यांत गुंतल्या होत्या, तर कुणी चुलीची आराधना करीत होत्या. या विद्यार्थिनींशीं त्या ज्या मित्रभावानं बोलत होत्या तें पाहून मला जरा आश्चर्य वाटलं. किती आपलेपणा होता त्यांच्यांत !

वस्तुतः या मुली परक्या गांवच्या. त्यांचे कपडे निराळे—नेहमींच्या घागरे ओढण्यांएवजीं त्या स्वच्छ पांढऱ्या साड्या नेसत. पुन्हा वागणंहि तसं 'अघो-रपणाचं.' वडील पुरुषमाणसांशीं बोलतांना डोक्यावर घूंघट नाहीं कीं नजर खालीं नाहीं. अजून कुंवार, तरी खुशाल पुरुषांच्या नरेला नजर भिडवून बघायला

कमी करीत नसत. गांवाची भाषा त्यांना बेताबाताचीच येत होती आणि आपापसांत कुठल्या भाषेंत बोलत तें गांवकऱ्यांना समजत नसे.

बापजाद्यांनीं ऐकल्या नव्हत्या असल्या गोष्टी करायला त्या सांगायच्या. पिढ्यान् पिढ्या चालत आलेल्या गोष्टी सोडून द्या म्हणून प्रचार करायच्या. महिन्याच्या आंतल्या मुलाला पाणी पाजल्याचं कधीं कुणीं ऐकलं तरी होतं का? जलोदर नाहीं का व्हायचा बाळाला? पण छे. तसंच जखम बांधण्याचं. गार ओल्या मातीचा थर दिला कीं आमचं होत होतं. पण या मुली कसल्या तरी वासाचं पिवळं मलम पांढऱ्या पट्टीला चोपडून चिकटवून टाकत. तें कसलं वजनाचं यंत्र आहे राम जाणे. कोणी कोणी म्हणतात कीं त्या यंत्रांत ठेवलं तर पोर आंचके देऊन दगावतं म्हणून.

हे आणि असे प्रवाद निर्माण झालेल्या ठिकाणीं या मुलींना प्रथम तोंड द्यावं लागलं. आजहि या भ्रममूलक कल्पनांवर या मुलींनीं संपूर्ण विजय मिळवला आहे असं कांहीं म्हणतां येत नाहीं पण आस्ते आस्ते त्यांचा जनमनावरचा पगडा कमी होत आहे यांतहि शंका नाहीं.

गांवांतल्या रस्यानं तेथील बायकांशीं या मुली गप्पा, हास्यविनोद करीत चालल्या होत्या. कपड्यांचं, मुलाबाळांचं कौतुकहि चालू होतं. याचबरोबर कुणाला कांहीं अडचण असली तर सहानुभूतीनं ऐकून घेऊन त्या त्यांना मार्ग सुचवीत होत्या.

याच गोड बोलण्यावागण्यानं त्यांनीं गांवकऱ्यांचा विश्वास संपादन केला होता. मग त्यांच्यापैकींच एखादी धीट बाई तिला पटल्यावर आपल्या मुलाला पाणी पाजायला तयार झाली. मग चक्षुर्वै सत्यानंच दाखवलं कीं पोटांत कांहींसुद्धां बिघाड झाला नाहीं म्हणून. मग हळूहळू आपल्या मुलाला कांट्यावर घालून वजन केलं तर कांहीं त्याला आंचके येत नाहींत हेंहि तिनं पाहिलं. पुढच्या महिन्याला त्या मुलाला कांट्यावर ठेवल्यावर तर आपल्या मुलाचं वजन वाढल्याचं तिला त्यावर प्रत्यक्ष बघतांसुद्धां आलं.

या परिचारिकांचं काम अत्यंत कठीण होतं. अनेकवेळां नाउमेद होऊन सोडून द्यावं असंहि वाटूं लागत असे. पण प्रतिदिनीं मिळणाऱ्या थोड्याफार कां होईना, विजयानं त्यांना आशा लावली आणि चिकाटीनं प्रयत्न करीत राहण्याचं धैर्य त्यांच्या ठायीं निर्माण केलं.

चौला हें सुमारें दीड हजार वस्तीचं एक छोटंसं गांव आहे. तसं पाहिलं तर विस्तार कांहीं मोठा नाहीं पण भारतांतील इतर खेडयांशीं तुलना केली तर तें मोठंच म्हणावं लागलं असतं. संख्येनं पाहिलं तर सरासरी सातआठशें लोक एका खेडयांत असतात. चिखलमातीच्या कुडाच्या भिंती असलेल्या झोंपडया अगदीं जवळ जवळ बांधलेल्या असतात. एखाद्याच बड्या आसामीची इमारत लाकूडविटांच्या भक्कम बांधणीची दिसायची.

सर्वसामान्य घर म्हटलं कीं दोनतीन अंधाऱ्या खोल्या आणि अंगण एवढं असायचं. घरकामाचे बरेचसे व्यवहार अंगणांत चालायचे. जेवणखाण, कामधंदा, विश्रांति सर्वच अंगणामध्यें करणारे लोक आहेत. अनेकदां गोठा म्हणूनहि त्याचा वापर होतांना दिसला. एखादी गाय नाहींतर म्हैस बांधलेली असे. एका कोपऱ्यांत चूल असे. बहुतेक ठिकाणीं एकदोन चारपाया जवळच टाकलेल्या असत. बायकांना जरा विश्रांति घ्यायला आणि बोलायबसायला उपयोग होत असे त्यांचा. संध्याकाळीं पुरुषमाणसं हुक्का पीत त्यावर बसूनच शिळोप्याच्या गप्पा मारत. त्यांत खेड्यांतल्या बातम्या, राष्ट्रीय वार्ता, कांहीं वेळां आंतरराष्ट्रीय राजकारण सुद्धां चर्चेसाठीं आपली हजेरी लावत.

अंगणामागच्या लहान खोल्यांमध्यें अवजारं, बियाणं, आंत्रोणाचं धान्य, आणि इतर मालकीचं सामान ठेवलेलं असे. खिडक्या फारच क्वचित् दिसतात आणि अर्थातच मग खोल्या फार अंधाऱ्या असतात. घरं झाडझूड करून स्वच्छ ठेवलेलीं असतात. पितळेचीं स्वैंपाकाची आणि जेवणाखाणाचीं भांडीं तर लखलखीत असतात.

पण ही सारी स्वच्छता उंबऱ्याआंतच. स्वतःचं घर एवढं स्वच्छ ठेवतील, पण रस्त्यावर जाऊन थुंकतील, तेथेंच सांडपाण्याला वाट करून देतील. सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणं ही या मुलींच्यापुढें फारच मोठी समस्या होती.

भारतांतील इतर खेड्यांप्रमाणेंच चौलांतहि वेगवेगळ्या वस्त्या आहेत. एरवीं त्यांच्यांत चांगला एकोपा व आपलेपणा असला तरी रोटीबेटीव्यवहार आजहि निषिद्धच आहे.

चौलामध्यें पहिल्या सकाळीं मी जागी झालें ती शेतावर निघालेल्या

गळ्यांतल्या घुंगरांच्या आवाजामुळें. फक्त सहाच वाजले होते आणि तरीहि आपण फार झोपाळू आहोंत असें मला वाटूं लागलें. कारण नांगरटीसाठीं शेतकरी शेतावर गेले होते, घरधनिणी विहिरीचं पाणी उपसून इतर कामाला लागल्या होत्या. मुलंबाळं जागीं होऊन खेळायला लागलीं होतीं. सूर्याचा डोळा उघडल्याबरोबर खेड्याचा दिवस सुरू झाला होता, हें सारं अंथरुणावर पडल्यापडल्या मला समजत होतं. मान्सूनचा पाऊस अगदीं तोंडावर आला होता. नांगरटीचे दिवस पुरुषमाणसांना आणि मोठ्या मुलांना मोठे गडबडीचे होते. उन्हाची तिरीप लागूं नये म्हणून पहांटेसच कामाला सुरुवात होत असे.

आंत उकडत होतं म्हणून बाहेरच्या अंगणांतल्या गारठ्यांत आम्ही झोंपलों होतों. मला जाग आली तेव्हां बाकीच्या मुलींपैकीं कांहींजणी उठून अंथरुणं गोळा करीत होत्या तर कांहींजणी आंघोळीला वगैरे गेल्या होत्या. गांवामध्यें वीज, नळ या सोयी नव्हत्या. गांवाच्या शीवेजवळ असलेल्या विहिरीचं पाणी जवळजवळ अर्ध्या मैलावरून आणावं लागे. कळशा, हंडे, माठ भरभरून बायका पाणी आणीत असतात.

पाणी भरण्याचं काम बायकांचं. कांठोकांठ पाण्यानं भरलेला माठ डोक्यावर घेऊन जाणारी, घोळदार घागऱ्याच्या हेलकाव्यांना अंगाखांद्यावरच्या आभरणांच्या तालाची साथ देणारी ही भारतीय ग्रामललना पाहिली कीं एखाद्या लेखकाच्या कल्पनाविश्वांतील व्यक्तीच साकार झाली असल्याचा भास होतो. ती सुदृढ आहे. आनंदी आहे. रंगवैचित्र्याची भोक्ती आहे. घोट्यापर्यंत पोंचतो न पोंचतो अशा लांबीचा तिचा घागरा खूपच चुणीदार आणि डौलदार असतो. कापड बहुधा टसठशीत रंगीबेरंगी चिटाचं असतं. तिचा खमीस जरा सैल असतो. रंगीबेरंगी कापडाची ओढणी कधीं नुसती डोक्यावरून तर कधीं सारा चेहरा झांकण्यासाठीं ती घेते.

लग्नाच्या वेळीं वधूच्या अंगावर खूपच दागिने घालतात. बांगड्या, वाकी, पैंजण, तोरड्या, नथ, कर्णभूषणं, बिंदी, भांगसर, गोंडेफुलं व केसांत घालायचे प्रकार, आणि माळा—बहुतेक सर्वच चांदीवर भरगच्च नक्षीकाम केलेले जड दागिने असतात. आवांक्याबाहेर खर्च करून मुलीचे वडील हे पैसे उभे

करतात आणि त्यामुळें कर्जाचा बोजा फार वाढतो. बहुतेकांचं कर्ज त्यांच्या हयातींत कांहीं फिटत नाहीं.

सात वाजेपर्यंत आमची न्याहरी उरकत असे. परोठे—एक प्रकारची तळलेली पोळी—उकडलेल्या बटाट्यांची भाजी आणि दूध किंवा चहा असा बेत असायचा. हा कार्यक्रम संपला कीं दिवसभराच्या कामाला मुली तयार असत.

नजफगढहून येणाऱ्या एका स्त्री डॉक्टरच्या साहाय्यानं वसतिगृहाच्या आवारांतच एक उपचारकेंद्र त्यांनीं चालू केलं होतं. डॉक्टर आठवड्यांतून एकदां येत. पहिल्या दिवशीं मी तेथें जाऊन त्यांना मदत केली.

या कामाचा खर्च नर्सिंग कॉलेजतर्फे केला जातो. या सेवाकार्यांचा लाभ चौलांतील प्रत्येक खेडुताला होत असतो. चौलामधील पांच वर्षांपर्यंतच्या सर्व मुलांना एक तक्ता देऊन त्यावर त्यांच्या प्रकृतीची संपूर्ण नोंद करण्यांत येते. शक्य तों हे तक्ते मूल अगदीं जन्मल्यापासूनच भरायला सुरुवात करतात. यामध्यें घरच्या तक्रारी आणि केंद्रांतील माहिती थोडक्यांत लिहिलेली असते आणि वजनाची वाढ स्वतंत्र रकान्यांत भरलेली असते.

एखादी बाई गरोदर आहे असं लक्षांत येतांच नवा तक्ता घेऊन दर महिन्याच्या तपासणीचा तपशील त्यांत भरावयास सुरुवात होते. त्यामध्यें आधींच्या मुलांचीं नांवं, आरोग्याची रूपरेषा, किंवा मृत्यूचें कारण वगैरे लिहिलेलं असतं. एक नमुना :

नांव—शांतिदेवी.

यापूर्वींचीं अपत्यें :

| नांव | मुलगा अथवा मुलगी | जन्मसन | प्रकृतिमान | मृत्यूचें कारण | मृत्युसमयीं वय |
|---|---|---|---|---|---|
| उषा | मुलगी | १९४४ | चांगलें | | |
| रामलाल | मुलगा | १९४५ | | विषमज्वर | ४ वर्षें |
| हरिराम | मुलगा | १९४७ | | न्यूमोनिया | ६ महिने |
| पुष्पा | मुलगी | १९४९ | ताप | | |
| मोहिंदर | मुलगा | १९५१ | चांगलें | | |

जून ५, १९५२, २० आठवड्यांचें गर्भारपण.

आरोग्याच्या बाबतींतल्या मदतीमुळें अपमृत्यूचें व बालमृत्यूचें प्रमाण व गति निश्चितच कमी झालीं आहेत. पण अजूनहि बालकें मृत्युमुखीं पडतांना दिसतात. बालमृत्यूपैकीं ५०% प्रमाण बारा वर्षांआंतील मुलांचं आहे, आणि त्यापैकीं एक चतुर्थांश पहिल्या वर्षांतलींच असतात. मुख्य समस्या म्हणजे पुष्कळच खेडुतांना योग्य तऱ्हेचं अन्न भरपूर प्रमाणांत मिळत नाहीं. तसंच बहुतेकांना स्वच्छतेचं महत्त्व कळत नाहीं आणि मुलांबद्दल निष्काळजी राहून दुर्लक्ष करणारे पालकहि कांहीं थोडे नाहींत.

अन्नाची टंचाई हें कारण आहे असं मला वाटत नाहीं. विशेषतः या अलीकडच्या वर्षांमधली धान्योत्पादनाच्या बाबतींतील प्रगति पाहिली कीं अपुऱ्या अन्नापेक्षां असमतोल आहार हेंच रोगांचं खरं कारण आहे. हिरव्या भाज्या, फळं, नत्रयुक्त पदार्थ यांची वाण अगदीं लक्षांत येते. धान्य आणि तूप हे पचायला जड असलेले पदार्थच रोजच्या जेवणांत मुख्यत्वेंकरून असतात. चौलांतले बहुसंख्य हिंदू कट्टर शाकाहारी आहेत. मग मांस आणि अंडीं यांचा प्रश्नच नाहीं.

एक किराणा मालाचं दुकान सोडलं तर खाद्य वस्तू मिळण्याला दुसरं दुकानच नाहीं. भाजीवाला कधीं तरी गांवांतनं चक्कर टाकतो, पण तो रोज येईलच असा भरंवसा देतां येत नाहीं. नजफगढ हें गांव तीन मैल दूर आहे. तिथल्या बाजारांत अधूनमधून खेप टाकावी तेव्हांच जरा भाज्या, फळं घेतां यायचीं. सायकली, बैलगाड्या,—नाहीं तर पायगाडी यांचा वाहन म्हणून वापर केला जातो.

एक दिवस मी आणि तिघी जणी परिचारिका सायकलवरून नजफगढच्या बाजारांत गेलों. तेथील केंद्रांत कांहीं मदत करण्याचंहि काम आम्हांला होतंच. या केंद्राखेरीज तेथें आसपासच्या जवळजवळ २८ खेड्यांना उपयोगी पडणारं रुग्णालय आहे. तें वाढवून सबंध जिल्ह्याला त्याची मदत पुरवण्याची सोय करण्याच्या योजना आहेत.

कांहीं केंद्रांवर काम केल्यावर आम्हीं बाजारांतून भाजी, फळं आणलीं. अमेरिकन दृष्टीनं किंमतींचा विचार केला तर चकित करणारी स्वस्ताई दिसली. पांच आण्याला तीन खरबुजं घेतलीं आम्हीं ! बाजारांत भाज्या आणि फळं

थांची रेलचेल होती. टोमॅटो, बटाटे, काकड्या, भोपळे, पडवळ, घेवडे, कांदे, ह्या भाज्या आणि केळीं, नारळ, खरबुजं, आंबे, पीचं, लीची हीं फळं. गाडीवाला घंटा वाजवत किसलेल्या बर्फाचे गोळे काडीला लावून विकणारा फेरीवाला बाजारांतून हिंडत होता. त्या पांढऱ्या बर्फावर तांबडंलाल सरबताचं गोड पाणी ओतून तो मुलांना विकीत होता. त्याचं एकनिष्ठ गिऱ्हाईक म्हणजे छोटीं मुलं.

चौलांत होतें, तोंवर कुणी ना कुणी व्हिजिटला जाईल त्या मुलीबरोबर मी गांवकऱ्यांच्या घरांत जाण्याची संधि घेत असें. मागें सांगितलं त्या उपेक्षित नवजात मुलीकडे तर आम्ही रोज जात होतों. एका आठवडाभरांत ती जरा बरी दिसत होती. हॅकी ही परिचारिका तिला न्हाऊं घालून थोडंसं पाणी पाजून औषध देत असे. आम्हांला कळलं कीं अजून पंधरा तीन वार तिचा बाप तिच्या आईचं तोंडसुद्धां बघणार नव्हता. ही मुलगी झाली हा तिचा दोष !

एक दिवस आम्ही त्या भागांत सुधारक म्हणून गणल्या जाणाऱ्या घरीं गेलों. याच लोकांनीं आमच्या संशोधन करणाऱ्या विद्यार्थिनीला त्यांच्या मुलाचं दर आठवड्याला वजन करूं दिलं होतं. त्या घरच्या बायका विशेषच दमदार प्रकृतीच्या आणि अगत्याच्या वाटल्या. परिचारिकेचा सल्ला त्यांनीं एकहि शंका उपस्थित न करतां मान्य केला.

एक दिवस अगदीं शांत, गाढ झोंपेंतून कुणाच्या तरी हांकांनीं मी जागी झालें. चार साडेचारचा सुमार असेल. उगवतीला प्रकाशाच्या खुणा दिसूं लागल्या होत्या. मिस् साहेब, मिस्साहेब, कोणींतरी हांक मारत होतं. आम्ही सगळ्याच जणी जवळजवळच बाहेर झोंपलों होतों आणि माझ्यासारख्याच बाकीच्याहि जाग्या झाल्या. 'क्या हो गया ?' असं आमच्यापैकीं एकीनं विचारलं. नंतर लगेच आवाज आला, "हॅकी, लौकर ऊठ. लक्ष्मीची वेळ आली वाटतं."

हॅकी आणि मी आदल्याच दिवशीं लक्ष्मीकडे जाऊन आलों होतों. तिचे दिवस भरतच आले होते. जूनच्या पहिल्या आठवड्यांतलीच तारीख दिली होती तिला. तिच्या नात्यांतलं कोणी तरी तिच्या पोटांत दुखायला लागल्याचं सांगत आलं होतं. हॅकी आणि केंद्रप्रमुख लगेच निघाल्या. त्यांना परत यायला दहा वाजून गेले. पावणेदहाला लक्ष्मीला चांगला ७॥ पौंड वजनाचा मुलगा झाला होता !

थोडया वेळानंतर आम्ही बाळाच्या घरीं गेलों. या मुलामाणसांच्या लहानशा घरांत एकीकडे बाळंतपण कसं काय होत असेल हा मला प्रश्नच पडला. एका कोंपऱ्यांत आपला तात्पुरता आडोसा करून एक बाज टाकली होती. पण तरी त्याला कुठल्याच तऱ्हेनं स्वतंत्र खोली म्हणतां आलं नसतं. आणि सर्वच घरांत असं असल्यामुळें पोरांसोरांना देखील या बाबतींत बरीच माहिती असते असं मला कळलं.

या जगांत डोळे उघडून अवघे सात तास झालेल्या आपल्या तान्हुल्याला कुशींत घेऊन लक्ष्मी खाटेवर पडली होती. मीं त्याला मांडीवर घेतलं. हॅकीनं त्याला थोडंसं पाणी पाजलं. दुसऱ्या दिवशीं आम्ही गेलों तेव्हां एवढ्या लहान मुलाला आंघोळ कशी घालावी तें हॅकीनं मला शिकवलं. मी त्याच दिवशीं लगेच प्रात्यक्षिकहि केलं. आसपास राहणाऱ्या बायकांची लगबग चालू होती, आनंदाच्या वातावरणांत मुलं दंगा करीत होतीं. पण ह्याच मुलाच्या जागीं मुलगी असती तर हा आनंद कुठल्या कुठें विरून गेला असता.

एक दिवस संध्याकाळचं जेवण उरकल्यानंतर दुसऱ्या एका मुलीबरोबर मी लग्नाला गेलें. सकाळीं ७ लाच वराकडची मंडळी आली होती. त्यांचा लवाजमा आम्हीं दारावरनं जातांना पाहिला होता. सर्वांत पुढें वराची गाडी आणि त्याच्यामागें वऱ्हाडी मंडळींच्या गाडया येत होत्या. त्यांचं घर जवळच्याच एका खेडयांत होतं. बहुतेक लग्नसंबंध असे आजूबाजूच्या खेडयांमध्यें जुळवतात.

या सर्व बैलगाडयांच्या पुढें वाजंत्री दिसत होती. बहुतेक सर्व रस्त्यावर ते वाजवत आले असावेत. वराची लग्नाला जातांना जी मिरवणूक काढतात त्यालाच 'वरात' म्हणतात. सुमनबरोबर दिल्लींत मीं अशी मिरवणूक पाहिलेलीच होती. पण यावेळीं थाट खेडवळ होता. मोटारगाडयांची छानछोक नव्हती.

वरात खेडयाच्या शीवेवर येऊन थांबली होती. मुलीकडच्या कर्त्या माणसांनीं येऊन 'जय राम' म्हणून हात जोडून स्वागत केल्यानंतरच मुलीच्या लग्नघरीं जाण्यासाठीं वऱ्हाडी हलले. मग दिवसभर लगीनघाई चालू होती. विवाहविधी आणि मेजवानीचं जेवणखाण हें दिवसभर चालूच होतं.

आम्ही मुलीच्या घरीं गेलों, तोंवर व्याहीमंडळींचीं जेवणं उरकून ती गेलेली होती. आम्हांला घरांत बोलावून नवरीमुलगी बसली होती तिथें नेलं. तिची

आई आणि दोघी बायका अंगणाच्या एका बाजूला तिला घेऊन बसल्या होत्या आणि तिच्या केसांच्या लहानलहान बऱ्याचशा वेण्या घालीत होत्या. ती मुलगी सुमारें सोळा वर्षांची दिसली. ती दिसायला फारच सुरेख व गोड होती. तिचा नवरा आणि सासरचीं माणसं आसपास वावरत नसल्यामुळें तिनं तोंडावरचा बुरखा दूर ठेवला होता. "बाहेर जे लोक गप्पा मारीत आहेत ते तर मला भावासारखे आहेत आणि हें माझ्या माहेरचं गांव आहे" असं तिनं बुरखा काढून ठेवण्याचं कारण सांगितलं.

रूढ पद्धतीनुसार दुसऱ्या दिवशीं पतीनं तिला सासरीं घेऊन जाण्यासाठीं यायचं असं ठरलं होतं. त्या घरीं तेथील सोहाळे उरकल्यानंतर तीनचार दिवसांनीं ती सहाआठ महिने तरी माहेरींच परत यायची होती. त्यानंतरच ती नवऱ्याच्या घरीं नांदायला जाणार होती.

माहेरचं गांव सुटल्यामुळें पुरुषमाणसांच्या देखत तोंडावरून घूंघट घेऊनच तिला वावरायला हवं.

लग्न झाल्यावर किती दिवस माहेरीं राहायचं हें वधूच्या वयावर अवलंबून असतं. चौलांतल्या एका मुलीचं नवव्या वर्षींच लग्न झालं होतं आणि आतां अठरा वर्षांची झाली तरी ती नवऱ्यापासून दूर माहेरींच होती. आतां ती लवकरच नवऱ्याकडे जाईल, असा माझा अंदाज आहे.

बहुतेक लग्नांमध्यें वधूचं वय ९ ते १५ च्या दरम्यान असतं. आपण अमेरिकेंत जेव्हां एवढंच ऐकतों तेव्हां 'बालविवाहा'च्या चालीवर आपण टीका करण्यास प्रवृत्त होतों. पण केंद्रप्रमुखाचं काम करणारी कार्यकर्ती म्हणाली, 'शेवटीं दोन्हींचा हिशेब सारखाच होतो. या भागांत सतराअठरा वर्षांची झाल्याखेरीज मुलगी नवऱ्याजवळ राहतच नाहीं मुळीं. त्यामुळें अल्पवयांत कांहीं बालसंगोपनाची जबाबदारी त्यांच्या अंगावर पडत नाहीं. सासरीं राहायला गेल्यावर मग दोनएक वर्षांनं तिला मूल होतं.

नुकताच एक कायदा पास होऊन १५ वर्षांच्या आंतील मुलींना व १८ वर्षांच्या आंतील मुलांना लग्न करण्याची मनाई जाहीर केली आहे.

चौला मला सुंदर वाटलें. परिस्थितीच अशी होती कीं, जीवन अत्यंत साधं असणं अपरिहार्य होतं. आधुनिक समाजजीवनाचीं एकमेकांत गुंतलेलीं दात्यांचीं

चक्रं इथें फिरतांना दिसत नव्हतीं व ती धकाधक आणि गुंतागुंत अनावश्यक भासत होती. यामुळेंच कीं काय निसर्गाशीं आणि शेजाऱ्याशीं तेथील व्यक्ति अधिक सलगीनं, आपुलकीनं राहूं शकत होत्या, असं मला वाटलं. नित्याच्या व्यवहारांत शेजारीपाजारी, धरणीमाता, पर्जन्यराजा, मुके प्राणी यांवर अवलंबून राहावं लागत होतं आणि त्यामुळें हें वातावरण मला सौख्यपूर्ण वाटलं.

अगदीं ओबडधोबड बांधलेलीं मातीचीं घरं कशीं धरणींतूनच वर आल्यासारखीं वाटत. भाजलेले चिकणमातीचे माठ, लांकडी नांगर, हातमागाचा कपडा, सर्वंच निसर्गाचं आणि आपलं नातं एका तोंडवळ्यानं दाखवत—त्यांचं साधेपणा प्रकर्षानं जाणवत असे. याचसाठीं मला त्यांचं सौंदर्य हृदयस्पर्शी वाटे.

पाहुणी म्हणून मी चौलांत गेलें आणि तेथील सौंदर्य, सौहार्द, शांति यांचा पाहुणचार घेऊन आलें. पण मी तिथल्या खेड्यांतच जन्मलें असतें, निरक्षरच राहून वयानं वाढलें असतें, अवर्षणाच्या दिवसांत उपाशीपोटीं राहण्याची कडू चव चाखली असती, आणि वयांत आल्यावर माझं गांव सोडून शहरांत जाऊन तेथील सुखसोयी पाहिल्या असत्या, तर मात्र या ग्रामीण जीवनाबद्दल फक्त द्वेष आणि तीव्र असंतोषच माझ्या मनांत भरून राहिला असता.

मग त्या शांततेंतलं सौंदर्य मला स्पर्श करूं शकलं नसतं. उलट त्याखालीं असलेली नाहक दुःखाचे भारे सोसणारी सोशिकताच बोंचणी लावून गेली असती. मग कुठल्या तरी शहराच्या, खेडुताच्या स्वप्नांतहि येणार नाहींत अशा सुखसोयींच्या जीवनांत मी अडकून तरी पडलें असतें किंवा माझ्या माणसांना मदत करायला परत आलें असतें.

अनावश्यक रोगराई, आजार, उपासमार, निरक्षरता, अज्ञान हीं सारीं विरूपतेचीं भयानक रूपं आहेत. त्या विद्रूपतेनें मी कधीं पछाडलें गेलें नव्हतें म्हणून आणि याविरुद्ध चालू असणारे भीमप्रयत्न पाहूं शकत होतें म्हणूनच मी चौलामध्यें सौंदर्य पाहूं शकलें.

: ११ :

दिल्ली पब्लिक स्कूल मे महिन्याच्या मध्यावर उन्हाळ्याच्या सुटीसाठीं बंद झालं आणि मीं सुटकेचा निःश्वास टाकला. पुन्हा ऑगस्टमध्यें शाळा उघडली कीं जायचं नाहीं असा ठाम निश्चय केला. पण करायचं काय याचा मात्र कांहींच निर्णय घेतला नव्हता. दिल्ली हें माझं गांव मी मानूं लागलें होतें. या गांवाबाहेर मी राहिलें नव्हतें. त्यामुळें भारताचे इतर भाग मला परके, अनोळखी वाटत आणि कांहीं झालं तरी शिक्षणाला फांटा तरी किती दिवस द्यायचा हा प्रश्न होताच.

पश्चिम बंगालमध्यें कलकत्त्याच्या उत्तरेस १०० मैलांवर भारतीय संस्कृतीचा विशेष अभ्यास चालू ठेवणारं एक विद्यापीठ आहे ही बातमी मला समजली. विद्यार्थिनी म्हणून तेथें प्रवेश करण्याची खास परवानगी मला मिळाली तेव्हां मी फार आनंदून गेलें.

गुरुदेव टागोरांनीं या विद्यापीठाची स्थापना केली. त्याचं नांव आहे 'शांतिनिकेतन.' टागोर अव्वल दर्जाचे कलावंत होते, कवि होते, संगीतज्ञ होते, भाषाप्रभु होते. १९४१ सालीं त्यांचें निधन झालें. तोंपर्यंत शांतिनिकेतनच्या कार्याची दिशा तेच ठरवून देत. आपल्या आत्मवृत्तामधील 'माझी शाळा' (My School) या विभागांत ते म्हणतात, 'सर्व बालकांचीं संस्कारक्षम मनं मानव्याच्या, मानव आणि निसर्ग यांच्यांतील एकतानतेच्या जाणिवेनं ओसंडायला हवींत. नित्यचाकोरीच्या शिक्षणांत नेमकं हेंच वगळलं जातं. उच्च ज्ञानाच्या नांवाखालीं कंटाळवाणं, बोजड असलं कांहींतरी मुलांवर लादतात.

'या जगांत आपण येतों तें केवळ ज्ञानसाधनासाठीं नव्हे, तर या जगाशीं

चक्रं इथें फिरतांना दिसत नव्हतीं व ती धकाधक आणि गुंतागुंत अनावश्यक भासत होती. यामुळेंच कीं काय निसर्गाशीं आणि शेजाऱ्याशीं तेथील व्यक्ति अधिक सलगीनं, आपुलकीनं राहूं शकत होत्या, असं मला वाटलं. नित्याच्या व्यवहारांत शेजारीपाजारी, धरणीमाता, पर्जन्यराजा, मुके प्राणी यांवर अवलंबून राहावं लागत होतं आणि त्यामुळें हें वातावरण मला सौख्यपूर्ण वाटलं.

अगदीं ओबडधोबड बांधलेलीं मातीचीं घरं कशीं धरणींतूनच वर आल्यासारखीं वाटत. भाजलेले चिकणमातीचे माठ, लांकडी नांगर, हातमागाचा कपडा, सर्वच निसर्गाचं आणि आपलं नातं एका तोंडवळ्यानं दाखवत–त्यांचं साधेपणा प्रकर्षानं जाणवत असे. याचसाठीं मला त्यांचं सौंदर्य हृदयस्पर्शी वाटे.

पाहुणी म्हणून मी चौलांत गेलें आणि तेथील सौंदर्य, सौहार्द, शांति यांचा पाहुणचार घेऊन आलें. पण मी तिथल्या खेडयांतच जन्मलें असतें, निरक्षरच राहून वयानं वाढलें असतें, अवर्षणाच्या दिवसांत उपाशीपोटीं राहण्याची कडू चव चाखली असती, आणि वयांत आल्यावर माझं गांव सोडून शहरांत जाऊन तेथील सुखसोयी पाहिल्या असत्या, तर मात्र या ग्रामीण जीवनाबद्दल फक्त द्वेष आणि तीव्र असंतोषच माझ्या मनांत भरून राहिला असता.

मग त्या शांततेंतलं सौंदर्य मला स्पर्श करूं शकलं नसतं. उलट त्याखालीं असलेली नाहक दुःखाचे भारे सोसणारी सोशिकताच बोंचणी लावून गेली असती. मग कुठल्या तरी शहराच्या, खेडुताच्या स्वप्नांतहि येणार नाहींत अशा सुखसोयींच्या जीवनांत मी अडकून तरी पडलें असतें किंवा माझ्या माणसांना मदत करायला परत आलें असतें.

अनावश्यक रोगराई, आजार, उपासमार, निरक्षरता, अज्ञान हीं सारीं विरूपतेचीं भयानक रूपं आहेत. त्या विद्रूपतेनें मी कधीं पछाडलें गेलें नव्हतें म्हणून आणि याविरुद्ध चालू असणारे भीमप्रयत्न पाहूं शकत होतें म्हणूनच मी चौलामध्यें सौंदर्य पाहूं शकलें.

: ११ :

दिल्ली पब्लिक स्कूल मे महिन्याच्या मध्यावर उन्हाळ्याच्या सुटीसाठीं बंद झालं आणि मीं सुटकेचा निःश्वास टाकला. पुन्हा ऑगस्टमध्यें शाळा उघडली कीं जायचं नाहीं असा ठाम निश्चय केला. पण करायचं काय याचा मात्र कांहींच निर्णय घेतला नव्हता. दिल्ली हें माझं गांव मी मानूं लागलें होतें. या गांवाबाहेर मी राहिलें नव्हतें. त्यामुळें भारताचे इतर भाग मला परके, अनोळखी वाटत आणि कांहीं झालं तरी शिक्षणाला फांटा तरी किती दिवस द्यायचा हा प्रश्न होताच.

पश्चिम बंगालमध्यें कलकत्त्याच्या उत्तरेस १०० मैलांवर भारतीय संस्कृतीचा विशेष अभ्यास चालू ठेवणारं एक विद्यापीठ आहे ही बातमी मला समजली. विद्यार्थिनी म्हणून तेथें प्रवेश करण्याची खास परवानगी मला मिळाली तेव्हां मी फार आनंदून गेलें.

गुरुदेव टागोरांनीं या विद्यापीठाची स्थापना केली. त्याचं नांव आहे 'शांतिनिकेतन.' टागोर अव्वल दर्जाचे कलावंत होते, कवि होते, संगीतज्ञ होते, भाषाप्रभु होते. १९४१ सालीं त्यांचें निधन झालें. तोंपर्यंत शांतिनिकेतनच्या कार्याची दिशा तेच ठरवून देत. आपल्या आत्मवृत्तामधील 'माझी शाळा' (My School) या विभागांत ते म्हणतात, 'सर्व बालकांचीं संस्कारक्षम मनं मानव्याच्या, मानव आणि निसर्ग यांच्यांतील एकतानतेच्या जाणिवेनं ओसंडायला हवींत. नित्यचाकोरीच्या शिक्षणांत नेमकं हेंच वगळलं जातं. उच्च ज्ञानाच्या नांवाखालीं कंटाळवाणं, बोजड असलं कांहींतरी मुलांवर लादतात.

'या जगांत आपण येतों तें केवळ ज्ञानसाधनासाठीं नव्हे, तर या जगाशीं

मनानें समरस होऊन खऱ्या अर्थानं जगण्यासाठीं. ज्ञानानं एकांगी सामर्थ्य वाढेल कदाचित्. पण परिपूर्णता लाभण्यासाठीं सहसंवेदनाची गरज आहे. केवळ माहिती व आंकडेवारी यांवर भर न देतां आपल्या जीवनाचा सूर भोंवतींच्या जीवनसंगीतांत बेमालूम मिसळून टाकण्यासाठीं मार्गदर्शन करतं, तेंच उत्कृष्ट शिक्षण. या सुसंबद्ध सहसंवेदनापासून आपल्या शाळा कटाक्षानं दूर आहेत एवढंच नव्हे, तर अशा वृत्तींना त्या पद्धतशीरपणें, हेतुपूर्वक खुंटवून टाकतात. लहान मुलांना भूगोल शिकवायचा, पण धरणीमातेशीं त्यांचा संबंध तोडायचा. त्यांना व्याकरण शिकवायचं तें त्यांची भाषा त्यांच्यापासून हिरावून घेऊनच ! त्या लहान जीवांचं सारं व्यक्तिमत्त्व याविरुद्ध बंड करून उठत असतं. पण तो आवाज ऐकूं येण्यापूर्वींच शिक्षेची भीति घालून तो गोठवला जातो.'

पण ४१ सालापासून टागोरांच्या पश्चात् शांतिनिकेतन बदललं. सरकारी मदत घेणाऱ्या 'अधिकृत' विद्यापीठांमध्यें तें गणलें जाऊं लागलें. पण माझ्या मतें दुर्दैवानें त्याचं अनन्य रूप गेलं. भारतांत सर्वत्र असलेल्या ब्रिटिश पद्धतीच्या कॉलेजांच्या स्वरूपाकडे तें झुकूं लागलं. अर्थात् अजूनहि टागोरांचा वारसा तिथें बऱ्याच प्रमाणांत शाबूत आहे. आणि तेवढ्याचसाठीं मला तिथें कला आणि संगीत यांच्या शिक्षणासाठीं जावंसं वाटलं.

शांतिनिकेतनचं वर्ष जुलैच्या मध्यावर सुरू होतं. पण वक्तशीरपणाचं कुणालाच अगत्य दिसलं नाहीं आणि मीहि दिल्लींत रेंगाळत राहून कांहीं दिवस उशिरांच गेलें. दिल्ली सोडून जातांना कांहीं वेगळ्याच भावना मनांत उसळत होत्या. दिल्लींत मला न आवडणाऱ्या गोष्टी खूपच होत्या हें निःसंशय. पाश्चात्यांच्या अनुकरणाबरोबर सर्व गोष्टींवर कृत्रिमतेचा ठसा उमटलेला असायचा. कुठेंहि जा, प्राणिसंग्रहालयांत ठेवलेल्या 'चिजां'कडे बघतात तशा कुतूहलानं माणसं माझ्यावर नवख्या नजरा रोखायचीं हें मला आवडत नसे.

पण दिल्ली हें 'माझं गांव' झालं होतं. प्रिय गोष्टी होत्या, त्या सोडून जाणं जिवावर आलं. दिल्लीची गजबजलेली बाजारपेठ, हॉस्पिटलमधलीं माझीं मुलं, सुमन, शकूर, मित्रांसमान वाटणारे इतर नोकर आणि अर्थातच माझं घर, माझीं माणसं हें सारं सोडून दूर जायचं म्हणजे कांहीं सोपं नव्हतं. बोलपूर-

पर्यंतचा प्रवासच तब्बल २६ तासांचा होता. हें शांतिनिकेतनला सर्वांत जवळ असणारं रेल्वे स्टेशन.

आई मला पोंचवायला आली होती. सेकंड क्लासच्या दोन जागा आम्हीं रिझर्व केल्या होत्या. आमची गाडी कलकत्त्याच्या रोखानं मार्गक्रमण करूं लागली तशी मी सहप्रवाशांचं निरीक्षण करूं लागलें. (मला वाटतं, रेल्वेच्या डब्यांत प्रत्येकजणच इतरांचं निरीक्षण करीत असतो!) त्यामध्यें दोन कॉलेजकन्या होत्या. लखनौच्या लेडीज् कॉलेजमध्यें त्या निघाल्या होत्या. दोघीहि आनंदी, उत्साही आणि मनमिळाऊ होत्या. आपल्या काळ्याभोर केंसांच्या त्यांनीं दोन वेण्या घातल्या होत्या, आणि पांढऱ्या साड्या नेसल्या होत्या.

आणखी एक प्रौढ इंग्लिश बाई होती, ती कानपूरला निघाली होती. 'चहाच्या वेळेपर्यंत माझें स्टेशन येईल' असं तिनं आम्हांला सांगितलं.

याशिवाय एक लठ्ठशी उतारवयाची पंजाबी बाई आपल्या नातीबरोबर होती. ही लहान मुलगी अगदीं सडपातळ व स्वरूपवान् होती. त्या बाईचे केंस रूपेरी छटा दाखवीत होते. दिल्लींत आसरा घेऊन आपलं घर उभं करणाऱ्या अनेक निर्वासित कुटुंबांपैकींच त्याहि एक असाव्यात. त्या फारच कमी बोलत होत्या. सर्वांचाच बहुतेक वेळ झोंप काढण्यांत जात होता.

चहाच्या वेळेला आम्ही कानपूरला पोंचलों. ती इंग्लिश बाई आणि कॉलेजकन्या इथें उतरल्या. पंजाबी बायका अलाहाबादला उतरल्या. तोंवर तिन्हीसांजा टळून गेल्या होत्या. शेवटीं रात्रभर आम्ही दोघीच डब्यांत उरलों.

सकाळीं उठून पाहतों तों एका नव्याच भूप्रदेशांत आम्ही पोंचलों होतों. भातशेतीसाठीं प्रसिद्ध असलेली वंगभूमि हिरवी शाल घेऊन स्वागत करीत होती. घोटाभर पाणी असतांना शेतांत कांहीं नांगरटी चालल्या होत्या, तर कांहीं शेतांत आवणी चालू होती. दिल्लीच्या कोरड्या धुरकट जमिनीपेक्षां ही ओलसट हिरवी जमीन किती वेगळी वाटत होती.

स्टेशनांवर भाषा आणि लिपी दोन्हींत बदल झालेला दिसला. कोलगेट टूथपेस्ट, इंग्लिश कंपन्यांचीं बिस्किटं, भारतीय उत्पादनाचं सीमेंट, या आणि अशा नेहमींच्या जाहिराती बंगाली भाषेंत लावल्या होत्या. बंगाली लोक मृदु

आवाजांत स्वभावतःच गोड असणारी 'बंगाली' भाषा बोलतांना ऐकूं येत होतं.

लोकांचा पोशाखहि दिल्लीपेक्षां वेगळा. पुरुष धोतर नेसलेले, तर बायका पांचवार साड्या नेसलेल्या.

सकाळीं नऊदहाच्या सुमाराला आम्हीं बरद्वानला गाडी बदलली. पुन्हा नवीं माणसं, नवे चेहरे, नव्या गप्पा. पण झोंपेनं मला इतकं घेरलं होतं कीं इतर माणसांकडे लक्ष द्यायला वेळच राहिला नाहीं. जातांजातां नजर टाकली त्यावरून त्यांच्यापैकीं दोघंजण व्यापारी असावेत असा मीं कयास बांधला. एक नवपरिणीत जोडपंहि होतं. तांबडी लगीनसाडी नेसलेली, लक्ष्मीसारखी सजलेली वधू पतिराजांबरोबर लाजत मुरकत निघाली होती.

आम्ही बोलपूरला उतरून विद्यापीठांत पोंचेपर्यंत अगदीं जेवणाची वेळ झाली होती. जेवणानंतर थोड्याच वेळांत आई परत जायला निघाली आणि नंतर कलाशिक्षण घेणाऱ्या मुलींच्या वसतिगृहांतील माझ्या खोलींत मला जागा दाखवण्यांत आली. बहुतेक सर्व खोल्या दोन मुलींनीं राहण्यासाठीं बांधलेल्या होत्या. क्वचित् व्यक्तिशः स्वतंत्र खोल्याहि होत्या. मला दिलेली खोली दोघींची असली तरी ऑगस्टपर्यंत मी एकटीच होतें. माझी खोली तशी लहानच होती. दुसऱ्या मजल्यावरची हवेशीर खोली मला मिळाली होती. भिंतींना साधा पांढरा रंग होता आणि फरसबंदीवर गालिचा वगैरे कांहींच नव्हतं. टेबलासारखे दोन सखल पलंग, गाद्या, टेबलं, स्टूलं अशाच वस्तू दिल्या होत्या. एकंदर चार खिडक्या होत्या. दोन बाहेरच्या बाजूला उघडणाऱ्या, आणि दोन मधल्या हॉलमध्यें उघडणाऱ्या. यामुळें खोली चांगलीच हवेशीर बनली होती. तिथला दिवा फारच मंद होता. रात्रीं अभ्यास करण्यायोग्य तर नव्हताच नव्हता. एकंदरींत खोली साधी आणि प्रसन्न होती.

मीं सामानाची लावालाव सुरू केली. माझीं पुस्तकं, चित्रं, इतर सटरफटर वस्तू शेल्फ़ावर टाकल्या, पलंगावर अंथरूण पसरून एक चिवटयाबावटयाच्या डिझाईनची रंगबेरंगी चादर घातली, आणि कपडे बॅगमध्यें व्यवस्थित लावले, तेव्हांच या खोलीला 'माझी खोली' म्हणायला सुरुवात झाली आणि या खोलींत राहणं मला आवडणार हें मला तेव्हांच कळून चुकलं.

त्यानंतर दोनच दिवसांनंतरची गोष्ट. मी टेबलापाशीं अभ्यास करीत बसलें होतें. तेवढ्यांत छपरावर कसला तरी धप्पकन् आवाज झाला. मान वर करून पाहतें तों एक केंसाळ पंजा खिडकींत दिसला आणि एक भलं मोठं माकड उडी मारून खिडकीच्या चौकटीला धरून बसलं. तेथून माझं, माझ्या खोलीचं त्यानं निरीक्षण आरंभलं. थोडयाच वेळांत तें आलं तसं टुणकन् उडी मारून नाहींसं झालं. त्या माकडाची ही भेट सर्व मुलींना परिचयाची होती. एखाद्या तपासणी अधिकाऱ्याप्रमाणें तें फिरत असे. त्याच्या कसोटीला मी उतरलें असेन आणि माझ्या गबाळपणाची वाच्यता करायची पाळी त्याच्यावर येणार नाहीं, अशी मी आशा करीत राहिलें.

इतरहि प्राणिसृष्टीचे सभासद खोलींत येत. पक्षी, सरडे, पाली, कुत्रीं, हर तऱ्हेचे किडे भेटी देत. एका मैनेनं भिंतींतल्या एका कोनाडयांत घर बांधलं आणि अनेकदां तिथें येऊन बसूं लागली. मी खोलींत नसतांना शोधायला तिथें कावळेहि येत असले पाहिजेत. रात्रींच्या वेळीं पाली यायच्या. हर तऱ्हेचे किडे हें तर त्यांचं भक्ष्य. पण मला चुकवण्यासाठीं पालीची आणि पालीला चुकवण्यासाठीं माझी सारखी धडपड चालू असे. अगदीं काळजीपूर्वक आम्ही एकमेकींना टाळीत असूं !

कुत्रीं केव्हांहि हिंडत असायचीं. बेवारशी असायचीं बहुतेक. आमच्या भोजनगृहांतलं अन्न पळवून तीं अगदीं मालकाच्या घरच्या पेक्षां चांगलीं पोसलीं होतीं. माझ्या खोलीच्या खालीं लागूनच गाईंचे गोठे, कोंबडयांचीं खुराडीं वगैरे होतं. एवढीशीं पिलं आईच्या मागें निश्चिंतपणें आवारभर हिंडत असायचीं.

शांतिनिकेतनमधल्या जीवनाशीं मी चटकन् मिळतं घेतलं. सारा वेळ बांधलेला असायचा. हॉस्टेलमधल्या मुलींची बडबड आणि गाणें कानांवर येऊं लागलें कीं पांचच्या सुमाराला मलाहि जाग यायची. पहांटवारा वाहत असायचा आणि झुंजुमुंजु झालेलं असायचं.

सहा वाजतां सकाळची न्याहरी असे. जेवणघर खूप मोठ होतं. बुटकीं टेबलं आणि अरुंद बांकं आम्हांला बसण्यासाठीं ठेवलेलीं होतीं. चहा किंवा कोकोबरोबर लोणीसाखर लावलेली ब्रेड किंवा पुऱ्या (म्हणजे पोळीचाच फुगवलेला प्रकार) आणि रस्सा घेत असूं.

त्यानंतर प्रार्थना असायची. सर्वजण एकत्र जमून एक लहानसं प्रार्थनागीत म्हणत. दर आठवड्याला प्रार्थना सुरू करण्याची पाळी बदलत असे. प्रार्थना मूक असायची. रवींद्रांनीं केलेलीं गीतं ऐकतांना मला कांहीं अमेरिकन लोकगीतांची आठवण होत असे.

सकाळच्या वेळीं साधारणपणें दोन किंवा तीन तास असायचे. साडेअकराच्या सुमारास जेवणाची वेळ. त्यावेळीं जेवणाच्या हॉलचे चार भाग केलेले असत. शाकाहारी मुलामुलींचे दोन आणि मांसाहारी मुलांमुलींचे दोन. मांसाहारी विद्यार्थ्यांची संख्या पुष्कळच जास्त असे, कारण बहुसंख्य विद्यार्थी बंगाली होते. बंगाली लोकांत शाकाहाराचं प्रमाण अगदीं कमी आहे. जेवणांत भात व मासे हें प्रमुख अन्न असतं. मी नेहमीं शाकाहारी जेवण घेत असें. एसेक्समध्यें आमच्या घरीं एक गाय, कांहीं कोंबड्या, डुकरं वगैरे प्राणी पाळलेले होते. त्यांना पोसण्याचं काम मला फार आवडायचं आणि त्यांचा अगदीं लळा लागून जायचा. मग मांसाहारी पदार्थ घशाखालीं उतरत नसत. आमच्या जेवणांत इतकं मांसाचं स्तोम असावं याचा मला खेद होई. अर्थात् भोंवतालीं सर्वच मांसाहारी असतांना तें टाळणं किंवा सोडणं शक्य झालं असतं असं मला वाटत नाहीं. पण भारतांत शाकाहार सर्वमान्य असल्यामुळें माझ्या जुन्या संवयी लौकर मोडतां आल्या.

चपाती किंवा भात असा आम्हांला पर्याय ठेवलेला होता. पंजाबी आणि इतर उत्तर हिंदुस्थानी लोक चपातीचे चाहते तर दक्षिणी लोक भातखाऊ. तोंडीलावण्यांपैकीं बटाट्याचा रस्सा, एक पालेभाजी, वरण आणि दहींसाखर एवढे प्रकार असत. दहीं मला फारच आवडत असे. कितीहि घेतलं तरी आतां पुरे असं वाटलंच नाहीं कधीं. मोसमाप्रमाणें विशिष्ट भाज्याच वर्षभरांत मिळत. स्वस्त झाली कीं आठवडेच्या आठवडे एकच भाजी. टोमॅटो, कांदे, फ्लॉवर, वांगीं, भोपळा वगैरे, आणि बटाटे तर बारा महिने तेरा काळ. तिथल्या जेवणाला घरच्या जेवणाच्या तुलनेनं मुली नांवं ठेवत, पण मला तें जेवण फार आवडत असे.

जेवणानंतर विश्रांति अन् अभ्यास यांसाठीं दोनतीन तास वेळ असे. बऱ्याच जणींप्रमाणें मीहि या वेळांत झोंपच काढीत असें. कसंबसं दुपारच्या

तासाला जाण्यासाठीं उठायचं ! मग दुपारचे तास खूप उशिरापर्यंत असायचे. वर्ग संपले कीं दोन तास खेळांसाठीं असत. या वेळांत कांहींजणी खेळायच्या, कांहींजणी स्टोअर्समध्यें जायच्या तर कांहींजणी फिरायला जायच्या. कांहीं कंपू हॉटेलच्या पायरीवरच गप्पा छाटीत बसलेले दिसायचे. संध्याकाळच्या वेळीं पश्चिमेला आकाशांत नारिंगी रंगाचा शिडकावा दिसायचा. त्या वेळीं मैत्रिणीं-बरोबर फिरायला जाणं हा माझा एक आवडता कार्यक्रम होता. खेळांना सुद्धां मजा यायची. आम्ही नेट बॉल, रिंग, थ्रोबॉल वगैरे खेळ खेळत असूं.

७ वाजतां वसतिगृहांत हजेरीसाठीं परत यावं लागे. नंतरचा वेळ नृत्य, वादन वगैरे शिकण्यांत किंवा व्याख्यानं, सभा, परिसंवाद वगैरे कार्यक्रमांत व्यतीत होत असे. रात्रीचं जेवण ८॥ ला असे. गप्पा, गाणीं, आरडाओरडा अन् दंगा हीं मला वाटतं सर्वच वसतिगृहांचीं वैशिष्ट्यं आहेतः त्यांतहि मुली म्हटल्या कीं आणखीच. तेव्हा यांचा कल्लोळ संपला कीं मग झोंप. पण एकंदरींत आम्ही लवकर झोंपत असूं.

बुधवार हा शांतिनिकेतनचा सुटीचा दिवस. तो दिवस आम्हाला पूर्णपणें मोकळा असे. काय असेल तें असो, पण शांतिनिकेतनचा बुधवार म्हटलं कीं निरभ्र आकाश, तळपता सूर्य अन् सारा दिवस आरामांत घालवणारी मी असंच स्मृतिचित्र माझ्या मनांत उभं राहतं. कपडे, चादरी वगैरे धुण्याचं तर मला व्यसनच जडलं होतं. स्वच्छ धुतलेल्या कपड्यांचा ताजा ताजा वास अन् ते हिरवळीनें आच्छादलेल्या अंगणांत वाळत घालतांना पाठीवर येणारं चटकतं ऊन मला अतिशय आवडायचं !

आठवडाभर लांबणीवर टाकलेल्या, अळंटळं केलेल्या गोष्टीहि बुधवारीं उरकतां येत. अभ्यासाखेरीज इतर वाचन करायला वेळ असायचा. माझी नवी मैत्रीण विजया कांहीं वेळां माझ्या हट्टापुढें मान तुकवून मला बंगाली शिकवत असे, तर कांहीं वेळां तिच्या नादानं मी वनभोजन, सहली वगैरेमध्यें भाग घेत असें. हें सारें करायचाहि आळस आला तर झोंपेचा कार्यक्रम होताच. नाहीं तरी आठवडाभर झोंपेकडे दुर्लक्षच झालेलं असायचं.

दर बुधवारीं सकाळीं एक सर्व धर्मांची प्रार्थना असे. सर्व विद्यार्थ्यांनीं त्यासाठीं हजर राहावं अशी अपेक्षा होती. पुष्कळ वेळां प्रार्थनागृहांत पोंचेपर्यंत चांगलीच

गर्दी झालेली असे आणि मुलं पायऱ्यांवर दाटीनं बसलेलीं दिसत. प्रार्थनागृहाच्या इमारतीचा आकार चौरस होता. चारी भिंती प्रशस्त जागा राखून, मोठे दरवाजे ठेवून बांधलेल्या होत्या. खिडक्यांना रंगीत कांचा बसवलेल्या होत्या. प्रार्थनेमध्यें पठण, गायन आणि प्रवचन असे भाग असत. सर्व प्रार्थना बंगालींत होई. हें सारं समजण्याइतकं बंगाली मला कधींच समजलं नाहीं. त्यामुळें मी नेहमीं बाहेरच्या पायऱ्यांवरच जागा पसंत करायची. तेथून मला पोस्ट ऑफिस, शांतिनिकेतनच्या आवारांतली झाडी, रस्त्यावरची बेताचीच रहदारी, हें सारं छान दिसायचं अन् शांतपणें मनन करतां यायचं.

पुष्कळदां शांतिनिकेतनचं आवार पाहिलं कीं मला वाटायचं कीं, तसं पाहिलं तर हें कांहीं रम्य स्थान नाहीं. तिथल्या इमारतींमुळें त्या जागेच्या सौंदर्याला बाध येई असं मला वाटे. बहुतेक इमारती बैठ्या नाहींतर दुमजली विटांच्या बांधणीच्या असत आणि वास्तुकलेचं सौंदर्य बेताबाताचंच असे. या इमारती म्हणजे वसतिगृह, कचेऱ्या, ग्रंथालय, वस्तुसंग्रहालय, भांडार, प्रेक्षागृह आणि विद्यापीठाचे निरनिराळे भाग, चित्रकलेचा विभाग, संगीत विद्यालय, चीनचा सांस्कृतिक अभ्यास करणारं महाविद्यालय, हिंदीचं महाविद्यालय आणि पदव्युत्तर शिक्षणाचा विभाग या सर्वांसाटीं बांधलेल्या होत्या.

पण तें वातावरण अतिशय प्रशांत असे आणि एक प्रकारची विश्रब्धता आसमंतांत नांदत असे. आवारांतील पटांगणं चांगलीं विस्तृत होतीं. दिल्लीच्या मानानं झाडी बरीच होती. हिरव्यागार भातशेतांमध्यें एखाद्या बेटासारखं शांतिनिकेतन दिसतं. त्याचं आवार सोडून बाहेर यायचा अवकाश, कीं लगेच आपण उच्चशिक्षणानं आणि ज्ञानानं भारलेल्या वातावरणांतून एकदम एका साध्यासुध्या खेड्यांत पोंचतों.

कांहीं कांहीं वेळां आम्ही संध्याकाळीं शेतांच्या बांधांवरून फिरायला जात असूं. कांहीं शेतं मैलोन् मैल पसरलेलीं असायचीं आणि असीमतेचा स्पर्श मनाला होऊन जायचा. त्यांतच खऱ्या सौंदर्याचं दर्शन घडत असे.

टागोरांचं या जागेवर अपार प्रेम होतं. ते म्हणतात, "या शांतिनिकेतन आश्रमाच्या चोहोंबाजूस दृष्टि पोंचेल तेथवर क्षितिजाचेच विस्तार दिसतात. नजरेची झेंप अडवायला कांहींच उभं नसतं. फक्त धरणीमाता आपल्या

अंगाखांद्यावर झाडाझुडुपांच्या बाळांना खेळवत असलेली दिसते. खुरट्या झाडांचे बुंधे, रानटीं झुडुपं, वारुळं—सारं तिच्या मांडीवर शोभून दिसतं. या एकाकी प्रदेशांत मानवाच्या वास्तव्याची खूण दिसायची ती तांवडमातीच्या वळणा-वळणाने जाणाऱ्या रस्त्याची. दूरवर दिसणाऱ्या खेड्याकडे ही वाट जाते. या रस्त्यानं बोलपुरच्या बाजाराला येणारे खेडूत जा ये करतात, संथालांच्या मुली गवताचे भारे डोईवर घेऊन लगबगीनं बाजाराची वाट चालतांना दिसतात आणि माल वाहणाऱ्या बैलगाड्यांची खूण म्हणून बैलांच्या खुरांनीं उठलेली धूळ दुपारच्या स्तब्ध उन्हांत बराच वेळ तरळत राहिल्याचा भास होतो. दुरून पाहिलं तर या ओसाड एकाकी माळावर उंच सालवृक्षांच्या रांगा दिसतात आणि पाहणाऱ्या वाटसराला, मंदिराचा कळस आणि एका दुमजली इमारतीच्या छपराचा भाग वृक्षांच्या गर्द पालवीआडून डोकावतांना दिसतो. या ठिकाणीं—आंबा, आवळी, साल, महुया यांच्या घनदाट छायेंत माझं शांतिनिकेतन आहे."

टागोरांच्या मनीषेप्रमाणें आम्ही छात्रगण खरोखरच निसर्गसन्निध होतों. पण शांतिनिकेतनच्या आयुष्याशीं जसा परिचय वाढत गेला, तसं माझ्या लक्षांत आलं कीं विद्यार्थी आणि बाहेरच्या जगांत त्यांच्या भंवतालीं राहणारी जनता यांच्यांत जो दुरावा सर्वच विद्यापीठांमधून आढळतो, तोच इथेंहि दिसत होता.

शांतिनिकेतन साक्षात् नंदनवनच भासे. सर्वांना पुरेसं अन्न, स्वच्छ टापटिपीची निवाऱ्याची जागा होती, उरापोटीं कष्ट नव्हते, पुढल्या वेळच्या घांसाची चिंता नव्हती. इथें यायला मिळालं हें भाग्यच वाटे मला. केव्हांहि यावं आणि शांतिनिकेतनच्या कुशींत शिरून सुरक्षित राहावं. पण आवारा-बाहेर ज्या जगानं आम्हांला वेढलं होतं, त्या लोकांच्यांत आणि आमच्यांत जमीनअस्मानाचा फरक होता. त्यांच्या परिश्रमांना मर्यादा कशी ती नव्हती. आमच्यांतील कांहीं जणांप्रमाणें अर्धवट उष्टावून पानावरून उठून जाणं त्यांना शक्य नव्हतं. या विरोधानं मला अस्वस्थ वाटे. ज्यांना या सुखाची चव कधींच चाखतां येत नाहीं अशांच्या मध्यें राहून, त्यांची उपेक्षा करून, आपला सुखाचा वांटा मात्र हंसत भोगणं हें मनांत शल्याप्रमाणं बोंचत राही.

# :१२:

प्रार्थनामंदिराच्या पायरीवर बसल्याबसल्या किंवा आसमंतांत फिरतांना मनांत आकार घेणाऱ्या या विचारांचा माझ्या शिक्षणांत फार मोठा वांटा होता. याच्याच बरोबरीनं, किंबहुना अधिकच महत्त्वाचा भाग शांतिनिकेतनच्या प्रत्यक्ष अभ्यासवर्गांत आणि कलावर्गांमध्यें घेतलेल्या शिक्षणाचा होता. मी खास विद्यार्थिनी असल्यानें कॉलेजबरोबरच मी कला आणि संगीत यांच्या शिक्षण-वर्गांचाहि लाभ घेऊं शकत असें.

कलाभवनांत मी फक्त भरतकामाच्या वर्गांत जात असें. या विभागांत शिकवल्या जाणाऱ्या अनेक हस्तकौशल्यांपैकीं हें एक. तेथें विणकाम, चाम-ड्यावरचं नक्षीकाम, 'बाटीक' ही कापड रंगवण्याची पद्धत, इत्यादि इतर भाग होते. भारतीय चित्रकला, सजावटीचं नक्षीकाम व शिल्प यांवर विशेष लक्ष दिलं जाई.

भरतकामाचा वर्ग आठवड्यांतून दोन दिवस असे. एका दिवशीं दोन तास. आमच्या वर्गांत फार मजा यायची. आम्ही पांचसहाजणी एकाच माळेच्या मणी होतों. सगळ्याच नवशिक्या आणि अनभिज्ञ ! आमच्या वर्गाची खोली लहानशीच होती. आम्ही खालीं बसून आमचं काम आरामांत करीत असूं. वारांबिराहि छान खेळायचा. या कामामुळें शीण येण्याऐवजीं नाहींसा व्हायलाच मदत होई. आमच्यापैकीं प्रत्येकीला पांढऱ्या कापडाचा मोठा चौकोनी तुकडा दिला होता नमुने विणण्याचं काम करण्यासाठीं. शिक्षिकेची मदत घेऊन आम्हीं त्यावर रंगीबेरंगी टाक्यांची चित्रविचित्र नक्षी काढायची. मी शांतिनिकेतन सोडलं तेव्हां मला पोलकीं, अभ्रे, टेबलक्लॉथ वगैरे भरतां

यायला लागलं होतं. अन् मुख्य म्हणजे दुसऱ्यांना शिकवतां येतील एवढे टांस्यांचे प्रकार यायला लागले.

संगीतभवनांत मला दोन वर्ग असत. तबला आणि कथाकली नृत्य. तबला हें तालवाद्य आहे. तबला म्हणजे दोन चर्मवाद्यें असतात. एक वरच्या पट्टींत स्पष्ट बोल उठवणारा 'तबला' व दुसरा मंद्र स्वरांत बोल घुमवणारा 'डग्गा.' तबला स्वतंत्रपणें वाजवत असले, तरी कुठल्याहि तालवाद्याप्रमाणें त्याचं मुख्य प्रयोजन साथ करणं हेंच.

मला ताल आणि चर्मवाद्याचा आवाज यांची मनापासून आवड होती; आणि भारतीय वाद्यांपैकीं तबलाच मला सर्वांत सोपा वाटला—ह्या दोन कारणांसाठीं मीं तबला शिकायला सुरुवात केली होती. त्याचा पहिल्या नवाईचा आनंद मावळल्यावर मला कळून चुकलं कीं कधींकाळीं यामध्यें प्रावीण्य संपादन करायचं असेल तर चांगली तपस्याच करायला हवी!

आमचे शिक्षक बंगाली होते. ते खूप उंच, आकर्षक व्यक्तिमत्वाचे होते. त्यांचीं बोटं तबला वाजविण्यासाठींच निर्माण केल्यासारखीं वाटत. लांब, निमुळतीं पण दमदार. वादनपटुत्वाबाबत बोलण्याचा माझा अधिकार नसला, तरी ते माझ्या मतें फार सुंदर वाजवीत.

आम्हांला शिकवतांशिकवतां जेव्हां ते स्वतःच्याच नादांत वाजवत राहत, तेव्हां मी अगदीं रंगून जायची. डोळे मिटून माना डोलावीत आणि पायानें ताल धरीत त्यांचं वादन चालायचं. त्यांचा तबला ऐकणं आणि त्यांना तबला वाजवतांना पाहणं याचा मला कधींच कंटाळा आला नाहीं.

आठवड्यांतून तीन दिवस एक एक तास तबला असे. संगीत भवनाच्या एका दालनांत आम्हीं जमिनीवर बसत असूं. आमच्या वर्गांत चारपांच मुलं आणि दोनतीन मुली होत्या.

संगीत भवनांतच दुसऱ्या दालनांत कथाकलीचा वर्ग असे. शांतिनिकेतनमध्यें भारतीय नृत्यप्रकारांपैकीं दोन प्रमुख प्रकारांचं शिक्षण दिलं जातं; कथाकली आणि मणिपुरी. कथाकली हा प्रकार द्रुतगति, आवेशपूर्ण, तालप्रधान आणि अभिनयानं नटलेला. हा मूळ दाक्षिणात्य कथा–नाट्यनृत्याचा प्रकार आहे.

मणिपुरी हा प्रकार ईशान्य भारतांतील. आवेश नसला तरी डौलदार, ओघवत्या गुंफणीच्या हालचाली हें त्याचं वैशिष्ट्य.

दोन्ही नृत्यपद्धति मुद्रा आणि अभिनय यांच्या आधारावर उभ्या आहेत.

'अंतर्यामांतील भाव शारीरिक हालचालींच्या माध्यमांतून प्रकट करणं म्हणजे नृत्य' अशी व्याख्या प्रेमकुमार या प्रसिद्ध सिलोनी नर्तकानं मांडली आहे. श्री. प्रेमकुमार यांच्या पत्नीशीं माझा चांगला परिचय होता. त्या कलाभवनच्या विद्यार्थिनी होत्या. प्रेमकुमारांनीं भावाविष्काराचे दोन प्रकार सांगितले; ते म्हणजे चेहऱ्याच्या हाल्चालींनीं भावदर्शन घडविणारा अभिनय आणि हात आणि बोटं यांच्या संकेतचिन्हांनीं अभिव्यक्त होणाऱ्या मुद्रा. या दोन्हीशिवाय नृत्य म्हणजे अर्थहीन धांगडधिंगा.

मुद्रांचे अर्थ समजले नाहींत तरी भारतीय नृत्य, त्यांतहि कथाकली—भान हरपवून टाकणारं असतं. कितीतरी वेळां स्वतःचे पाठ शिकून तालीम करण्या-ऐवजीं इतर वर्गच मी पाहत बसायची.

मी कथाकली निवडलं तें त्याच्या तालबद्ध आवेशासाठीं. आमचे शिक्षक दक्षिणी होते. त्यांच्या नृत्यांत कौशल्य आणि सौंदर्य यांचा सुरेख संगम आढळत असे. त्यांचा निर्दोषतेवर विशेष भर असायचा आणि प्रत्येक हाल्चाल सर्वांगसुंदर झालीच पाहिजे हा त्यांचा आग्रह होता. मला दिवसाकांठीं मेहनतीसाठीं पुरेसा वेळ नसे, आणि माझी अवस्था पाहून ते अगदीं कातावून जात.

वर्गांत आणखी तीन मुली होत्या. आमच्या शिक्षणाची सुरुवात एका सुंदर पूजानृत्यानं झाली. सर्वत्र आवाज दुमदुमून टाकणारं खोळ हें वाद्य आम्हांला साथीला असे. पदन्यास व बोल हे कसे अगदीं एकमेकांच्या हातांत हात घालून येतात. तबल्याप्रमाणेंच खोळाच्या प्रत्येक बोलाला स्वतंत्र एकाक्षरी नाम आहे. ति, रि, की, वगैरे. नृत्याचे बोल आम्हांला पाठ करावे लागत.

जवळजवळ एका महिन्यानंतर आम्हीं मुद्रा म्हणजे हाताच्या आणि बोटाच्या हालचाली शिकायला सुरुवात केली. मुळांत चोवीस मुद्रा आहेत. पण त्यांचे अर्थ मात्र दोनापासून तिसापर्यंत असतात! आतां 'पताका' ही पहिली मुद्रा. पण एकीच्याच निरनिराळ्या प्रकारांनीं सिंह, राजा, सूर्य, हत्ती एवढं सगळंच

दाखवतां यायचं. हें शिकणं कांहीं सोपं नाहीं! पुढें पाठ आणि मागें सपाट हा माझा क्रम! पण उत्तम नर्तकांना शेंकडों प्रकार लक्षांत ठेवावे लागतात.

माझा उरलेला वेळ कॉलेजमध्येंच जात असे. भारतीय इतिहास, रवींद्र-साहित्य, नागरिकशास्त्र, वनस्पतिशास्त्र या नेहमींच्या विषयांखेरीज भारतीय कलेचा इतिहास आणि बंगाली हे विषयहि कांहीं काळ मीं घेतले होते.

भारतीय इतिहास मला फार आवडत असे. आमच्या शिक्षकांचा या क्षेत्रांतील अधिकार मोठा होता, आणि मुलांनीं जिज्ञासा जागरूक ठेवावी असं त्यांना कळकळीनं वाटे. आमच्या शंकांना, प्रश्नांना, तास संपल्यावर संपूर्ण उत्तरं द्यायला ते सदैव तयार असत. इतर कांहीं प्राध्यापकांप्रमाणें त्यांचा त्यांना कंटाळा वाटत नसे.

इतिहासाच्या अध्ययनाची पूर्वतयारी म्हणून त्यांनीं कांहीं विषयांवर व्याख्यानं दिलीं—भारतांतील इतिहासलेखनाबद्दलचं औदासीन्य, इतिहासाचीं साधनं, भारताची भौगोलिक परिस्थिति—या प्रदीर्घ पूर्वतयारीमुळें अभ्यासाची पार्श्वभूमि तयार झाली. त्यनंतर त्यांनीं खिस्तपूर्व २५०० पासूनचा भारताचा राजकीय आणि सांस्कृतिक इतिहास शिकवला. मोहेंजोदारोजवळील अवशेषांतून सांपडलेल्या सिंधू संस्कृतीपासून (खि. पू. २५००) भारतीय इतिहासाला सुरुवात झाली असें मानण्यांत येतें. हा भाग सध्यां पश्चिम पाकिस्तानांत येतो.

दिल्ली पब्लिक स्कूलमधील तासांप्रमाणेंच इतिहासावर फक्त व्याख्यानं होत. चर्चा, प्रश्नोपप्रश्न यांना वाव नसे. आम्ही टिपणं घेऊन आधार व संदर्भ यांच्या सूचि लिहून घेत असूं.

भारतीय इतिहास, राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र यांचे तास झाडाखालीं होत. विद्यार्थी अर्धवर्तुळांत व समोर शिक्षक अशा मांडणीनें आम्ही चटयांवर बसत होतों. उन्हाळ्याच्या दिवसांतली वाऱ्याची झुळूक, थंडीमधलं ऊन आणि पानांची सळसळ आणि पक्ष्यांची किलबिल हें सारें अनुभवतांना मला फार आनंद व्हायचा.

भारतीय इतिहासाखालोखाल मला रवींद्रसाहित्याचा तास अतिशय आवडे. या वर्गांत बंगाली मुलं थोडीं असत. बहुसंख्या इतरांचीच असे. आमच्या

शिक्षकांनीं रवींद्रनाथांच्या साहित्याचा सखोल अभ्यास केला होता. इंग्रजींत मूळांतच लिहिलेलं किंवा भाषांतर झालेलं रवींद्रसाहित्य एकूण संभाराच्या पांच टक्के सुद्धां नाहीं असं ते म्हणत. त्यामुळें ज्यांना खरा अभ्यास करायचा असेल, त्यांनीं बंगाली शिकलं पाहिजे असं त्यांचं मत होतं. पण मी शांतिनिकेतन सोडलं तोंवर माझ्या बंगालीची प्रगति साध्यासाध्या कविता वाचण्यासमजण्या-पुरतीच होती !

आमचे शिक्षक बंगाली काव्य वाचून दाखवत. अत्यंत नादमधुर, लयबद्ध आणि मंजुळ. बंगाली काव्याचीं इंग्रजीमधलीं कांहीं भाषांतरंहि सुंदर आहेत असं [काव्याची विशेष भक्ति नसूनहि] मला वाटतं.

The fire of April leaps from forest to forest,
Flashing up in leaves and flowers
from all nooks & corners.
The sky is thriftless with colours,
The air delirious with song.
The wind tost branches of the woodland
Spread their unrest in our blood.
The air is filled with bewilderment of mirth,
And the breeze rushes from flower to
flower, asking their names.

[चैत्राचं चैतन्य रानावनांतून संचार करूं लागतं, कोनाकोंपऱ्यांतल्या पानाफुलां-तून डोकावून बघत राहतं. आभाळांत रंगाची उधळमाधळ चालते, वातावरण गीतांनीं धुंदकारतं. वाऱ्याच्या खोड्यांनीं बेजार झालेल्या वृक्षराजीची खळबळ माझ्या रक्तांत सळसळते. आनंदाच्या लाटेंत हवेचं देहभान हरपतं आणि वेडी झुळुक तर प्रत्येक फुलाला नांव विचारीत फिरत असते.]

रवींद्रसाहित्याच्या वर्गात फारच थोडीं मुलं होतीं. एक पंजाबी मुलगी, एक अमेरिकन मुलगा, एक सिलोनी मुलगा, एक दक्षिणी, 'ओकेलो' नांवाचा केनियांतील मुलगा आणि मी. हा आमचा वर्ग दुपारीं असायचा.

आमच्यापैकीं बहुतेकांना त्यानंतर वर्ग नसायचा, त्यामुळें आम्ही तासन् तास गप्पा मारीत कुठल्या कुठें वाहवत जायचे. या वर्गात खरी अनौपचारि-

कता होती. आम्ही आमचे पाठ आळीपाळीनं वाचून प्रश्नोत्तरं आणि चर्चा असा तासाचा कार्यक्रम आंखत असूं. कॉलेजचं कार्यालय, वाचनालय वगैरे ज्या इमारतींत होतं त्या जुनाट इमारतीच्या पोर्चमध्यें हा वर्ग भरायचा. तेथून हांकेच्या अंतरावर एक चहाचं छोटं हॉटेल होतं. तासानंतरच्या गप्पा सुरू झाल्या कीं, आम्ही त्या हॉटेलांतून चहा मागवायचे. कधीं गप्पा लांबल्या कीं पुन्हा एकदां चहाची ऑर्डर सुटायची.

आमचे शिक्षक 'अशोकदा' फार सहृदय आणि प्रसन्नमुख होते. फावल्या वेळांत ते मला कांहीं कविता आणि उतारे नीट समजावून सांगत. मी तेथून निघालें तेव्हां वर्गांतील सर्वांनीं मला दोन बंगाली आणि एक इंग्रजी अशीं टागोरांचीं तीन पुस्तकं भेट दिलीं, तेव्हां मला फार आनंद झाला.

माझे बाकीचे वर्ग म्हणजे वनस्पतिशास्त्र, अर्थशास्त्र व राज्यशास्त्र. हे तास जगांतल्या इतर सर्व विद्यापीठांप्रमाणेंच इथें असत. वनस्पतिशास्त्राचा वर्ग आठवड्याला चारपांच वेळां असे. प्रयोगशाळा सुसज्ज असे. पण या वर्गांतील वीसबावीस मुलं प्रथम वर्षाचीं असत, त्यांना इंग्रजींत विषय समजावून घेणं जड जात असे. मग शिक्षकांना बंगालीच माध्यम म्हणून वापरावी लागे. तोच प्रकार अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र या विषयांचा. पण अभ्यासाचीं पुस्तकं इंग्रजींत असल्यानं फारसा त्रास होत नसे. भारतीय भाषांत या क्षेत्रांमधील पुस्तकं फार थोडीं प्रसिद्ध झालेलीं आहेत.

आमच्या अर्थशास्त्राच्या प्राध्यापकांशीं माझा नेहमीं वाद व्हायचा. अमेरिकेला ते भांडवलशाही राष्ट्र म्हणत आणि पूर्वग्रहदूषित शब्दांत भांडवलशाहीचं वर्णन करीत. तें असं :

१. खाजगी मालमत्ता असते.

२. उत्पादन केवळ नफ्यासाठींच असतं.

३. कुठलंहि खेडं स्वयंपूर्ण नसतं.

४. कमालीची आर्थिक विषमता असते आणि समाजांत मूठभर श्रीमंत आणि बहुसंख्य दरिद्री असतात.

५. भांडवलदारच उत्पादनाचा काळ, पद्धति व प्रकार ठरवतात.

शिवाय आमच्या पुस्तकांत लिहिलं होतं, "भांडवलशाहीच्या दुष्परिणामांमुळेंच

रशियांत तिला उलथून श्रमिकांनीं राज्ययंत्रणा आपल्या हातीं घेऊन समाजवादी उत्पादनपद्धति प्रस्थापित केली आहे. त्यांत मजूर म्हणजे मोलानं लावलेला मिंधा मनुष्य नसून सरकारी नोकर असतो. उत्पादनाचीं साधनं सरकारी मालकीचीं असून उत्पादनयंत्रणा नियोजित आराखड्यांप्रमाणें राबवली जाते. उत्पादनाची सुयोग्य वांटणी होऊन अगदीं तळापासून समता राखली जाते."

एक दिवस रात्रीं आमच्या प्राध्यापकांनीं विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना अमेरिकेंतील अर्थव्यवस्थेवर व्याख्यान दिलं. अर्थात् तें पूर्वग्रहदूषित होतं हें उघड उघड दिसण्यासारखं होतं. मात्र सुदैवानं नंतर चर्चा झाली त्यांत हजर असलेल्या अमेरिकन मुलांनीं व्याख्यानांतील अपसमज दाखवून दिले.

अमेरिकाविरोधी वृत्तींशीं मला शांतिनिकेतनमध्यें क्वचितच सामना करावा लागला. पण भारतीय विद्यापीठांतील विद्यार्थ्यांशीं बाबांचे जे संबंध होते, त्यांच्याकडून त्यांना अमेरिकेच्या आर्थिक घडणीबद्दल आणि परराष्ट्रीय धोरणाबद्दल बरीच साशंकता इथें आहे, हें कळत असे.

पाश्चात्यांच्या वसाहतवादाचा कटु अनुभव दीर्घकाळ घेतल्यावर अशा शंकाकुशंका येणें हें अगदीं साहजिक आणि समजतां येण्याजोगें आहे. बाबा म्हणत कीं, गैरसमज आणि अपुरी माहिती यांमुळें विचार फार दूषित होतात. पण त्यांना खरी माहिती मिळविण्याचीहि किती उत्सुकता असते तेंहि बाबांना माहीत होतं.

शांतिनिकेतनमधल्या मुली मात्र याबद्दल सहसा कांहीं बोलत नसत. बहुधा हे विचारच त्यांनीं कधीं केले नसावेत. मुलांपैकीं कांहीं जणांशीं माझी जास्त ओळख झाली असती, तर त्यांचीं खरीं मतं ऐकायला मिळालीं असतीं.

अमेरिकेबद्दल त्यांचा दृष्टिकोन कांहीं असो, त्यांच्या माहितीवरून त्यांना अमेरिका आवडो न आवडो, मला एक दिसलं तें म्हणजे त्यांचं माझ्याशीं वागणं कायम राहिलं. त्यांत कांहीं मला बदल दिसला नाहीं. शांतिनिकेतनमधली सर्वांत जवळची मैत्रीण नलिनी हिनेंहि अमेरिकेच्या सरकारी धोरणाच्या प्रामाणिकतेबद्दल आणि अमेरिकेन लोकांबद्दलहि अविश्वास माझ्यापाशीं व्यक्त केला. तिचं हें मत तिनं शांतिनिकेतनमध्यें पाहिलेल्या कांहीं अमेरिकनांच्यावरून बनवलं होतं हें उघड आहे. पण हे अमेरिकन म्हणजे कांहीं अमेरिकन

जनतेचे प्रतिनिधि नव्हते, याबद्दल मात्र आमचं दोघींचं एकमत झालं. त्यामुळंच अमेरिका–विरोध सोडण्याची विनंति मी तिला कळकळीनं केली. मीं तिला कितीहि पटवून देण्याचा प्रयत्न केला तरी आमच्या प्राध्यापकां-सारख्या भारतीय व्यक्तींवर तिचा एवढा दृढ विश्वास होता कीं त्यांचा संशय तिला आला नाहीं; उलट परकीय लोकांबद्दल विश्वास बाळगणं तिला अवघड वाटलं.

अमेरिकेनं भारताला जी मदत केली त्याबद्दल तिनं १९५२ सालच्या सप्टेंबरमध्यें माझ्याजवळ संशय व्यक्त केला. एवढा एकाएकीं पुळका कां आला अमेरिकेला ? ही कांहीं नुसती सदिच्छा नव्हे. त्यांत कांहीं तरी हेतु नक्कीच असला पाहिजे. तिसऱ्या महायुद्धांत अमेरिकेला जर भारताला स्वतःच्या बाजूस ओढायचं असेल तर अमेरिकेचें सरकार तसं स्पष्ट सांगत कां नाहीं ?

अमेरिकेंतील निग्रोविरोधी परिस्थितीबद्दल तिनं एकदां नापसंती व्यक्त केली. गेल्या एका वर्षात १०० वेळां लोकांनीं कायदा हातीं घेऊन निग्रोंची हत्या केली असं ती म्हणाली. मी किती जीव तोडून सांगितलं कीं बाई ग, ही आतां भूतकालीन गोष्ट झाली ! पण छे, तिचा कांहीं विश्वास बसला नाहीं. नाहींतरी हे कम्युनिस्ट आशियाई राष्ट्रांतील विद्यार्थ्यांमध्यें असे गैरसमज पसरवण्याचे शक्य ते सर्व प्रयत्न करीत असतात.

३६८५१
१९६०

## : १३ :

शांतिनिकेतनमध्यें पाऊल ठेवल्याला दोन महिने उलटून गेले, त्या सुमाराला एक प्रकारचं निराशेचं पटल माझ्या मनाला ग्रासूं पाहात होतं. मी आलें तेव्हां माझी कल्पना होती कीं ज्या जागेचं नांवच शांतिनिकेतन आहे, तेथील मुली शांत, साध्या आणि मेहनती असतील. पण अमेरिकेंत काय किंवा भारतांत काय, मुली इथून तिथून सारख्याच हें मला लवकरच कळून चुकलं. या नियमाला जे अपवाद भेटले, ते अपेक्षेपेक्षां फारच कमी होते.

कलाभवनाच्या वसतिगृहांतील स्वच्छंदी आणि स्पष्टवक्त्या मुलींच्या घोळक्यांत एकदम सांपडल्यामुळें उसळलेली निराशेची लाट अल्पजीवी ठरली. शांतिनिकेतनच्या स्मृतिचित्रांत त्या लाटेचं एका तरंगांत रूपांतर झालं. नंतरचे दृढ स्नेहसंबंध आणि आम्हीं एकमेकींच्या सहवासांत घालवलेला चिरस्मरणीय काळ यांच्या तुलनेनं तर तो नाराजीचा काळ अगदींच क्षुल्लक म्हणायला हरकत नाहीं.

कलाभवनच्या मुलींच्या वसतिगृहांत भारताच्या जवळजवळ प्रत्येक प्रांताची एकएक प्रतिनिधि होती—काश्मीर, पंजाब, दिल्ली, उत्तर प्रदेश, मध्यभारत, मुंबई, हैद्राबाद, आसाम इत्यादि. दोघी सिलोनी होत्या, 'सामिरा' इराकची होती अन् दुसरी एक अमेरिकन होती, तिचं नांव 'एड्ना' होतं.

अंवतींभंवतीं सारखी बंगाली भाषा बोललेली ऐकूं यायची. आम्हांला ती भाषा शिकण्याची चेतना देण्याचा कितीहि प्रयत्न झाला, तरी आम्हांला बंगालीचा फारसा गंध नसे, आणि आपापसांतलं संभाषण हिंदी किंवा इंग्रजींत, तर बंगाली लोकांशीं इंग्रजींत असा आमचा खाक्या होता.

येथील मुली सर्वसाधारणतः फार आकर्षक असत. रेखीव चेहरा, नितळ

कांति, गडद तपकिरी डोळे, हिरकण्यांसारखे दांत अन् व्यवस्थित निगा राखलेले लांबसडक काळेभोर केंस एवढ्या निसर्गदत्त देणगीला सडपातळ बांधा आणि डौल यांची जोड असायची.

साधी सुती साडीचोळी हा त्यांचा पोशाख. पण त्यांतच त्यांचं सौंदर्य अधिक डौलदार दिसायचं. साड्यांचे रंग अगदीं सौम्य असायचे. मुख्यतः शुभ्र. शिवाय पोपटी, गुलाबी, आकाशी, बसंती वगैरे. ते फिकट रंग त्यांच्या श्यामल वर्णाला फार खुलून दिसायचे. कांहींजणी सँडल्स् वापरत, पण पुष्कळजणी अनवाणीच असत.

या मुलींच्या प्रसाधनांचा पसारा बराच असतो. वेणीफणी हा एक वेळखाऊ, स्वतंत्र कार्यक्रमच असतो. पुष्कळजणी काजळ घालून डोळ्यांचा आकार स्पष्ट करीत. कांहींच्या कपाळावर कुंकुमतिलक असायचा, अन् बंगालच्या सौभाग्यवती भांगांत शेंदूर घालायच्या. हिंदी आणि अमेरिकन मुली आरशा-समोर वेळ घालवतात तो सारखाच असला तरी भारतीय मुलगी नेहमींच अधिक सतेज, रसरशीत अन् साधी वाटते. तिचं सारं सौंदर्य निसर्गदत्त आहे याबद्दल मनाची निखालस खात्री पटते.

मी वसतिगृहांत गेल्यापासून त्यांच्यांतली एक बनेपर्यंत फारसा काळ जावा लागला नाहीं. पहिल्या भेटींत कांहींजणी फार अबोल, अलिप्त अन् औपचारिक वाटल्या तर कांहींजणी पहिल्यापासूनच मोकळ्या आणि स्नेहशील होत्या. शांतिनिकेतनच्या चाकोरींत रुळतांना मला सर्वांत जास्त मदत कुणी केली असेल तर विजया या माझ्या समवयस्क मैत्रिणीनं. ती आणि मी वयानं सर्वांत लहान मुली होतों. तिचं हें वर्ष हौसेमौजेचं पहिलं वर्ष होतं. तिनं कलाविभागांतील पदवीचा चार वर्षांचा अभ्यासक्रम घेतला होता. तिचं घर कलकत्त्याला होतं. बंगाली या मातृभाषेखेरीज ती हिंदी व इंग्रजी बोलत असे.

शांतिनिकेतनमध्यें गेल्यानंतर थोड्याच दिवसांनीं एकदां आम्ही दोघी आवाराच्या पूर्व सीमेवरून जाणाऱ्या रेल्वे लाईनवर फिरायला गेलों होतों. त्या दिवशीं माझ्या बंगालीचा पहिला पाठ विजेयेनं मला दिला. रुळालगत एका रस्त्याच्या कडेला असलेल्या दरडीवर आम्ही बसलों होतों. बंगालीचं इतर भाषांशीं नातं काय आहे तें ती सांगत होती. हिंदीला बंगाली अगदीं जवळची. त्याचप्रमाणें इतर सहासात भारतीय भाषांत आणि बंगालींत जें साम्य आहे,

त्याचं कारण त्या सर्वच संस्कृतोद्भव आहेत. संस्कृत ही इंडोयुरोपीय भाषा-समूहापैकीं असणारी भाषा बोलीभाषा म्हणून प्रचारांतून गेलेली आहे.

त्या दरडीवर फार उल्हसित वाटत होतं. शीतल वाऱ्याच्या मंद झुळुका आल्हादकारक वाटत होत्या. एक लांबलचक गाडी समोरच्या रुळावरून सावकाश झुकझुक करीत पुढच्या चढणीवर गेली. किती गर्दी होती गाडीला! आम्हीं गाडींतल्या लोकांना 'टाटा' केला.

मान्सूनचा पाऊस अजून संपलेला नव्हता. त्याच दिवशीं सकाळीं कांहीं सरी येऊन गेल्या होत्या. पण दुपारीं ढगबिग पार पळून गेले होते, आणि निळ्या आकाशावर पुन्हा सूर्ययुग प्रस्थापित झालं होतं. त्या दिवशीं आम्ही परत फिरलों, तोंवर सूर्य पश्चिमक्षितिजाला भिडला होता.

आम्ही दोघी अशी भटकंती खूप वेळां करीत होतों. तिचा स्वभाव मोठा मिष्कील व विनोदी होता आणि तिचा उत्साह तर अमर्यादच असायचा. तिच्या केंसांत एखादं सुंदरसं फूल नेहमीं असायचं.

कलाभवनच्या वसतिगृहांतली प्रत्येक मुलगी मला निरनिराळ्या कारणांसाठीं आवडत असे. विजयाची वृत्ति आणि सुस्वभाव मला आवडायचा, सोमा या सिलोनी मुलीबद्दल मला फार ओढा वाटायचा, पण तिच्या जीवनांत शिरण्याची संधि मला कधीं मिळालीच नाहीं. ती वयानं आम्हां सर्वांची ताई होती. प्रेमकुमार या सुप्रसिद्ध कथाकली नर्तकांची ती पत्नी. ती दिसायला सुंदर होती. उंच, सडपातळ, शांत, प्रेमळ आणि मनमिळाऊ. तिला रागावलेली, संतापलेली अशी कधीं पाहिल्याचं आठवत नाहीं.

माझं खरं मित्रमंडळ 'शिक्षाभवन' म्हणजे कॉलेजमध्येंच होतं. तिथें नलिनीशीं माझं सर्वांत जास्त मेतकूट असे. नलिनी मजबूत, कणखर पण आकर्षक अशी मुलगी होती. तिच्या स्वतंत्र आणि धीट वृत्तीमुळें ती इतर मुलींहून वेगळी उठून दिसायची. फाळणीच्या धामधुमींत पश्चिम पंजाबांतून उठून त्यांचं कुटुंब दिल्लींत येऊन स्थायिक झालेलं होतं. तिची मातृभाषा पंजाबी होती. त्याखेरीज इंग्रजी, हिंदी, आणि शांतिनिकेतनला आल्यापासून कामचलाऊ बंगाली तिला बोलतां येत असे. ती तिसऱ्या वर्षाला आलेली होती. शांतिनिकेतनला ती यंदांच आलेली होती. तिचे आणि माझे कांहीं तास बरोबर

असत. ग्रामीण जीवनाबद्दल मला वाटणारं आकर्षण आणि शांतिनिकेतनमध्यें असतांना आसपासच्या ग्रामीण जीवनाचा स्पर्शहि न घडल्याबद्दल वाटणारं असमाधान या दोन्हींत ती मला सहभागी असे.

एक दिवस मी, विजया अन् नलिनी शांतिनिकेतनच्या पश्चिमेच्या बाजूला हिंडायला गेलों होतों. त्या बाजूला खोलीला जरा कमीच असणारं एक तळं होतं. भातशेतांचे तुडुंब भरलेले चौकोन होते. श्रीनिकेतनच्या दिशेनं आम्ही चालूं लागलों. या खेडेगांवांत ग्रामविकास केंद्र आहे. शांतिनिकेतनपासून तीन मैलांवर श्रीनिकेतन आहे. त्याच रस्त्यावर सुमारें एक मैलभर गेलं कीं डाव्या हाताला दहाबारा झोंपड्यांची वस्ती लागते. चोहोंबाजूला भातशेतं पसरलीं आहेत अन् मध्येंच उंचवटयावर ही वस्ती आहे.

पावसाळ्याचा अगदीं भरच होता. आम्ही त्या वस्तींत शिरलों अन् पाऊस सुरू झाला. आम्ही एका बाईची परवानगी विचारून तिच्या झोपडीजवळच्या शेडमध्यें निवाऱ्याला गेलों. आंत सर्व स्वच्छ आणि कोरडं होतं. एका कोपऱ्यांत एक गोऱ्हा संथपणें रवंथ करीत बसलेला दिसला. लाकडी नांगर आणि इतर अवजारं हारीनं लावलेलीं होतीं. गवताच्या टोपल्या तर पुष्कळच होत्या. गप्पा मारतांमारतां अन् गाणीं म्हणतांम्हणतां अर्धा तास संपला. तेवढ्यांत सरहि ओसरली आणि आम्ही परतीच्या रस्त्यावर पावलं वळवलीं.

शांतिनिकेतनच्या आसमंतांतील खेडीं बंगाली किंवा शांताल लोकांचीं आहेत. शांतालांचे पूर्वज म्हणजे खुद्द द्रवीड कीं त्याहीपूर्वीचे आदिवासी याबद्दल विद्वानांत मतभेद आहेत. तरी, येथील आद्य रहिवाशांपैकीं ते आहेत एवढं निश्चित. आर्यांचं आक्रमण झाल्यावर बिहार, पश्चिम बंगाल, आणि मध्यभारताच्या जंगलांत त्यांची हकालपट्टी झाली असावी. बाह्य जगांतील संस्कृतीशीं संबंध तुटल्यामुळें वनवासी राहणीमध्यें त्यांची जीवनपद्धति व चालीरीती जवळजवळ मूळ स्वरूपांतच आजहि दिसतात. भारतांतील मागासलेल्या जमातींत त्यांची गणना होते. शांतिनिकेतनच्या परिसरांतले शांताल दळणवळणाच्या सुलभतेनं व श्रीनिकेतनच्या कार्यानं बदलले आहेत. पण त्यांच्या जीवनाचा प्रवाह भोंवतींच्या प्रवाहांत मिसळलेला नाहीं. त्यांची जमात वेगळीच राहते.

शांतिनिकेतन सोडण्यापूर्वी थोडे दिवस आधीं एकदां आम्ही तिघी लौकर निघून दुपारच्या वेळीं एका शांताली खेड्यांत गेलों. छोट्या घरांमधून आणि अरुंद रस्त्यांवर जाग जशी दिसतच नव्हती. कुठं चारदोन पोरं धुळींत खेळत होतीं, एका घराच्या ओसरींत दोन मुली कांडण करीत होत्या. लाजाळू असल्या तरी त्या आमच्याशीं अगत्यानं वागल्या. आम्हांला एकमेकींची भाषा येत नव्हती. पण आम्हीं खाणाखुणा करून त्यांना सांगितलं कीं आम्ही तुम्हांला कामांत मदत करूं इच्छितों.

धान्य कांडण्याची त्यांची पद्धत मोठी और होती. जमिनींत उखळ खणलं होतं. त्यांत धान्य घालायचं, मुसळ एका तरफेसारख्या फळीला जोडलेलं असतं. ती फळी खालीं दाबली कीं मुसळ वर जायचं, सोडून दिली कीं धान्यावर घाव घालायचं! एक प्रकारचं सी सॉच होतं तें! पण किती मेहेनतीचं काम.

त्या खेड्यांतलीं बहुतेक सर्व घरं बंदच होतीं. एका घराच्या दारांत नातवाला शेजारींच खेळायला सोडून एक प्रौढ बाई अंगणांतच दळायला बसली होती. आम्ही बंगालींत तिच्याजवळ पाणी मागितलं. तिनं बंगालीच बोलायला सुरुवात केली, तेव्हां आम्हांला फार आश्चर्य वाटलं. पण ती म्हणाली कीं घरच्या पुरुष माणसांकडून थोडं थोडं बंगाली तिनं उचललं होतं. शेतावर काम नसतांना जेव्हां ते मजुरीसाठीं जात तेव्हां बंगाली आणि बिहारी लोकांशीं घसट पडल्यानें त्यांना बंगाली येत असे. तिचं घर अगदीं स्वच्छ आणि गारव्याला चांगलं होतं. मात्र घराला खिडक्या नसल्यामुळें आंत फार अंधार होता. नक्षीच्या रांजणांत पिण्याचं पाणी भरून ठेवलेलं होतं. 'खेड्यांत एवढी सामसूम कां बरं?' असं आम्हीं विचारलं तेव्हां ती म्हणाली कीं बहुतेक सर्व जण बोलपूरच्या बाजाराला गेले आहेत. ती बाई मनमोकळी वाटली. आम्ही गेल्यामुळें बोलायला कुणींतरी मिळाल्यानं ती आनंदित झाली होती हें स्पष्ट दिसण्यासारखं होतं. पण थोड्याच वेळांत आम्ही निघालों आणि भातशेतांचे चौकोन तुडवत परत आलों. पावसाची ओल तोंवर वाळूनहि गेली होती.

शांतिनिकेतनची माझी दुसरी जिवलग मैत्रीण म्हणजे मनजित्. तीहि पंजाबी निर्वासितांपैकीं होती. तिचं घर भाक्रा नानगलच्या धरणाजवळ होतं. तेथील कामावर तिचे वडील ओव्हरसिअर होते.

मनजित् शांत स्वभावाची आणि मन लावून काम करणारी होती. सेवा-ग्रामच्या लोकांप्रमाणें ती हातमागाचा कपडा वापरत असे. तिच्या दाट जाड केंसांचा ती साधा एक शेपटा घालत असे.

तिला नलिनीप्रमाणेंच देशसेवेची हौस होती. उन्हाळ्याच्या सुटींत मी तिच्या घरीं गेलें होतें. तिच्या आईचे विचार सनातनीच होते, आणि नवविचार समजत असला तरी उमजत नव्हता. शाळेंत जाण्यासाठीं आपल्या मुलीनं एवढा नऊशें मैलांचा प्रवास करावा ही गोष्टच तिला तितकीशी पसंत नव्हती. त्यांतून आपल्या मुलीनं अशा कल्पनांच्या मागें लागावं हें तर तिला अवलक्षणच वाटत होतं.

मनजित्‌ला खेडयांत जाऊन समाजसेवा करण्याची हौस होती अन् तिची वृत्ति या कामाला अगदीं साजेशी होती. पण आईचा एवढा विरोध असल्यानं तिनं ही इच्छा पूर्ण होईल ही आशाच सोडून दिली होती. शाळा, कॉलेज, पदवी–लग्न अन् पुढें चूल नि मूल या सर्वसामान्य मालिकेपेक्षां वेगळं कांहीं घडेल असं तिला वाटत नव्हतं.

हिंवाळ्यामध्यें आम्ही कांहींजणी तास संपल्यावर रात्र पडेपर्यंत मैदानी क्रीडांचा सराव करीत असूं. अखिल भारतीय आंतरविद्यापीठ खेळांच्या सामन्यांच्या वेळीं जानेवारींत मद्रासला जातां यावं यासाठीं आमचे प्रयत्न चालू होते. तब्बल २४ तासांचा जातांयेतां प्रवास, मद्रासमध्यें दोनतीन रात्री मुक्काम या साऱ्याकडे आम्ही अगदीं डोळे लावून बसलों होतों. अभ्यासांतून जरा डोकं वर काढायला संधि मिळाली असती.

दिल्लींतील आंतरशालेय स्पर्धांमध्यें थाळीफेक विभागांत मी पहिली आलें होतें. त्यामुळें इथेंहि मी पुन्हा सरावाला सुरुवात केली. माझ्याबरोबरचे इतर लोक धांवणं, भालाफेंक, पोल व्हॉल्ट वगैरेंचा सराव करीत. पण आमच्या प्रयत्नांना यश आलं नाहीं. आमचे कष्ट बड्या अधिकाऱ्यांना विशेष महत्त्वाचे वाटतच नव्हते. आणि अगदीं ऐनवेळीं 'तुम्हांला जातां येणार नाहीं', असं आम्हांला सांगण्यांत आलं. आमचा आणि आमच्या शिक्षकांचा फार विरस झाला.

इतर दोघी मुलींच्यापैकीं दीपालीशीं माझा चांगला परिचय झाला. माझी

थाळीफेंक चालू असतांना ती दुसऱ्या क्रीडाप्रकाराचं शिक्षण घेत असे. इतर मुलांपैकीं एकजण तिच्या धांवण्याचा वेळ पाहणं वगैरे गोष्टींत तिला मदत करीत असे, तशीच तीहि इतरांना मदत करीत असे. दीपाली दुसऱ्या वर्षांमध्यें होती आणि तिच्या संगतींत वेळ मोठा मजेंत जात असे. मद्रासला जातां येणार नाहीं हें आम्हांला कळलं तेव्हां आम्ही दोघी फार खट्टू झालों होतों. आमच्यापैकीं जीं चार मुलं गेलीं, त्यांना निरोप देण्यासाठीं मात्र आम्ही उत्साहानं स्टेशनवर गेलों, त्यांना हार घातले, शुभेच्छा व्यक्त केल्या. तेथील स्पर्धा संपतांच त्यांनीं आम्हांला तारेनं कळवलं कीं त्यांच्यापैकीं कुणीं जरी विशेष चमकलं नाहीं तरी त्यांचा वेळ मात्र चांगला जात होता.

आमचे शिक्षक सुबोधदा चपळ, आकर्षण व्यक्तिमत्त्वाचे होते. आमच्या अंगच्या कौशल्याचा पूर्ण विकास व्हावा म्हणून ते अगदीं जिवाचा आटापिटा करीत. त्यांनीं आमच्या प्रयत्नांना अशी कांहीं प्रेरणा दिली कीं मी आणि दीपाली कांहीं दिवस रोज ४–४॥ ला उठून गच्चीवर जाऊन व्यायामाचे प्रकार करीत होतों! ती वेळ मोठी सुंदर असे. पुरतं फटफटलेलंसुद्धां नसायचं कित्येकदां. पण या लौकर उठण्यामुळें जेवणाची वेळ होईपर्यंत आम्ही फार थकून जात होतों. त्यामुळें थोडया दिवसांनीं आम्हीं हा प्रयोग सोडून दिला.

आमच्या या मामल्यांत कांहीं छोट्या मंडळींना फार कुतूहल वाटायचं. मिष्टुणी नांवाची एक अगदीं कांहीं लहान नव्हे अशी मुलगी त्यांच्यापैकीं एक. ती तेरा वर्षांची होती. तिचे वडील विद्यापीठाचे उपकार्यवाह होते. त्यांचं घर आवारांतच होतं. मिष्टुणीच्या आईचं नांव होतं 'उमादी.' त्या फावल्या वेळांत हस्तव्यवसायाचे सर्व प्रकार करीत असत. त्यांचं घर म्हणजे भरतकाम, विणकाम यांच्या सजावटीचा नमुनाच असे.

'बाटिक' काम शिकण्याची मला फार इच्छा होती आणि तें शिकवण्याचं उमादींनीं कबूल केलं. जवळजवळ एक महिनाभर मी रोज दुपारीं किंवा संध्याकाळीं त्यांच्या घरीं जायची. एकीकडे 'बाटिक' काम शिकतांशिकतां गप्पाहि पुष्कळ चालायच्या. मिष्टुणीला इंग्रजी विशेष येत नसल्यामुळें आमचं संभाषण मर्यादितच असे.

मिष्टुणीनं बाटिकचे दोन हातरुमाल केले आणि मीं एक मोठा टेबलक्लॉथ आणि इतर बारीकसारीक काम केलें. मला बाटिकचं तंत्र एकदां शिकवल्या-नंतर एक दिवस उमादींनीं मला सांगितलं कीं तूं केव्हांहि येऊन काम करीत जा, त्यामुळें कांहीं काळ मी अगदीं त्यांच्या घरांतलीच बनलें होतें.

बाटिकची कृति अशी. प्रथम साध्या फिक्या रंगाच्या कापडावर डिझाईन काढून घ्यायचं. दोनतीन रंगांत तें करतां येतं. मी जें टेबलक्लॉथ केलं त्यांत पांढरा, निळा, पिवळा असे रंग वापरले होते. जो भाग पांढराच ठेवायचा असेल त्यावर प्रथम मेण लावायचं. मग पिवळा रंग द्यायचा. रंग वाळला कीं त्यावर मेण लावायचं आणि सर्व कापड निळ्या रंगांत घालायचं. तें वाळलं कीं मेण काढून टाकायचं. हें काम करतांना फार गंमत वाटायची आणि तें दिसायलाहि चांगलं दिसायचं.

मिष्टुणीला तीन बहिणी होत्या. एक परगांवीं असायची. दुसरी 'मधुश्री' कॉलेजमध्यें होती. आणि तुकु अगदींच लहान आणि फार गोड होती. तिच्या वयाला शोभेसा दंगा आणि हट्ट चालू असायचा तिचा.

या सर्वांहून 'रामप्रवेश' हा बिहारी मुलगा अगदीं वेगळा होता. तो जमशेटपूरचा होता. भारताच्या भवितव्याबद्दल तो अकारणच निराशावादी होता असं मला वाटत असे. तो एकदां मला म्हणाला, 'सरकारी पदाधिकाऱ्यांत जोंवर इतके जमीनदार आहेत, तोंवर जमीनविषयक सुधारणेचं कार्य कसंबसं, रुटुखटूच चालणार. जमीनविषयक सुधारणा योजना जारीनं अंमलांत येत नाहीं तोंवर भारताचा सर्वांगीण विकास होणं शक्य नाहीं.'

भारतांत जमीन-सुधार फार सावकाश चालू आहे, हें खरं आहे. पण रामप्रवेशचा निराशावाद मात्र मला मुळींच पटला नाहीं. सावकाश कां होईना, पण प्रगति होते आहे हेंच किती महत्त्वाचं आहे. आतां वेग येणं, गति वाढणं हें होईल हळूहळू. प्रवेशशीं माझे अनेक बाबतींत मतभेद होत. पण त्याचा विचारी स्वभाव आणि भारताच्या भावी उन्नतीबद्दलची आस्था यामुळें मला तो आवडत असे. जमशेटपूरच्या पोलादाच्या कारखान्यांत मजुरीची अंगमेहनत त्यानं केली होती. शरीरश्रमापासून दूर पळणाऱ्या अनेक भारतीय विद्यार्थ्यांपैकीं तो नव्हे.

शांतिनिकेतनमध्यें जरी बहुसंख्य मुलं बंगाली असलीं तरी त्यावेळेस

भारताच्या इतर राज्यांमधून आणि परदेशांतूनहि बरींच मुलं येत. सीलोन, नेपाळ, ब्रह्मदेश, चीन, इंडोनेशिया, जर्मनी, तुर्कस्थान, इराक, इजिप्त आणि केनया इतक्या वेगवेगळ्या देशांमधून विद्यार्थी येत. पण बहुतेक जण पदव्युत्तर विभागांत व संशोधनांत गुंतलेले असत. त्यांचा आमचा कॉलेजांत संबंध येत नसे.

टॉमस ओकेलो या केनयांतून आलेल्या मुलाशीं माझी कॉलेजांत ओळख झाली. आमचा पुढें बराच परिचय झाला. तो चांगला उंचनिंच, धिप्पाड आणि उमदा होता. त्याचा आवाज त्याच्या चेहऱ्याला शोभेसा मृदु व सुंदर होता. त्यानं आपल्या देशाबद्दल जें सांगितलं त्यामुळें माझी उत्कंठा चांगलीच जागृत झाली आहे. कधीं मी त्याच्या देशांत जाईन असं मला झालं.

विजया, नलिनी, मनजित्, दीपाली, सुबोधदा, मिष्टुणी, प्रवेश आणि ओकेलो हे सगळे माझे खरे दोस्त होते. इथें उल्लेख न केलेल्या किती तरी व्यक्तींशीं माझी ओळख होती. आतां सातासमुद्रापलीकडे मला त्यांची फार आठवण येते.

: १४ :

शांतिनिकेतनमधलं आयुष्य म्हणजे अभ्यासाचा कांटा आणि खेळाला फांटा असं नव्हतं. उलट आम्ही बराच वेळ गप्पाटप्पांत, थट्टामस्करींत घालवींत असूं. जवळजवळ रोजच कांहीं ना कांहीं करमणुकीचा कार्यक्रम असे. नाटक, गाणं, नृत्याचे कार्यक्रम, व्याख्यान यांपैकीं कांहींतरी असायचंच. इतर वेळीं सहलींचे बेत असतच.

मी प्रत्येक भवनांतील कुठल्या ना कुठल्या वर्गांत असल्यानें सगळीकडच्याच वर्गमैत्रिणी मला प्रत्येक समारंभाला हजर राहण्याचा आग्रह करीत असत. त्यामुळें कुठेंहि कांहींहि असलं तरी मी उपस्थित असणार हें ठरूनच गेल्यासारखं झालं होतं.

महिन्यांतून निदान दोनतीन छोट्यामोठ्या सहली असत. कांहीं सबंध दिवसाच्या, कांहीं चांदण्यांतल्या, कांहीं सकाळीं, तर कांहीं दुपारच्या असत. पण वेळ कोणतीहि असली तरी आमच्या हौसेमौजेला कांहीं बाध येत नसे. सर्वांत मोठी आणि संस्मरणीय सहल सर्व कॉलेजविद्यार्थ्यांसाठीं सप्टेंबरमध्यें निघाली होती.

आम्ही शंभरएक लोक सकाळची न्याहरी आटोपल्यावर 'गोलपूर' या खेडेगांवाच्या रस्त्यानं पायीं निघालों. बोलपूर ते गोलपूर हा रस्ता शांतिनिकेतनच्या आवाराला लागूनच जातो. हा कच्चा रस्ता पावसानं पार धुवून गेला होता. त्यावरून रस्ता काढतांना, आम्हांला भेटणाऱ्या बैलगाड्यांची फार तिरपीट उडत होती. दुतर्फा मैलोन्‌मैल हिरवींगार डुलतींझुलतीं भातशेतं पसरलेलीं होतीं. मध्येंच शिंदीचीं झाडं आणि लहान वस्त्या केवळ रेघा ठिपक्यांसारख्या दिसत होत्या.

गोलपूर साधारण मध्यम वस्तीचं खेडं आहे. साफसूफ, टुमदार, खास बंगाली धर्तीचं. आम्ही उतरलों ती जागा खेड्याच्या सीमेवर होती. घनदाट राई, गवताचा गालीचा अन् चार पावलं पलीकडून वाहणारा एक लहानसा गढूळ ओहळ. त्यांत गुरं पाणी पीत होतीं, पोरं डुंबत होतीं.

आम्ही पोंचल्यावर प्रथम जेवणाचा वेत काय करायचा आणि जेवण कुणीं बनवायचं हें दोन मुद्दे सोडवून टाकले. अगदीं सुसज्ज स्वयंपाकघर असलं तरीहि भारतीय पद्धतीचा स्वयंपाक हें मोठं यातायातीचं काम आहे. पण भोजनप्रमुखांनीं आम्हांला सर्वोत्तम जेवण देण्याचा चंगच बांधला होता. एका झाडाच्या छायेंत स्वयंपाकाची जय्यत तयारी सुरू झाली. कांद्याबटाट्यांचा हा नुसता ढीग पडला होता. मुलींनीं भाजी सोलून चिरण्याचं काम झटाझट सुरू केलं. तांदूळ धुवून वैरणं, वरण शिजत लावणं हीं कामं इतरांनीं अंगावर घेतलीं. मुलं चूल पेटवण्याची आराधना करूं लागलीं. ज्या बैलगाडींतून स्वयंपाकाचं सामान आलं होतं, तीच घेऊन कांहीं मुलं गांवांत विहिरीचं पाणी आणायला गेलीं.

एव्हांना उरलेल्या मंडळींनीं खेळ, गाणीं, यांसाठीं गट पाडून कार्यक्रम सुरू केलेच होते. मी कांदे सोलीत होतें. तेथून तो ढीग संपवून उठेपर्यंत क्रिकेट, रिंग, इतर बैठे खेळ यांचं चांगलंच बस्तान बसलं होतं. पत्ते, गाणीं, वृंद-नृत्यं–सगळं अगदीं रंगांत आलं होतं. यांत कुठेंच भाग न घेणारे दुरूनच गंमत पाहत होते. कांहीं जण ओहोळांत डुंबत होते. थाळीपळी वाजवून जेव्हां जेवण तयार असल्याची वर्दी दिली, तेव्हां सर्वांनाच सपाटून भुका लागल्या होत्या. लगेच सर्व जण पंक्तीमध्यें मांडी घालून जेवायला बसलों. ताटाऐवजीं पत्रावळी मांडल्या होत्या. थोड्याच वेळांत पहिल्या वाफेचं अन्न आमच्या पुढ्यांत आलं. भात, डाळ, उकडलेल्या कांदेबटाट्यांचा रस्सा, मांसाहारी मंडळींसाठीं मटन असा वेत होता. नंतर 'मिश्ती' हा बंगाली मिठाईचा प्रकार वाढला. जेवण झाल्यावर ज्यानं त्यानं आपापली पत्रावळ उचलून एके ठिकाणीं ढीग टाकला. कावळे, बैल यांनीं उरल्यासुरल्यासकट त्या पानांचा केव्हांच फन्ना केला.

उरलेली दुपार एक नाटक पाहण्यांत घालवली. काय भाऊडभरती होती

त्यांत! आणि एकसारखं एकापुढें एक चालूच होतं! आयत्या वेळीं सुचेल तें पोरं बोलत होतीं, एक सूत्र धरून बरींच भरकटत होतीं. गाणीं, नाच, अभिनय, भाषणं—अमूक एक नव्हतं असं कांहीं नाहींच! भाषा बंगाली असली तरी त्यांतला विनोद आणि निरर्थक गप्पा इतक्या उघड होत्या कीं सर्वांनींच त्याचा आनंद लुटला. मग बंगाली कळो किंवा न कळो.

सूर्य जरा कलल्यावर पुन्हा खेळांची लाट आली. सूर्यास्ताच्या वेळीं आम्हीं चहा घेतला. नंतर गाणीं गात, हंसतखेळत एक मिरवणूकच निघाली. आवारांत शिरून सहल संपवतांना 'आमेद्र शांतिनिकेतन' हें आमचं खास गाणं आम्ही म्हणत आलों.

पण सहलींपेक्षां शांतिनिकेतनमध्यें 'विशेष कार्यक्रमां'चं फार बंड होतं. कुठल्या तरी मंडळातर्फे नाटकं, गायन, नृत्य—असे विविधअंगी कार्यक्रम असत. त्यांत वगळ अशी कशालाच नसे. मला सर्वांत आवडलेला कार्यक्रम म्हणजे लोकनृत्यं आणि लोकगीतं यांचा.

संगीत भवनाच्या इमारतीच्या मध्यभागीं मोठा चौक आहे. त्याच्या एका बाजूच्या इमारतीचं बाहेर उघडणारं स्टेज् आहे, त्यामुळें चौकाचा उपयोग साहजिकच प्रेक्षागृहासारखा होत असे. खालीं हिरवळीचा गालिचा, वरतीं चांदण्या लावलेलं आकाशाचं छत अशा थाटानं बसलेल्या प्रेक्षकांना मोकळ्या वाऱ्याचाहि लाभ घेतां येई. गरम हवेंत तो हवासा वाटे.

त्या दिवशींच्या कार्यक्रमांत पुष्कळ लोकनृत्यं होतीं. यांत मुलंमुली मिळून भाग घेत. मुलींच्या रेशमी साडया तांबडया, पिवळ्या, जांभळ्या अशा गडद, ठसठशीत रंगाच्या असत. त्या चुणून घोट्यापर्यंत येणाऱ्या घागऱ्यासारख्या त्या नेसत. फिकट रंगाच्या चोळ्या आणि या रंगसंगतींत शोभतील अशा रंगीत ओढण्या असत. केंसांत मोठीं गेंदेबाज केशरी पांढरीं फुलं माळलेलीं असत. या सगळ्या रंगांच्या संमेलनांत मुलांचा पोशाख मात्र साधा पांढरा असायचा. कमरेचा शेला आणि फेटे एवढंच नारिंगी रंगाचं.

टिपरी म्हणजे लहानशी काठी. प्रत्येकाजवळ दोन टिपऱ्या असत. तालाच्या प्रत्येक आघाताबरोबर सगळ्यांच्या टिपऱ्यांचा एक आवाज येत असे. स्वतःच्या हातांतील टिपऱ्या वाजवणं किंवा दुसऱ्याच्या टिपरीला आपली टिपरी देणं हे

टिपरीचे दोन प्रकार. नाच सुरू होतांच संथ लयींत सुरू होई पण शेवटीं गति इतकी वाढे कीं सर्वांना अगदीं जोश चढे. टिपरीच्या गुंफणीचे अनेक प्रकार आहेत. सर्व मुलं एका दिशेनं व मुली विरुद्ध दिशेनं वर्तुळांत फिरून जी गुंफण करतात त्यानं मला 'ग्रँड राइट अँड लेफ्ट'ची आठवण झाली.

याच कार्यक्रमांत वृंदवादनाचा कार्यक्रम बसविलेला होता. सर्वांनीं मिळून पश्चिम भारतांतील डोंगरच्या राजांचं एक लोकगीत वाजवलं. खरं पाहतां शास्त्रोक्त संगीतांत वाद्यांचा संयुक्त वापर भारतीय पद्धतींत नाहींच. इथें मात्र पुष्कळच वाद्यं एकत्र होतीं. सतार हें छेडण्याचं तंतुवाद्य, इसराज हें धनुकलीनं वाजवण्याचं व्हायोलिनसारखं वाद्य, बाजाची पेटी, फ्लूट, तबला आणि ढोलक असा हा संच होता.

अशाच एका रात्रीं पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचं संमेलन झालं. अगदीं अनौपचारिक स्वरूप होतं. ऑस्ट्रेलियाखेरीज सर्व खंडांचे प्रतिनिधि होते. त्यामुळें जगाच्या सर्व भागांतील काव्य आणि गायन ऐकायला मिळालं. सर्वांत प्रथम एका भारतीय मुलीनं एक बंगाली गाणं म्हटलं. ती पदव्युत्तर शिक्षण घेणारी तत्त्वज्ञानाची विद्यार्थिनी होती. संथ, मोकळा, मंद्रस्वरांतला आवाज होता तिचा. तिच्यानंतर आपल्या आफ्रिकन जमातीच्या ल्यूओ या भाषेंतील गीतं ओकेलोनं आपल्या मृदु, चेतनामय आवाजांत म्हटलीं.

गवन या तुर्की मुलानं त्याच्या भाषेंतलं गाणं गायिलं. 'मंत्र' या उंचनिंच लक्ष वेधून घेण्याऱ्या मुलानं इंडोनेशियन गाणं म्हटलं. नंतर बरींच भारतीय गाणीं झालीं. मग फ्रेंच, जर्मन, संस्कृत, बंगाली सर्वांची वर्दी झाल्यावर एका अमेरिकन मुलानं गिटारच्या साथीवर एक बंगाली गाणं म्हटलं! भारतीय विद्यार्थ्यांना त्याची फार गंमत वाटली आणि सर्वांनीं त्याचं कौतुक केलं.

७ ऑगस्ट हा टागोरांचा स्मृतिदिन. तो गंभीर वातावरणांत साजरा झाला. आदल्या दिवसापासून कलाभवनच्या मुली तयारींत गढल्या होत्या. दिवसभर पांढरीं, पिवळीं, केशरी फुलं त्यांनीं गोळा करून आणलीं होतीं. संध्याकाळीं या फुलांचे हारगजरे करायचं काम जें सुरू झालं तें रात्रीं कितीतरी वेळ चालू होतं.

कलाभवनच्या विद्यार्थ्यांकडे नेहमींच सजावटीचं काम असे. तें त्यांना फार आवडायचं आणि त्यांना मदत करायला मलाहि फार मजा वाटायची. एखाद्या मुलींच्या खोलींत सगळा फुलांचा पसारा घालून आम्ही सहासात जणी पलंग, टेबल, जमीन यांवर दाटीवाटीनं बसून काम सुरू करीत असूं. गाणीं गात, गप्पा मारीत फुलांचे केव्हांच हार बनून जात. मग ते खुंट्यांना अडकवण्याऐवजीं आमच्या गळ्यांतच घालून आम्ही बसत असूं.

त्या दिवशीं साडेचार वाजतां मिरवणुकीनं आम्ही उषावंदनाच्या प्रार्थनेला गेलों. चंद्रप्रकाश अगदीं चांगला स्वच्छ होता. त्याचं मार्दव अंगावर घेत, टागोरांचीं गीतं म्हणत आम्ही ओळींत चाललों होतों. आरामांत आळोखे-पिळोखे देत पहांट आली अन् मागोमाग पेंगुळलेला सूर्य कसाबसा क्षितिजाच्या कडेवर चढला. दर पौर्णिमेला पहांटेच्या चंद्रप्रकाशांत अशा उषावंदनाला आम्ही जात असूं.

सकाळीं प्रार्थनामंदिरांत स्मृतिदिनाची प्रार्थना झाली. दुपारचा मुख्य समारंभ वृक्षारोपणानं सुरू झाला. या वेळीं पुष्कळ पाहुणे उपस्थित होते. शांतिनिकेतनला आल्यास एवढ्या गर्दीची संवय मोडलीच होती.

ठरलेल्या वेळीं सगळ्या मुली पिवळ्या साड्या आणि पांढरीं ब्लाऊजेस घालून एका लांब रांगेनं निघाल्या. प्रत्येकीच्या हातांत एखादं रोप किंवा फुलांचा हार होता.

नियुक्त जागेवर कलाभवनांतील मुलींनीं खूप मोठी 'अल्पना' रांगोळी काढली होती. चोपून तयार केलेल्या जमिनीवर तांदुळाच्या पिठानें आणि पाण्यांतील रंगानें अल्पना काढतात. अल्पना बहुधा पांढरीच असते. पण यावेळीं त्यांत हळदीकुंकवाचे रंग भरले होते. सर्व कार्यक्रम बंगालींत असल्यानें मला सर्व समजलं नाहीं. पण एकूण साधेपणा, रंगसंगति, यांचं सौंदर्य मला मोहक वाटलं.

या शांत समारंभाच्या अगदीं विरुद्ध स्वरूपाची एक चार दिवसांची ट्रिप झाली. आम्ही कलकत्याला गेलों होतों. कलकत्ता हें भारतांतील सर्वांत मोठं शहर. मी अन् माझी एक अमेरिकन मैत्रीण अशा दोघी निघालों. अँटिओक कॉलेजची ही विद्यार्थिनी कांहीं आठवड्यांसाठीं शांतिनिकेतनांत आली होती.

शांतिनिकेतनमधलं आयुष्य विश्वास बसणार नाहीं इतकं संथ आणि निर्वेध चालू असे. पण आम्हीं त्या आवाराबाहेर पाऊल टाकलं मात्र, आणि अडचणींनीं चेहरे दाखवायला सुरुवात केली. पण त्याला तोंड देण्यांतहि एक मजा होती, सुखाच्या घरट्यांतून बाहेर पडून पंख हलवण्यांत, स्वतःच्या पायावर उभं राहण्यांत, आनंद होता.

गाडी पकडण्यासाठीं बोलपूरला जायचं. पण कसं ? वाहनाची काय व्यवस्था ? आम्हांला पाहून एक रिक्शावाला तेथेंच घुटमळत होता. पण आम्ही दोघीहि सायकल रिक्षांतून जाण्याच्या अगदीं विरुद्ध होतों. माणसालाच ओझ्याचा प्राणी बनवणाऱ्या या वाहनाचा आम्हांला फार तिरस्कार वाटत असे. पण आमच्या-समोर दुसरा मार्गच नव्हता. गाडीला जरी पुष्कळ अवकाश असला, तरी सामान बरंच जड होतं, शिवाय अंतरहि पुष्कळ होतं.

शेजारच्याच बिहार प्रांतांतून आलेला हा श्रमजीवी रिक्शावाला मात्र संध्या-काळच्या जेवणाच्या तरतुदीसाठींच आमच्याकडे पाहत असेल कदाचित्. कुणीं सांगावं, आमच्या निर्णयामुळें त्या रात्रीं त्याच्या कुटुंबाला कोरड्यास मिळू शकेल ! असे विचार मनांत आल्यावर आम्हीं मुकाट्यानं सामान टाकलं आणि बसलों आंत. प्रत्येकीची एक बॅग आणि बिछाना होता. भर दुपारीं एक वाजतांचं ऊन रणरणत होतं. आणि रिक्शावाला आम्हांला घेऊन चालला होता. रस्त्यावर जीं थोडींफार माणसं दिसलीं, तीं सावलीलाच बसलीं होतीं.

थोड्याच वेळांत आम्ही बोलपूरला पोंचलों. या छोट्या स्टेशनांत नेहमींची गोंधळगर्दी होतीच. रिक्शावाल्याला त्याच्या कष्टांचा मोबदला देऊन आम्हीं तिसऱ्या वर्गाचीं तिकिटं काढलीं. प्लॅटफॉर्मवर चहाचं छोटं दुकान होतं. तिथें आम्ही उभ्या राहिलों. भारतांतील बहुसंख्य लोक–विशेषतः विद्यार्थीवर्ग—हे तिसऱ्या वर्गानें प्रवास करतात. कलकत्त्याच्या शंभर मैलांच्या प्रवासाचं भाडं तीन रुपयांहून कमीच (सुमारें ६० सेंट्स्) होतं.

उत्तरेकडच्या टेंकड्यांमधला लांबलचक कंटाळवाणा प्रवास संपवून गाडी धापा टाकीत स्टेशनांत शिरली. अगोदरच खेंचाखेंच झालेल्या एका डब्यांत आम्हीहि घुसलों. सोळा लोकांची बसण्याची सोय असलेल्या डब्यांत त्याच्या कितीपट माणसं होतीं हें सांगणं कठीण आहे.

बरद्वान या पुढच्या स्टेशनावर आमच्या डब्यांत तांदुळाचा चोरटा व्यापार करणारे लोक धाबऱ्याघुबऱ्या चढले. पोलीस त्यांच्या मागावर होते. तीं माणसं डब्यांत यावींत असं कोणालाच वाटत नव्हतं. कलकत्त्याच्या सीमेवर जेव्हां गाडीचा वेग मंदावला तेव्हां ते लोक पटापट उडया ठोकून पसार झाले.

माझी मैत्रीण खूप बडबडी असल्यानें चढल्यापासून थोडयाच वेळांत, कलकत्याला परत निघालेल्या विद्यार्थ्यांशीं आम्हीं आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर चर्चा सुरू केली होती. त्या मुलांच्यांत दोघं पंजाबी होते आणि एकजण नेपाळी होता. एक पंजाबी कायद्याचा अभ्यास करीत होता, तर दुसरे दोघं मेडिकलचे विद्यार्थी होते. पंजाबी मुलं उंच, गोरीं होतीं—पंजाबी लोकांचीं हीं वैशिष्ट्येंच आहेत. नेपाळी मुलगा चणीनं लहान पण रंगानं अधिकच गोरा होता. नेपाळ हा भारताच्या उत्तर सीमेवरील डोंगराळ मुलूख आहे.

कलकत्ता आलं तोंवर दिवेलागणी झाली होती. हुगळीवरचा प्रचंड पूल ओलांडून गाडी सियालदा स्टेशनमध्यें शिरली. स्टेशनवर हिंदु निर्वासितांची पुष्कळच गर्दी होती. फाळणी होऊन पांच वर्षं लोटलीं तरी दंगली चालूच होत्या. त्याची झळ लागलेल्या लाखों हिंदु लोकांचं भारतांतील पहिलं घर म्हणजे सियालदा स्टेशन! आज ना उद्यां पुनर्वसनासाठीं सरकारतर्फे स्थापन झालेल्या नगरांत निवारा मिळेल या आशेनं सर्वचजण वाट पाहत होते. कुटुंबंच्या कुटुंबं स्टेशनावर बसून होतीं. त्या गर्दीतून वाट काढीत आम्ही स्टेशनाबाहेर आलों.

कलकत्त्याच्या प्रथमदर्शनानं मी चकितच झालें. मला न्यूयॉर्कची आठवण झाली. ट्रॉलीज, बसेस, टॅक्सीज साऱ्यांची प्रचंड रहदारी चालू होती. निऑनचे दिवे एकमेकांना खुणा करीत होते. हमरस्त्यावर भपकेबाज हॉटेल्स आणि उपाहारगृहं दुतर्फा रांगेनं उभीं होतीं. या कोलाहलांत मी मूक बनलें. शांतिनिकेतनपासून शतयोजनं दूर आल्यासारखं वाटत होतं.

आमच्याबरोबरचे तिन्ही विद्यार्थी आतां पुढचा वेळ कसा घालवायचा याच विवंचनेंत होते. त्यांनीं आम्हांला टॅक्सी पाहून दिली, शिवाय आम्ही उतरणार होतों त्या साल्व्हेशन आर्मी होस्टेलपर्यंत पोंचवलं. दर दिवसाला जेवणासहित केवळ तीन रुपये दर होता. खूपच स्वस्त होतं. याबद्दल आम्हीं ऐकलंहि होतं. कांहीं म्हाताऱ्या अँग्लो इंडिअन बायका आणि कांहीं नोकरी करणाऱ्या मुली

तेथें राहात होत्या. त्यांच्यांत भारतीय, अँग्लो इंडिअन, चिनी, सर्वजणी होत्या. शाळेंत काम करणाऱ्या पंजाबी बाईच्या खोलींत माझ्या मैत्रिणीला जागा मिळाली. शिवाय एक परिचारिकेचं काम करणारी मुलगीहि होती. माझ्या खोलींत एकच गरीब आणि वयस्क अँग्लो इंडिअन बाई होती.

त्या अँग्लो इंडिअन बायकाना कां कुणास ठाऊक, पण स्वतःच्या इंग्लिश रक्ताची फाजीलच ऐट होती. दिल्लींत मला भेटलेल्या अँग्लो इंडिअन्सहि तशाच! सुचेल त्या मार्गानें स्वतःच्या वेगळेपणाची त्या जाणीव करून देत. खरं पाह्यला गेलं तर त्यांनीं भारतीय चालीरीती, पोशाख वगैरे उचललं असतं तर भारतीय समाजांत त्या केव्हांच एकरूप होऊन गेल्या असत्या. पण त्यांनाच एकोप्यानं राहणं पसंत नाहींसं दिसतं. पाश्चात्य पद्धतीचे कपडे घालायचे, फक्त इंग्रजीच बोलायचं आणि नवभारताचे घटक न बनतां वेगळं राहायचं हा त्यांचा खाक्या.

त्या आमच्या विद्यार्थीमित्रांनीं आमच्याबरोबर जेवायला येण्याचं कबूल केलं होतं. ते थोड्या वेळानं आल्यावर आम्ही एका अलिशान हॉटेलमध्यें गेलों. माझे जाडेभरडे कपडे आणि जुनेपुराणे सँडल्स् तिथल्या थाटामाटाशीं किती विसंगत होते! मला मनांतून लाजच वाटत होती. वेटर्सचे फेटे आणि पदार्थांचे प्रकार सोडले तर त्या हॉटेलचा रागरंग शिकागोमधल्या एखाद्या बड्या हॉटेलसारखाच होता.

आम्ही उतरलों होतों ती जागा लहानशीच होती. एका गजबजलेल्या रस्त्यावरची ही तिमजली इमारत. दिवसा फूटपाथवर नेहमींच गर्दी असायची. साधे पांढरे कपडे घातलेलीं माणसं छोट्या दुकानांमध्यें सौदा पटवतांना केवढ्या तरी मोठ्यानं बोलायचीं. नाहीं तर कामाला जातांनाच्या घाईगर्दींतच जगाच्या परिस्थितीबद्दल सहकाऱ्यांशीं चर्चा करीत जायचीं.

त्या छोट्या दुकानांत सर्व प्रकारचा माल विक्रीला तयार असे. छोट्या हॉटेलांची गर्दी तर विचारूंच नका. कापड, भांडीं, तळलेले मसालेदार पदार्थ, बंगाली मिठाई, फळफळावळ, आईस्क्रीम—सर्वच त्या रस्त्यावर दिसायचं.

रस्त्यावरून कांहीं वेळां एखादाच मोकाट बैल निर्वेधपणानं जात असायचा. ट्रॉलीज् खडखडत जायच्या, माणसांना वाटेंतून दूर होण्याची सूचना देण्यासाटीं

घंटा खणखणत असत. दमून गेलेले रिक्शावाले गिऱ्हाईक शोधत असायचे. मोटारींची रांग भरधांव धांवत असायची.

शांतिनिकेतनच्या प्रशांत वातावरणापेक्षां किती निराळं होतं हें जग! शांतिनिकेतनचं संथगति जीवन सोडून आल्यावर चुकल्या-चुकल्यासारखं जरी वाटलं, तरी परततांना आम्ही नव्या ओढीनं, नव्या उल्हासानं गेलों.

छे! शांतिनिकेतनचं आयुष्य म्हणजे कामच काम आणि खेळाला रामराम असं कधींच नव्हतं. ५३ च्या फेब्रुवारींत या जागेचा आणि मित्रमैत्रिणींचा निरोप घेतांना माझ्या मनांत उडालेली खळबळ मला किती चांगली आठवते! साध्यासुध्या गोष्टींमध्यें आपलं मन कसं गुंतलेलं असतं याचा प्रत्यय मला तेव्हां आला. महत्त्वाच्या प्रसंगांच्याच नव्हे तर दररोजच्या आयुष्यांतील गोष्टींच्या आठवणीहि नंतर माझ्याभंवतीं रुंजी घालीत राहतील. तें वर्गांत जाणं, पुस्तकांच्या शेल्फाआड पुस्तकांमध्यें रंगून जाणं, सीमेंटच्या दगडावर कपडे धुणं, कपडे वाळत घालतांना पाठीवर येणारं ऊन, सारंच कसं मनावर ठसून गेलं होतं.

शांतिनिकेतनांत कायम अनवाणी चालण्यांतली स्वातंत्र्याची जाणीव मला आठवते, त्याबरोबरच मैत्रिणींचा आनंदी स्वभाव, त्यांचा साजरेपणा इतकेंच काय, पण त्यांचा दंगाहि मला अजून आठवतो.

## : १५ :

फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यांत मी दिल्लीला परत आलें. मार्चमध्यें आई, बाबा, सॅम्, सॅली सर्वच परत जाणार होते. मला भारतांतील ग्रामीण जीवन बघण्याची फार इच्छा होती. आईबाबांच्या परवानगीनं मी आणखी कांहीं महिने राहणार होतें.

जुलैपर्यंतचे तीन महिने काय करायचं असा प्रश्न नव्हताच मुळीं. स्नेही-मंडळींकडच्यीं बोलावणीं अन् येणंजाणं यांत दिवस कसे गेले तें समजलंहि नाहीं. दिल्लींत अमेरिकन माहितीखात्यांत काम करणाऱ्या जीन जॉईस आणि दिल्लीच्या सार्वजनिक आरोग्य व पुनर्वसन खात्याच्या मंत्रिपदावर काम करणाऱ्या सुशीला नायर या दोघींनीं माझं पालकत्व पत्करलं होतं.

मार्चअखेर उन्हाळ्याची चुणुक जाणवायला लागते. उत्तरेंतला उन्हाळा म्हणजे कोरडा आणि रखरखीत. एप्रिलच्या सुरुवातीलाच माझे सर्व कुटुंबीय परत गेले. त्या दिवशीं त्यांना निरोप देण्यासाठीं विमानतळावर बरेच लोक आले होते. त्यांचा मार्ग पॅसिफिक महासागरावरून जाणारा होता. विमानाची घरघर सुरू झाली अन् तें पाहतांपाहतां दृष्टिआड झालं. मी एकटी राहिलें. पण जगांतल्या अत्यंत स्नेहशील देशांत मी होतें, आणि माझ्याभोंवतीं जिव्हाळ्याचीं माणसें होतीं. इथें राहावयाला मिळालं, लोकांच्या जीवनाचा अभ्यास करण्याची संधि मिळाली याबद्दल मी स्वतःला धन्य मानलं. भारत मला अगदीं मनापासून आपलासा वाटूं लागला होता.

पुढले तीन महिने तर माझी खरीच मजा होती.. त्या काळांत मी वेगवेगळ्या धर्मांच्या, वेगवेगळ्या आर्थिक पातळीवरच्या भारतीय कुटुंबांमध्यें राहणार होतें.

पहिले कांहीं दिवस मी सुशिला नायर यांच्या जुन्या दिल्लींतल्या घरीं राहणार होतें. सुशीलाबाई या गांधीजींच्या शिष्या. त्या बरेच दिवस सेवाग्रामला होत्या. त्यांच्या वैद्यकीय सल्लागार म्हणून त्या काम करीत. मंत्रिपदावर आरूढ होण्यापूर्वी त्या निर्वासितांच्या छावणींत प्रमुख वैद्यकीय अधिकारी म्हणून काम करीत होत्या.

उच्चपदाधिकारी असलेल्या व्यक्ति उच्च शिक्षणासाठीं परदेशीं जाऊन आलेल्या असणं हा भारतांत नित्यक्रमच आहे. सुशीलाबेनहि याला अपवाद नव्हत्या. अमेरिकेंतील जॉन्स् हॉपकिन्स् विद्यापीठांत जवळजवळ दोन वर्षं अभ्यास करून त्यांनीं सार्वजनिक आरोग्याच्या क्षेत्रांतील उच्च पदव्यांसाठीं पात्रता संपादन केली.

सुशीलाबेन दिवसभर कामांत गुंतलेल्या असत. त्यांच्याकडे असतांना माझे बरेच उद्योग चालायचे—मैत्रिणींकडे जाणं, क्लिनिक्‌मध्यें काम करणं, बाजारांत चक्कर टाकून येणं, वगैरे. करण्याजोग्या गोष्टी इतक्या होत्या कीं घरच्यांची आठवण काढून विचार करीत बसायला वेळच नसे. सुशीलाबेन तर माझी आईच बनल्या होत्या. मला कांहींच उणं पडूं देत नसत त्या. शकूरहि माझी काळजीपूर्वक चौकशी करीत असे. कामावरून परततांना जवळजवळ रोजच माझी रेटंडनरोडकडे फेरी असायची. शकूर आणि इतर सर्वांशीं भेट होत असे. मार्च अखेरपर्यंत मी सुशीलाबेनकडे राहिलें. एप्रिलच्या सुरुवातीला उत्तर प्रदेशांतील एका लहानशा गांवांत वायजर्स नांवाच्या एका मिशनरी कुटुंबांत मी राहायला जाणार होतें.

शांतिनिकेतनमधून आल्यानंतर एका अमेरिकन मैत्रिणीशीं माझं ग्रामसुधारणेबद्दल बोलणं झालं. तिनंच मला इंडिया व्हिलेज सर्विस (भारतीय ग्राम सेवा संघ) या संस्थेच्या चालकांकडे त्यांच्या सहकाऱ्यांसमवेत राहण्याची कल्पना सुचवली होती.

वायजर्स कुटुंब ज्या ठिकाणीं स्थायिक झालं होतं तें अगदींच लहानसं गांव होतं. माझ्या मैत्रिणीनं सांगितलं, "दिल्लीच्या आग्नेय दिशेला उत्तर प्रदेशांत शंभर मैलांवर मरहेरा हें छोटंसं गांव आहे. तूं गेलीस तर त्यांना फार आनंद होईल." ती स्वतः मार्चच्या शेवटीं शेवटीं मरहेराला जाणार होती, तेव्हांच

मला नेण्याचं तिनं कबूल केलं होतं. "दुसरं असं," ती पुढें म्हणाली, "कीं त्यांच्या सहकाऱ्यांपैकीं एकजण लखनौजवळच्या खेड्यांत एकाखांबी तंबूच बनली आहे. एखादा आठवडाभर जर कामांत बरोबरीनं मदत करायला कोणीं आलं तर तिला बरंच वाटेल. मरहेराहून तुला तिकडे जातां येईल. तें गांव मात्र उत्तरेच्या बाजूस आहे.'

हें आमंत्रण म्हणजे आंधळा मागतो एक आणि देव देतो दोन अशापैकींच वाटलं मला! मरहेरांत आणि लखनौजवळच्या खेड्यांत जाऊन भारतीय ग्रामविकासाच्या कार्यांत गढलेल्या व्यक्तींचं आणि प्रत्यक्ष कामाचं दर्शन घेतां आलं असतं. 'इंडिया व्हिलेज सर्विस' ही खाजगी संस्था असली तरी तिचं कार्य सरकारी संस्थेच्याच स्वरूपाचं होतं. त्यामुळें सरकारी आणि खाजगी प्रयत्नांत एकसूत्रता राहूं शकत होती.

आमचा बेत अगदीं ठरल्याप्रमाणें पार पडला. मरहेराला पोंचण्यासाठीं कांहीं तासच मोटारीचा प्रवास करावा लागतो. दुतर्फा शेतं होतीं. कापणीचा हंगाम आल्यामुळें कांहीं शेतांत उभं पीक नव्हतंच. सगळीकडे झोडपणी-मळणीचीं कामं सुरू झालीं होतीं.

मिसेस् वायजर्सनीं आमचं आनंदानं स्वागत केलं. 'आतां आपलंच घर मानून राहायचं बरं का. उगीच संकोच वगैरे करूं नका,' असं वायजर्स स्वतः आम्हांला म्हणाले.

मरहेराला मोठं खेडंहि म्हणतां आलं नसतं किंवा लहान गांवहि म्हणतां आलं नसतं. अशा विशिष्ट गांवाला त्या भागांत 'कसबा' म्हणतात. ४७ सालीं या खंडप्राय देशाची फाळणी होऊन हिंदुस्थान पाकिस्तान अशीं दोन राष्ट्रं अस्तित्वांत आलीं, त्यापूर्वीं मरहेरा हें मुख्यतः मुसलमानी गांव होतं. पण फाळणीच्या धामधुमींत बहुतेक सर्व मुसलमान भेदरून जाऊन पाकिस्तानांत निघून गेले. हिंदु आणि मुसलमानांना एकमेकांविरुद्ध चिथावणी दिली जात होती आणि माथेफिरू हिंदु आपल्या मुस्लीम शेजाऱ्याला मारीत होता तर कडवा मुस्लिम आपल्या दोस्ताचा गळा कापत होता.

पण जिवाच्या भीतीबरोबरच मुसलमानांना त्यांच्या भवितव्याचीहि चिंता वाटत होती. पण ही भीति निराधार असल्याचं सर्वांना अल्प अवकाशांत

दिसून आलं. पुष्कळांना वाटलं कीं भारतांत हिंदूंचं बहुमत झाल्यावर धार्मिक कसोटीनुसार भेद केला जाईल.

प्रत्यक्षपणें मरहेरांत किंवा आसपासच्या भागांत कांहीं दंगा झाला नाहीं असं मीं ऐकलं पण सर्वच उत्तर भारतांत आणि पाकिस्तानांत हजारों माणसं या हत्त्याकांडांत बळी पडलीं.

आजमितीला मात्र शीख, मुस्लीम, हिंदु हे सारेच भारतांत शांततेनं एकत्र राहतात. या चमत्काराचं श्रेय मुख्यतः पंडित नेहरूंच्या प्रयत्नांना आहे. त्यामुळेंच आज चार साडेचार कोट मुसलमान त्यांना उत्साहानें पाठिंबा देतात.

मरहेराच्या रस्त्यांच्या कडेला मोडकळीस आलेलीं घरं गतवैभवाच्या कथा सांगत उभीं होतीं. मिसेस् वायजर्सच्या ओळखीच्या एक बाई जुन्या हकीगती सांगत. जुन्या काळीं घरंदाजांच्या बायका कधीं अंगणाबाहेर आल्या नाहींत आणि आल्याच तर पडदेपालखीशिवाय कुठें गेल्या नाहींत, असा एकूण थाट होता.

गांव ओसाड पडल्यामुळें मरहेराला एक प्रकारची ग्लानि आल्यासारखी वाटते. शाळा, ऑफिसं सुरू होतेवेळीं अन् सुटतेवेळींच काय ती मुलांमाणसांची जाग. एरवीं गांवांत शुकशुकाटच असतो. सूर्योदय अन् सूर्यास्ताच्या वेळेला नमाज पढणाऱ्यांची गर्दी, जरा गडबड आणि मशिदींतल्या घंटांचा आवाज. मशीद म्हणजे मुसलमानांची प्रार्थनेची जागा. क्वचितच एखादा प्रफुल्ल चेहरा पडक्या दाराच्या चौकटींत दिसायचा. पण त्यामुळेंच कीं काय एकूण वातावरण उदास, एकाकी, उपेक्षितच वाटत असे.

बाजाराचा दिवस मात्र चांगलाच गजबजलेला असायचा. दर गुरुवारीं पंचक्रोशींतले निरनिराळे बलुते, शेतकरी, व्यापारी गांवाच्या सीमेवर जमत. मात्र क्रयविक्रयाच्या व्यवहाराला इष्टमित्रांच्या गांठीभेटींची आणि हास्य-विनोदाची झालर असे.

वायजर्स यांचं घर मुसलमान पद्धतीचं होतं. बरंच जुनं असावं तें. मध्यभागीं चौक, तिन्ही बाजूंनीं खोल्या आणि चौथ्या बाजूला शेजारच्या घराची भिंत ही सर्वसाधारण बांधणी. चौकाच्या मागच्या बाजूला दोन छोटया खोल्या होत्या, त्यांपैकीं एक त्यांनीं मला दिली. समोरच्या अंगणांतच आम्ही झोंपत होतों.

घराच्या दर्शनी भागांत एक दिवाणखाना होता. वायजर्स यांची खोली, स्वयंपाकघर, मोरी वगैरे बाजूच्या भागांत होतं.

घराची ठेवण मुळांतच साधी होती. आणि तें ठेवलं होतंहि साधंच. विटांच्या कच्च्या भिंती होत्या. माझ्या खोलींत सारवलेली जमीन होती आणि कॉटऐवजीं मला चारपाई दिली होती. फाळणीपूर्वी एखादं मुसलमान कुटुंब येथें राहत असेल तेव्हां हें घर कसं असेल याची मीं कल्पना करून पाहिली. बायकांचा वावर या मागच्या दोन खोल्यांत आणि अंगणांतच असणार. मुसलमानांत किती कडक गोषा असतो! परपुरुषाचा दृष्टिस्पर्श चालत नाहीं त्यांना. म्हणून बाहेर जातांना त्या बुरखा घेऊन जातात.

शेजारच्या घरांतील दोघी मुसलमान मुलींशीं माझी चटकन मैत्री जमली. त्यांच्यापैकीं एकजण माझ्या वयाची आणि दुसरी जरा मोठी होती. एकदां त्यांच्या घराच्या अंगणांत आम्ही गप्पा मारीत बसलों होतों. तेवढ्यांत तिकडून एक पाणक्या पखालींत पाणी घेऊन आला तो मुळीं डोळ्याला ढांपणं लावूनच! घरच्या बाईवर आणि मुलींवर कुणाची नजरसुद्धां पडूं नये यासाठीं सारा खटाटोप.

या मुली आणि त्यांचा मोठा भाऊ इथें एकाकी पडले होते. त्यांचे सगेसोयरे पाकिस्तानांत गेल्यामुळें आणि गांवांत विशेष राम नसल्यानं घरकामाचे रोजचे व्यवहार उरकण्यापलीकडे त्यांना जीवनच उरलं नव्हतं. मी करीत होतें त्या कामाची माहिती मीं त्यांना दिली आणि तुम्हीहि कां नाहीं तास दोन तास वेळ देत? अशी विचारणा केली. मी त्यांना सांगितलें कीं काम फक्त बायकामुलांतच करावं लागतं. हंसून 'आमच्यांत असली पद्धत नाहीं' एवढंच या म्हणाल्या.

मरहेराला दोन शाळा होत्या. एक मुलामुलींची प्राथमिक शाळा आणि फक्त मुलांसाठीं एका दुय्यम शाळा. एक हॉस्पिटलहि होतं, पण साधनांचा अभाव लक्षांत येण्याजोगा होता.

एक दिवस आम्हा दोघींना एका डॉक्टरांच्या बायकोनं चहाला बोलावलं. पोस्टमास्तर, शाळामास्तर अशा मंडळींच्या 'सुशिक्षित' बायकाच तिथें जमल्या होत्या. त्यांचं बोलणं ऊर्दूतून चालू असलं तरी संभाषणाची गोळाबेरीज

अमेरिकेंत बायकांच्या चहापार्टीला जी असते, तीच.—याला मूल झालं, तो मेला, अमकीचं लग्न झालं अन् तमकी भाजी महाग आहे—एवढंच.

व्हायोलेट ही एक तरुण भारतीय कार्यकर्ती 'इंडियन व्हिलेज सर्विस'च्या सातआठ कार्यकर्त्यांपैकीं एक होती. तिचं मुख्य क्षेत्र सार्वजनिक आरोग्याचं होतं. मरहेराच्या आसपासच्या खेडयांत मी व्हायोलेटबरोबर जात असें. लौकर उठून थोडंसं खाऊन बाहेर पडलं कीं एक वाजेपर्यंतचा वेळ आम्ही आमच्या कक्षेंत येणाऱ्या पांचापैकीं कुठल्या तरी एका खेडयांत घालवीत असूं. जिथें जिथें गरज आणि शिकण्याची इच्छा दिसली तिथें तिथें आम्ही आमचा मदतीचा हात पुढें केला. एखाद्या मुलाचे डोळे आलेले दिसले, कीं त्याला साधे उपचार, डोक्याला बांधण्यासाठीं चौकोनी रुमाल करणाऱ्या मुलीला हौस असली तर रेशमाचे टांके घालायला शिकवणें, एखादा सांथीचा रोगी मरण पावला, तर रोगप्रतिकार व निवारण कसं करावं हें सांगणं, असं साधं काम आम्ही करीत होतों.

'इंडियन व्हिलेज सर्विस' ही संस्था अमेरिकेंतील प्रेस्बिटेरिअन चर्चच्या साहाय्यानें काम करते. अंगीकृत कार्यांत मग्न असलेल्या दक्षिणेंतील लोकांप्रमाणेंच या लोकांतहि सेवाभाव हाच महत्त्वाचा होता, आणि म्हणूनच त्यांच्या कार्याला ख्रिश्चन म्हणणं यथार्थ होतं. त्याला धर्मप्रसाराचा वास क्वचितच येतो. गांवांत कुणीं विचारलंच, तर, किंवा एखादी गोष्ट पटवतांना चपखल दृष्टांत म्हणून बायबलमधली गोष्ट उपयोगी पडत असली तरच धर्माचा आणि ग्रंथांचा उल्लेख करण्याची वेळ येत असे.

त्यांचं साधं उद्दिष्ट म्हणजे खेड्यांतील नागरिकांना त्यांच्या सर्वोच्च विकासासाठीं त्यांच्या विशिष्ट परिस्थितींत सर्व मदत देऊं करणं. धार्मिक वृत्ति, तत्त्वानुसार भाषण आणि आचरण यामुळें संस्थेच्या सभासदांना प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. ती केवळ धर्मांतराच्या मागें लागलेल्या मिशनऱ्यांच्या वांट्याला कधींच येणार नाहीं.

भारतांत या क्षेत्रामध्यें काम करणाऱ्या इतर कार्यकर्त्यांप्रमाणेंच 'सर्विस'चे कार्यकर्तेहि प्रथम खेडुतांचा विश्वास संपादन करतात आणि मगच शेतीच्या पद्धतींत, अवजारांत ज्या कांहीं सुधारणा करायच्या असतील त्या सावकाश, लहान प्रमाणांत सुरू करतात. एकदां सुरुवात झाली कीं प्रगतिपथावर पावलं टाकत टाकत सहकारी संस्था, औषधोपचार केंद्रं, शाळा, येथवर गांवाचा विकास झाला कीं त्यांतील

पद्धशीरपणामुळें गांवकऱ्यांचं सक्रिय सहकार्य मिळतं आणि यश पदरांत पडतं.

या संस्थेतर्फे बऱ्याच सुधारणा करण्यांत आल्या होत्या. कॉंक्रीटनें बांधलेल्या विहिरी, गांवालगतची ट्यूब वेल या गोष्टी मला व्हायोलेटनं मोठ्या अभिमानानं दाखवल्या. या ट्यूब वेलच्या साहाय्यानं चारशें एकर जमिनीची सिंचाई होऊं शकते. नंतर मीं शेतं पाहिलीं. नव्याजुन्या पद्धतींची तुलना उभ्या पिकांतच स्पष्ट दिसत होती. चांगल्या दर्जाचं पीक दर एकरीं जास्त प्रमाणांत पदरांत पडलं तर नवीं सुधारलेलीं बियाणीं वापरण्याला कोण नाहीं म्हणेल ?

ग्रामसेवकांचं कार्य धिम्या गतीनंच चालणं अपरिहार्य आहे. ट्रॅक्टर, कापणी-यंत्रं यांसारखीं मोठालीं यंत्रं तेथें मुळींच नव्हतीं. पण नांगरणी, पेरणी, कापणी यांच्या पद्धतींत योग्य ते बदल करण्यांत आले होते. एरवींच्या व्यवहारांत सुद्धां बैलगाडीचीं चाकं जास्त काळ टिकण्यासाठीं धांवा बसवणं, कापणीच्या विळ्याचं पातं, बोटं जमिनीवर घांसून इजा होणार नाहीं अशा रीतीनं दांड्याला बसवणं, या आणि अशा गोष्टी सर्वांनीं उचलल्या. मग लोहाराला हीं नवीं कामं शिकावीं लागलीं.

वजनानं हलके आणि खोलवर नांगरट करणारे नांगर आतां गांवांतल्या गांवांतच तयार होतात. पूर्वीं शेणाचा उपयोग फक्त सरपणाकडेच होई, आतां कंपोस्ट खतासाठीं तें वापरलं जात होतं.

खेड्यांतील लोकांना त्यांच्या गरजांची जाणीव देऊन प्राप्त साधनांनीं त्या कशा पुरवाव्यात हें शिकवण्याचं कार्य तिथें प्रमुखतः चालत असे. त्याला हातभार लावण्याची संधि मिळाली याचा मला आनंद वाटला.

मरहेराला मी दहाबारा दिवस राहिलें. नंतर एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यांत वायजर्स मंडळींचा निरोप घेतला. मिसेस वायजर्स मला दहा मैलांवरच्या रेल्वे स्टेशनवर पोंचविण्यासाठीं आल्या होत्या. गाडीला नेहमींप्रमाणेंच गर्दी होती. तेथून बरेलीला आणि बरेलीला गाडी बदलून मी लखनौच्या गाडींत बसलें. संध्याकाळच्या सुमाराला लखनौ आलं.

लखनौ स्टेशन आधुनिक पद्धतीचं आहे. तेथून मी टांगा ठरवून ख्रिश्चन मिशनच्या 'इझबेला थॉबर्न' या मुलींच्या कॉलेजांत गेलें. कॉलेज स्टेशनापासून बरंच लांब होतं. फतेहपूर ह्या जवळच्याच खेड्यांत काम करणाऱ्या इंडिया

व्हिलेज सर्विसच्या बाई मला तिथें भेटल्या. त्यांच्याबरोबर एक आठवडा फतेहपूरमध्यें राहायचं असं ठरलं होतं.

कॉलेजमधून आम्ही लगेचच निघालों. पुढची दोनएक मैलांची वाट आम्हीं पायीं जायचं ठरवलं. मैलभर मोठ्या सडकेनं गेल्यानंतर आम्ही वळलों आणि रेल्वे लाईनच्या कडेनं थोडंसं चालून एका आमराईच्या बाजूला लागून असलेल्या फतेहपूरच्या पाऊल-वाटेला वळलों. दुतर्फा झाडांच्या रांगा होत्या. काकडीचे मळे दिसत होते.

आम्हांला पाहतांच गल्लीच्या तोंडाशीं खेळणाऱ्या मुलांनीं 'बहेनजी आयी है ऽऽ' अशी आरोळी ठोकून आमच्या आगमनाची वार्ता दिली. मोठीं माणसं हातांतलीं कामं बाजूला ठेवून पुढें झालीं. लहान पोरांनीं आमच्याभंवतीं गिल्ला करायला सुरुवात केली. बहेनजीला पाहून त्यांना फार आनंद झाला होता. आम्ही वळलों ती पाऊलवाट जिथें गांवांत शिरते त्याच ठिकाणीं बहेनजीचं घर होतं. शेणामातीच्या भिंती आणि गवताचं छप्पर हा घराचा थाट. खेड्यांतल्या बाकीच्या घरांहून वेगळं असं त्यांत कांहींच नव्हतं. उलट इतर घरांहून तें थोडं लहानच होतं. आंत दोन छोट्या खोल्या होत्या. एकींत दोन खाटा टाकलेल्या होत्या. तिथेंच धान्य, कपडे, पुस्तकें वगैरे सामान होतं. दुसऱ्या खोलींत आम्ही स्वयंपाक, जेवण उरकत असूं. बाहेरच्या पडवींत खेड्याचं छोटंसं वाचनालय होतं. मासिकं, पुस्तकं तिथें ठेवलेलीं असत. येण्याजाण्याला वेळेचं बंधन नसे. पडवीच्या दुसऱ्या बाजूला एका भिंतीच्या आडोशाला धुण्याचा दगड आणि आंघोळीची जागा होती. फतेहपूर मोठ्या शहराच्या इतक्या जवळ असून तिथें वीज नव्हती. रात्रींचीं गप्पागाणींसुद्धां अंधारांतच चालत. महागाईमुळें रॉकेलची दिवलीसुद्धां क्वचितच लागायची.

दुसऱ्या दिवशीं लौकरच बाहेर पडून बहेनजीनें कामाला सुरुवात केली. एका घरांतली बाई आजारी होती. तिला शहरगांवच्या दवाखान्यांत जाण्याचा सल्ला बहेनजीनं दिला. तें शक्य झालं नाहीं तर उपाय म्हणून एक औषध बहेनजीनं लिहून दिलं. त्या बाईचा मुलगा तें आणूं शकला असता.

दुसऱ्या एका घरामध्यें एका बाळंतिणीला नव्या बाळासाठीं कपडे बेतायला आणि शिवायला शिकवलं. एका छोटया मुलीच्या वाचनाच्या अभ्यासांत मदत केली...

आणि होतां होतां सारा गांव हिंडून झाला. अशा वैयक्तिक संबंधामुळें खेडुतांना तिच्याबद्दल विश्वास अन् आपुलकी वाटे. बहेनजीवर केव्हांहि विसंबतां येईल, या खात्रीनं ते अधिकाधिक प्रमाणांत बहेनजीचा सल्ला विचारायला येत.

रोज १२ वाजतां आम्ही जेवण्यासाठीं परत येत असूं. मग उन्हाचे वेळीं आम्ही बाहेर पडत नव्हतों. कांहीं वेळां गांवांतल्याच कांहीं बायका येत. कुणी लिहावाचायला, कुणी शिवणटिपण करायला तर कधीं नुसतंच बोला-बसायला. उन्हं कलल्यावर आम्ही पुन्हा फेरीला जात असूं, त्या दिवेलागणीला परत येत असूं. संध्याकाळच्या जेवणानंतर कांहीं लोक रेडिओ ऐकायला जमत असत. गल्लींतलीं पोरं खेळांत दंग असत. मग रात्रशाळा चालू होई.

स्वतःची जमीन असणारे मालक किंवा दुसऱ्याची जमीन खंडानं करणारीं कुळं हींच खेड्यांत जास्त. अगदीं थोडेच लोक मजुरीसाठीं शहरांत जात. मी गेलें तेव्हां गहूं आणि डाळींची पिकं तयार झालीं होतीं. तसंच फतेहपूरहून काकड्या, भोपळे, टोमॅटो वगैरे भरपूर भाजी शहराच्या बाजाराला जाई.

माझ्या तेथील छोट्या मैत्रिणींपैकीं राजकुमारी नांवाची एक छोकरी एक दिवस माझ्याकडे भरतकाम शिकायला आली. त्यांच्या मळ्याच्या बांधावर पाटाशेजारीं आम्ही बसलों. मधूनमधून पिकावर झेपावत असलेलीं पांखरं उडवण्यासाठीं तिला उठावं लागायचं.

मीं तिथल्या बायकांना भरतकाम शिकवलं आणि त्यांच्याकडून टोपल्या विणायला शिकलें. अशा सुंदर टोपल्या इतरत्र क्वचितच बघायला मिळतात. वायां जाणाऱ्या गवतकाडीला तांबडा, हिरवा, पिवळा असे कच्चे रंग देऊन त्याच्या सुंदर नक्षीच्या टोपल्या घरावरांतून बनवलेल्या दिसत. विशेष मेहनतीनं केलेल्या टोपल्या तर अहेरालासुद्धां वापरत.

बहेनजी अगदीं जीव ओतून काम करीत असे. तिच्या कामाचा गाभा तिच्या मनांतील तळमळीनं बनला होता. तिच्यासारखी खरीखुरी, अस्सल ख्रिस्ती धर्मानुयायी मीं दुसरी पाहिली नाहीं. तिनं फतेहपूरमध्यें निर्माण केलेली भावना जर भारतांतील प्रत्येक खेड्यांत दिसून आली तर काय बहार होईल! प्रगतीच्या इच्छेमधून निर्माण झालेला हा जीवनविषयक नवा दृष्टिकोन भारताचं रूपच पालटून टाकील.

## : १६ :

उत्तर प्रदेशांतील रायबरेली जिल्ह्यांत बर्खुर्दारपूर हें एक अगदीं लहान खेडं लखनौच्या नैऋत्येला वसलेलं आहे. वस्ती असेल शंभरएक घरांची. कुणाहि समाजसेवकाचीं, शेतकीविषयक तज्ज्ञाचीं पावलं अजून इकडे वळलेलीं नाहींत, किंवा कोठल्याहि समाजविकास योजनेंत याचा समावेश झालेला नाहीं. या खेड्यांत मी येण्याचं कारण म्हणजे शकूर. हें त्याचं जन्मस्थान. इथेंच तो लहानाचा मोठा झाला. त्याचं घर, जमिनी, कुटुंबीय मंडळी इथेंच असतात.

शांतिनिकेतनला जाण्यापूर्वीं शकूरचीं बायकामुलं मला दिल्लींत भेटलीं होतीं. शकूरची मोठी मुलगी सबरा बरीच आजारी होती. तिला दवापाणी करण्यासाटीं सर्वच जण आले होते. ती बरी झाल्यानंतरहि सबंध हिंवाळा त्यांनीं दिल्लींतच काढला. एप्रिलच्या सुरुवातीला सबरा, तिची आई, भावंडं, सर्वच जण परत गेले. कापणीचा हंगाम आला होता आणि सबराला आणि तिच्या आईला शेतावर कामं होतीं. या दोघी दिल्ली सोडून जाईपर्यंत आमची जानपछान चांगलीच वाढली होती. त्यामुळें बर्खुर्दारपूरला येण्याचं अगदीं आग्रहाचं आणि अगत्याचं निमंत्रण मला होतं.

मी निघालें ती फतेहपूरहून. बहेनजीच्या घरापासून लखनौपर्यंत टांग्यानं जाऊन पुढें मी रेल्वेनं गेलें. जैसपर्यंत रेल्वेचा प्रवास. मी नेहमींप्रमाणें तिसऱ्या वर्गाच्या बायकांच्या डब्यांत बसलें. तिथें मुसलमान स्त्रियांची बरीच गर्दी होती. उत्तर-प्रदेशांत मुसलमान वस्ती बरीच आहे. त्यांच्या बायका गोऱ्यापान आणि सुंदर असतात. घराबाहेर त्यांचा गोषा मात्र फार कडक असतो. घरीं किंवा फक्त स्त्री-समुदायांत असतांनाच त्या तोंडावरचा बुरखा बाजूला करतात.

जैस हें बर्खुर्दारपूरला सर्वात जवळ असलेलं रेल्वे स्टेशन. लखनौपासून शंभर मैलांहून कमीच अंतर असलेल्या या खेडेगांवांत पोंचायला तीन तास लागतात. ब्ऱ्याच ठिकाणीं थांबत थांबत गाडी जाते. पत्रानं मीं माझ्या येण्याची वेळ सबराला कळवली होती. त्यानुसार काकांना आणि कनीज या आपल्या धाकट्या बहिणीला घेऊन ती आली होती. गाडी स्टेशनांत शिरतांशिरतां मी दुरूनच सबराला ओळखलं, तें तिच्या ओढणीवरून. तिची लालचुटुक ओढणी ती दिल्लींत वापरत असे तेव्हां माझ्या चांगल्या ओळखीची झाली होती.

जैसला उतरून आम्ही घोड्याच्या एक्क्यामध्यें बसलों. रस्त्यावर गजबज अशी नव्हतीच. वाट अगदीं शांत होती. सुमारें तीन मैलांवर आम्ही कच्च्या सडकेला वळलों. हा रस्ता एका आमराईमधून जात होता. कापणी नुकतीच उरकली असल्यामुळें आसपासचीं शेतं मात्र अगदींच ओकीं ओकीं दिसत होतीं. पावसाची आतुरतेनं वाट पाहत होतीं. पण तो तर अजून दोन महिने दूर होता.

सबराचं जुनंपुराणं घर खेड्याच्या ज्या बाजूनं आम्ही शिरलों त्याच्या विरुद्ध बाजूच्या सीमेवर होतं. तें बहुधा तिच्या आजोबांनीं त्यांच्या उमेदींत बांधलं असावं. आम्ही घरीं पोंचलों, तेव्हां तिची आई पुढच्या अंगणांत काम करीत होती. मला पहातांच ती पुढें झाली. मोठा—सहा वर्षांचा उमताजहि पाठोपाठ आलाच. सर्वांत धाकटी चार वर्षांची मुमताज नुकतीच झोपेंतून उठवल्यामुळें माझ्याशीं बोलायला राजी नव्हती. तिची झोंप उघडून ती पुरती जागा झाल्यावर मात्र तिला तोंड फुटलं.

या सर्वांखेरीज घरामध्यें वडीलधारे असे आजोबा होते. त्यांची उंचनिंच देहयष्टि, पांढरीशुभ्र लांब दाढी, यामुळें त्यांचा रुबाब खानदानी वाटला. त्यांच्या मोठ्या मुलाखेरीज सर्वजण शहरांत कामधंद्यासाठीं गेले होते. कोणीं कारखान्यांत मजुरी करीत होते तर कोणी शकूरप्रमाणें घरकामाचे नोकर म्हणून लागले होते. तिकडेच त्यांचीं कुटुंबं वाढत होतीं. सबराचे हे मोठे काका मात्र घरची शेती पाहत. तसं पाहिलं तर ते कांहीं फार मोठे जमीनदार नव्हते. अवघी तीन एकर जमीन. पण तो तुकडा आणि बैलजोडी यांतच यांच्या जीवनाचा आधार होता. त्यांच्या आसपास स्वतःची जमीन असणारेच

मुळांत थोडे. भूहीनांना राबणुकीच्या मोबदल्यांत पिकाचा थोडा भाग मिळतो एवढंच.

त्यांची स्वतःची जमीन असली तरी त्यांना श्रीमंत म्हणतां आलं नसतं. त्यांची राहणीहि चारचौघांपेक्षां वेगळी नव्हती. दुष्काळांत इतरांपेक्षां त्यांना कमी झीज सोसावी लागे, एवढंच.

सबराचं घर मुसलमान पद्धतीचंच होतं. मध्यभागीं अंगण आणि तिन्ही बाजूनीं खोल्या. उन्हाची वेळ सोडली, तर चौकांतच सारा दिवस काम चालायचं. एका कोंपऱ्यांत चूल होती. अंगणांत कांहीं ना कांहीं वाळवण असे. खोल्यांचा उपयोग कोठी, कोठार यासाठीं करीत. एका खोलींत शेतीला लागणारी औजारं आणि इतर सामान होतं. एक खोली सबराची होती. तिला आपल्या खोलीचा फार अभिमान होता. तिची चौपाई, ट्रंक, इतरांच्या ट्रंका असं सामान तिथें असे. तिची टापटीप मोठी बघण्याजोगी असे. रात्रीं झोंपतांना सर्वांच्याच खाटा अंगणांत असत.

अंगणाच्या एका कोंपऱ्यांतून सांडपाण्याला वाट करून दिली होती. तें समोरच्या गल्लींत वाहत जायचं. फतेहपूरप्रमाणेंच इथेंहि वीज, नळ, मोरी या सोयी नव्हत्या. शेजारच्या विहिरीवरून पाणी ओढायचं अन् न्हाणीघरासाठीं शेताचा उपयोग करायचा. इथें लवकरच वीज येणार असल्याचं मला सांगण्यांत आलं. उत्तर पंजाबमधलं भाक्रा धरण ६५ सालच्या सुमारास पूर्ण झालं कीं पंजाब, राजस्थान, आणि उत्तरप्रदेश या प्रांतांमधील हजारों खेड्यांना तेथील कालव्यांच्या पाण्याचा आणि जलविद्युत्‌केंद्रांत तयार होणाऱ्या विजेचा लाभ होईल ही उद्यांची आशा आहे.

पण कृत्रिम प्रकाशाची गरजच भासत नसे फारशी. आपल्या मंदस्निग्ध प्रकाशानं सर्वांना झोंपेतून हलकेंच जागं करण्याचं काम तर पहांट स्वतःच करते. सूर्य उदयाचलावर येईपर्यंत स्वतःचं आंवरणं, झाडलोट वगैरे पारोशीं कामं सुरू होऊन गेलेलीं असायचीं.

सबरा उठल्यापासून कामाच्या चक्रांत असे. केरवारे करणं, रात्रभर पाटीखालीं झांकून ठेवलेल्या कोंबड्यांना दाणे घालणं, रात्रींच्या स्वैंपाकाचीं भांडीं घांसणं, विहिरीचं पाणी भरणं, अशा कामांचा ती झपाट्यानं उरका पाडत असे.

हीं कामं तिच्या बरोबरीनं करणं मला फार आवडत असे. ती न कुरकुरतां आपणहूनच हीं कामं नित्यकर्म म्हणून उरकत असे.

लहानग्यांची जड झोंप उघडायला मात्र वेळ लागत असे. उठलं कीं तोंडं धुवून थोडीशी न्याहारी. त्यांचं होईपर्यंत आम्ही दोघी कामांत असायच्या. मुलांबरोबरच काका आणि आजोबा या दोघां वडील पुरुषांचीहि न्याहरी होत असे. त्यांचं झालं कीं आम्ही दोघी. सर्वांत शेवटीं उरलंपुरलं पाहून सबराची आई बसत असे. नंतर कनीज आणि उमताज शाळेला जात आणि मोठीं माणसं शेतावर जात.

सकाळ कशी घालवावी हा प्रश्नच नसे. बरींच कामं असायचीं. धान्य निवडायचं, भल्यामोठ्या दगडी जात्यावर तें दळायचं काम असे. दुपारच्या स्वैंपाकाची तयारी हें मोठंच काम. शिवाय धुणं, थोडंफार शिवणटिपण हेंहि असे. अगदींच कांहीं उद्योग नसला तर गप्पा असतातच.

एक अमेरिकन मुलगी सबराच्या घरीं आली आहे ही बातमी कळतांच तिच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांची ये जा अधिकच वाढली. प्रत्येकजण चौकस दृष्टीनं अन् बऱ्याच अंशीं परकेपणाच्या भावनेनं माझ्याकडे पहात होता. माझ्या कातडीचा आणि केंसांचा रंग, केंसांची लांबी हें सारं त्यांना अनोळखी होतं. असं मनुष्य यापूर्वीं बहुतेकांनीं पाहिलेलं सुद्धां नव्हतं. या नवाईमुळें माझ्यासंबंधीं केवळ कुतूहल होतं त्यांना. परिचय करून घेण्याजोगी त्यांच्यासारखीच मी एक व्यक्ति आहें या दृष्टीनं माझ्याकडे कुणींच पाहत नव्हतं. ही त्यांची वागणूक साहजिकच वाटली मला.

माझ्या आणि सबराच्या वयाच्या मुली मात्र माझ्याशीं मोकळेपणानं वागल्या. मी आलें त्या दिवशीं असाच एक घोळका अंगणांत जमला होता. मी त्यांच्याशीं थोडं बोलण्याचा प्रयत्न करीत असतांनाच सबरानं मला कोंपरखळी देऊन सुचवलं कीं इथल्यापेक्षां जर सगळ्याजणी कोठाराच्या छपरावर जाऊन बसलों तर अधिक गंमत करतां येईल.

मुलींची प्रश्न विचारण्याची एकच घाई. मी कुठून आलें, कां आलें, इथें कशी आलें, मला भावंडं किती, माझं लग्न झालंय का—एक ना दोन.

त्या सगळ्याजणी सबराप्रमाणेंच नाकांत सोन्याच्या चमक्या घालत. सबरा

दिल्लीला आली होती तेव्हां तिनं चमकी घातली नव्हती. ती म्हणाली कीं चौदापंधरा वयाच्या उपवर मुली चमकी घालतात.

नंतर त्यांच्या गप्पा लग्नाच्या विषयाकडे वळल्या. हिचं लग्न ठरलंय्—ती माहेरीं आली आहे, तिची सासू स्वयंपाकांत कांहीं चुकलं कीं तिला मारते म्हणे! त्या सर्वजणींनीं ठरवून टाकलं कीं सासूसमोर उभं राहायची वेळ येण्याआधींच स्वयंपाकांत तरबेज होऊन जायचं.

या मुली जरी मुसलमान होत्या तरी खेड्यामध्यें त्यांच्यापैकीं कुणींच बुरखा घेत नसत. मात्र साऱ्याजणी एकजात डोक्यावरून ओढणी घेत. दिल्लींत असतांना तशी ओढणी घ्यायला मी शिकलें होतें.

सबराच्या घरांत मी हिंदुस्थानी बोलत असें. पण या खेड्यांतील लोकांच्या भाषेंत ऊर्दूचं मिश्रण जास्त होतं. त्यामुळें मी कांहीं वेळां गोंधळून जायची. त्यांच्या संभाषणाची फक्त गोळावेरीजच ध्यानांत यायची.

शाळा संपवून मुलं दहा साडेदहापर्यंत घरीं परत यायचीं. स्वयंपाक कधींचा होऊन पडलेला असायचा. आभाळाचा डोंगर चढून थकलेला सूर्य माथ्यावर आला कीं आम्ही जेवायला बसत असूं. रोटी हा पोळीच्याच जातीचा प्रकार अन् बटाटे, अंडीं, किंवा इतर कुठल्या तरी भाजीचा रस्सा हें प्रमुख जेवण. रस्सा खूप मसालेदार असे. लहान मुलांसाठीं दूध असायचं. भात मात्र अधूनमधूनच असे.

भाज्यांच्या बाबतींत फतेहपूरचं अगदीं दुसरं टोक होतं इथें. ताजी भाजी कांहीं दृष्टीला पडत नसे. एखादा फेरीवाला आलाच तर अवाच्या सवा किंमती सांगायचा. ताज्या भाज्या आणि फळं यांच्या बाबतींत आहार अत्यंत अपुरा असे. त्याखेरीज इतर घटक मात्र ठीक असत. जेवणांत बदल फारसा नसे. मात्र मला अतिशय आवडलेल्या भारतांतील जेवणांपैकीं बर्खुर्दारपूरचं जेवण आहे.

जेवण झालं कीं दोनतीन तास विश्रांति. पांच वाजतां सबरा शेजारच्या घरीं हिंदी शिकायला जायची. एक दिवस तिची शिक्षिका खेड्यांतील वैद्यकीय मदतीच्या अभावाबद्दल आणि मोठी शाळा नसल्याबद्दल रागारागानं तक्रार करीत होती. ती मला म्हणाली, 'ताईसाहेब, तुम्ही शिक्षण संपवलं कीं इथेंच

परत या, अन् आमच्यासाठीं शाळा अन् दवाखाना सुरू करा.' या बाईचा मुलगा मुंबईच्या कॉलेजांत वैद्यकाचा अभ्यास करीत होता, यावरूनच इतरांच्या मानानं ती सुखवस्तु होती याचा अंदाज बांधतां येण्याजोगा होता. खरं म्हणजे स्वतःच या दोन्ही गोष्टी सुरू करण्याचं सामर्थ्य तिच्या अंगीं होतं. पण मीं विचारलं तेव्हां तिनं कांहींतरी गुळमुळीत उत्तर दिलं. अशा गोष्टींसाठीं स्वतः पुढें होण्याऐवजीं इतरांच्या ओंजळीनं पाणी पिण्याची कांहीं लोकांना संवयच जडली आहे.

आतां या बाईचा मुलगा शिक्षण संपल्यावर कामासाठीं आपल्या खेड्यांत परत येईल किंवा नाहीं याची शंकाच आहे. शहरामधल्या झगमगत्या रोषणाई-पुढें हे मागासलेले, काजळलेले घासलेटाचे दिवे त्याला तुच्छ वाटत असणार. नव्यानं डॉक्टर झालेल्या मुलांचा सर्व जगभर हाच दृष्टिकोण असतो. भारतांत आज अत्यंत आवश्यक असलेल्या त्यागवृत्तीची दीक्षा घेण्याऐवजीं हा मुलगा जर इतरांप्रमाणेंच उथळ विचारांचा राहिला तर शहराच्या कोलाहलांत खोऱ्यानं पैसे ओढणाऱ्या डॉक्टरांच्या मेळ्यांत तो जाऊन बसणार आणि त्याच्या खेड्याची दैना तशीच राहणार हें उघड आहे.

सबराची शिकवणी संपल्यावर आम्ही फिरायला किंवा लोकांकडे भेटायला जात असूं. सबराच्या घराच्या मागेंपुढें आमराई होती. उमताज आणि मुमताजच्या टोळ्या कैऱ्यांवर नजर ठेवून अधूनमधून हल्ले चढवत. त्यांच्या तडाख्यांतून वांचलेल्या खालीं पडलेल्या कैऱ्यांची आम्ही पुष्कळदां चवदार चटणी करीत असूं.

घराच्या मागच्या बाजूला दूरवर कापणी झालेलीं शेतं होतीं. दुसऱ्या बाजूला खळं होतं. तिथें मळणीचं काम चालू असे.

सूर्य अस्ताचलावर टेंकला कीं संध्याकाळचं जेवण. नंतर अंगणांत गाद्या घालून दरवाजे बिरवाजे बंद करून आम्ही चिडीचूप झोंपून जात असूं. सबराचे काका धान्याजवळ झोंपायचे. आजोबा मुमताजला घेऊन कोठारावरच्या धाब्या-वर झोंपत.

मला या राहणींत अन् जीवनांत किती मजा वाटत होती तें मुद्दाम वर्णन करण्याची गरज नाहीं. ते दिवस चटकन् निघून गेल्यामुळें मला फार वाईट

वाटलं. तिथें गेल्याच्या चौथ्या दिवशीं माझे डोळे आले. फतेहपूरला मी खुपऱ्या झालेल्या मुलांची शुश्रूषा करीत असें त्याच्या संसर्गानें हें झालं असावं. एकदोन घरगुती औषधांचा उपचार झाल्यावर मी सब्राच्या काकांबरोबर जैसला गेलें. एक सायकल आणि गॉगल्स कुठून तरी मिळवले अन् सरकारी दवाखान्यांतून औषध आणलं. तेथील डॉक्टरांनीं इतरांप्रमाणेंच मलाहि मोफत तपासलं.

सब्राच्या कुटुंबांत माझे पहिले तीन दिवस जितक्या मजेंत गेले, तसे कांहीं पुढचे तीन दिवस गेले नाहींत. सूर्यप्रकाशांत मला डोळे उघडतां येत नसत त्यामुळें सब्राच्या खोलीबाहेर पडणं अशक्य होतं. सर्वांत दुःखाची गोष्ट म्हणजे घरांत मला इकडची काडीसुद्धां तिकडे करतां येत नव्हती.

बर्खुर्दारपूरला माझं नवं घरच होतं जणुं. तें मी फारच नाराजीनं सोडलं. मी भारतांत जे दिवस अत्यंत आनंदांत घालवले त्यांपैकीं हे आठ दिवस होत.

बर्खुर्दारपूरला शेतीच्या आणि आरोग्याच्या नव्या तंत्राचा गंधहि नव्हता. ट्यूबवेल्, खतासाठीं खड्डे, व्यवस्थित बांधणीचीं गटारं...कांहींच नव्हतं. सब्रा ज्या विहिरीचं पाणी पिण्यासाठीं आणीत असे, तिचं तोंड झांकलेलं नव्हतं. साधा बांधहि नव्हता. काटक्या, केरकचरा सहज आंत लोटला जाई. सांडपाणी गल्लींतच वाहत असे. सब्राचे काका आपल्या वाडवडिलांपासून चालत आलेली शतकानुशतकांची जुनी पद्धत वापरून शेतं पिकवीत. पावसाच्या लहरीवर पिकाची आणेवारी ठरायची.

मी सब्राच्या काकांना इंडियन व्हिलेज सर्विसच्या खेड्यांमधून असलेलीं सांडपाण्याचीं पक्कीं गटारं आणि कुंड्या यांची माहिती दिली. पण ते म्हणाले, 'तें सारं खरं बेहेनजी, पण एवढा खटाटोप हवा कशाला? उगाच पैसा ओतायचा, वेळ घालवायचा आणि अर्थाअर्थी फायदा कांहींच नाहीं कुणाचा.'

भारताच्या पंचवार्षिक योजनेंत, ज्याला प्रागतिक दृष्टिकोन असं म्हणतात त्याचा त्यांच्यापाशीं अभाव होता. यामधून निर्माण होणारी व्यापक सामाजिक आंदोलनाची जाणीव असल्याखेरीज राष्ट्राच्या नव्या घडणीच्या कार्यात यश मिळणं कठीण. ही जाणीव सेवाग्राम, फतेहपूर, मरहेरा या ठिकाणांहून पसरत होती खरी, पण या ठिकाणीं तिचा संपूर्ण अभाव होता.

अशीच अवस्था बहेनजी जाण्यापूर्वी फतेहपूरचीहि होती. मी अन् व्हायोलेट ज्या खेड्यांत जात होतों, त्यांपैकींहि कांहीं ठिकाणीं हीच स्थिति होती. तिथल्या बायकांना मी कोण आहें आणि माझं लग्न झालं आहे कीं नाहीं—या चौकशां-पलीकडे कांहीं नवं जाणून घेण्याची इच्छा नव्हती. फार काय, लहान मुलांमध्यें सुद्धां "मला नवं शिकायचं नाहीं" या वृत्तीचीं बीजं रुजलेलीं दिसत. बख्तुं-दारपूरमध्यें ग्रामसेवकांपुढें इतर ठिकाणांप्रमाणेंच समस्या उभ्या राहतील. इंडियन व्हिलेज सर्विसचे कार्यकर्ते, चौलामधील परिचारिका, भारताच्या इतर भागां-तले ग्रामसेवक त्यांना यशस्वी रीत्या तोंड देत होते. नवमूल्य स्वीकारण्याची अनिच्छा आणि एक प्रकारची जडता हेच मोठे अडथळे आहेत. आपण राहतों त्यापेक्षां नुसतं वेगळं नव्हे तर अधिक चांगलं राहावं ही आंतरिक प्रेरणा देखील कशी दिसत नाहीं? अशी सर्व कार्यकर्त्यांची तक्रार असते.

हें पाहून कांहीं जण उतावीळपणें म्हणतात 'छे हो! कांहीं अर्थ नाहीं यांत. या लोकांनाच शिकायला नको. त्यांना शिकवत बसणं हा वेळेचा शुद्ध अपव्यय आहे. त्यांना अज्ञान आणि दारिद्र्य यांतच खितपत पडून मरायचं असलं, तर तर मरेनात बेटे!'

पण बहेनजी, व्हायोलेट आणि इंडियन व्हिलेज सर्विसचे इतर कार्यकर्ते याकडे वेगळ्या दृष्टिकोनांतून पाहतात. ज्यानं आपले वाडवडील उभ्याउभ्याच बीं विखरून पेरतांना पाहिले आहेत, त्याला पद्धतशीर, वाफेवार, ओळीनं बीं पेरण्यांत कांहीं फायदा आहे हें पटावं अशी अपेक्षा आपल्याला करतां येईल का? अनुभवसिद्ध नसलेल्या नव्या पद्धति कामाच्या भाऊगर्दींत राबबून नसतं अवलक्षण करून घेण्याचा धोका कोण पत्करील?

दवाखान्यांत गेलेलीं सर्व माणसं ज्यानं दगावलेलींच पाहिलीं आहेत, त्यानं गंभीर आजारांतहि रुग्णालयांत जाणं नाकारावं हें साहजिकच नाहीं का? दवाखान्यांत मिळणाऱ्या मदतीची ज्यांना कल्पनाच नाहीं, त्यांना त्याचं मोल पटवून देण्याचं कार्य कुठल्याहि राष्ट्रांत झालं तरी फार कठीण आहे.

जंतू हा प्रकार ज्यानं कधीं पाहला ऐकला नाहीं, त्याला नुसतं नितळ निवळलेलं पाणी आरोग्याच्या दृष्टीनंहि स्वच्छच वाटणार. आज आपण एक

अमेरिकेंत याबद्दल सारखं ऐकत असतों, पण जर आपल्याला त्याची अजिबात माहिती नसती, तर न दिसणाऱ्या, पण आजार आणणाऱ्या जंतूंवर आपला तरी विश्वास बसला असता का? मग आपण आजाराची जिम्मेदारी अर्थातच देवावर टाकली असती. चौलांतील लोकांनीं नव्हता का टायफॉईडचा संबंध दैवी कोपाशीं जोडला!

बहेनजी किंवा व्हायोलेट विचारतील, चोहों बाजूंनीं घनदाट अरण्यानं वेढलेल्या एका लहानग्या खेड्यांत आपण आहोंत अशी कल्पना करतां येईल तुम्हांला? तुमच्या लेखीं जगाची परिमितीच त्या खेड्याएवढी. तुम्ही कधीं त्या खेड्याबाहेर पडलां नाहींत, स्वतःच्या चिरपरिचित राहणीखेरीज वेगळा प्रकार पाहिला नाहीं. तुमचे आजोबा, त्यांच्या पिढीचे सारेच वयस्क आणि प्रतिष्ठित लोक एकाच तऱ्हेनं शेती करतात. तेवढा एकच प्रकार तुम्हांला माहीत. मग याहून वेगळ्या पद्धतीनं शेती करतां येते ही शक्यताहि तुम्ही ग्राह्य मानणार नाहीं.

अशा वेळीं नवी पद्धत केवळ वेगळीच नव्हे तर अधिक चांगलीहि आहे, हें तुम्हांला पटेल का? तुमच्या अवजारांत आणि पद्धतींत आमूलाग्र बदल सुचविणाऱ्या तिऱ्हाइताकडे तुम्ही संशयानं, अविश्वासानं पाहणार नाहीं का? एवढंच कशाला, तुम्ही तर कदाचित् विरोधहि कराल.

भारतीय खेड्यांत ही निद्रावस्था शतकानुशतकांची आहे. आतां कुठें स्वातंत्र्य मिळाल्यानंतर समाजांत जागृति होते आहे. आपल्या संकुचित क्षेत्रांतील लाभाबद्दलची अल्पसंतुष्टता जाऊन नव्या गरजांची जाणीव व त्या पूर्ण करण्याची इच्छा निर्माण होऊं लागली आहे.

ही जागृति रोमांचकारी आहे. द्वितीय पंचवार्षिक योजनेनुसार १९६१ सालीं प्रत्येक खेड्यांत नवी शेती, वैद्यकीय उपचार केंद्रं, सार्वजनिक आरोग्यरक्षण आणि शाळा या गोष्टी दिसून येतील. खेड्यांच्या उन्नतीसाठीं होणाऱ्या प्रयत्नांत समाजविकास योजना प्रमुख साधन आहे. एक लाख खेड्यांतील सुमारें ७० लाख लोकांसाठीं सध्यां काम सुरू झालं आहे.

पंचवार्षिक योजनेंत वीज आणि कालवे यांसाठीं पुष्कळ धरणयोजना आहेत. त्यांचा अग्रमान भाक्रा-नानगलच्या योजनेकडे जातो. मनजित् या शांतिनिकेतन-

मधल्या माझ्या मैत्रिणीचे वडील त्या कामावरच ओव्हरसिअर होते. तिथें एक आठवडा तरी येण्याचं मला आमंत्रण होतं.

... ... ...

माझे खुपरे डोळे लवकरच बरे झाले अन् मला मनजितचं आमंत्रण स्वीकारतां आलं.

आज दहा वर्षांखालीं मनजित्च्या घराच्या आसपासचा, पूर्व पंजाबमधील होशियारपूरचा, हिमालयाच्या पायथ्यापासचा प्रदेश तुरळक खेडीं सोडलीं तर ओसाडच होता. शाळा, दवाखाने, व वेगवेगळ्या धर्मांचीं मंदिरं यांनीं गजबज-लेलं नानगल शहर तेव्हां जन्मलंहि नव्हतं.

१९४७ मध्यें फाळणीनंतर शीख आणि हिंदूंचा जो लोंढा पूर्व पंजाबमध्यें शिरला त्यांनीं होशियारपूरच्या ओसाडींतून पोटाला भाकर कमवण्याचा प्रयत्न केला. भाक्रा नानगलच्या प्रचंड योजनेंत इंजिनिअर, ड्रायव्हर, मेकॅनिक, मजूर अशा वेगवेगळ्या जागांवर पुष्कळ निर्वासितांना काम मिळालं आहे. धरणाच्या कामीं लागलेल्या यंत्रशक्तीचा आवाज आज नानगलमध्यें घुमत आहे.

मी तिथें होतें तेव्हां भाक्रा येथील सुरुवातीचं बांधकाम पुरं होत आलं होतं. ही योजना पूर्ण होऊन जेव्हां पंजाबभर कालव्यांचं जाळं पसरलं जाईल, तेव्हां या भागांतील पाणीपुरवठ्याची योजना सध्यांच्या समस्येला यशस्वीपणें तोंड देऊं शकेल, आणि उत्तर भारतांतील राज्यांमधल्या हजारों खेड्यांना वीज-पुरवठा होईल. ही योजना पाणीपुरवठ्याच्या दृष्टीनें सर्व जगांत मोठी आहे आणि धरणाच्या भिंतीची उंची फक्त अमेरिकेंतील हूवर धरणापेक्षां कमी राहील.

या कोरड्या ठणठणीत प्रदेशावर ह्या किमयेचा हात फिरतांच त्याचा संपूर्ण कायापालट होऊन नवजीवनाचं संगीत तेथें ऐकूं येईल.

आपली स्थावर इस्टेट पाकिस्तानांत मागें सोडून मनजित्चं कुटुंब आलं होतं. तिच्या वडलांना याच योजनेंत काम मिळालं होतं.

कामापासून दहा मैलांवर त्यांचं घर होतं. रात्रंदिवस काम चालू असे. एखाद्या ट्रकच्या किंवा बुलडोझरच्या आवाजानें रात्रीं जाग आली कीं नवजागृतीच्या जाणीवेची शिरशिरी अंगांतून जात असे.

कामाच्या जागांवर ठिकठिकाणीं तात्पुरत्या राहत्या घरांची सोय केली आहे. भाडं, विजेचं बिल, माफ असतं. हीं घरं मोठ्या कुटुंबांना अपुरीं वाटत असलीं तरी एकूण बरीं होतीं. मनजित्च्या घरांत दोन बसण्याउठण्याच्या खोल्या, एक कोठी, एक लहान स्वयंपाकघर आणि अंगण एवढी जागा होती. अंगणांत गायगोऱ्हा होता. ती जागा फारच एकीकडे होती. आसपास अगदींच थोडीं घरं होतीं. सर्वांत जवळचं शहर ९ मैल लांब होतं.

मी मनजित्बरोबर एक अठावडा होतें. तिलाहि उन्हाळ्याची सुटी लागली होती. आम्ही घरांतल्या घरांतच सारा दिवस कांहींतरी उद्योग करीत वेळ घालवीत होतों. उन्हामुळें आणि डोळ्यांमुळें बाहेर जाणं शक्यच नव्हतं. भाक्रा आणि नानगल या दोन्ही ठिकाणीं आम्ही एकेक दिवस जाऊन आलों. नानगलमध्यें योजनेवरचे बरेच अधिकारी व कामगार राहतात. तें चांगलंच गजबजलेलं शहर आहे.

आठ दिवस मजेंत घालवून मी मनजित्चा निरोप घेतला. सीमेंटचीं रिकामीं पोतीं ट्रकनें नेणाऱ्या धिप्पाड निर्वासित शिखानं मला स्टेशनपर्यंत पोंचवलं. मी संध्याकाळीं दिल्लींत पोंचलें.

: १७ :

बर्खुर्दारपूरहून येऊन मनजित्कडे जाण्यापूर्वी मी जवळजवळ तीन आठवडे दिल्लींत होतें. माझे खुपरे डोळे निवळायला तेवढा अवधी लागलाच. या काळांत दिल्लींत माझं पालकत्व पत्करलेल्या जीन जॉईस यांच्या घरीं मी राहिलें. जुन्या दिल्लींतील एका इमारतींत त्या राहतात. तिथें दिल्लींत कांहीं कामानिमित्त आलेले बरेच अमेरिकन लोक राहतात.

जिनीबाई दिवसभर कामांत असायच्या, त्यामुळें मी दिवसां रेटंडन रोडवरच्या आमच्या पहिल्या घरीं जायची. शकूर आणि आवारांत राहणाऱ्या इतर लोकांच्या सहवासांत वेळ कसा चुटकीसरशीं जायचा. मी बहुधा सकाळीं जाऊन दिवसभर तेथें राहून दुपार उलटल्यावर डॉक्टरांकडे जात असें. सध्यां त्या सर्वांना अर्धी सुटी होती. अमेरिकेचे भारतांतील नवे वकील श्री. जॉर्ज ॲलन अद्याप आले नव्हते. त्यांच्या स्वागताची सर्वजण तयारी करीत होते.

घराच्या कंपौंडमध्यें नोकरमाणसं दाटीवाटीनंच राहायचीं. ८×१५ च्या खोल्यांमधून एकूण नऊ कुटुंबं राहत असत. अंगण आणि मोरी सार्वजनिक होती. इतक्या निकट सहवासांतहि त्यांच्यामधले धार्मिक किंवा भाषिक भेद कधीं डोकं वर काढत नसत.

शकूरचीं बायकोमुलं गांवाला गेल्यामुळें सध्यां तो एकटाच राहत असे. तो मुस्लीम होता. त्याची मातृभाषा ऊर्दू होती. किशोरलाल हिंदू तरुण होता. मोठा भला माणूस. त्याची बायको आणि चार मुलं तेथेंमजेंत राहत. त्याची बायको फारच आनंदी आणि उत्साही बाई होती.

सुषेण हा स्वैपाकी होता. तो आणि त्याची बायको हे पूर्व बंगालमधील

बौद्धधर्मीय होते. मी त्याच्या बायकोला दीदी (म्हणजे मोठी बहीण) म्हणत असें. ती दिसायला आकर्षक होती. केंसांचा तेल लावून चापूनचोपून अंबाडा घालत असे ती.

ड्रायव्हर जीवन आणि त्याची बायको दोघेंहि वयस्क होतीं. ते शीख लोक. त्यांचं गांव पंजाबच्या समाजविकास योजनेमध्यें समाविष्ट झालेलं होतं. तीं दोघं पंजाबी भाषा बोलत. जीवनची बायको शांत, प्रेमळ अशी होती. 'तूं काय, माझ्या मुलीसारखी आहेस' असं ती एकदां मला म्हणाली. ती सलवारखमीस घालीत असे.

दोघे माळी हिंदू होते. त्या दोघांचींहि कुटुंबं उत्तर प्रदेशांत होतीं. त्यांच्यापैकीं जो मोठा होता त्याची बायको मोठी बडबडी आणि विनोदी होती. ती उन्हाळाभर दिल्लींत होती. ती जाड्याभरड्या साड्या नेसायची आणि खास खेडेगांवी पद्धतीचे चांदीचे भारंभार दागिने घालायची. तिचे जड पैंजण जातां येतां छुनुक् छुनुक् वाजायचे. एक दिवस किशोरलालच्या मुलीला आणि मला तिनं त्या पैंजणांचे घट्टे दाखवले.

मदन हा हिंदू हरिजन होता. त्याच्यापाशीं त्याचा मुलगा आणि सून असत. माळ्याप्रमाणेंच त्याची मातृभाषा देहाती हिंदुस्थानी होती. तो भंगीकाम करीत असे. सर्व तऱ्हेची स्वच्छता करण्याचं काम त्याचं. फरशा पुसायच्या, केराचे डबे टाकायचे, अंगणाची झाडलोट करायची हें त्याचं काम. बाकीचे सहकारी त्याला जरी अपमानास्पद रीतीनें वागवत नसले, तरी केवळ जन्मामुळें त्याला तुच्छ, कनिष्ठ मात्र लेखत.

आम्हीं जेव्हां सांगितलं कीं आम्ही सर्वांना समानतेनं वागवणार, तेव्हांच मला कांहीं मुलांनीं मला मदनच्या घरीं अन्नपाणी न घेण्याबद्दल बजावलं होतं.! आम्हीं त्यांच्यांत समभाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला, तरी पिढ्यान्‌पिढ्यांचे संस्कार असे वर्षा दोन वर्षांत थोडेच पुसले जाणार?

निसार हा रखवालदार शकूरप्रमाणेंच मुसलमान होता. त्याचंहि घर उत्तरप्रदेशांतच होतं. त्याचीं बायकामुलं अगदीं थोडेसेच दिवस त्याच्याबरोबर होतीं. शरिरानं तो चांगला उंच धिप्पाड होता अन् त्यानं दाढी राखली होती. त्याच्या चेहऱ्यावर देवीचे खूप व्रण होते.

आमचा धोबी बद्रीप्रसाद हा हिंदू होता. त्याला तीन मुलगे होते. त्याचं घर आग्र्याला—ताजमहालच्या गांवीं—होतं. आमच्या आसपासच्या दोनतीन घरचीं धुणीं तो करायचा. त्याच्या धुण्याच्या हौदांत उन्हाळ्याच्या दिवसांत लहान पोरं खुशाल डुंबत बसायचीं. त्याच्या इस्त्रीचं काम त्याची बायको झगझगीत निखारे घातलेल्या खूप मोठ्या इस्त्रीनें उरकत असे.

अर्थात् माझी खरी दोस्ती लहान मुलांशींच होती. किशोरलालच्या मुलीचं नांव होतं शांति. अवघी तेरा वर्षांची होती ती. सुदृढ अन् सुंदर! धाकट्या भावाला संभाळून शिवाय स्वयंपाक, झाडलोट यामधें तिला मदत करावी लागे. तिचे केंस लांबसडक, भरपूर आणि काळेभोर होते. तिची वेणीफणी म्हणजे मोठाच उपव्याप होता.

शांतीचा भाऊ प्यारेलाल. तो दहाएक वर्षांचा असेल. रोज सकाळीं स्वच्छ कपडे घालून शाळेंत जाण्यासाठीं तो तयार झालेला दिसायचा. शाळा संपली कीं चांगले कपडे नीट खुंटीवर काढून ठेवून तो मागच्या गल्लींत धोब्याच्या मुलांशीं खेळायला जायचा.

शांतीची धाकटी बहीण लीला सहा वर्षांची होती. मुलीच्या जन्मांत हाच काळ निर्वेध स्वच्छंदाचा असतो. सध्यां रीतीभातीचा धरबंध नसल्यानं तिचा धुडगूस चालू असे. एक अर्धी चड्डी अडकवून ती सगळीकडे फिरत असे. अशानं किती रापली होती ती! शांति जेवढी जबाबदार, तेवढी ही बेधडक वृत्तीची. सर्वांत धाकटा अशोक कुमार फक्त सहा महिन्यांचा होता. अगदीं गोड्या होता तो. खूप खेळायचा.

भगवानदास हा बद्रीप्रसादाचा मुलगा. तो शांतीच्याच वयाचा. तिच्याप्रमाणेंच त्याला घरकामांत वांटा उचलावा लागे. वडलांना धुण्याच्या कामीं आणि आईला इस्त्री करतांना तो मदत करीत असे. शिवाय प्यारेलालप्रमाणें त्याच्यामागें शाळाहि होती. इंग्लिशचे धडे मला धडाधड वाचून दाखवण्यांत त्याला फार अभिमान वाटत असे. त्याचा धाकटा भाऊ बाबूलाल अकरा वर्षांचा होता. पण सगळीकडेच धाकट्या भावांची जी स्थिति असते, तीच याचीहि होती—भगवानदासच्या दादागिरीपुढें त्याला नमतं घ्यावं लागे. त्यांचा सर्वांत धाकटा भाऊ रामदास दोन वर्षांचा होता. तो सारखा आजारी

असे. पण तो मला फार आवडायचा. त्याला वेळच्या वेळीं चांगलं औषध-पाणी मिळावं म्हणून आईनं खूप सांगून पाहिलं, पण त्याच्या आईवडिलांचा औषधांवर फारसा विश्वास नसे, पुन्हा हॉस्पिटलमध्यें येण्याजाण्यासाठीं लागणाऱ्या खर्चाचा प्रश्न होताच. या सगळ्या प्रकारांत तो बिचारा तसाच खुरटा राहिला.

कांहीं वेळां मुलांचं बाळपण संपूंच नये, अन् मोठेपणाच्या जबाबदाऱ्या त्यांच्यावर पडूंच नयेत असं मला वाटे. माझ्याशीं लहान मुलं मोठ्या बहिणीशीं वागावं तशीं वागायचीं, तर मोठीं माणसं मला त्यांच्या कुटुंबांतीलच लहान व्यक्तीप्रमाणें वागवत. शकूर तर मला धाकटी बहीणच म्हणायचा.

या साऱ्यांच्या आतिथ्यशीलतेला मर्यादाच नव्हती. कुणीं जेवायला, तर कुणीं दुपारचं बसायला, चहाला, सारखा आग्रह करीत. एकदोनदां तर मी शांतीकडे रात्रीची झोंपायलाहि गेलें होतें.

या साऱ्याची परतभेट करावी म्हणून मी मुलांना खाऊ आणायची, सायकलवरून बाजारांत, शाळेंत ने-आण करायची, एखाददिवशीं सहजच फिरवून आणायची, किंवा घरांत माझ्याच्यानं जमेल तेवढी मदत करायची. पण जगांतल्या कुठल्याहि भेटीनं त्यांच्या अगत्याचा आणि आदरातिथ्याचा मान होणार नाहीं. माझं प्रेम ही एकच चीज त्याच्या बदल्यांत मी देऊं शकतें.

याच्या अगदीं विरुद्ध वातावरणांत दुसरा आठवडा गेला. सुशीला बेनच्या मैत्रिणींनीं मला त्यांच्याबरोबर काश्मीरला नेण्याची तयारी दर्शवली. दर उन्हाळ्यांत हिमालयाच्या पायथ्याशीं डोंगराळ भागांत सुटी घालवण्याचा त्यांचा परिपाठ होता.

दिल्लीहून आम्ही गाडीनं पठाणकोटकडे निघालों. हें रेल्वेचं उत्तरेकडचं टोंक. दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्ही तिथें पोंचलों. तेथून श्रीनगरपर्यंत मोटारीनें गेलों. श्रीनगर हें काश्मीरच्या राजधानीचं शहर पठाणकोटपासून २६५ मैल आहे. ९००० फूट उंचीवर असलेल्या बनिहाल खिंडीपर्यंत चढणीचा रस्ता आहे. त्यानंतर रस्ता श्रीनगरच्या दरींत उतरतो.

श्रीनगरला पोंचायला संध्याकाळ झाली. झिमझिम पाऊस पडत होता, हवेंत गारठाहि चांगलाच होता. आमची उतरण्याची जागा गांवाबाहेरच्या, वृक्षांनीं

घेढलेल्या एका टेंकडीवर होती. घर खूप मोठं असलं तरी आंत सामान बेताबाताचं होतं. यामुळें मला 'मेन'च्या 'वसंत विश्रामा'ची आठवण झाली.

मी एका सुखवस्तु पंजाबी कुटुंबांत राहिलें होतें. फाळणीपूर्वी हे लोक पंजाबच्या—आतां पाकिस्तानच्या—ताब्यांत असलेल्या भागांत राहत. या घरांत कर्ते पुरुष म्हणजे आजोबा. ते नेत्रवैद्य होते. सुटींतहि कामापासून त्यांना खरी सुटका नव्हतीच.

घरामध्यें आजोबाआजींना फार मान व आदर दाखवला जाई. डोक्यावरून व्यवस्थित पदर घेतल्याखेरीज आजोबांसमोर जाण्याची छाती नव्हती कुणाची. रोज उठल्याबरोबर सर्वजण त्यांना नमस्कार करीत. ते कधीं अद्वातद्वा तिखट बोलत नसत पण त्यांच्या आवाजांतच अधिकाराची अशी छाप होती कीं त्यांची अवज्ञा कुणाच्या हातून होत नसे.

म्हाताऱ्या आजी चणीनं लहान, धार्मिक अन् प्रेमळ होत्या. त्या संस्कृत विषयाच्या एम्. ए. होत्या. हा त्यांचा पराक्रम आदरणीय होता यांत शंका नाहीं.

मी गेलें तेव्हां दोघी सुना, त्यांचीं मुलं, मेडिकल कॉलेजमध्यें शिकणारा मुलगा, तिघी सोळासतरा वर्षांच्या मुली अन् दोन लहान मुलगे एवढीं माणसं दिसलीं.

हें एक सनातनी हिंदु कुटुंब होतं. पूर्वपद्धतीनुसार घरांत पहांटे पूजाअर्चा, आरती वगैरे असे. आतां फक्त आजोबा-आजीच हें सारें करीत. "हीं नवीं पोरं धर्म विसरत चाललीं आहेत" असं आजोबांनीं आपलं मत व्यक्त केलं. रोज मलाहि ते सकाळच्या आरतीला बोलावत.

होमाजवळ बसून आजोबा वेदपठण करीत आणि स्तोत्रें म्हणत. विशिष्ट वेळेनंतर होमांत आहुति देत. तूप, पाणी, तीळ यांच्या आहुति म्हणजे हवा, पाणी व अन्न यांच्या शुद्धीचं प्रतीक समजल्या जात. इतर वेळींहि त्यांचं जपजाप्य चालूच असे.

काश्मीर हें हिंदुस्थानचं स्वित्झर्लंड मानलं जातं. भारतांत येणारे परदेशी पाहुणे आणि सुखवस्तु भारतीय लोक उन्हाळ्यांत तिकडे जायला फार उत्सुक असतात. माझा योग कांहीं चांगला नव्हता. मी अगदीं जेमतेम चारच दिवस राहिलें, अन् तेवढ्यांत पावसानं अगदीं पाठपुरावा केला. श्रीनगर हें शहर

आणि श्रीनगर ते पठाणकोट हा रस्ता याहून विशेष कांहींच मला पाहतां आलं नाहीं. पण जें मीं पाहिलं, त्यानं माझी निराशाच झाली. पुन्हा पंजाबच्या कोरड्या सपाटीवर परततांना मला फारसं वाईट वाटलं नाहीं.

काश्मिरी लोक हुन्नरी व कसबी कारागीर म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांची भरतकामांत विशेषच गति आहे. मी राहिलें होतें त्या घरच्या बायका, मुली नाती, बाजारांत नेहमीं जात. दुकानांत माल आकर्षक रीतीनें भरून ठेवलेला असायचा. दुकानाची व्याप्ति एका खोलीएवढीच. एका बाजूला भिंतीऐवजीं फळ्यांचं दार. 'सीझन'च्या लोकांच्या मागण्या पुरवण्यासाठीं कारागीर खपत होते. मांडी घालून खालींच बसून किंवा अगदीं कमी उंचीच्या चौरंगावर बसून त्यांचें झराझर काम चालू असे. बरोबरचे लोक जेव्हां पसंती करण्यांत किंवा किंमतीची घासाघीस करण्यांत गुंतलेले असत तेव्हां माझं लक्ष या कारागिरांच्या सुईवर असे. कांहीं नव्या प्रकारचे टांके लक्षांत आले तर पाहावें हा माझा उद्देश.

माझे ते चार दिवस फारच आळसांत अन् एक प्रकारच्या अस्वस्थतेंत गेले. नोकरांनीं सारीं कामं करायचीं आणि घरच्या बायकामुलांनीं रिकामटेकडा वेळ घालवायचा हा प्रकार मला मुळींच पटला नाहीं.

अशा घरांत मला खरं सुख लागलंच नाहीं. सबराचे विनतक्रार कष्ट, खेड्यांतील जीवनाचं साधेपण, वायजर्स, व्हायोलेट, बहेनजी यांचे अविश्रांत परिश्रम, छोट्या छोट्या खोल्यांमध्यें गर्दींत राहूनहि आनंदानं जीवन कंठणारीं रेटंडन रोडवरचीं नोकरमाणसं यांच्या संगतींत मी निश्चितच अधिक सुखांत व उत्साहांत होतें. निरुद्योगी आळशीपणानें श्रीनगरला दिवस कंठायची मला शरम वाटत राहिली.

## : १८ :

व्हायोलेट आणि फतेहपूरच्या बहेनजी दोघी ख्रिश्चन होत्या. शकूरचं कुटुंब मुसलमान होतं. काश्मीरांत हिंदू घरामध्यें मी राहिलें होतें. मनजितचं घर शीखधर्मी होतं. कावल नांवाच्या एका शीख मुलीशीं माझी दिल्लींत ओळख झाली होती. अमृतसरला जेव्हां मी तिच्या घरीं आठवडाभर राहिलें तेव्हां मला शीखधर्माची अधिक माहिती झाली.

कावलची अन् माझी ओळख झाल्याला वर्ष उलटून गेलं होतं. तसे तिचेमाझे संबंधहि फार वाढले नव्हते. त्यामुळें तिच्या घरांत माझं कसं काय स्वागत होईल या विचारानें मी अवघडलें होतें, पण तिचं अगत्याचं आमंत्रण पाहतांच माझ्या शंका वितळून गेल्या. आईबाबा परतल्यानंतर मी जेव्हां भारतांत एकटी राहिलें, तेव्हां तिचं मला पत्र आलं.

...'तूं अमृतसरला आलीस तर फार छान होईल. आमच्याकडेच उतरायला ये म्हणजे झालं. आमच्या घरच्या सर्वांना फार आनंद होईल. मी वाट पाहत आहें. तुझे येथील दिवस आनंदांत जातील याची सर्वजण काळजी घेऊं. तुझ्या इतर कार्यक्रमांत बसेल त्यानुसार जास्तींत जास्त दिवस आमच्याकडे यावंस. माझ्या मावशीचे यजमान माझे पालक आहेत. ते तुझेहि पालक आनंदानें होतील.'

... ... ...

मी गेलें तेव्हां अमृतसरच्या विमानतळावर कावल आणि तिचे मावसे आले होते. विमानतळ शहरापासून पांचएक मैलांवर आहे. श्रीनगर ते अमृतसर या

प्रवासाला दोन तास लागले. कावलच्या मावशीच्या यजमानांच्या छोट्या गाडींतून आम्ही शहरांत गेलों. कावलचं घर बैठं, साधं, जुन्या पद्धतीच्या विटांच्या बांधणीचं होतं. शहरांतल्या कँप विभागांतील एका शांत रस्त्यावर हें बांधलेलं होतं. एकूण रचना कांहींशी सबराच्या घरासारखी होती. अर्थात् हें घर मोठं होतं आणि वीज, नळ, या शहरी सुखसोयी होत्या हा भाग वेगळा.

मला घर दाखवतां दाखवतां जसजशी मंडळी भेटली, तसतशी कावलनं माझी ओळख सर्वांशीं करून दिली. एवढं मोठं कुटुंब पण सारे कसे गुण्यागोविंदानं राहत होते. माझं सर्वांनीं हार्दिक स्वागत केलं. घरांत सर्वांत मोठं माणूस म्हणजे कावलची पणजी. ती तिच्या आईच्या वडिलांची आई. शिवाय जुन्या पिढींतले म्हणजे आजी, आजोबा आणि मावसआजी.

प्रौढांच्या पिढीपैकीं तेव्हां कावलची मावशी, तिचे यजमान, मामा, मामी, मामेबहीण एवढे तेव्हां घरांत होते. हें कावलचं आजोळ होतं. तिच्या मावशीकडेच ती शिक्षणासाठीं राहिली होती. तिचे आईवडील दिल्लींत होते.

कावल सांगत होती कीं तिचं आजोळचं घर इतर एकत्र कुटुंबांपेक्षां निराळं होतं. सामान्यतः वडलांकडचे आजोबा कुटुंबप्रमुख असायचे पण इथें आईकडचे आजोबा होते. मावशी सासरीं जाण्याऐवजीं तिचे यजमान घरजांवई झाले होते.

हें एक डॉक्टर लोकांचं कुटुंब होतं. प्रख्यात डॉक्टर म्हणून कावलच्या आजोबांना सारं अमृतसर ओळखत असे. या वयालाहि ते सतत काम करतांना दिसत. ते वृत्तीनं उदार होते. ज्यांना शक्य असेल त्यांच्याकडूनच ते पैसे घेत. 'वसुली' हें त्यांचं ध्येय दिसलं नाहीं. कावलचे मामा नेत्रवैद्य होते, आणि मामी स्त्रीरोगतज्ज्ञ होती. तिच्या मावशीचे यजमान जनरल प्रॅक्टिस करीत, त्याबरोबरच एका मुलांच्या वैद्यकीय शिक्षणसंस्थेंत ते शिकवण्याचं काम करीत. मावशी स्वतः एका मुलींच्या शाळेची मुख्याध्यापिका होती. त्याच शाळेंत कावल जात असे. या दांपत्याशीं माझी चांगली ओळख झाली. डॉक्टरांची आज पन्नाशी उलटलेली होती. पण त्यांच्याकडे पाहून ते एवढे वयस्क वाटत नसत. पुराणमतवादी शीख असल्यामुळें आपले केंस वर बांधून ते त्यावर फेटा बांधीत. कावल आणि डॉक्टर स्वभावानं समानधर्मी होते. प्रचलित सामाजिक अवस्थेंत सुधारणा होण्याची आवश्यकता आहे याची जाणीव व

कळकळ दोघांनाहि होती. शीखधर्मावर अविचल श्रद्धा असूनहि त्यांच्या अंगीं सहिष्णुता होती. साध्या सरळ वृत्तीचे, अनौपचारिक वागणुकीचे अन् आपलं काम मन लावून करणारे. त्यांच्याशीं ओळख झाली याचा मला फार आनंद झाला.

कावल आणि मी तासन् तास गप्पा मारत असूं. माझ्या कल्पनांशीं इतके मिळतेजुळते विचार दुसऱ्या कुणाचेच नसतील. ती दिसायला पंजाबी मुलीप्रमाणेंच थोराड परंतु रूपवान् होती. तिचा रंग आणि कॆस जवळजवळ माझ्यासारखेच होते. त्यांच्यांत कॆस कापण्याची पद्धत नाहीं. तिच्या दोन वेण्या कंबरेपर्यंत रुळत. तिचे कपडे साध्या सुती कापडाचे असत. शीखधर्माचं चिन्ह म्हणून ती उजव्या हातांत पोलादी कडं घालीत असे.

कावल वुडस्टॉकच्या शाळेंत शिकली होती. तिथें तिनं अमेरिकन जीवनाचा अनुभव घेतला होता. मला ती दिल्लींत भेटली तेव्हां स्वच्छंद वृत्तीची, पाश्चात्य पद्धतीनं राहणारी छोकरी होती. दिल्ली पब्लिक स्कूल तिनं माझ्याआधींच सोडलं, आणि अमृतसरला डॉक्टरीचं शिक्षण घेण्यासाठीं ती आली. तिथें ती साध्या भारतीय जीवनाशीं समरस झाली. मी गेलें तेव्हां ती डॉक्टरीच्या अभ्यासाची पूर्वतयारी करीत होती. डॉक्टर होण्याची तिची फार इच्छा होती. तिचं मला नुकतंच पत्र आलं,

'...मी सध्यां सैन्यांतील रजिस्टर्ड नर्स म्हणून काम करण्यासाठीं शिक्षण घेत आहें. मी डॉक्टर व्हावं असा घरच्यांचा अजूनहि फार आग्रह आहे, पण प्रतिष्ठित घरच्या मुलींनीं परिचारिकेचा पेशा पत्करल्याखेरीज त्या व्यवसायाचा दर्जा उंचावणार नाहीं.'

दुसऱ्या एका पत्रांत ती लिहिते,

'हिंदुस्थानला—आतां भारताला—अजून इतकं पुढं जायचं आहे कीं अजस्र भासणारं हें कामाचं धूड पार पाडायचं ही अशक्य कोटींतली घटना वाटते. तरी आमची प्रगति धिम्या गतीनं कां होईना, पण निश्चित दिशेनं चालू आहे. पुढेंमागें स्वकीयांच्या किंबहुना मानव समाजाच्या अधिक उपयोगी पडावं असं मला फार फार वाटतं.'

कावलचं साधं दैनंदिन जीवन दिवस उजाडण्यापूर्वींच पांचच्या सुमाराला

सुरू होत असे. ७॥-८ च्या सुमाराला आम्ही परोठे आणि दूध घेत असूं. कामाचीं सर्व माणसं परत आल्यानंतर १॥ च्या सुमाराला जेवण असे. चौरस आहारामुळें पंजाबी लोकांची भारतांतील सर्वांत निरोगी व सशक्त प्रकृतीच्या लोकांमध्यें गणना होते.

रोजच्या जेवणामध्यें दहीं, भाज्या, फळं, दूध, कोंड्यासकट कणकेची रोटी यांचा समावेश असे. जेवण अत्यंत रुचकर असे. त्या घरांत जेवतांना मला संकोच असा कधींच वाटला नाहीं.

जेवणानंतर दुपारभर गप्पा आणि झोंप असा आमचा कार्यक्रम असे. नंतर दुधाबरोबर कांहींतरी थोडंसं तोंडांत टाकून आम्ही बाहेर पडत असूं, त्या जेवणाच्या वेळेला म्हणजे ९ च्या सुमाराला परत येत असूं. कुठें कॉलेजजवळच्या देवळांत, कधीं खेळांच्या सामन्याला, तर कधीं शहरांतील 'प्रेक्षणीय' स्थळं पाहायला. रात्रीं ११ पर्यंत अभ्यास, वाचन, शिवण, गप्पा यांत वेळ जायचा. मग गच्चीवर अशी छान झोंप लागायची!

अमृतसरमधले दिवस कसे गेले तें कळलंहि नाहीं. मीं शहराचा बराचसा भाग पाहिला. शीखांचं गुरुद्वार पाहिलं. त्याला ते लोक हरिमंदिर किंवा दरबार साहिब म्हणतात. त्याला सोन्याचा कळस असतो म्हणून आंग्लभाषिक त्याला 'सुवर्णमंदिर' म्हणतात.

मीं भारत सोडल्यानंतर एकदां कावलनं या शहराबद्दल मला लिहिलं,

'अमृतसर इतर शहरांपेक्षां खूप वेगळं आहे. इथें औपचारिक समाज-जीवन, नाचगाणीं, रात्रींचे क्लब हें कांहीं सांपडणार नाहीं. एकंदरींत शहर---विशेषतः दरबारसाहिबच्या आसपास—धीरगंभीर वातावरणांत वावरत असतं. इथले लोक धार्मिक असले तरी धर्मवेडे नाहींत. जेथें श्रद्धा आहे तेथें प्रेम आणि सुसंवाद ओघानंच येतात, नाहीं का? असं हें शहर—किंबहुना सारा भारतच आहे. सिंथिया, मला वाटतं जोंवर आम्ही पाश्चात्यांचं अंधानुकरण करण्यामागें नाहीं, तोंवर आम्ही असेच राहूं.'

पूर्व पंजाबच्या वायव्य टोंकाला, पाकिस्तानच्या सरहद्दीपासून अगदीं जवळ अमृतसर वसलेलं आहे. सध्यां या प्रांतांतच शीखांचीं बहुतेक कुटुंबं राहतात. त्यांच्या दहा गुरूंपैकीं नऊ गुरूंची कर्मभूमि म्हणजे पूर्वींचा अखंड पंजाब प्रांत.

शीख धर्माच्या अनुयायांची संख्या केवळ सहा लाखांच्या घरांतच असेल. उत्तर भारतांत, विशेषतः पंजाब आणि दिल्लींत या धर्माचं विशेष प्राबल्य आहे. हिंदुधर्माचीच एक शाखा म्हणतां येईल त्याला. त्यांत मुस्लिम आणि ख्रिश्चन धर्मांचंहि साम्य आढळतं. कावल म्हणते, "आम्हीं प्रत्येक धर्मांतील ग्राह्य तत्त्वं उचललीं आहेत." ग्रंथसाहेब हा त्यांचा धर्मग्रंथ. त्यामध्यें अनेक धर्मांमधील संतांनीं रचलेलीं स्तोत्रं आहेत.

या धर्माची स्थापना गुरु नानकांनीं १६ व्या शतकांत केली. तत्कालीन हिंदु आणि मुसलमान धर्मांविरुद्ध झालेल्या प्रतिक्रियात्मक बंडामधून हा धर्म निर्माण झाला. त्यांनीं नवा पंथ असा निर्माण न करतां सर्व धर्मीयांना बंधुभावानं वागण्याचा आदेश दिला. "संतजन बंध होत—मग ते कुठल्याहि धर्माचे असोत. मुंडन, लांबलचक प्रार्थना, वेदमंत्र, देहदंड या बाह्य देखाव्याला पुजूं नका. तर मोहमय जगतांत राहूनहि सदाचार आणि पावित्र्य यांचा अवलंब करा' हा गुरु नानकांचा मंत्र आहे.

हिंदूंच्या जातिव्यवस्थेवर त्यांनीं कडक टीका केली. 'जातपात, पिढीजाद मानमरातब, कीर्ति हें मूर्खपणाचं थोतांड आहे. देव कांहीं जातकुळी विचारणार नाहीं, तो कर्माचाच हिशेब मागेल!' असं ते म्हणत. 'देव एक आहे. त्याचं नाम सत् आहे. तो विश्वकर्मा, भयमुक्त, अजातशत्रु, अनादि, अनंत, स्वयंभू, उदात्त आणि जीवनदाता आहे'...असं म्हणतांना त्यांनीं आपली एकेश्वरी श्रद्धा प्रगट केली आहे असं दिसतं.

गुरु नानकाची शिकवण मानणाऱ्यांचा एक पंथ निर्माण झाला, त्याबरोबर अनेक बाह्य गोष्टी त्यांत आपोआप शिरल्या. त्यांनीं अग्राह्य ठरवलेलं कर्मकांड आणि प्रतीकवाद यापासून हा धर्महि वांचूं शकला नाहीं. कट्टर शीख आजहि पांच 'ककार' वापरतो. पोलादी कडं, कट्यार, कंगवा, विशिष्ट कपडा, केंस राखून फेटा—या गोष्टी धर्माचाच अविभाज्य भाग बनून बसल्या आहेत.

मी एका रात्रीं कावलच्या कुटुंबियांसह अमृतसरमधील सुवर्णमंदिरांत गेलें. हें शीखांच यात्रेचं पवित्र स्थान आहे. शीख धर्माचा उदय व प्रसार येथूनच झाला, त्यामुळें इतरांनाहि त्याचं महत्त्व वाटतं. एका विस्तीर्ण पुष्करिणीच्या मध्यावर मंदिराची भव्य इमारत आहे. पण त्या भव्यतेपेक्षां तेथील लोकांच्या

भावनेनं मात्र मला भारावल्यासारखं झालं. वेदीसमोर मंत्रपठण चालू होतं. तें ऐकण्यासाठीं आम्ही दुसऱ्या मजल्यावरच्या गॅलरींत बसलों. शीख मंदिरांत अनावृत मस्तकानं जातां येत नाहीं. खात्रीं पूजेसाठीं येणाऱ्या लोकांची सारखी ये-जा चालू होती. मंदिरांत आल्यावरोबर गुडघे टेंकून जमिनीपर्यंत लवून शीख लोक प्रणाम करतात. अग्निहोत्राजवळ 'ग्रंथसाहेब' मधून उतारे वाचत असतात. भाविक लोक दर्शनाला आले म्हणजे प्रदक्षिणा घालून इच्छेनुसार वाचन ऐकण्यासाठीं थांबतात.

आम्ही वर पुष्कळ वेळ बसलों, पण तो वेळ किती झटकन् निघून गेला. अमृतसरच्या मंदिरांत रोज जाऊन बसतां आलं तर काय बहार होईल, असे विचार अजूनहि कधींकधीं माझ्या मनांत येतात.

मीं पुष्कळ देवळं पाहिलीं होतीं. पण असं प्रसन्न आणि भक्तिमय वातावरण मला कुठेंच एवढ्या प्रकर्षानं आढळलं नव्हतं. कलकत्याच्या एका हिंदु मंदिरांत मला असाच कांहींसा अनुभव आला होता, पण त्याचा ठसा एवढा खोलवर उमटला नव्हता. तें देऊळ कालीमातेचं होतं. कालीचा भक्तगण बंगाली हिंदूंमध्यें फार मोठा आहे. त्या देवळांत अस्वच्छता, गर्दी, गोंगाट फार होता. भक्तांनीं चढवलेल्या फुलांच्या पूजेनं आणि नाण्यांनीं मूर्ति जवळजवळ झांकून गेली होती. देवीसमोर माणसं ध्यानधारणा करीत बसलीं होतीं.

कलकत्यालाच मी जैनांचं एक अत्यंत स्वच्छ आणि भरगच्च नक्षीकाम केलेलं मोठं देऊळ पाहिलं होतं. जैन धर्माचे अनुयायी थोडे आहेत, पण त्यांच्या तपोनिष्ठ वैराग्याबद्दल त्यांची भारतांत ख्याति आहे. आत्यंतिक अहिंसा, सर्वसंगपरित्याग यावर त्यांचा विश्वास आहे, त्यामुळें कोणत्याहि सचेतन वस्तूचा संहार हें पाप मानण्यांत येत. जंतूदेखील मरूं नयेत म्हणून कांहीं लोक तर नाकातोंडावर फडकं बांधतात.

जैन देवळांत भिंती, छत, जमिनी यांवर नक्षीकामाची अगदीं रेलचेल असते. भव्यता नसली तरी त्यामधील कलाकुसरीची मेहनत इतरत्र क्वचितच आढळणारी आहे.

नेपाळच्या आमच्या भेटींत आम्हीं पुष्कळ हिंदू व बौद्ध देवळं पाहिलीं. वैदिक हिंदुधर्म हा नेपाळी लोकांचा मूळ धर्म होता. पुढें खिस्तपूर्व तिसऱ्या

शतकांत प्राचीन सम्राट् अशोकानें आपले बौद्ध धर्मप्रसारक तेथें पाठवले. थोड्याच अवधींत नेपाळांतील बहुसंख्य प्रजा बौद्ध बनली. कालांतरानं या दोन धर्मांचं वेगळंच मिश्रण तेथें झालं, तें आजहि तेथें दिसतं. तथापि पुष्कळ लोक पुन्हा हिंदू बनले.

नेपाळमध्येंच स्वयंभूनाथाच्या देवळांत आम्ही गेलों होतों. हें मंदिर एका उंच टेकडीवर असून त्याला सहाशें पायऱ्या आहेत. बौद्धधर्मीयांचं हें पवित्र स्थान. तिबेटी बौद्ध येथें यात्रेला येतात. त्यांचा एक मठहि तेथें आहे.

मठांत जाण्याची आम्हांला परवानगी मिळाली. आंत साधारण अंधारच होता. समोर पोथ्या ठेवून एकेक पान उलगडून दोन ओळींत बसलेले भिक्षु निरनिराळ्या स्वरांत एकदमच पठण करीत होते, तें सुरेल नव्हतें, तरीहि कानांना आल्हादकारक वाटलें.

भिंतीच्या मध्यभागावर बुद्धचरित्रांतील प्रसंग कोरलेले होते. भारतांत ज्या देवतेचं मंदिर असेल, त्याची चित्रकथा भिंतीवर रेखाटलेली आढळते. मात्र या देवळांत एक मोठं मननीय चित्र होतं. बुद्ध, क्रॉसवरचा येशू, आणि गांधीजी यांच्या चित्राखालीं 'मानव्याची सेवा' असं लिहिलं होतं. सर्वच धर्मभक्तांनीं यांत बोध घेण्यासारखा आहे.

मी अमृतसरहून परत निघालें तेव्हां माझा गळा दाटून आला होता. मी जेव्हां शीख पद्धतीप्रमाणें 'सत् श्री अकाल' म्हणून निरोप घेतला, तेव्हां लौकरच इथें यावं, कावलला, तिच्या आणि आतां माझ्याहि बनलेल्या कुटुंबियांना, नोकरमाणसांना पुन्हा भेटावं अशी मला तीव्र इच्छा झाली. तिची आजी मला निघतांना म्हणाली, "बेटा! खूब पढो. ज्यादा विद्या पाओ."

: १९ :

जूनची अखेर किती लौकर आली ! जुलैच्या सुरुवातीला मी बोटीनं परतीच्या प्रवासाला निघणार होतें. त्या संबंधांत अमेरिकन एक्सप्रेस कंपनीचं पत्र कुठल्याहि क्षणीं येण्याचा संभव होता.

२० जूनच्या सकाळीं रेटंडन रोडवरच्या घराच्या आवारांत रामदासला मांडीवर घेऊन मी भगवानदासला इंग्रजी शिकवत होतें. तेवढ्यांत शकूर मला फोनवर बोलवायला आला. फोन कंपनीकडूनच आला होता. २ जुलैला मुंबईहून मार्सेल्सला जाणाऱ्या बोटीवर माझी व्यवस्था झाली असल्याचं मला त्यांनीं कळवलं. तेथून इटलींतील जिनोआ शहरीं जाऊन दुसऱ्या बोटीनं मी जुलैअखेर न्यूयॉर्कला पोंचणार होतें.

दुसऱ्याच दिवशीं साऱ्यांचा निरोप घेऊन मी मुंबईच्या गाडींत बसलें. दिल्लींत माझं घर होतं. माझं घर, माझीं माणसं मागें टाकून जातांना माझीं पावलं जड झालीं, डोळे पाणावले.

मुंबईच्या वाटेवर मी जळगांवला थांबणार होतें. काश्मीरांतल्या मंडळींच्या एका पारशी स्नेह्याच्या कुटुंबांत एक दिवस थांबून पुढें जावं असा बेत होता. जळगांव हें मुंबईराज्याच्या ईशान्य भागांतील मराठी भाषिक गांव. येथून हैद्राबाद राज्याची सीमा अगदीं जवळ येते.

आमची गाडी संध्याकाळच्या सुमाराला विंध्य पर्वतांत शिरली. दुसऱ्या दिवशीं अगदीं उजाडतांच मी जळगांवला पोंचलें. मला उतरवून घेण्यासाठीं साधारण माझ्याच वयाची एक मुलगी आणि एक मुलगा आले होते. हीं दोघं बहीणभावंडं म्हणजे त्या पारशी गृहस्थाचीं मुलं.

माझा तो दिवस या कुटुंबांत मोठा मजेंत गेला. या मुलांचे वडील पूर्वी एक दारूचं छोटंसं दुकान चालवीत. पण सध्यां दारूबंदीमुळें दुकान बंद झालें. आतां तेथें हॉटेल चालविण्याचा त्यांचा विचार होता. त्यासाठीं आवश्यक ते फेरबदल घराच्या दर्शनी भागांत चालू होते.

या कुटुंबांतील सर्वांनाच थोडंबहुत इंग्रजी येत होतं. त्यांची मातृभाषा मराठी होती. मराठी भाषा हिंदीला अगदीं जवळची आहे. त्यांचा धर्म पारशी होता. पारशी लोक म्हणजे झरतुष्ट्राचे अनुयायी. हा प्रेषित इसवी सनापूर्वी ६०० वर्षांच्या सुमारास आपलीं धर्मतत्त्वें पर्शियांतील लोकांस शिकवून गेला. स्वदेशांत त्यांचा वेगळा पंथ बनला. तथापि तेथील छळाला व असहिष्णुतेला कंटाळून त्यांनीं भारताच्या किनाऱ्याचा आसरा घेतला व पारशी समाजाची स्थापना केली. पारशी समाज छोटा असून त्यांची मुख्य वस्ती मुंबई राज्यांतच आहे.

त्यांच्यापैकीं बहुतेक सुविद्य आणि पाश्चात्य संस्कृतीचे अनुयायी आहेत. पुष्कळ लोक उत्तम व्यापारी आहेत. त्यांच्या पोशाखावरून त्यांना कुठेंहि ओळखावं. बंद गळ्याचा लांब कोट, पँट, घेऱ्याबरोबर बसणारी गोल टोपी अन् हातांतील वेताची छडी या लक्षणांवरून मुंबईत पारशी ओळखतां येतो.

दिल्लींत जरी पावसाची कांहींच नांवनिशाणी नसली तरी नैऋत्य मान्सूनचा पाऊस नुकताच मुंबईत जोरानं सुरू झाला होता, त्यामुळें उत्तर हैद्राबादमधील अनेक लहान नद्यांना पूर आले होते. मी आणि ते गृहस्थ सायकलीवरून जळगांवच्या बाहेर सुमारें आठ मैल गेलों, तेव्हां एक नदी लागली. वाहनांना पार होण्यासाठीं एक साधा दगडी पूल होता. एरवीं तो वाहनांना जायला यायला पुरेसा असतो. पण पावसाळ्यांत मात्र त्यावर तीनचार फूट पाणी सहज चढतं. आम्ही गेलों तेव्हां पाणी जरा ओसरून वाहतुकीला नुकती सुरुवात होत होती. कितीतरी मोटारी, ट्रक वगैरे २४ तास अडकून पडले होते. मोटारींचीं चाकं बुडतील एवढं पाणी अजूनहि होतंच. पाण्याला तशी ओढहि होती. मोटारी अत्यंत सावधगिरीनं हळूहळू पाणी कापीत येत होत्या.

आम्ही उभे होतों त्या बाजूनं दोन शेतकरी सातआठ गाई आणि कांहीं वासरं घेऊन निघाले. पण पाण्याच्या धारेनं जवळजवळ निम्मीं गुरं पुलावरून

वाहावलीं. नंतर त्यांना पकडून कांहींना या, तर कांहींना पलीकडच्या तीरावर ओढून काढलं.

माझ्या बरोबरचे गृहस्थ सांगूं लागले, 'तीन महिन्यांच्या उन्हाळ्यानंतर पावसाळ्याचा ओलावा अगदीं हवाहवासा वाटत असतो. पण एरवीं कोरड्या ठण्ण् असलेल्या नद्या एकाएकीं खळाळून वाहूं लागतात आणि पाण्याच्या लोंढ्याखालीं सपाट भाग बुडून जातो. प्रत्यक्ष मुंबई शहरांतहि या पावसानं हीच तऱ्हा होते. एकदां पावसानं ताल धरला म्हणजे रोज नेमानं कोसळतो आणि दीड महिन्याचा भर पावसाळा संपण्यापूर्वींच बहुतेक नद्यांना खूप पाणी चढतं. पण एवढं होऊनहि पुन्हा उन्हाळ्यांत पाण्याची ओरड असतेच.'

त्यांची मुलगी पेरीन हिच्याबरोबर मी जळगांव शहरांत फिरलें. मध्यम वस्तीच्या गांवांत आढळणाऱ्या सर्व सोयींखेरीज इथें खास स्त्रिया व मुलांकरितां बगीचा, एक चित्रपटगृह आणि एक चांगली बाजारपेठ आहे. अमूक एक गोष्ट मिळतच नाहीं असं सहसा होत नाहीं. गांवांत दोन कापूस-गिरण्या आहेत. पैकीं एक पेरीनच्या घरासमोरच होती.

पेरीनची धाकटी बहीण जळगांवच्या प्राथमिक शाळेंत शिकत होती. जळगांवमध्यें एक खाजगी आणि एक सरकारी अशा दोन दुय्यम शाळा आहेत. शिवाय शेतकीचं शिक्षण देणारी एक शिक्षणसंस्था आहे. तीन वाजतांच्या सुमाराला शाळा सुटल्या कीं रस्त्यावर शाळकरी मुलांची ही गर्दी उडायची.

एकमेकांचे हात धरून मुकाट्यानं जाणारीं लहान मुलं, आरडाओरड, दंगा करणारीं जरा मोठीं मुलं, त्यांचे आवाज, हंसणीं, उड्या, धांवपळ यामधूनच वाट काढत चाललेल्या, बरीचशीं पुस्तकं घेऊन टापटिपीनं जाणाऱ्या किशोरवयाच्या मुली, या सर्वांची गर्दी बघायला फार गंमत वाटायची.

जेवण झाल्यावर मी आणि पेरीन वरच्या मजल्यावर गेलों. तिथून खालचा रस्ता छान दिसत होता. रस्त्यावर बहुतेक मराठी माणसं दिसतात. निळ्या, तांबड्या, पिवळ्या, जांभळ्या अशा नानारंगी नऊवार साड्या चापून चोपून नेसणाऱ्या मराठी बायका दिसत. पण त्यांच्या पोशाखांत मला दिल्लींतील पोशाखाची शान दिसली नाहीं.

गुजराथी वस्तीहि तेथें आहे. या बायका सहा वार साड्या वेगळ्याच तऱ्हेनं

नेसतात. दागिन्यांनीं मढलेल्या मारवाडी बायका घूंगट घेऊन जातांना दिसल्या. पश्चिम पाकिस्तानांतून आलेल्या सिंधी निर्वासितांनीं इकडे आल्यावर बाडवडिलांचा गोषा धाब्यावर बसवलेला दिसत होता. त्यांच्या पंजाबी पोशाखामुळें त्या बायका वेगळ्या उठून दिसायच्या.

कपड्यांवरून बायकांप्रमाणें पुरुषांच्या प्रांतभेदाचा अंदाज चटकन् येत नाहीं. पारशी, अनवाणी चालणारे दिगंबरपंथी जैन, हेच जरा वेगळे ओळखतात.

रात्रीचं जेवण उरकल्यावर मीं मुंबईची गाडी पकडली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी दादरला आलें. दादर हें मुंबईचं एक प्रमुख उपनगर. निरनिराळ्या कुटुंबांत राहण्याच्या या प्रयोगांत आतां मला गुजराथी कुटुंबांत राहण्याची संधि मिळाली. निघण्याच्या दिवसापर्यंत मी त्यांच्या घरीं राहणार होतें. त्यांचं घर माटुंग्याला होतं. दादरला लागूनच माटुंगा हें उपनगर आहे. एका तीन खोल्यांच्या ब्लॉकमध्यें हे लोक राहत.

त्या तरुण जोडप्याला पाहतांच माझ्या मनांत असलेली आशंका कुठल्याकुठें नाहींशी झाली. मालती बहेन अगदीं सु-गृहिणी होत्या. स्वैंपाकपाणी संभाळून त्याशिवाय अर्थशास्त्र घेऊन एम्. ए. साठीं अभ्यास करीत होत्या. त्यांचे पति मुंबईच्या हायकोर्टांत नुकतेच वकील म्हणून प्रॅक्टीस करूं लागले होते. अगदीं नव्या पिढीचं तरुण दांपत्य होतं तें.

मुंबईला उन्हाळ्याच्या दिवसांत ११ तें ७ या वेळांत शाळा, उद्योगधंदा, यांची सारी गडबड चालते. मालतीबहेनचा दैनंदिन कार्यक्रम मी आत्तांपर्यंत पाहिलेल्या कुटुंबांपेक्षां वेगळा होता. सहाच्या सुमाराला उठून सात वाजतां आम्ही दूध घेत असूं. कांहीं वेळां फळंहि असत. नंतर मालतीबहेन स्वयंपाकाच्या तयारीला लागत, १० वाजण्यापूर्वीं जेवणं होत. १० वाजतां मालतीबहेनचे पति कामाला जात. मी तिथें असेतोंवर मालतीबहेनचे कॉलेजांतील तास चालू नव्हते. सकाळचं जेवण झालं, कीं आम्ही मुंबई बघायला, मित्रमैत्रिणींना भेटायला किंवा बाजारहाट करण्यासाठीं जात होतों. पांचच्या सुमाराला जिथें असूं तिथें चहाफराळ घेऊन, संध्याकाळचें जेवण मालतीला करावयाचें असल्यामुळें आम्ही घरीं परतत असूं.

त्यांचं जेवण स्वादिष्ट असे. स्वयंपाक करतांना निरीक्षण करून पुष्कळ गोष्टी

मी मालतीबहेनजवळ शिकलें. तीं दोघं पूर्णपणें शाकाहारी. या स्वतः गुजराथी हिंदू तर ते जैन. मालतीबहेन सांगत होत्या कीं स्वैंपाकघरांतलीं झुरळंमारण्याच्या बाबतींतहि त्यांना पतीशीं प्रथम वाद घालावा लागला !

क्षेत्रफळ व लोकसंख्या या दृष्टीनं मुंबई हें भारतांतील दुसऱ्या क्रमांकाचं शहर आहे. मराठी बोलणाऱ्यांच्या उत्तर आणि पश्चिम सीमेवर तर गुजराथी बोलणाऱ्यांच्या दक्षिण सीमेवर हें शहर आहे, त्यामुळें तें अमुक एका प्रान्ताचं शहर असें म्हणतां येत नाहीं. मराठी आणि गुजराथ्यांचीच मुंबईत वस्ती खूप. तरी मुंबईच्या पंखाखालीं सर्व धर्मांचे व सर्व प्रांतांचे लोक आहेत हें लक्षांत ठेवणं जरूर आहे.

निर्वासितांना मुंबईनें प्रेमानें आसरा दिला. सिंधी, शीख, पंजाबी, सारेच आले. राजस्थानच्या मरुभूमींतले मारवाडीहि दिसतात. हे अठरापगड लोक विशिष्ट भागांत समूह करून राहतात.

पंजाबी ड्रायव्हर्स तर दिसतच, पण पुष्कळदां मोटारदुरुस्तीच्या दुकानांत मेकॅनिक म्हणून दिसत. कामगार व बुद्धिजीवी वर्ग बहुतेक सर्व मराठी भाषिक. व्यापाराचीं सूत्रं बहुतेक पारशी व गुजराथी यांच्या हातांत आहेत. फाळणीच्या वेळीं अमानुष दंगे झाले, तरी मुंबईनं आजहि अनेक मुसलमानांना आश्रय दिला आहे. बहुतेक पारशांचीं घरं इथें आहेत. ख्रिश्चन आणि शीख तर भारतांतील प्रत्येक शहरांत आहेतच.

एखाद्या गर्दीच्या रस्त्यावर उभं राहिलं तर इतक्या जातीजमातींचे लोक जातांना दिसतात कीं आपण कोठल्या प्रांतांत आहों याचा अंदाजच करतां येत नाहीं.

मुंबईची चलनी भाषा म्हणजे हिंदुस्थानी. राष्ट्रभाषा असल्यामुळें साहजिकच तिचा उपयोग येथें होऊं लागला. बसमधले कंडक्टर, दुकानदार, भाजीबाजारांत दुकानवाले—सगळेच हिंदींतून व्यवहार करूं शकतात. तसं पाहिलं तर हिंदी कांहीं येथील बोलीभाषा देखील नाहीं.

मालतीबहेन आणि त्यांचे पति माझ्याशीं फार चांगले वागले. मला मुंबई दाखवण्यासाठीं त्यांना बराच त्रास पडला. एक आठवडाच जेमतेम आम्ही एकत्र होतों. पण भारत सोडतांना ज्या भावना माझ्या हृदयांत उचंबळून

आल्या, त्या त्यांना समजूं शकल्या. माझे शेवटचे दिवस मी त्यांच्याबरोबर घालविले याचा मला फार आनंद होतो.

२ जुलैचा दिवस उजाडला. पावसाळी जुलै महिन्याच्या मानानं हा दिवस कल्पनेबाहेर प्रसन्न होता. सूर्यदर्शन होत होतं. भारतीय क्षितिजावर सूर्याचीं पहिलीं पावलं उमटतांना पुन्हा कधीं दिसतील असा विचार मनांत तरळून गेला.

मी दहा वाजतां बंदरावर गेलें. कस्टमच्या भानगडींतून पार पडून १ वाजतां बोटीवर पोंचायला हवं होतं. पासपोर्टवर शिक्का मिळवण्यासाठीं जेव्हां मी रांगेंत उभी राहिलें, तेव्हां दुःखभावनेनं मला भारलेलं नव्हतं हें निश्चित. मात्र भविष्याबद्दलची अनिश्चितता तेवढी मनांत घर करून होती. ज्या देशांत मीं एवढा विशाल अनुभव घेतला, शिकलें, स्नेहसंबंध जोडले, तो सोडून जातांनाचं दुःख, हुरहुर या अनिश्चिततेच्या पटलाखालीं लपली होती. तिचं बाह्य स्वरूप साकार झालं नाहीं.

रस्ता मोकळा झाल्यावर १॥ च्या सुमाराला बोट सुटली. अरबी समुद्राच्या निळ्या लाटा मला भारतापासून दूर नेऊं लागल्या. डेकवर स्तब्धपणें उभी राहून मी मुंबईचा किनारा दृष्टिआड होईपर्यंत एकटक पाहत होतें.

अनुक्रम ... ३६८५७ वि:
... ११५०

# उपसंहार

भारतांत माझं दुसरं घर आहे या विचारांत मला फार सुख वाटतं. एसेक्सखेरीज दुसरीकडे कुठेंच मला इतकी आपुलकी वाटली नाहीं, लळा लागला नाहीं. कॉलेजशिक्षण संपवून पब्लिक हेल्थ नर्सचा शिक्षणक्रम पूर्ण केल्यानंतर तिकडे परत एकदां जावं, अशी माझी मनीषा आहे.

मला भारताबद्दल जो जिव्हाळा वाटतो, त्याचा एक दिवस सुमनजवळ मीं उल्लेख केला तेव्हां ती म्हणाली, 'तूं अजून लहान आहेस. कुणाला तरी आपली गरज आहे, आपलं कौतुक करणारं कुणीं आहे, या जाणिवेंत या वयाला फार समाधान वाटत असतं. तुला मीं आपलीशी केली, तुझ्यावर प्रेम केलं, आमच्या घरच्यांनीं अगत्यपूर्वक तुला सामावून घेतलं. हॉस्पिटलमध्यें मुलांच्या भागांत, उपचारकेंद्रांत तुझी गरज होती, तुझा गौरव होत होता. मी विचारतें, तुला आवडतो तो भारत कीं ही आपुलकी अन् गौरव?' मला वाटतं, 'मला आपल्यांत घेऊन जवळ करणाऱ्या प्रेमळ लोकांबद्दलची कृतज्ञता' एवढ्यानं माझी भारताबद्दलची भावना स्पष्ट होणार नाहीं.

कदाचित् माझी भावना कांहीं अंशानं भारतीय जीवन आणि आसमंत यांच्या साधेपणामुळें निर्माण झाली असेल. दिल्ली, चौला, शांतिनिकेतन, मरहेरा, फतेहपूर, बर्खुर्दारपूर, नानगल, अमृतसर या सर्व ठिकाणच्या साध्या जीवनाचंच मला आकर्षण असेल.

त्यामध्यें कांहीं भाग, माझ्याभंवतीं विशेषतः खेड्यांमध्यें ज्या रंगवैचित्र्यानं जीवनाचं सौंदर्य नटलं होतं, त्याचाहि आहे.

याच भावनेचा आणखी एक पैलू जीवनमान सुधारण्यासाठीं बद्धपरिकर

झालेल्या देशाच्या खंबीर निश्चयाच्या कौतुकानं आणि स्नेहादरानं चमकत आहे.

पण सर्वांत मोठं श्रेय आहे, तें माझ्या मित्रांना—माझ्या प्रेमाचा सर्वांत मोठा वांटा त्यांच्याकडेच आहे. सुमन, शकूर, नलिनी, कावल...असेच किती तरी. यांनीं मला पूर्वपश्चिमेची संधिरेषा दाखवली, पौर्वात्य आणि पाश्चात्य संस्कृती भेटूं शकतात हें दाखवलं एवढंच नव्हे, तर अमेरिकन आणि भारतीय मुलींमध्यें जो फरक दिसतो, तो वाटतो तेवढा मूलगामी नाहीं, हेंहि मला त्यांनीं समजावून सांगितलं. आमच्या व्यक्तिमत्वाचा गाभा या वरकरणी दिसणाऱ्या कवचांप्रमाणें भिन्न नव्हता, हें मला प्रत्यक्ष दिसून आलं.

हेंच जगांतील सर्व लोकांच्या बाबतींत खरं नाहीं काय ? मला वाटतं कीं भिन्नता आहे ती बाह्य लक्षणांमध्यें. वर्ण, भाषा, अन्न, कपडे—या अशा वरवरच्या गोष्टी भिन्नरूप असतात.

सांस्कृतिक भेदहि दिसतात. अमेरिकन आणि भारतीय जीवनपद्धति वेगळाल्या आहेत. काम, खेळ, सारंच निराळं. शिक्षण, आरोग्य, शेती यांचा दर्जा, कसोट्या वेगळ्या, अमेरिकेंतील निकष भारतांत निरुपयोगी. एका संस्कृतींतील नीतिकल्पना, विधिनिषेध दुसऱ्या संस्कृतींत अमान्य ठरतात.

ही बहिरंगाची भिन्नरूप माया, जीवन, कृति, विचार यांमधील भिन्नता आज राष्ट्राराष्ट्रांच्या मैत्रीच्या, समजुतीच्या आणि स्नेहसंबंधाच्या मार्गांतील अलंघ्य अडथळ्याप्रमाणें भासते. पण केवळ मानवप्राणी ही आपली जात आहे, याखेरीजहि संस्कृतिनिरपेक्ष असं कांहींतरी आपणां सर्वांच्यांत नाहीं काय ? सर्वांनींच उराशीं बाळगलेल्या अशा सार्वत्रिक भावना आणि मूल्यें आपल्याला आढळत नाहींत का ? ही जी मूलगामी समरूपता आहे ती बाह्य भिन्नतेहून कितीतरी जास्त महत्त्वाची नाहीं का ?

मला वाटतं जरूर आहे. हें साम्यच संस्कृतिजन्य अडथळ्यांच्या पलीकडे जाऊन चिरंतन मैत्रीचा लाभ भिन्न संस्कृतींतील लोकांनाहि करून देऊं शकेल.

ह्या साम्याचं ज्ञान झालं, आपण पाहतों तींच स्वप्नं जगांतील इतरहि व्यक्ति पाहतात हें लक्षांत आलं, तर जगांतील अपसमज दूर होतील, आणि समंजस-पणांतून स्नेह निर्माण होईल. आपली आशा या स्नेहांतून शांति निर्माण होईल हीच आहे.

REFBK-0013168